**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेतील विशेष बैठकीत नियम 260 अन्वयेचे दोन प्रस्ताव दर्शविण्यात आलेले आहेत. परंतु काल ठरल्या प्रमाणे हे दोन्ही प्रस्ताव क्लब करुन, दोन्ही प्रस्तावावर एकत्र चर्चा करण्यात येईल व मंत्री सुध्दा एकत्र उत्तर देतील. या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार हे सुरुवातीला विचार मांडणार होते परंतु ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे मांडतील व त्यानंतरचा दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत मांडतील.

**पृ.शी.**: मुंबई शहरात मोठया प्रमाणात वाढत असलेल्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेले अनेक प्रश्न व मुंबईतील गृहनिर्माण धोरण ठरविणे तसेच सर्वांगीण विकासासाठी नियोजनबध्द रितीने प्रयत्न होणे

**मु.शी.**: मुंबई शहरात मोठया प्रमाणात वाढत असलेल्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेले अनेक प्रश्न व मुंबईतील गृहनिर्माण धोरण ठरविणे तसेच सर्वांगीण विकासासाठी नियोजनबध्द रितीने प्रयत्न होणे या विषयावर सर्वश्री. संजय दत्त, गुरुनाथ कुलकर्णी, एस.क्यु.जमा, डॉ. एन.पी. हिराणी, श्री. सुधाकर गणगणे, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. सुभाष चव्हाण, श्रीमती उषाताई दराडे, प्रा. सुरेश नवले, श्री. जैनुद्दीन जव्हेरी, पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ. दिपक सावंत, सर्वश्री.मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, प्रकाश शेंडगे, अनिल परब, वि.प.स. यांचा अन्वये प्रस्ताव

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम २६० अन्वये पुढील प्रस्ताव मांडते.

" महाराष्ट्रातील मुंबई शहरात होत असलेल्या इमारती व टॉवर यांची बेसुमार निर्मिती याला मूळ कारण मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात वाढत असलेली लोकसंख्या, त्यामुळे राहत्या जागाचे भाव आकाशाला भिडणे, वाहनांची होत असलेली बेसुमार वाढ, बस, रेल्वे, रिक्षा व टॅक्सी यात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन रस्त्यावरुन चालण्यास धोक्याचे होणे, दिवसाकाठी अनेक तऱ्हेचे अपघात होत असून त्यात मोठ्या प्रमाणात जीवितहानी होणे तसेच कापड गिरण्या नष्ट होऊन तेथे उद्योग निर्माण होणे हे उद्योगधंदेवाले महापालिकेचे नियम धाब्यावर बसवून आपला व्यवसाय चालू ठेवणे, त्यामुळे मुंबईतील मध्यवर्ती असलेल्या रेतीवाला इंडस्ट्रीजमध्ये स्फोट होऊन १० कामगारांचा

...२

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ......

मृत्यू होऊन अनेक कामगार जखमी होणे, अशातऱ्हेच्या मुंबईत असलेल्या अनेक उद्योगात लहान मोठे अपघात होत असणे, तसेच लोकवस्ती वाढल्यामुळे कचरा व सांडपाणी यांचा ड्रेनेजवर विपरीत परिणाम होऊन प्रदूषणात वाढ होणे, यामुळे मुंबई शहरातील जनतेला विविध साथींच्या रोगांना तोंड द्यावे लागणे, तसेच वाढत्या लोकसंख्येने कायदा व सुव्यवस्थेवर होणारा विपरीत परिणाम, यामुळे त्यांना सर्व सुविधा पुरविणे शासनाला अशक्यप्राय होत असणे, याबाबत राज्यशासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम २६० अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"मुंबई शहर ही देशाची औद्योगिक, आर्थिक राजधानी समजली जाणे, तथापि या शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनबध्द रितीने प्रयत्न न होणे, केंद्र व राज्य शासनाचे या शहराकडे पूर्ण दुर्लक्ष होणे, केंद्र शासनाला देशातील एकूण आयकराच्या ३५ टक्के आयकर मुंबईतून मिळणे, तथापि केंद्र शासनाकडून मुंबईसाठी मिळणारी केंद्रीय मदत अत्यंत अपूरी असणे, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत रेल्वे प्रकल्प, रस्ते प्रकल्प यांची कामे अपूर्ण असणे, तसेच प्रकल्पग्रस्तांच्या पूनर्वसनाचे काम अत्यंत धिम्या गतीने होणे, मुंबईच्या ब्रिमस्टोवॅड प्रकल्पासाठी केंद्र शासनाने १०० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याचे मान्य केल्यानंतर त्याचेही काम रखडणे, माहीम-वांद्रे तसेच शिवडी-न्हावा या जलसेतूंची कामे दिर्घकाळ अपूर्णावस्थेत असणे, म्हाडाच्या भ्रष्ट व अनागोंदी कारभारामुळे भूखंडाची आरक्षणे बदलली जाणे, म्हाडाचे भूखंड कवडीमोलाने बिल्डर्सना विकले जाणे, राज्याचे गृहनिर्माण धोरण अद्याप निश्चित न झाल्यामुळे घरांची टंचाई व घरांचे भाव आकाशाला भिडणे, बिल्डर व विकासकांनी मुंबईचा ताबा घेणे, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या दुरुस्ती व पुनर्बांधणीचे काम अतिशय मंद गतीने सुरु असणे, एसआरए योजनेत अनेक प्रकारचे गैरव्यवहार होणे, मुंबईच्या पदपथावरील अनधिकृत झोपड्या, फेरीवाले, भिकारी व अतिक्रमणे याबाबत दीर्घ कालावधीसाठी एक निश्चित धोरण नसणे, रस्त्यांची व उड्डाण पुलांची कामे रखडल्यामुळे व वाहनांची संख्या बेसुमार वाढल्यामुळे वाहतुकीची कोंडी होणे, वाहतुकीतील

....३

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

बेशिस्तीमुळे शहरात अपघातांच्या संख्येत वाढ होणे, मुंबईत येणाऱ्या प्रचंड लोंढ्यामुळे सर्व प्रकारच्या नागरी सुविधांवर भयानक परिणाम होणे, स्थानिकांना मुंबई सोडून दूर जावे लागणे, पिण्याच्या पाण्याचा, आरोग्याचा व प्रदूषणाचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, या सर्व परिस्थितीमुळे असुरक्षित, संभ्रमित झालेला मुंबईकर याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : ज्या सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावरील चर्चेत भाग घ्यावयाचा आहे त्यांनी माझ्याकडे नावे द्यावीत. आता जे सन्माननीय सदस्य नावे देतील त्यांनाच या चर्चेत भाग घेता येईल. यानंतर सन्माननीय सदस्यांनी जरी नावे दिली तरी ती स्वीकारली जाणार नाहीत. आता सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी भाषणाला सुरुवात करावी.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सदनामध्ये मुंबई शहराच्या समस्यासंबंधीची चर्चा अनेक वेळा झाली आहे संयुक्त महाराष्ट्राचा लढा सुरु झाला तेव्हा व्दिभाषिक राज्याची विभागणी झाली होती. त्या लढया समोर अखेर केन्द्र सरकारला झुकावे लागले आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करावी लागली. परंतु बेळगाव, कारवार, निपाणीचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. ज्या मुंबई शहरासाठी 105 हुतात्मे झाले त्यांचे स्मारक पूर्वीच्या फ्लोरा फाऊन्टन येथे करण्यात आले आहे आणि आता तो चौक हुतात्मा चौक म्हणून ओळखला जातो. ज्या मराठी माणसांनी लढून मुंबई जिंकली आहे त्या मराठी भाषिक मुंबईवर , देशाची आर्थिक राजधानीवर जे प्रसंग येत आहेत ते प्रसंग जर आपण पाहिले तर पुन्हा एकदा मराठी माणसांवर हुतात्मा होण्याची वेळ येईल काय अशी स्थिती निर्माण झालेली आहे. मुंबईतील आमची टक्केवारी दिवसेंदिवस घसरत चालली आहे. परप्रांतियाचे जे लोंढे येतात त्यामुळे ही टक्केवारी घसरत चालली आहे.

सभापती महोदय, मी एक जुने पुस्तक चाळत होतो तेव्हा मला असे आढळून आले की, 1661 साली मुबईची लोकसंख्या फक्त 10,000 होती, 1681 साली ही लोकसंख्या 60 हजार होती, 1781 साली ही लोकसंख्या 1 लाख होती, त्यानंतर 1821 साली ही लोकसंख्या 8 लाख 21 हजार 764 होती, 1901 साली ही लोकसंख्या 9 लाख 27 हजार 694 होती, 1991 साली ही लोकसंख्या 99 लाख 25हजार 891 होती म्हणजे दहा पटीने लोकसंख्या वाढली आहे. आता मुंबईची लोकसंख्या दीड कोटी असून 2011 साली 2 कोटी 40 लाख एवढी मुंबईची लोकसंख्या होईल असा अंदाज आहे. जोपर्यंत मुंबईत येणा-या लोकसंख्येला आपण आळा घालणार नाही तोपर्यंत मुंबईचा विध्वंस होण्याचे थांबणार नाही.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

आम्ही जेव्हा 'परप्रांतियांचा लोढा' असा शब्द वापरतो तेव्हा सारेजण राज्यघटनेचा उल्लेख करतात. देशाच्या नागरिकाला देशामध्ये कोठेही जाण्याचा, राहण्याचा घटनेने अधिकार दिला आहे असे सांगितले जाते. या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करतो. काल परवाच त्यांच्या मुखातून असे स्टेटमेंट आले आहे की, घटनेप्रमाणे कोणाही व्यक्तीला कोठेही जाता येईल परंतु तेथे अनधिकृत बांधकाम करता येणार नाही. हे पहिल्यांदाच माननीय मुख्यमंत्र्यांच्या तोंडून वाक्य आलेले आहे. आपले हे धोरण अगोदर पासून असते तर काही प्रश्नच आला नसता. परंतु आपण या धोरणाशी किती विसंगत बोलता आणि वागता आहात हे मी आपल्याला पुढे सांगणारच आहे. आपले हे धोरण असले तरी त्याची अमलबजावणी होत नाही हे आमचे दुःख आहे. म्हणूनच या मुंबई शहरातील लोकसंख्या वाढत गेली आणि तिचा ताण मुंबई शहराला सहन होण्यापलिकडे गेला आहे. मुंबईच्या एकूण मूळ क्षेत्रफळाचा विचार करता, मुंबईची जुनी बेटे कशी होती ते आपल्या लक्षात येईल. आजचे मुंबई शहर जे वाढले आहे त्यामध्ये आपल्या या शहराची घनता उपनगरामध्ये अधिक वाढत गेली. मुंबईच्या उपनगरांमध्ये माणसांची घनता अधिक आहे. हे करताना आपण काय केले ? आपण जंगले साफ करीत गेलात. या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्री साहेबांना आठवण करून देतो की, आपण पहिल्यांदा काय पराक्रम केला तर काल-परवाच आपण युएलसी कायदा रद्द केला. त्याच्या मागील आपला काय दृष्टिकोन होता व आहे ते आपल्यालाच ठाऊक. पण हा कायदा रद्द करताना आपल्या कडे असलेले भूखंड आपल्याला वापरता आले असते. कारण त्या कायद्यात तरतूद होती की, एखादा भूखंड मालक त्याच्याकडे असलेल्या भूखंडाचा ठराविक कालावधीत उपयोग करीत नसेल तर तो भूखंड ताब्यात घेण्याचा शासनाला अधिकार आहे. या अधिकारानुसार शासनाला कारवाई करून येथील जमिनी ताब्यात घेता आल्या असत्या, त्यावर सर्वसामान्यांसाठी घरे बांधता आली असती. पण आपण तसे केले नाही. उलट पक्षी आपण युएलसी कायदा रद्द करताना मुलामा असा दिला की, हा कायदा रद्द केल्यानंतर मुंबईतील जागांचे भाव कमी होतील. असे आपण म्हणता आहात तर मग हा कायदा रद्द केल्यापासून मुंबईतील कोठल्या भागातील जागांचे भाव कमी झाले हे आपण येथे सांगितले तर मी आपले जरूर स्वागत करीन. हा कायदा रद्द केल्यानंतर अमुक भागातील जागांचे भाव घसरले आहेत हे आपण आम्हाला दाखवून द्यावे. उलट सारे बिल्डर्स, विकासक मोकाट सुटले. इतके की, त्यांच्यामुळे आज सर्व

..... सी 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सावंत ....

सामान्य माणूस, ज्याने या मुंबईसाठी बलिदान केले आहे त्यांना मुंबईत स्वत:चे घर घेण्याचे, असण्याचे स्वप्नदेखील पाहू शकणार नाही अशी परिस्थिती आपण निर्माण करून ठेवली आहे. ही मुंबई मराठी माणसांची राजधानी राहिली पाहिजे असे आपणास वाटत नाही का ? आज मुंबईतील एका झोपडीला 50 लाख, 1 कोटी रूपये देतो आणि ती जागा सोडून जा म्हणून कोणी सांगितले तर साहजिकच तो माणूस पैसे घेऊन ती जागा सोडून मुंबई बाहेर जाणार. बीकेसीमध्ये एवढा भाव आला तर निश्चितच झोपडी हटविण्यासाठी 1 कोटी रूपये द्यावे लागले आणि ज्याने कधी आयुष्यात 1 लाख रूपये देखील पाहिले नसतील त्याला अशा प्रकारे 1 कोटी रूपये मिळत असतील तर तो निश्चितच ती जागा सोडून मुंबई बाहेर जाईल आणि त्या पैशाच्या व्याजावर जीवन जगू शकेल. आज मुंबईमध्ये हे सारे अर्थकारण, राजकारण सुरू आहे आणि त्यामध्ये समाजकारण कोठेही नाही. यात सर्वसामान्य माणसाचा बळी दिला जाणार आहे. तुमची म्हाडा किंवा सिडको असू द्यात, त्यांनी त्यांच्या घरांचे भाव काय ठेवले आहेत, ते जरा लक्षात घ्या. मी आमच्या कर्मचारी बांधवांची एक सोसायटी केली आणि मी आपल्याला अभिमानाने सांगतो की, आम्ही त्यासाठी 1500 रूपये भावाने जागा दिली. आज त्या जागेला मार्केटमध्ये किमान 3 हजार रूपये भाव द्यावा लागतो आहे. पण आम्ही 1500 रूपयांनी दिली, आम्ही सहकाराच्या चळवळीतून ते केले. सभापती महोदय, आजही मुंबई, ठाणे भागामध्ये 1500 ते 2000 रूपये चौ.फूटाने जागा देणे शक्य आहे. पण ते कोण देणार ? कोणताही विकासक, बिल्डर ते देणार नाही, उलट त्याला त्यातून 100-200 पटीने कमाई करायची आहे. म्हणूनच म्हाडाने, सिडकोने त्यांच्या घरांचे दर हे सर्वसामान्यांच्या आवाक्यात येतील हे पाहिले पाहिजे. सिडकोने आज जी त्यासाठी उत्पन्नाची मर्यादा ठरवून दिली आहे ती 10 हजार रूपये मासिक उत्पन्न असले पाहिजे तसे असेल तरी तो ते घर घेऊ शकत नाही. परंतु त्याला तुम्ही त्याच्या खालीदेखील जाऊ देत नाही. ....

( यानंतर सौ. रणदिवे .... डी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ KGS/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 10:45

श्री.अरविंद सावंत . . . .

कारण त्याचे उत्पन्न दहा हजार रुपयांपेक्षा जास्त आहे. शिपायाचे उत्पन्न तेवढे आहे. पाचवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर त्याच्या उत्पन्नात वाढ झाली आणि आता सहाव्या वेतन आयोगामुळे त्याचा पगार आणखी वाढणार आहे. त्यामुळे तो माणूस 500 चौ.फुटाचे घर घेण्यासाठी एलीजिबल रहाणार नाही. हा माणूस घरामध्ये एकटा कमवत असून त्याचे उत्पन्न दहा हजार रुपयांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे तो छोटे घर घेऊ शकत नाही. मोठे घर घेण्यासाठी भाव जास्त आहे आणि त्यासाठी त्याला दहा लाख रुपयांचे कर्ज घ्यावे लागले तर तो ते घर कसे घेणार आहे ? हे मला सांगावे. अशा वेळी घर घेण्यासाठी जर सहा ते आठ लाख रुपयांचे कर्ज घेऊन, स्वत:कडील एक लाख रुपये त्यामध्ये घातले तरी तो माणूस कर्जाची परतफेड कशी करणार आहे ? मुलांचे शिक्षण कसे करणार ? तसेच त्या सोसायटीचा मेन्टेनन्स्चा खर्च, विजेचे बिल, पाण्याचे बिल कसे देणार आहे? अशा प्रकारे ही सगळी बिले देऊन तो संसार कसा करणार आहे ? हा प्रश्न आहे आणि अशा परिस्थितीत तो स्वत:चे घर घेऊ शकत नाही. म्हणून माझी अशी सूचना आहे की, उत्पन्नाची मर्यादा बदलली पाहिजे. तसे केले तरच सर्वसामान्य माणूस घर घेऊ शकेल. त्यामुळे याबाबतीत विचार करण्यात यावा.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, आज मुंबई शहरातील जलवाहिन्या या फार जुन्या काळापासूनच्या आहेत. गटाराच्या बाबतीत सांगावयाचे तर परवा चेंबूर येथे माननीय मुख्यमंत्र्यांनी ब्रिमस्ट्रावॅड प्रकल्पाचे उद्‌घाटन केले. हा प्रकल्प 14 वर्षापासून प्रलंबित होता. ठीक आहे, या प्रकल्पासाठी 1200 कोटी रुपये दिले. पण हा प्रकल्प वेळेवर सुरु झाला असता तर त्या साठी 500 कोटी रुपये लागले असते. पण कोणतीही गोष्ट वेळेवर करावयाची नाही हा राज्यकर्त्यांचा, शासनकर्त्यांचा खास गुण आहे. आज आपण मुंबई शहरामधून इन्कम टॅक्सच्या रुपाने, इतर करांच्या रुपाने केंद्र शासनाच्या तिजोरीमध्ये 95 हजार कोटी रुपये भरत आहोत. मग अशा वेळी सांगितले जाते की, मुंबईमध्ये बरीच कॉर्पोरेट ऑफीसेस सुरु झालेली आहेत. म्हणून मुंबईमधून मिळणारे उत्पन्न वाढलेले आहे.. यात तुमचे काय आहे ? सामान्य जनतेचा त्यात सहभाग आहे. परंतु ही कॉर्पोरेट ऑफीसेस पाटणा, कानपूर, अलाहाबाद इ.ठिकाणी का जात नाही? ही ऑफीसेस मुंबईमध्येच का येतात ? तर येथे त्यांना निश्चितपणे लाभ मिळतो. जर आपण मुंबई शहरामधून केंद्र शासनाला टॅक्सच्या रुपाने 95 हजार कोटी रुपये देणार असलो, तर अशा

. . . .डी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

वेळी राज्य शासन स्वत:चा हिस्सा मागणार आहे की नाही ? यासंबंधात केंद्र शासनाचे असे म्हणणे आहे की, आम्ही हा जो निधी जमा करतो, तो अविकसित राज्यांमध्ये देतो. महाराष्ट्र राज्य विकसित आहे असे त्यांचे म्हणणे आहे, म्हणजे एका बाजूला आम्ही विकसित आहोत असे सांगावयाचे आणि दुसऱ्या बाजूला मुंबईमधून जमा होणारा निधी इतर अविकसित राज्यांच्या विकासासाठी द्यावयाचा. परंतु असे करुनही त्या राज्यांमधून येणारे लोंढे थांबत नाहीत. ते त्यांचा विकासही करीत नाहीत आणि तेथील लोंढे मुंबईमध्ये पाठवितात. अशा वेळी आम्ही बाहेरुन येणाऱ्या लोंढयांचा ताण निधीशिवाय सहन करावयाचा काय ? त्यामुळे माझे म्हणणे असे आहे की, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे मागणी केली पाहिजे की, येथे लोंढे यावयाचे थांबलेले नाहीत. केंद्र शासन अविकसित राज्यांना पैसे देते. परंतु ती राज्ये स्वत:चा विकास करीत नाहीत. त्या राज्यांमधून येणारे लोंढे आम्हाला सहन करावे लागतात. त्यामुळे त्या अविकसित राज्यांमधून येणाऱ्या लोकांसाठी तरी आम्हाला निधी द्यावा. मुंबईमधून जमा होणारा निधी अविकसित असलेल्या राज्यांसाठी दिला जातो, अशा वेळी या रकमेतील 25 टक्के रक्कम महाराष्ट्र राज्यासाठी मिळाली पाहिजे आणि त्यातील अधिक वाटा मुंबईसाठी कसा देता येईल याचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पूर्वीच्या कालखंडामध्ये मुंबई शहरामध्ये किती टक्के वनसंपत्ती होती याबाबतीत माहिती द्यावयाची तर 1925 साली मुंबईतील 60 टक्के जमीन वनाखाली होती. पण ती 1994 पर्यंत 30 टक्क्यापर्यंत आली. 1925 ते 1994 या कालावधीमध्ये खारफुटीचे जंगल 28 टक्क्यावरुन 18 टक्क्यापर्यंत आले आणि याच काळामध्ये मुंबई शहरामध्ये कॉन्क्रीटीकरणाचे प्रमाण 12 टक्क्यावरुन 52 टक्क्यापर्यंत झाले. शास्त्रज्ञांनी असे दाखवून दिले आहे की, याच काळात मुंबईतून वाहणाऱ्या 6 उपनद्यांचे खोरे आणि हे पाणी ज्याठिकाणी जाते, त्या 4 खाडया अक्षरश: उध्वस्त करुन तेथे रस्ते, इमारती आणि झोपडपट्टया उभ्या करण्यात आल्या. मिठी नदीच्या बाबतीत काय झाले याची तुम्हाला माहिती आहेच. त्याबाबतीत काय झाले हे परत सांगण्याची गरज नाही. याबाबतीत सदनामध्ये बऱ्याच वेळेला चर्चा झालेली आहे. सध्या बांद्रा येथे आपण सेतू करीत आहोत. अशा वेळी खाडीचे मुख बुजविण्याचा प्रयत्न होत असेल तर ती अवस्था वाईट आहे. काल या सदनामध्ये ग्लोबल वॉर्मिंगबाबत चर्चा झाली.त्यावेळी पर्यावरणाचा समतोल न राखल्यामुळे काय-

. . . .डी-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

काय घडेल याची माहिती देण्यात आली. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील हे मान्य केले आहे. मी रॉयल पामच्या बाबतीत उदाहरण दिले आहे. मी राजकारणाच्या विरहित बोलत आहे, आपल्याला हात जोडून सांगतो.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत..

आपल्याला जसे मुबईबाबत प्रेम नाही तसेच त्यांनाही प्रेम नाही. जितके प्रेम आपल्याला लातूर बाबत आहे, तितके प्रेम मुंबई बद्दल नाही असे आमचे ठाम म्हणणे आहे. आपण राग मानू नका. आपण मुंबईवरील प्रेम थोडेसे वाढवा. आपण दिलदारपणे हे मान्य केले पाहिजे. आपण सांगितले होते की, येथे येऊन अनधिकृत झोपडपट्टया बांधू नका. याची अंमलबजावणी झाली पाहिजे. आता केवळ गोरेगाव, बोरीवली, मुलुंड येथे जे जंगल आहे तेथेच केवळ हिरवळ राहिलेली आहे. रॉयल पाम येथे गोल्फ क्लब बांधण्याकरिता जागा दिली होती. ती जागा आमच्या पक्षाच्या राज्यामध्ये दिली होती हे मला मान्य आहे. हे मी राजकारण विरहित बोलत आहे. पूर्वी तेथे सुंदर हिरवळ होती. आता गोरेगावमध्ये प्रचंड इमारती बांधल्या गेल्या आहेत. या जंगलामध्ये अपार्टमेंट बांधले जात आहेत. हे सर्व राजरोस सुरु आहे आणि हे सर्व राज्यकर्ते केवळ पाहत बसले आहेत.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सन 2006 साली सभागृहात सांगितले होते की, या संदर्भात चौकशी केली जाईल. परंतु आजपर्यंत रॉयल पामची चौकशी झालेली नाही. पवई येथे हिरानंदानी यासारखे मोठमोठे कॉंप्लेक्स उभे राहिले आहेत. मी आपणास सांगू इच्छितो की, 1969 साली, मी आयआयटीची एन्टरन्स परीक्षा देण्याकरिता पवईला गेलो होतो. तेथे एल ॲंड टी पासून आयआयटी पर्यंत 10 ते 12 फूटाचा रस्ता होता. या ठिकाणी सर्वत्र हिरवळ व जंगल होते. कांदीवली येथील ठाकूर कॉंप्लेक्स कधी उभा राहिला ते कळालेच नाही. हे लोक कधी आले, त्यांनी कधी प्रॉपर्टी घेतली, त्यांचे नाव 7/12 वर कधी लावले गेले हे पाहण्याकरिता आपण इतिहासात गेलो तर भयानक माहिती हाती लागेल. कधी बांधकाम करतात काहीच कळत नाही. तेथे असलेली सर्व हिरवळ, जंगले आज नष्ट झाली आहेत. तेथे त्यांनी सुंदर शहर वसवले, डोंगर कापून टाकले. या संदर्भात मी मुंबईच्या कमिशनरांना फोन केला होता, जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठविले होते. ही सर्व मंडळी खाजगीमध्ये सांगतात की, आपण कशाला आम्हाला अडचणीत आणता ? मी त्यांना सांगितले, तुमच्यापेक्षा मी जास्त अडचणीमध्ये आहे. हे सर्व मी उघडया डोळयांनी पाहू शकत नाही. या ठिकाणी रात्री जेसीबी आणून सर्व डोंगर धडाधड तोडण्याचे काम सुरु असते. दुस:या दिवशी आपण बघितले तर सर्व सपाट झालेले असते. अशा प्रकारे बांधकाम करण्यासाठी जमिनीचे सपाटीकरण केले जाते. कालच आपल्या सभागृहामध्ये ग्लोबल वॉर्मिंगबाबत





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत..

चर्चा झाली होती. मुंबई आज ज्वालामुखीच्या तोंडावर आहे. काल एक चित्र पाहिले होते. आपण दक्षिण मुंबईचे शांघाय करायला निघाले आहात. परंतु मुंबई ही मुंबईच राहू द्या.

सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांना मी सांगू इच्छितो की, युएलसी कायदा रद्द केल्यामुळे आता मोठमोठे टॉवर्स मुंबईमध्ये उभ्या राहणार आहेत. या इमारतीमध्ये राहणाऱ्यांना 24 तास पाणी मिळते. एसआरए योजनेअंतर्गत चाळीमध्ये राहणाऱ्या लोकांचे पुनर्वसन केले, त्यांना फ्लॅट दिला. परंतु त्यांना 24 तास पाणी मिळत नाही. जे लोक 4-5 करोड रुपयांचे फ्लॅट घेणारे आहेत त्यांना दिल्या जाणाऱ्या पाण्याचा दरही तोच. ज्या लोकांची 4-5 करोड रुपयांचा फ्लॅट घेण्याची ऐपत आहे. त्यांना पाण्याचा दर तोच कसा काय ? झोपडपट्टीवासीयांना दिल्या जाणाऱ्या पाण्याचा दरही तोच. खरे तर पाण्याचा दर बदलला पाहिजे. ज्यांच्याकडे प्रचंड पैसा आहे, ते पाणी विकत घेऊ शकतात, ते लोक बिसलेरीच्या बाटल्या विकत घेऊन पाणी पित असतात.

सभापती महोदय, भांडूप येथे पाण्याच्या शुद्धीकरणाचा प्रकल्प आहे. मुंबईमध्ये 2 ते 3 पाणी शुद्धीकरणाचे प्रकल्प आहेत. आपण बिसलेरी मधील पाणी पिणार नाही इतके शुद्ध पाणी तेथे असते. परंतु हे शुद्ध पाणी तेथून निघून, घरापर्यंत येताना अशुद्ध होते. पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांचे लिकेज होत आहे. खरे मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या ज्या जलवाहिन्या आहेत त्यांच्यावर व त्यांच्या लगत असलेल्या झोपडपट्ट्या हटवा. हे काम आज टॉप प्रायोरीटीने केले पाहिजे असे मला वाटते. आपण झोपडपट्टी वासियांना मानखुर्द येथे जागा दिली. तेथे श्रीमती सोनिया गांधी यांच्या हस्ते घरांच्या चाव्या देण्यात आल्या होत्या. हे सर्व आपण चांगले केले आहे. परंतु येथे असणाऱ्या जलवाहिन्या उघडया आहेत. हा फार मोठा धोका आहे. एखाद्या आतंकवादयाने जर जलवाहिन्या उडविण्याचे ठरविले तर त्यास ती उघडी जलवाहिनी उडविण्यास काहीही वेळ लागणार नाही. असे झाले तर मुंबई उद्ध्वस्त होईल.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

माझी हात जोडून विनंती आहे. या ठिकाणी टॉप प्रायोरिटी कशाला द्यावयाची असेल तर मुंबईतील ज्या मुख्य जल वाहिन्या आहेत त्यावरच्या झोपडपट्टया तातडीने काढाव्यात. मग त्या कोणाच्याही असोत. पक्ष आमचा असला तरी पर्वा नाही. परंतु कोठे तरी कठोर निर्णय घेतला पाहिजे. मी आणखी एका गोष्टीबाबत शासनाचे स्वागत करतो. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. टोपे साहेब, मी आपल्याला बोललो होतो. कर्नाकबंदर येथील रस्त्यावर ज्या झोपड्या होत्या त्या काढल्या गेल्या आहेत. माझगावपासून त्या झोपड्या काढल्या गेल्या आहेत. त्या ठिकाणी आंघोळ वगैरे सर्व उघड्यावर होत होते. आता त्या ठिकाणी काय होते ? एन.एन.पी.टी.ला कामकाज गेल्यामुळे या ठिकाणी वर्दळ कमी असते. त्या ठिकाणी जे गोडावून होते ते मोकळे होते. त्या ठिकाणी त्या लोकांनी बी.पी.टी. ची भिंत फोडली. हे लोक त्या ठिकाणी आत राहतात आणि बाहेर घाण करतात.

सभापती महोदय, मुंबईमधील वाहनांच्या बाबतीत भयानक परिस्थिती आहे. मुंबईमध्ये किती गाड्या अस्तित्वात आहेत ? मुंबईमध्ये 1951 मध्ये वाहनांची संख्या 37 हजार होती. 2006-07 मध्ये मुंबई शहरातील वाहनांची संख्या 12 लाख 94 हजार होती. अजून नॅनो कार यावयाची आहे. त्यामुळे होणारे प्रदूषण हा भाग वेगळा आहे. किडवई रोडवर ज्ञानेश्वर विद्यालय आहे. त्या ठिकाणी शिवडी ते किंग्ज सर्कलपर्यंत चौपदरी रस्ता आहे. ज्ञानेश्वर विद्यालयासमोर असलेल्या चौपदरी रस्त्यावर चोवीस तास पार्कीन्ग असते. तो हायवे आहे पण त्या ठिकाणी चोवीस तास टॅक्सी, लॉरीज, मोटरसायकली पार्क केलेल्या असतात. त्या ठिकाणी जे सेपरेटर बांधलेले आहेत ते उंच आहेत. त्या ठिकाणी राहणारा सर्व समाज जसे कावळे बसावेत त्या पध्दतीने त्या सेपरेटवर बसलेला असतो. त्या ठिकाणाहून गाड्या काढणे मुश्कील होते. त्या ठिकाणी मुलांना रस्ता क्रॉस करणे मुश्कील होते. परंतु काही लोकांना हात कसा लावावयाचा हा प्रश्न पडतो. मतांची लाचारी प्रत्येक ठिकाणी आडवी येते. एका विशिष्ट समाजाने काहीही केले तरी शासन त्याला हात लावत नाही. किडवई रस्त्याचा हा भाग साफ करावा.

सभापती महोदय, मुंबईच्या संदर्भात बोलावे तेवढे थोडे आहे. मी फक्त महत्वाचे मुद्दे मांडतो. मुंबईमध्ये फेरीवाल्यांचा प्रश्न आहे. आपण अनेक रेल्वे स्टेशनच्या बाहेर बघावे. त्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

ठिकाणी फेरीवाले असतात. त्या ठिकाणी ट्राफीक जॅम होत असते. मुंबईतील प्रदूषण, वाहने, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आरोग्याची व्यवस्था ही सगळी व्यवस्था कोलमडलेली आहे. शासनाने यू.एल.सी. कायदा रद्द केला. या ठिकाणी आणखी 1 लाख घरे बांधण्यात येणार आहेत. जेवढे लोक येतील तेवढे येऊ द्या पण त्यांना पिण्याचे पाणी कोठून देणार आणि कसे देणार ? त्यांच्या आरोग्याची व्यवस्था कशी करणार ? हिरानंदानी यांनी सुंदर नगरी बसवली. परंतु त्या नगरातील रस्ते छोटे आहेत आणि त्या रस्त्याच्या लगत 30 मजली, 40 मजली इमारती बांधलेल्या आहेत. ज्या ठिकाणी चौपदरी किंवा 60 फुटी रस्ता पाहिजे त्या ठिकाणी फक्त 40 फुटी रस्ता आहे आणि त्या रस्त्याच्या लगत 30 मजली, 40 मजली इमारती बांधलेल्या आहेत. त्याला कोण परवानगी देतो. आपण महानगरपालिकेवर ढकलणार आणि महानगरपालिका शासनावर ढकलणार. या ठिकाणी दुसरीकडे बीएमआरडीएचे दिव्य चालू आहे.

सभापती महोदय, सायनला उड्डाण पूल आहे. आपण ठाण्याला जात असताना पाहात असाल. सायनला एकतर्फी उड्डाण पूल बांधलेला आहे. आता त्या ठिकाणी एक लाईन तिकडून येण्यासाठी ठेवलेली असते. हा पूल बांधतानाच दुतर्फा बांधावयास पाहिजे होता. विक्रोळीला जो उड्डाण पूल बांधलेला आहे त्या ठिकाणी कांजूरमार्ग रेल्वे स्टेशनच्या पूलाजवळ चिंचोळा भाग झालेला आहे. त्या ठिकाणी आय.आय.टी. जवळ बॉटल नेक तयार झाला. हे बॉटल नेक काढणार की नाही ? आय.आय.टी. जवळचा बॉटल नेक आपण काढला पण गुरुव्दारा हटून बसला आहे. जोगेश्वरी-विक्रोळी लिंकरोड येथील उड्डाण पूल पूर्ण न झाल्यामुळे ते काम तसेच पडून आहे. त्या कामाला आणखी किती वर्षे लागणार आहेत ? एअरपोर्टजवळ काय हाल आहेत हे आपल्याला माहीत आहे. त्या ठिकाणी पुलाचे काम सुरु आहे. मुंबईतील समुद्र किनाऱ्यांची अवस्था काय आहे ? माहीम येथे मिठी नदीच्या बाबतीत काम केले पाहिजे. शिवाजी पार्कसमोर घाण होत चालली आहे. समुद्राच्या भरतीचे पाणी खाडीमध्ये घुसले पाहिजे. तरच त्या खाडीमधील जीवितांचे रक्षण होते. त्या ठिकाणी जी तिवरांची, खारफुटीची झाडे आहेत त्यांना ते पाणी लागते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

वांद्रयाला पक्षी अभयारण्य होते. पूर्वी तेथे पक्षी उडताना दिसत होते. आता कोणतेही पक्षी दिसत नाहीत. हा धोका कोण ओळखणार की नाही ? ग्लोबल वॉर्मिंगची आता भीती व्यक्त करण्यात येत आहे. शासनाला जे सहज करता येणे शक्य आहे ते केले जात नाही. शासन मुंबईतील रस्ते वाढवू शकत नाही. परंतु मुंबईतील वाहतूक मर्यादित करु शकते. नवी मुंबई, ठाणे येथून ट्रक येतात. सिमला वा नैनितालला ठराविक वेळेमध्ये वाहतूक बंद केली जाते, कारण ते छोटे स्थान आहे. त्याप्रमाणे आपल्याकडे सकाळी 9 ते रात्री 9 या वेळेमध्ये शहरामध्ये येणारी ट्रकची वाहतूक बंद करावी. नवी मुंबई येथे प्रचंड जागा आहे. तेथे एक वाहन तळ बांधावे आणि रात्री 9 नंतर तेथून ट्रक मुंबईला येऊ दिले तर मुंबईतील दिवसभराची वाहतूक थोडी कमी होईल. मुंबईतील वाहतूक थोडा वेळ तरी सुरळीत होईल, हे बंधन शासन घालू शकेल. या ट्रकवाल्यांचा व्यवसाय रात्री चालू शकेल. तसेच ट्रकखाली मुले चिरडून मरण्याचे प्रकार कमी होतील. हा एक प्रयोग शासनाने करुन पहावा. सभापती महोदय, सकाळी अनेक लोक कार्यालयासाठी जात असताना कचऱ्याची गाडी आमच्या पुढे असते. त्या गाडीतील अर्धा कचरा रस्त्यावर पडत असतो. महानगरपालिकेतील अधिका-यांना हा हसण्यासारखा विषय वाटेल. परंतु कचऱ्यांच्या गाडयांची वेळ बदलता येऊ शकते. त्यांची वेळ रात्रीची करावी. लोकांना सकाळी कार्यालयात जाताना वा मुलांना शाळेमध्ये जाताना प्रसन्न वातावरणातून जाऊ द्यावे. सभापती महोदय, आम्ही शाळेत जात होतो त्यावेळी मुंबईतील रस्ते पाण्याने धुताना आम्ही पाहिले आहेत. आता पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. त्यावेळी धुतलेल्या रस्त्यावरुन आम्ही जात होतो. आता धूळ खात जातो. ग्लोबल वॉर्मिंगमध्ये कचऱ्याचा सुध्दा विषय अंतर्भूत आहे. त्यामुळे कचऱ्याचे मॅनेजमेंट केले पाहिजे. मुंबईत कचरा किती टाकला जातो आणि त्या कचऱ्याचे काय करणार आहात, त्याबाबत नियोजन आहे काय ? केवळ केंद्र सरकारचा पैसा मुंबईसाठी आणला म्हणून सर्व प्रश्न सुटले असे नाही. ब्रीमस्टोवॅड येईल तेव्हा येईल. स्टॉर्म वॉटर आहे त्याचे नियोजन नाही. त्याचे काम अद्याप सुरु झालेले नाही. मुंबईने एकदा प्रलय पाहिलेला आहे. आता ग्लोबल वॉर्मिंगच्या नावाखाली मुंबई बुडणार, मुंबई बुडणार अशी चर्चा चालू झाली आहे. सभापती महोदय, मुंबईतील.....

2...

NTK/ KGS/ KTG/

श्री.अरविंद सावंत....

पर्यावरण सांभाळण्याची गरज आहे. मुंबईतील झोपडपट्टयांचा प्रश्न एकदाच काय तो निकाली काढावा. शासन रोज नवीन नवीन आकडेवारी जाहीर करीत आहे. आज 225 चौ.फूट, उद्या 360 चौ.फूट, मग 269 चौ.फू.बिल्टअप एरिया असे सांगितले जात आहे. यापूर्वी ज्यांच्या एस.आर.ए.च्या योजना मंजूर केल्या आहेत त्यांना 225 चौ.फूटांची घरे मिळतील. त्यामुळे ते ओरडत आहेत. आता ते 360 चौ.फूटांचे घर द्यावे अशी मागणी करीत आहेत. त्यांच्यात भांडणे सुरु झाली आहेत. यातून म्हाडा कसा मार्ग काढणार हा खरा प्रश्न आहे. लोकांना स्वस्त आणि चांगली घरे द्यावीत. जोपर्यंत ज्या इमारतींचे आयुष्यमान 100 वर्षे असू शकेल अशी घरे बांधली जात नाहीत, तोपर्यंत हे थांबणार नाही.

सभापती महोदय, मुंबईतील परप्रांतियांचा लोंढा हा महत्वाचा प्रश्न आहे. सभापती महोदय, विधानमंडळाच्या लिफ्टमध्ये मागील अनेक दिवसांपासून एकच गाणे ऐकावयास मिळते, ऐ दिल ए मुश्कील है जीना यहाँ, जरा हटके, जरा बचके, ये है बम्बई मेरी जान. मुंबई आमचा जीव आहे, प्राण आहे. हुतात्मा चौकावर केवळ पुष्पचक्र वाहण्यासाठी आम्ही जात नाही. तेथे आम्ही मनोमन म्हणत असतो की, होय रे, तुम्ही मुंबईसाठी रक्त सांडले आहे, ही मुंबई मराठी माणसांची कशी राहील त्यासाठी आम्ही सतत प्रयत्न करु. ती मराठी माणसांच्या हातातून कोणी हिसकावून घेण्याचा कितीही प्रयत्न केला तरी ते शक्य होणार नाही. (अडथळा)

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 11:05

**<u>सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषा दराडे</u>**

(श्री. अरविंद सावंत....)

या निमित्ताने मला या सदनाचे माजी सदस्य स्व. प्रमोद नवलकर यांची सुध्दा आठवण होते. या मुंबई शहराच्या संबंधी "टाईम्स ऑफ इंडिया" या दैनिकामध्ये बातम्या छापून येतात. आज या मुंबईमध्ये काय काय चालले आहे याकडे कोणाचे लक्ष नाही. मुंबईचे चारित्र्यसुध्दा संपत चालले आहे. सांस्कृतिक चळवळीची केन्द्रे हळूहळू नामशेष होऊ लागलेली आहेत. गिरगावची एक संस्कृती होती. परळ, लालबाग या गिरणगावाची स्वत:ची संस्कृती होती. त्यानंतर पुढे पार्ला, मुलुंड ही सुध्दा मुंबईतील सांस्कृतिक केन्द्रे बनली. आता ही सांस्कृतिक केन्द्रे हरपत चालली आहेत. नव्या पिढीला या मुंबई संबंधी काहीच कळत नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये जाणा-या या नव्या पिढीला या मुंबईचा इतिहास माहीत व्हावयास पाहिजे. आता त्यांच्या आई-वडिलांनाच तो माहीत नसेल तर त्यांना तरी तो कुठे माहीत असणार ? म्हणून ही नवी पिढी या मुंबईकडे वेगळयाच दृष्टीने पहाते. 105 हुतात्म्यांनी या मुंबईसाठी कसे रक्त सांडले, मुंबई कशी निर्माण झाली, संयुक्त महाराष्ट्राचा लढा कसा झाला यासंबंधीचे धडे सर्व माध्यमांच्या शाळांतून शिकविले तरच हा महाराष्ट्र आणि ही मुंबई कशी निर्माण झाली हे नव्या पिढीला समजेल. जेव्हा आम्ही ही मुंबई कोणाची असे बोलतो त्यावेळी ही पिढी म्हणते की, हे असे काय बोलतात ? कशासाठी हे भांडतात ? याचे कारण नव्या पिढीला या महाराष्ट्राचा आणि मुंबईचा इतिहास माहीत नाही. कोणतीही शाळा विद्यार्थ्यांना हुतात्मा चौक दाखविण्यासाठी, तेथे नतमस्तक होण्यासाठी, त्यांच्या बलिदानाची गाथा त्यांना सांगण्यासाठी मुलांना घेऊन येत नाही. हे जोपर्यन्त होत नाही तोपर्यन्त नव्या पिढीला ही मुंबई कशी झाली हे कळणार नाही. त्याना फक्त बाजार कळतो. अमेरिकेने सगळया जगाचा बाजार मांडलेला आहे. तेथे सगळे मार्केटिंग चाललेले आहे. विकत घ्या आणि विकत द्या, एवढया पुरताच तेथे संबंध आहे. ऋणानुबंध, प्रेमाचे संबंध, मातीशी संबंध तेथे नाहीत. आमचा संबंध येथल्या मातीशी आहे. येथल्या मातीत आम्ही खेळलो आहोत. सभापती महोदया, माझे म्हणणे असे आहे की, ही मुंबई बकाल होण्यापासून तिला वाचवा. मी आपल्या राष्ट्रकुल संसदीय मंडळातर्फे चिन, हाँगकाँग या देशांचा दौरा केला होता. हाँगकाँग मधील सेनझेन येथे एसईझेड प्रकल्प सुरु आहे. सेनझेनच्या सीमेवर आपल्या येथील टोलनाक्याप्रमाणे मायग्रेशन सेंटर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

आहे. त्याठिकाणी बसेस, मोटारी थांबतात. प्रत्येक माणसाला सेनझेनमध्ये जाण्यापूर्वी त्याला दिलेले परमिट तेथे स्क्रोल करुन आत जावे लागते आणि परत बाहेर जाताना पुन्हा ते परमिट स्क्रोल करुन बाहेर यावे लागते अशी पध्दत आहे. एखादा माणूस परत आला नाही तर त्याची चौकशी होते. कारण हाँगकाँग मधून एखादा माणूस सेनझेनमध्ये गेला तर तो परत हाँगकाँगमध्ये असला पाहिजे याची दक्षता तेथे घेतली जाते. या मुंबई शहराच्या बाबतीत देखील अशी व्यवस्था केली पाहिजे. मी कोणाच्या विरुध्द बोलत नाही. परंतु आपल्या घटनेतील अनुच्छेद 19(ब) मध्ये ह्या संबंधी सांगितलेले आहे. सभापती महोदया, या सभागृहामध्ये क्षमतेपेक्षा जास्त सदस्य बसू शकत नाहीत. लोकसभेच्या खासदारांची संख्या 588 आहे. ही सदस्य संख्या सीमित करण्यात आली. कारण सदस्य संख्या वाढली तर तेथे बसण्यासाठी जागाच शिल्लक राहाणार नाही. म्हणून शेवटी या मुंबई शहराची देखील काही क्षमता आहे. पाणीपुरवठा, आरोग्य, रस्ते, पर्यावरण या सर्व गोष्टीचा विचार करता निदान यापुढे तरी एक कडक अशा प्रकारचे धोरण अवलंबिले पाहिजे. आज मुंबई शहरामध्ये माणसांचे लोंढेच्या लोंढे येत आहेत. त्यांनी येऊ नयेत असे मी म्हणत नाही. परंतु आज मुंबई शहराची अवस्था काय झालेली आहे ? मुंबई शहरातील स्थानिक लोकांची संख्या दीड कोटी आहे. तसेच नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने ठाणे, कल्याण, पुणे, नाशिक येथून मुंबईमध्ये येऊन परत जाणारे जे अदृश्य लोंढे आहेत त्यांचीही संख्या फार मोठ्या प्रमाणावर आहे. म्हणजे मुंबईची स्वत:ची लोकसंख्या दीड कोटी आहे. ही दीड कोटी लोकसंख्या आणि रोज येणारे अदृश्य लोंढे याचा विचार केला तर पाण्याची किती व्यवस्था लागते. हे कुठे तरी थांबणार आहे की नाही ? यावर कुठे तरी नियंत्रण करणार आहात की नाही ? म्हणून परवाना पध्दत आणली पाहिजे. माझा परप्रांतीयांवर राग नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

आम्हाला त्यांच्याबद्दल व्देष नाही. ते लोक रोजगारासाठी मुंबईमध्ये येतात ही गोष्ट आम्ही समजू शकतो. परंतु मुंबई शहरातील स्थानिक बेरोजगार वणवण करीत फिरत आहे. "असुनी खास मालक घरचा, म्हणती चोर त्याला " असुनी खास मालक घरचा मराठी माणूस रोजगारासाठी फिरतो आहे. बाहेरुन येणारी माणसे चार दिवस प्रेमाने राहतात. ते घरात घुसतात आणि नंतर घरच्याच माणसाला बाहेर काढतात अशी अवस्था आज आमची झाली आहे. "भटाला दिली ओसरी आणि भट हातपाय पसरी " अशी म्हण आहे. आम्ही आमची ओसरी या परप्रांतीयांना प्रेमाने दिली. मराठी माणूस अतिशय उदार आहे, मराठी माणूस हा पाहुण्यांचे स्वागत करणारा आहे. परंतु पाहुण्यांनी आता एवढे हातपाय पसरले आहेत की, मराठी माणूस ओसरीत आणि ते पाहुणे मालकांच्या घरात अशी अवस्था आज झाली आहे. मुंबई शहराचे नियंत्रण करण्यासाठी मी मागणी करतो की, मुंबई शहरात परप्रांतीयांना येण्यासाठी परवाना पध्दत सुरु करावी. शासन गृहनिर्माण धोरण जाहीर करणार आहे ते मराठी माणसाच्या हिताचे असले पाहिजे. या मुंबईत शहरात अनधिकृत झ ोपडपट्टया वाढल्या आहेत. या शहरात अनधिकृत बांधकाम केले म्हणून एका तरी अधिका-यावर कारवाई केली आहे याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी सांगावी. अनधिकृत बांधकामांना वॉर्ड ऑफिसर आणि पोलीस अधिकारी यांना जबाबदार धरले जाईल अशा प्रकारचे जाहीर वक्तव्य या सभागृहात केले गेले आहे. त्याप्रमाणे एका तरी अधिका-यावर कारवाई केली आहे काय यासंबंधीचा खुलासा माननीय मंत्र्यांनी करावा. मुंबई शहरात मोठया प्रमाणात अनधिकृत झोपडपट्टया वाढल्या आहेत त्याला जबाबदार कोण आहेत ? या गोष्टीस राजकारणी लोक तर जबाबदार आहेतच परंतु या गोष्टीस आपण सगळेच जबाबदार आहोत. परंतु अशा झोपडपट्टया तोडण्याच्या कारवाईला सुरुवात केली तर तुमच्याच पक्षाचे लोक आडवे येतात. मी 1996 साली आमदार झालो त्यावेळी मनोरा आमदार निवासाच्या बाजूला पूर्वी झोपडयांच्या दोन रांगा दिसत होत्या. आता त्या ठिकाणी झ ोपडपट्टीच्या सहा रांगा झाल्या आहेत. आता मला अशी माहिती मिळाली आहे की, त्या झ ोपडपट्टीच्या जागेवर मोठ्या इमारत बांधली जात आहे. त्या झोपडपट्टीत राहणारे लोक मोठे नशिबवान निघाले. त्या ठिकाणी मोठी इमारतीचे बांधकाम झाल्यानंतर तेथील झेपडपट्टी धारकांना समुद्र किनारी रहावयास मिळणार आहे. मुंबईतील मराठी माणूस हा अजूनही चाळीत राहतो आहे. मराठी माणूस ज्या जुन्या इमारतींमध्ये आहे त्या इमारती कोसळण्याच्या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

अवस्थेत आहेत. त्यांचे ब्लॉक पडण्याच्या अवस्थेमध्ये आहेत. ज्यावेळी अनधिकृत झोपडपट्टया तोडण्याची कारवाई करण्यास महानगरपालिकेचे अधिकारी गेले होते, त्यावेळी ती कामे तोडू नका म्हणून श्रीमती शबाना आझमी त्या ठिकाणी गेल्या होत्या. स्व. सुनील दत्त देखील तेथे गेले होते. अनधिकृत कामे तोडण्यास अधिकारी गेले तर त्यांना आडवे कोण जाते याचा तुम्ही शोध घ्यावा. शोध घेतल्यानंतर त्यांची नावे आपल्याला कळतील. प्रत्येक अनधिकृत झोपडपट्टीवर कारवाई करण्यास अधिकारी गेले तर हीच माणसे अधिका-यांना अडवितात. कधी कधी आमच्या पक्षातील देखील माणसे अधिका-यांना आडवी आली असतील. परंतु ती गोष्ट चूक आहे. मुंबईचा विध्वंस करण्याचा अधिकार कोणालाच नाही. या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री महोदय उपस्थित आहेत, त्यांना सांगू इच्छितो की, मुंबई शहरात मोठया प्रमाणात झोपटपट्टीदादा निर्माण झाले आहेत, त्यांना तुम्ही ढोपरापासून कोपरापर्यंत सोलून काढा. मुंबई शहरात रोज एक नवीन झोपडपट्टी कशी निर्माण होते याचा शोध घेण्याची गरज आहे. माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री. टोपे साहेब, मी तुम्हाला मागे विनंती केली होती की, मुंबईतील खरी परिस्थिती काय आहे हे पाहण्यासाठी तुम्ही मला वेळ द्या. आज नवलकर साहेब आपल्यात नाहीत. मी त्यांचा इतका भटका नाही. परंतु एक शतांश भटका आहे. आपण माझ्यासोबत आलात तर मी तुम्हाला मुंबईतील एक-एक गल्ली दाखवू शकतो. प्रत्येक झोपडपट्टी दाखवू शकतो. मुंबईतील सर्व रस्त्यांची पूर्णपणे मला माहिती आहे. मुंबईची अवस्था काय आहे ही बाब आपण प्रत्यक्ष डोळयांनी बघा. फेरीवाल्यांपासून काय त्रास होतो आहे ते बघा. ते लोक कोठून आले ते बघा. मुंबईचा विध्वंस कोण करीत आहे याची आपल्याला पूर्णपणे कल्पना येईल. मुंबईचा विकास चांगल्या पध्दतीने व्हावा अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माननीय सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो मुंबई वाचवा, मराठी माणूस वाचवा अशी शासनाकडून अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

-------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पडांगळे (नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी मुंबईच्या विकासाच्या संदर्भात आणि वेगवेगळया अडचणींच्या संदर्भात अतिशय चांगला प्रस्ताव सभागृहात मांडलेला आहे, त्या प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी अतिशय चांगल्या शब्दात मुंबई शहरातील व्यथा आणि अडचणी सभागृहात मांडल्या आहेत. कोणत्याही प्रकारचे राजकारण न आणता त्यांनी मुंबईतील गंभीर प्रश्न उपस्थित केले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया,मुंबई शहराची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ KTG/ 11:15

श्री. राम पंडागळे ....

अनेक वर्षे या राज्यामध्ये कॉंग्रेसचे सरकार आहे मध्यंतरी शिवसेना-भाजपचे सरकार आले होते. परंतु कोणीही प्रामाणिकपणे मुंबईचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला नाही. आज मुंबईची परिस्थिती अशी आहे की, मुंबईतील मराठी माणूस हा मुंबईच्या बाहेर फेकला जाऊ लागला आहे. घरांच्या किंमती प्रचंड प्रमाणात वाढलेल्या आहेत. कारखान्यामध्ये काम करणारा कामगार किंवा मंत्रालयात काम करणारा कारकून मुंबईमध्ये घर घेऊ शकत नाही. उपनगरामध्ये जागांचे भाव 10000 रु. चौ.फूट झाले आहेत तर मुंबई शहरामध्ये जागांचे भाव 20-25 हजार रु. चौ.फूट होऊ लागले आहेत. अशा अवस्थेमध्ये सामान्य माणूस, गरीब माणूस कसे काय घर घेऊ शकणार? मराठी माणूस मुंबईच्या बाहेर कल्याण, डोंबिवली तसेच डहाणू,पालघरपर्यंत जाऊ लागला आहे. मुंबईतील सामान्य आणि गरीब माणूस मुंबईच्या बाहेर फेकला जाऊ लागला आहे. मध्यंतरी मुख्यमंत्र्यांनी चटईक्षेत्र वाढविल्याचे जाहीर केले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. काही ठिकाणी 4 तर काही ठिकाणी 2.5 चटईक्षेत्र करण्यात आले आहे. परंतु या वाढीव चटईक्षेत्राचा फायदा नेमका कुणाला होणार आहे याचा विचार करण्याची गरज आहे. चटईक्षेत्र वाढविले तरी गरीब आणि सामान्य माणूस घर घेऊ शकत नाही. मंत्रालयातील शिपाई किंवा कारकुन घर घेऊ शकत नाही. मग याचा फायदा कोणाला झालेला आहे ? जे बिल्डर आहेत ज्यांच्याकडे करोडो रुपयांची संपत्ती आहे त्यांना फायदा होणार आहे. सरळ मार्गाने जे जमिनी घेत नाहीत एक नंबरचा व्यवहार आणि दोन नंबरचा व्यवहार करतात त्यांनाच फायदा होणार आहे. या बिल्डरांनी उंच इमारती उभ्या करावयाच्या आणि त्यांच्यावर कसलेही नियंत्रण नाही. काय वाट्टेल ते भाव लावायचे आणि 1000 चौ.फूटाची सदनिका असली तरी प्रत्यक्षात ती 500 चौ.फूटाची सुध्दा नसते. 40 ते 50 टक्के चटईक्षेत्र चोरले जाते. म्हणून घरांच्या किंमतीवर नियंत्रण येणे आणि ते आणणे अत्यंत आवश्यक आहे. मी सदनामध्ये मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री आणि सरकारचे अभिनंदन करतो. कारण एसआरए योजनेमध्ये जी 225 फुटाची घरे दिली जाणार होती ती आता 369 फूटाची दिली जाणार आहेत. 225 फुटाचे घरामध्ये दोन बकऱ्या देखील राहू शकणार नाहीत. तेथे कुटुंबाला घुसविण्याचा प्रयत्न होत आहे. 225 चौ.फुटात पती, पत्नी आणि त्यांचा विवाहित मुलगा कसा काय राहणार ? परंतु 3/4 वर्षानंतर का होईना सरकारने जास्त चौ.फूटाचे घर देण्याचा निर्णय घेतला. आता कमीत कमी 3 खोल्यांचे घर झ ोपडीधारकांना मिळणार आहे. तीन खोल्यांचे घर मिळण्याचे त्यांचे स्वप्न

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे...

साकार होणार आहे त्याबद्दल मी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि शासनाचे अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सांगितले की आता यामुळे वाद निर्माण होणार आहे. जुन्या नियमाप्रमाणे 225 चौ.फूटाचे आणि नवीन नियमानुसार 369 चौ.फूटाचे घर मिळणार आहे. परंतु याबाबतीत सरकारला निर्णय घेणे आवश्यक होते.पूर्वीचीच योजना चालू ठेवली असती....

श्री. अरविंद सावंत : यामध्ये सोल्यूशन काढण्याची आवश्यकता आहे.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, या योजनेतून मार्ग काढण्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेले आहे. काही कामे सुरु झालेली आहेत. काही कामे पूर्ण झालेली आहेत. ज्यांच्या घरांच्या बाबतीत योजना सुरु होणार आहे त्यांना फायदा होणार आहे. परंतु सरकार या निर्णयाप्रत आले म्हणून सरकारचे अभिनंदन करतो. सामान्य माणसाला, गरीब माणसाला आणि झोपडपट्टीतील माणसाला कमीत कमी 3 खोल्यांची आवश्यकता आहे या निर्णयाप्रत सरकार आले. युती सरकारने सांगितले होते की 40लाख झोपडपट्टीवासियांना मोफत घरे देऊ.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे.......

27 लाख तरुणांना नोकऱ्या देऊ. घोषणा खूप झाल्या. आम्हालाही वाटत होते की, निश्चितपणे झ ोपडपट्टीवासियांना घरे मिळतील. लोकाभिमुख सरकार सत्तेवर आले, लोकांना हवे असलेले सरकार सत्तेवर आले. परंतु त्या काळात ते 40 घरे देखील देऊ शकले नाहीत. फक्त घोषणा झाल्या. तेथे काय काय घडले? कसे प्रकार घडत होते? मंत्रालयात एखादा बिल्डर एसआरएची योजना घेऊन गेल्यानंतर त्याला सांगितले जायचे, खाली जा. मुख्यमंत्र्यांना भेटा. तेथे गेल्यानंतर सांगायचे, मातोश्रीवर जा. या येण्याजाण्यामध्ये आणि मधल्या दलालांमुळे एकही घर झोपडपट्टीवासियांना मिळू शकले नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. चुकीचे रेकॉर्डवर राहू नये. एकही घर मिळू शकले नाही हे चुकीचे आहे. युती सरकारच्या काळात 18 हजार घरे बांधली गेली होती.

श्री.राम पंडागळे : परंतु 40 लाख घरे बांधली नाहीत हे तर खरे आहे.

डॉ.दीपक सावंत : हवे तर असे म्हणावे. परंतु एकही घर बांधू शकले नाहीत असे म्हणू नये.

श्री.राम पंडागळे : 40 लाख घरे देऊ शकले नाहीत. सार्वभौम सत्ता असताना शेतकऱ्यांचे एक रुपयाचे देखील वीज बिल आपण माफ करु शकला नाहीत. शेतकऱ्यांचे 60 हजार कोटी रुपयांचे कर्ज आम्ही माफ केले. तेव्हा 40 लाख घरापैकी 18 हजार घरे बांधली गेली. परंतु आज सरकारचे अभिनंदन करा.

श्री.अरविंद सावंत : 40 लाख झोपडपट्टीवासियांना घरे देणार होतो. 40 लाख घरे नव्हे. एका घरात साधारणपणे 4 ते 5 माणसे गृहित धरुन 40 लाख झोपडपट्टीवासियांना घरे द्यायची होती.

श्री.राम पंडागळे : परंतु तुम्ही ती योजना अंमलात आणू शकला नाहीत. तुम्ही मुद्देसूद बोलता परंतु कर्तृत्व मात्र शून्य झाले. म्हणून लोकांनी तुम्हाला शिक्षा दिली. तेव्हा आता तरी सरकारचे अभिनंदन करा. आपल्या मुंबईतील बांधवांना सरकार तीन खोल्यांच्या घरात पाठवित आहे. त्यामुळे सामान्य लोकांमध्ये आनंदोत्सव निर्माण झाला आहे. लोकांच्या भावना तपासून पहा. येणाऱ्या निवडणुकीमध्ये आपल्याला कळून येईल.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे..........

सभापती महोदय, मुंबईतील जनजीवन अतिशय दुरापास्त झाले आहे. आम्ही सभागृहात उशिरा येतो म्हणून सन्माननीय उपमुख्यमंत्री आम्हाला दम देतात. परंतु सभागृहाची बैठक दुपारी 12.00 वाजता सुरु होणार असेल आणि आम्ही घरातून सकाळी 9.00 वाजता निघालो तरी विधानभवनात पोहोचायला तीन ते चार तासांचा अवधी लागतो. मुंबई उपनगरातील सगळ्यांची तीच अवस्था आहे. मुंबई शहरामध्ये उड्डाणपूल तयार झाले. काही पुलांचे बांधकाम सुरु आहे. परंतु ही कामे झपाट्याने पूर्ण कशी होतील यासाठी यंत्रणा आहे का हे तपासून पाहण्याची गरज आहे. मुंबईतील हायवे किंवा मोठ्या रस्त्यांवर ब्रिज बांधले जात आहेत. परंतु आतील भागात असलेल्या रस्त्यांवर देखील ब्रिज उभारणे आवश्यक आहे. एस.व्ही.रोडवर देखील ब्रिज बांधण्याची आवश्यकता आहे. कांदिवलीहून मालाडला जायला दोन तास लागतात. कांदिवलीहून गोरेगावला जायला अडीच तास लागतात. त्यामुळे आतील भागामध्ये देखील पूल होण्याची आवश्यकता आहे. मुंबईतील जनजीवन सुरळीत होण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. याठिकाणी रॉयल पामचा उल्लेख करण्यात आला. त्याबाबत माझ्या देखील भावना अतिशय तीव्र आहेत. एका बाजूला पर्यावरणाबाबत बोलतो. पर्यावरणाचा समतोल राखला पाहिजे असे बोलतो. दुसऱ्या बाजूला रॉयल पामने शेकडो इमारती उभ्या केल्या आहेत. हजारो फ्लॅट बांधले आहेत. गोल्फ क्लबच्या नावाने उभ्या राहिलेल्या रॉयल पामने हिरव्यागार वनराईवर हजारो इमारती बांधल्या आहेत. या रॉयल पामचे उद्घाटन कोणी केले? या क्लबच्या उद्घाटन प्रसंगी हायवे ते रॉयल पामच्या मार्गावर मोठ्या प्रमाणात झेंडे लावले होते. सन्माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी उद्घाटन केले होते. गोल्फ क्लब म्हणून उद्घाटन केले. आपल्या पक्षाचा पाठिंबा होता. परंतु रॉयल पामकडून कायद्याचे पालन झाले की नाही हे कोणी बघितले का? टोलेगंज इमारती उभ्या राहिल्या आणि गोल्फ क्लब संपुष्टात आले.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे ....

तेव्हा शासनाने ॲक्शन घेतली पाहिजे. जे लोक वन विभागाच्या आणि पर्यावरण विभागाच्या पोटात जाऊन कामे करतात त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी परप्रांतियांच्या संदर्भात सदस्यांनी विचार मांडलेले आहेत. परंतु ज्यांच्या तीन तीन पिढया मुंबईत वाढल्या, ज्यांच्या मुलांच्या मुलांना मुले झालेली ते आता परप्रांतीय कसे काय होऊ शकतील ? त्यांना तुमच्या इतकेच मुंबई बद्दल प्रेम आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ज्यांच्या चार पिढया मुंबईत वाढल्या त्यांना हाकला असे आम्ही बोललो नाही तर मुंबईत येणारे लोंढे थांबवा असे मी बोललो आहे.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, आता पर्यंत रस्त्याच्या फुटपाथवरील झोपडया कोणीही हलवण्याची हिंमत दाखवली नव्हती परंतु आमच्या शासनाने फुटपाथवरील झोपडपट्ट्या हटवल्या व या लोकांचे दुसरीकडे पुनर्वसन करुन दिलेले आहे. आमच्या शासनाने कुलाब्या पासून ते वडाळयापर्यंतच्या फुटपाथवरील झोपड्या हलवून त्यांचे पुनर्वसन करुन दिल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, लोकशाही आघाडीच्या सरकारने चांगल्या प्रकारची अनेक कामे केलेली आहेत परंतु माझी एकच विनंती आहे की, आता प्रायव्हेट फॉरेस्टचा प्रश्न निर्माण झालेला आहे. ठाणे जिल्हयात अशा प्रकारची घरे या लोकांनी घरे घेतली त्यांना ओ.सी. दिले, सी.सी. दिले, या लोकांनी सोसायटया देखील स्थापन केल्या असून आता या घरांना आठ ते 10 वर्षे झालेली आहेत असे असतांना या लोकांना आपण जर निराधार करणार असाल तर ते चुकीचे होईल. यासंदर्भात जर कोणावर कारवाई करावयाची असेल तर ज्यांनी ही घरे बांधलेली आहे त्या बिल्डरांवर ख-या अर्थाने कारवाई करुन या घरांना संरक्षण दिले पाहिजे एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदाताई म्हात्रे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, आज एका चांगल्या प्रस्तावावर या सदनात चर्चा होत आहे. आतापर्यंत अनेक वेळा मुंबईच्या विषयावर या सभागृहात चर्चा झालेली आहे. मुंबईच्या विषयावर बोलावयाचे झाले तर मला आनंदाने सांगावेसे वाटते की, मी या मुंबईची मुलगी असून मुंबई मध्येच माझा जन्म झालेला आहे. त्यामुळे मुंबई बद्दल बोलतांना मला अतिशय आंनद होता व एकीकडे दु:खही होते. मुंबई, नवी मुंबई, ठाणे या ठिकाणच्या मूळ जमिनी हया आगरी आणि कोळी लोकांच्या होत्या. परंतु आता हा समाज मुंबई, नवी मुंबई, ठाण्यामधून नामशेष झाला असून काही ठराविक लोकांची घरे मुंबईमध्ये आपल्याला पहावयास मिळतात. जवळ जवळ पालघरपासून अलिबागपर्यंतच्या सागरी किना-यावर आगरी आणि कोळी लोकांचे साम्राज्य होते. आगरी आणि कोळी लोक हेच खरे छत्रपती शिवाजी महाराजांचे पाईक होते. आगरी आणि कोळी लोकांनीच छत्रपती शिवाजी महाराजाच्या संरक्षणाचे तसेच अंगरक्षकाचे काम केलेले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात आगरी आणि कोळी लोकांना देशमुखी आणि वतनदारी देऊन त्यांना जमिनी दिलेल्या होत्या.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे..

मुंबई आणि ठाणे शहराचा इतिहास सांगावयाचे ठरविले तर त्याबाबतीत पुष्कळ काही सांगता येईल परंतु त्या खोलामध्ये मी जाऊ इच्छित नाही. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी मुबईच्या अनेक महत्वाच्या मुद्यांना स्पर्श केलेला आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांनी देखील मुंबईच्या चर्चेत भाग घेत असतांना अनेक महत्वाचे मुद्दे मांडलेले आहेत. मुंबईतील झोपडपट्टीत राहणा-या रहिवाशांना मोठी घरे देण्याचा निर्णय माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांनी घेतला आहे त्यामुळे मुंबई शहरातील झोपडपट्टीमध्ये राहणा-या गरीब लोकांमध्ये, दलित वस्तीमध्ये राहणा-या लोकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे.

सभापती महोदया, मुबईतील आगरी आणि कोळी समाजातील लोक एक गाणे म्हणावयाचे हे गाणे अनेक स्थानिक लोकांना, नगरसेवकांना आणि सन्माननीय सदस्याना माहीत असेल " "मुंबईचे मुम्बादेवी मुंबई बांधलीय गं पाण्यावरी " असे मुंबई शहराचे वैशिष्ट सांगणारे एक कोळी गीत आहे मुंबईचा संपूर्ण परिसर जर आपण पाहिला तर आपल्याला असे दिसून येईल की मुंबईला चारही बाजूने समुद्राने वेढलेले आहे. या मुंबई शहरामध्ये अनेक जाती, धर्म,पंथाचे, अठरा पगड जातीचे लोक गुण्या गोविंदाने राहत आहेत. मुंबईमध्ये अनेक साहित्यिक, कलाकार, राजकारणी मोठे झालेले आहेत, करोडोपती झालेले आहेत त्याच प्रमाणे नट नटया देखील मोठया झालेल्या असून त्या बॉलीवूड पासून हॉलीवूड पर्यंत गेलेल्या आहेत. मुंबईने सर्व सामान्य माणसांना वडा पाव दिला आहे त्याचप्रमाणे मोठया लोकांना धन, धान्य, पैसा, संपत्ती भरपूर दिलेली आहे.

सभापती महोदया, मुबई शहरामधील गिरणी कामगार आज उद्‌ध्वस्त झालेला आहे . खरे सांगावयाचे म्हणजे गिरणी कामगारांची आज कोणतीही पिढी येथे दिसून येत नाही तरी सुध्दा आपण त्यांच्या संदर्भात सभगृहात बोलत असतो. प्रत्येक वेळी समोरच्या बाकावर बसलेले सन्माननीय सदस्य हा विषय येथे मांडत असतात आणि त्यावर चर्चा करीत असतात परंतु कोकणील गिरणी कामगार आज कोठे आहे, त्यांचा वारस कोठे आहे हे शोधण्याचा प्रयत्न कोणी केला आहे काय ? तेव्हा या गिरणी कामगाराना वा त्यांच्या वारसांना शोधून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात आला पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.माननीय उपमुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत त्यांच्या समोर मी हा मुद्दा मांडू इच्छिते की, गिरणी कामगारांचे जे कोणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वारसदार असतील त्यांना शोधण्याचे व न्याना न्याय देण्याचे काम शासनाने केले पाहिजे. या गिरणी कामगारांनी घाम गाळला असल्यामुळे मुंबई उभी राहिलेली आहे. मुंबईमध्ये अनेक बिल्डर्स व उद्योगपती आलेले असतील परंतु मुंबईला या गिरणी कामगारांनीच मोठे केले आहेत. सभापती महोदया, या विषयावर मी जास्त बोलणार नाही. काल सभागृहामध्ये ग्लोबल वॉर्मिगच्या संदर्भात एक प्रस्ताव मांडण्यात आला होता व अतिशय महत्वाची चर्चा या ठिकाणी करण्यात आली होती परंतु त्या चर्चेमध्ये मला सहभागी होता आले नाही. या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, मध्यंतरी लेह व लडाखला मी गेले असतांना तेथे ऑक्सिजनची गरज भासली होती तशीच परिस्थिती काही वर्षानंतर मुंबईवर येईल काय असे मला वाटू लागले आहे. दिवसेंदिवस मुंबईतील लोकसंख्या वाढत चालली आहे महाराष्ट्रातील व्यक्ती असो वा देशातील व्यक्ती असो प्रत्येक व्यक्तीला असे वाटत असते की ,आपण मुंबईला जावे. याचे कारण असे की मुंबईला आल्यानंतर येथे रोजगार उपलब्ध होत असतो.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितले की मुंबईमध्ये पर राज्यातून लोकांचे लोंढे सतत येत असतात त्यामुळे मुंबईची लोकसंख्या वाढत आहे. मी त्यांना सांगू इच्छिते की, पर राज्यातून लोकांचे लोंढे येत असल्यामुळे मुंबईची लोकसंख्या काही आजच वाढत आहे असे नाही तर माझ्या जन्माच्या अगोदर पासून मुंबईमध्ये बाहेरच्या राज्यातून लोक येत होते. आमच्या चाळीमध्ये देखील उत्तर प्रदेश आणि बिहार राज्यातील अनेक मुस्लिम लोक भाडेकरु म्हणून राहत होते. माझ्या चाळीतील भाडेकरुंकडून आजही दरमहा 5 रुपये भाडे घेण्यात येत होते आता 10 रुपये भाडे घेण्यात येत आहे .परप्रांतियांचे लोंढे आज येथे येत नाहीत. पूर्वी पासून हे लोंढे येत असून त्यांच्या चार पाच पिढया येथे राहिलेल्या आहेत.केवळ रोजगार मिळेल या हेतूने हे लोक येथे येतात. त्यामुळे ज्या समस्या निर्माण होतात त्यातून मुंबईला गालबोट लागत आहे. लोकसंख्या वाढल्यामुळे सांडपाणी, कचरा उचलणे, पिण्याचे पाणी इत्यादी अनेक सुविधा पुरविण्यावर विपरित परिणाम होत असतो. ज्या ठिकाणी शहरामध्ये महानगरपालिका आहेत त्यांच्या संदर्भातील प्रश्न या सभागृहात मांडण्यात येत असतात . या सुविधा पुरविण्याचे काम त्या त्या महानगरपालिकेले असते. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या संदर्भात अनेकदा

3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहात उत्तरे दिलेली आहेत. आज मुंबईमध्ये कोणाची महानगरपालिका आहे यासंबंधी बोलले तर समोरच्या बाकावर बसलेल्या सन्माननीय सदस्यांना लगेच राग येईल. त्याचप्रमाणे .......

नंतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/SBT/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 11:35

श्रीमती मंदा म्हात्रे ....

रामभाऊंसारखे माझ्या अंगावर उठतील परंतु वस्तुस्थिती काय आहे ? खरे तर शहरातील ही सारीकामे महापालिकेने बरीचशी करावयाची असतात परंतु तरीही आपण येथे शासनालाच त्याबद्दल जाब विचारीत असतो, जबाबदार धरत असतो. पण यामध्ये मुख्यत्वे करून महापालिकाच जास्त जबाबदार आहे असे मला सांगावेसे वाटते. सभापती महोदय, मुंबई शहराच्या पाईपलाईन्सवर देखील काही झोपडपट्ट्या वसल्या आहेत, त्यांच्यावर देखील आपण कारवाई करणे आवश्यक आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तसेच ड्रेनेजच्या ज्या पाईपलाईन्स आहेत त्यावर या झोपड्या उभ्या असल्याने प्रसंगी झोपडपट्टीवासी लोक पाण्यासाठी पाईपलाईन तोडून पाणी घेतात आणि अशा वेळी शेजारून ड्रेनेज लाईन जात असल्यास पिण्याचे पाणी प्रदूषित होते आणि रोगराई पसरण्याचा मोठा धोका असतो. म्हणूनच या पाईप लाईनवरील झोपड्या ताबडतोबीने हटविल्या पाहिजेत. शिवाय ती पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन असल्याने त्याबाबतीत आता येथे सन्माननीय सदस्य श्री.पंडागळे यांनी सांगितल्याप्रमाणे बाहेरचे लोक येऊन काही घातपात देखील करू शकतात. तेव्हा त्याहीबाबतीत लक्ष देण्याची गरज आहे. सभापती महोदया, मी बीपीटीच्या मार्गाने नवी मुंबईला जात असते तेव्हा अनेकदा पाहिले आहे की, त्या रस्त्यावर काही मोठमोठ्या चकचकीत तपेल्यांमध्ये जेवण शिजविले जात असते. तेथील चौकोनी खोल्यांमधून मोठ्या प्रमाणात चपात्या लाटल्या जात असतात, भाताच्या मोठ्या डेंगी उतरविल्या जात असतात. मी थांबून त्याबाबत विचारणा केली असता मला समजले की, मुंबई पाहण्यासाठी म्हणून जे मोठ्या प्रमाणात मुंबई, महाराष्ट्राबाहेरून बसेस करून लोक येत असतात त्यांना हे जेवण पोहोचविले जाते. अशा लोकांच्या या जेवणातूनही मोठ्या प्रमाणात घातपात होण्याचीही शक्यता असते. असे काही झाले तर मोठा बिकट प्रश्न निर्माण होऊ शकतो. पण हे सारे व्यवहार तेथे कोणाच्या जीवावर चालतात? महापालिकेचे वॉर्ड ऑफिसर पैसे घेऊन हे सारे प्रकार सर्रास चालवून घेतात. मात्र आपण येथे त्याबाबत सरकारला जाब विचारतो. तेव्हा हे वॉर्ड ऑफिसर या बाबत काय करतात ? तेथील मोठी गोडाऊन्स असतात त्यातूनही यासाठी मोठ्या प्रमाणात सामान मिळविले जाते. तेव्हा हा साठा त्या वॉर्ड अधिकाऱ्यांच्या लक्षात येत नाही का ? तरी या बाबत आपण लक्ष देण्याची गरज आहे. त्याच बरोबर आज मी सरकारचे या ठिकाणी अभिनंदन करते. माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांनी झोपडपट्टीवासियांना जी मोफत घरे विकासकामार्फत दिली जाणार आहेत त्यांचे

..... एन 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती म्हात्रे ....

चटईक्षेत्र वाढवून दिले आहे. पण याचा फायदा खरोखरी त्या झोपडपट्टीवासियांना होणार आहे काय ? हेही आपण पाहिले पाहिजे. आपले शिपाई सारखे जे चतुर्थश्रेणी कर्मचारी आहेत, तसेच वर्ग 3 चे कर्मचारी-अधिकारी आहेत त्यांचाही यातून काहीही फायदा होणार नाही. मात्र जे कोट्याधीश आहेत त्या लोकांनाच याचा फायदा होणार आहे. तेव्हा असे होऊ नये आणि गरिबांना, झ ोपडपट्टीवासियांना याचा खरोखरी फायदा व्हावा या दृष्टीने याबाबत जातीने लक्ष आपण दिले पाहिजे तसेच लोकसंख्या वाढीवर देखील आळा घातला पाहिजे. सभापती महोदया, आपण मला या चर्चेत बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद देऊन मी भाषण संपविते.

***

..... एन 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, मुंबईच्या प्रश्नावर दोन प्रस्ताव येथे चर्चेला आलेले आहेत. एक प्रस्ताव सत्तारूढ पक्षाने दिलेला आहे आणि दुसरा विरोधी पक्षांतर्फे आलेला आहे. हे दोन्ही प्रस्ताव एकत्र करून त्यावर एकत्रित चर्चा घ्यावी अशी व्यवस्था प्रत्यक्ष वाटाघाटी करून केली गेली. परंतु त्यावेळेस असेही ठरले होते की, हा प्रस्ताव सकाळी 10 वाजता न आणता, सभागृहाच्या नियमित कामकाजाच्या वेळेत घेतला जावा. पण आता असे झालेले आहे की, आमचे प्रस्ताव सकाळी 10 वाजता ठेवले जातात. आमच्या अर्धा-तास चर्चा असतील, लक्षवेधी सूचना असतील ते सारे कामकाज सकाळी 10 वाजता ठेवले जाते. म्हणजे जे जे विरोधी पक्षाचे कामकाज असेल ते सगळे उरकून घ्यायचे ही त्या मागील भूमिका दिसते आहे. सभापती महोदया, हा प्रस्ताव सभागृहाच्या नियमित कामकाजामध्ये घेतला असता तर त्यावर खूप चर्चा करण्याची आमची इच्छा होती. परंतु हा प्रस्ताव आता सकाळी 10 वाजता ठेवला आहे आणि ही गोष्ट मला रात्री कळली. मला आश्चर्य वाटले, अगोदर ठरविता काय आणि प्रत्यक्षात केले काय जाते हेच समजेनासे झाले आहे. हल्ली तर सभागृह सकाळी 10 वाजता सुरू होऊन रात्री 10 वाजेपर्यंत चालते. येथे येणाऱ्या लोकप्रतिनिधींना जणू वेठबिगार करून ठेवले आहे. त्याचा परिणाम हा सभागृहातील उपस्थितीवर होतो. ...

( यानंतर सौ.रणदिवे.... ओ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ SBT/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 11:40

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

याठिकाणी मुंबईसारख्या महानगरातील ज्वलंत प्रश्नाबाबत चर्चा करीत असताना सदनामध्ये सन्माननीय सदस्यांची उपस्थिती नाही. याचे कारण काय आहे ? मी विरोधी पक्षाच्या आणि सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना दोष देणार नाही. पण रोजच्या कामकाजाची जी पध्दत आहे, तीच मुळामध्ये चुकीचे आहे. ही पध्दत लोकप्रतिनिधींवर कुठेतरी अन्याय करणारी आहे आणि ही बाब मला रेकॉर्डवर आणावयाची होती म्हणून मी येथे मुद्दाम याबाबतीत बोललो आहे. हा प्रकार आजच झालेला नाही. खरे म्हणजे संसदीय मंडळाचे कामकाज वर्षातून किती वेळ सुरु असावे याबाबतीत नियम आहेत, संकेत आहेत, परंपरा आहेत. पण ते पाळले जात नाही. अधिवेशन सुरु झाल्यानंतर ते कसे गुंडाळावयाचे याची पूर्वतयारी सुरु होते. वर्षातून निदान 100 दिवस तरी अधिवेशन झाले पाहिजे अशी त्यामागची संकल्पना आहे. परंतु आम्ही 60 दिवस सुध्दा काम करीत नाही आणि त्याचा परिणाम आमदारांना वेठबिगार करण्यामध्ये होतो. मग दर दिवसाचे काम वाढविले जाते. ही परिस्थित बदलण्याची आवश्यकता आहे. जर संसदीय परंपरा मजबूत करावयाची असे, विचारांची देवाणघेवाण करावयाची असेल तर ठरविलेल्या कालावधीपर्यंत अधिवेशन चालले पाहिजे. आज सकाळी वर्तमानपत्र उघडल्यानंतर एक शीर्षक दिसले. त्यामध्ये असे म्हटलेले होते की,"32 मिनिटांमध्ये 8 विधेयके मंजूर" हा काय प्रकार आहे ? हे कायदे मंडळ आहे ना. याठिकाणी 32 मिनिटांमध्ये 8 विधेयके मंजूर होतात, म्हणजे त्यावर चर्चाच झालेली नाही. जे विधेयक चर्चा न करताच पास होते, तो कायदा कसा म्हणता येईल ? त्यामुळे या व्यवस्थेकडे पहाण्याची परिस्थिती फार निराळी झालेली आहे.

श्री.राम पडांगळे (खाली बसून) : विधानसभेमध्ये काल गोंधळ झाला होता.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य बरोबर सांगत आहेत. प्रत्येक सभागृहामध्ये गोंधळ होतो. लोकसभेमध्ये सुध्दा गोंधळ होतो. परंतु लोकसभेमध्ये कोणत्याही विधेयकावर चर्चा होऊनच ती मंजूर केली जातात, तेथे विधेयकावर चर्चा न करता गोंधळामध्ये ती पास केली जात नाहीत. मी मुद्दाम हे सर्व रेकॉर्डवर आणलेले आहे. विधेयकांवर चर्चा झालीच पाहिजे. हे कायदेमंडळ आहे . जर एखाद्या कायद्यामध्ये सुधारणा करावयाची असेल तर सदनामध्ये त्याबाबत चर्चा व्हावयास पाहिजे. आपण कायद्याचे पदवीधर आहात. आपल्याला ही गोष्ट मंजूर आहे काय ? विधेयकावर चर्चा न होता मंजूर केली आहेत. आपल्यासमोर जसा विषय आला आहे,

. . . .ओ-2

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

तसा तो पुढे ढकलून द्यावयाचा. याठिकाणी माझे ॲडव्होकेट मित्र समोर बसलेले आहेत. हे काय चालले आहे ?

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सदनामध्ये विधेयकावर चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी जो मुद्दा मांडलेला आहे, त्याला माझा पाठिंबा आहे. परंतु चर्चा करण्याच्या बाबतीत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची जबाबदारी आहे की नाही ? की एकाच बाजूच्या सन्माननीय सदस्यांची जबाबदारी आहे ? ज्यावेळेला सदनासमोर विधेयके चर्चेसाठी येतात, तेव्हा गोंधळ घालावयाचा, आरडाओरडा करावयाचा आणि त्यावर चर्चा करावयाची नाही. हे योग्य होणार नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्यांनी जो हरकतीचा मुद्दा मांडलेला आहे, तो आपण स्विकारलेला आहे की नाही ? ते सांगावे. म्हणजे मी त्यावर भाष्य करणार आहे. असे होऊ नये की, सन्माननीय सदस्यांनी बोलावयाचे आणि त्यावर मी प्रत्युत्तर द्यावयाचे.

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, तो आपण स्विकारलेला आहे काय ?

**तालिका सभापती** :मी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला हरकतीचा मुद्दा स्विकारलेला नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, ठीक आहे. सन्माननीय सदस्य म्हणतात, ते चुकीचे आहे असे मी म्हणणार नाही.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला हरकतीचा मुद्दा फेटाळल्यानंतर परत त्याबाबत कशासाठी बोलावयाचे ?

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, परंतु खुलासा . . . .

**तालिका सभापती** : तसे नको. मग मला सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला हरकतीचा मुद्दा रेकॉर्डवर घ्यावा लागेल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, त्यांच्या ज्ञानामध्ये फरक व्हावा आणि अनुभवामध्ये वाढ व्हावी म्हणून एवढेच रेकॉर्डवर आणू इच्छितो की, ही जबाबदारी कोणाची आहे ?

. . . .ओ-3



APR/ MMP/ SBT/ 11:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तर सदनामध्ये येणाऱ्या प्रत्येक सन्माननीय सदस्यांची ही जबाबदारी आहे की, सदनाच्या कामकाजामध्ये भाग घेऊन विधेयके पास करणे, मंजूर करणे. . . . .

**तालिका सभापती** : जर याबाबतीत सन्माननीय सदस्य खुलासा करणार असतील तर मला सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला हरकतीचा मुद्दा रेकॉर्डवर घ्यावा लागेल. माझे काय म्हणणे आहे . . . .

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, मी कामकाजाबाबत बोलत आहे . . .

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला हरकतीचा मुद्दा आपण रेकॉर्डवरुन काढून टाकलेला नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला हरकतीचा मुद्दा स्विकारावा लागेल. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी असे सांगितले की, जर सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला हरकतीचा मुद्दा स्विकारला नसेल तर मी त्याबाबत बोलत नाही. मी माझ्या विषयावर बोलतो. आपल्याला दोन्ही प्रस्ताव अडीच तासामध्ये संपवावयाचे आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, दोन्ही प्रस्तावांसाठी अडीच तासाचा वेळ देणे हेच मुळात चुकीचे आहे. ते मला मंजूर नाही. मी ते मान्य करीत नाही. दोन प्रस्तावांसाठी पाच तासाचा वेळ आहे. सत्ताधारी पक्षाकडून जो प्रस्ताव देण्यात आला आहे, त्यासाठी अडीच तासाचा वेळ आहे आणि विरोधी पक्षाकडून जो प्रस्ताव देण्यात आला आहे, त्यासाठी देखील अडीच तासाचा वेळ आहे. तुम्ही हे दोन्ही प्रस्ताव अडीच तासामध्ये कसे गुंडाळत आहात ? ही कोणती पध्दत आहे? ही लोकशाहीची पध्दत आहे ? माझा याच गोष्टीला विरोध आहे. दोन प्रस्ताव दिलेले आहेत आणि त्यावर अडीच तासामध्ये चर्चा करावयाची आहे ? या गोष्टीला माझा विरोध असून तो रेकॉर्डवर आणण्यासाठी मी बोलत आहे. भविष्य काळामध्ये तरी असे होऊ नये. जर आम्ही दोन्ही प्रस्तावावर एकत्रित चर्चा करण्यासाठी मान्यता दिलेली असेल तर मग त्या चर्चेसाठी पुरेसा वेळ तरी द्यावा. एक तर आम्हाला सकाळी येथे बोलवत आहात आणि पुन्हा असे सांगितले जात आहे की, चर्चेसाठी वेळेची मर्यादा आहे. दोन्ही गोष्टी कशा होऊ शकतात ?

सभापती महोदया, मी आता मूळ प्रश्नाबाबत बोलतो. आज आपण येथे मुंबईच्या प्रश्नाबाबत चर्चा करीत आहोत. मुंबईतील प्रश्न हा मोठा विषय आहे, ज्वलंत विषय आहे. मार्च महिन्यामध्ये

. . . .ओ-4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अंदाजपत्रक सादर केलेले आहे. त्यामध्ये पर कॅपेटा महाराष्ट्रातील लोकांचे दरडोई उत्पन्न किती आहे ? याची आकडेवारी दिलेली आहे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ SBT/ MMP/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 11:45

श्री. मधुकर सरपोतदार ...

सभापती महोदय, आता बऱ्याचशा विषयांवर याठिकाणी बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी मुद्दे मांडलेले आहेत. मी गटनेता असल्यामुळे सन्माननीय सदस्यांचे बोलून झाल्यावर त्याच मुद्दयावर पुन्हा बोलणे बरे नाही. म्हणून खरे तर मी या बाबत काही भाष्य केले नाही. परंतु त्यावेळी मला एक मुद्दा मांडावयाचा होता की, मुंबईचे दर डोई उत्पन्न व महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न यामधील फरक आपल्याला जावणेल. या दोन्ही उत्पनांची तुलना आपण केली तर आपल्याला दिसून येईल की, आपण खूप मागे आहोत. महाराष्ट्र हे राज्य प्रगतीशील आहे असे म्हटले जाते यामध्ये मुंबईचा खूप मोठा वाटा आहे. हे कोणी नाकारु शकणार नाही. 9 मार्च 1951 साली मी मुंबई शहरामध्ये राहण्यासाठी आलो होतो. त्यावेळी मुंबईतील लोकसंख्या 45 ते 46 लाख होती. आज ही लोकसंख्या दीड कोटीच्या घरात गेली आहे. 50 वर्षामध्ये एक कोटी लोकसंख्या वाढली आहे. लोकसंख्या सतत वाढत आहे मात्र मुंबईचे जे क्षेत्र आहे ते वाढत नाही. ते आहे तेवढेच आहे. परंतु लोकसंख्येच्या प्रमाणात घरांच्या मागणीमध्ये वाढ होत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मघाशी येथील माणसांबद्दल व परप्रांतियांच्या लोंढयाबद्दल एक मुद्दा काढला होता. त्यांना मी सांगू इच्छितो की, मुंबईमध्ये जी माणसे स्थायी आहेत, ते बऱ्याच वर्षापासून येथे राहत आहेत, त्यांचा जन्म येथेच झालेला आहे. त्यांना काम करण्याकरिता रोज मुंबईला जावे लागते. अशा लोकांनी मुबईच्या बाहेर राहायला जावे अशा प्रकारची भूमिका शिवसेनेने आजपर्यंत कधीही घेतली नाही. आपल्या माहितीकरीता ही गोष्ट मी येथे सांगत आहे. आपण मला बऱ्याच वर्षापासून ओळखत आहात. मी अशी भूमिका कधी घेतली आहे काय ? हे आपण मला सांगावे. आपण माझी अनेक भाषणे ऐकलेली आहेत. मी अशी भूमिका कधीही मांडली नाही आणि यापुढेही अशी भूमिका कधी मांडणारही नाही.

श्री. राम पंडागळे (बसून ) : आपण शिवसेनेपासून वेगळे आहात.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी शिवसेना पक्षातील नेता आहे ही तर वस्तुस्थिती आहे. आपला याकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगळा असू शकतो. माझे मित्र अनेक पक्षामधील आहेत. परंतु आमच्या पक्षाची भूमिका त्यावेळी जशी होती तशीच भूमिका आजही आहे. यामध्ये काहीही परिवर्तन झालेले नाही. मी जे त्यावेळी बोलत होतो तेच आजही बोलत आहे त्यात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ...

काही बदल झालेला नाही. आमचा एकाच गोष्टीला विरोध आहे. खरे तर आज मी येथे बोलणार नव्हतो. परंतु आता बोलतो.

सभापती महोदय, अंदाजपत्रक सादर करीत असताना या सदनामध्ये मांडण्यासाठी मी एक काव्य तयार केले होते. ते काव्य मांडण्याची मला संधी मिळाली नाही. म्हणून हे काव्य आज रेकॉर्डवर आणत आहे. त्यामुळे ते काव्य माननीय अर्थमंत्र्यांनाही कळू शकेल.

"नकोत नुसती आश्वासने, नको नुसती तोंड पाटीलकी,<br>
नको नुसता आकडयांचा घोळ, नको त्या जनतेच्या जिवाशी खेळ,<br>
अर्थाला साथ मिळाली सुगंधाची, नको साथ संधीसाधूंची.<br>
युती शासनाने कर्ज घेतली प्रगतीसाठी, आघाडी शासनाने ती वाढविली कशासाठी ?<br>
नसे माहिती नसे खुलासा, मात्र उद्धार करती युती शासनाचा.<br>
असा हा अर्थसंकल्प दहावा, अर्थमंत्र्यांचा.<br>
धारण करुनी वेष शेतकऱ्याचा हिशेब करती त्यांच्या आत्महत्यांचा,<br>
हीच असे निती, तशीच दिसते कृती,<br>
नाही चिरा, नाही पणती<br>
शेतमजूर वाऱ्यावर, कारखाने प्राणवायूवर,<br>
वीज नाही पाणी नाही, कुपोषणाला अंत नाही.<br>
तंटामुक्त गाव नाही, भ्रष्टाचार मुक्त शासकीय खाते नाही "

अशी माझी छोटीशी कविता आहे. ही कविता त्यावेळी मला मांडता आली नाही म्हणून आज या निमित्ताने मी येथे मांडत आहे. अशी परिस्थिती आज महाराष्ट्र राज्याची झालेली आहे. झोपडपट्टीवासियांना घरे देण्याची योजना ही मूलतः माननीय शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांची होती. त्यावेळी झोपडपट्टीवासियांची संख्या साधारण 40 लाख होती. 40 लाख लोकवस्ती म्हणजे साधारण 10 लाख घरांचा अंदाज त्यावेळी करण्यात आला होता. या योजनेमध्ये त्यानंतर बदल करण्यात आले. आता मोठया प्रमाणात झोपडया वाढत गेल्या, लोंढे वाढत गेले, वस्ती वाढत गेली. हे सर्व आपल्या नियंत्रणाबाहेर गेलेले आहे.

...3..



DVG/ SBT/ MMP/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 11:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ...

सभापती महोदय, आज मुंबईमध्ये दळणवळणाची काय परिस्थिती आहे ? मला आजही आठवते त्या जमान्यामध्ये मुंबईमध्ये ट्राम्स होत्या. आपण कदाचित त्या बघितल्या नसतील. त्यावेळी मुंबईमध्ये ट्राम्स होत्या, बसेस होत्या, व्हिक्टोरिया होत्या. मुंबईचे जे वैभव होते ते सर्व त्यावेळी होते. आज तसे काही राहिले नाही. आता सर्व गर्दी झालेली आहे. त्यावेळी देखील लोकल होती. परंतु त्या वेळची लोकल व आजची लोकल यामध्ये फरक आहे. त्यावेळी अर्धा एक तासाने एक लोकल सुटायची आता एक किंवा दोन मिनिटाने लोकल सुटते तरी देखील ती अपुरी पडत आहे. याचे कारण प्रवास करणाऱ्यांची संख्या मुंबईमध्ये प्रचंड वाढलेली आहे. मोठमोठे लोंढे प्रत्येक स्टेशनमधून येत असतात जात असतात.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

प्रत्येक स्टेशनातून लोंढेच्या लोंढे बाहेर येत असतात आणि जात असतात असे भयानक चित्र मुंबईमध्ये उभे राहिले आहे. मुंबईतील रस्त्यांच्या बाबतीत काय परिस्थिती आहे ? मुंबईत सुरुवातीला मी भव्य रस्ते पाहिलेले आहेत. तेव्हा केवढे मोठे रस्ते मुंबईमध्ये आहेत असे मला वाटावयाचे. आता ऑपेरा हाऊस समोरचा रस्ता छोट्याशा गल्लीसारखा वाटतो. त्यानंतर त्यापेक्षा मोठे रस्ते तयार झाले. मुंबई रोज वाढत चालली आहे पण मुंबईतील साधने कमी होत चालली आहेत. मुंबई आकुंचित होत चालली आहे. विस्तार होण्यासारखी परिस्थिती मुंबईमध्ये राहिलेली नाही. त्यामुळे मुंबईच्या जीवनाबद्दल आमची तक्रार आहे. मुंबई शहर प्रदूषणमुक्त कसे होईल, मुंबईतील जीवन जास्तीतजासत सुसह्य कसे होईल, मुंबईमध्ये होणारे वाईट प्रकार कसे थांबतील यादृष्टीने आम्ही मुंबई शहराचा विचार करतो. मुंबई शहर ही सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे असे म्हटले जाते. सोन्याची अंडी खा परंतु ती कोंबडी मारु नका. सोन्याची अंडी खाणारी माणसे मुंबईमध्ये येतात परंतु ते या मुंबईसाठी काही करत नाही हे दुःख आहे. मुंबई शहर चांगले व्हावे, मुंबई शहर स्वच्छ व्हावे, येथील जीवन जास्तीतजास्त सुसह्य करणारे मुंबई शहर असावे असे आपण म्हणतो पण तसे चित्र दिसत नाही, ही दुर्देवाची गोष्ट आहे. यासंदर्भात मी माझी स्वतःची भूमिका 1990 सालापासून या सदनामध्ये मांडत आहे.

सभापती महोदया, मुंबईमध्ये 60 गिरण्या होत्या आणि जवळजवळ अडीच ते तीन लाख गिरणी कामगार या ठिकाणी काम करीत होते. आताच सन्माननीय सदस्यांनी आज मुंबईमध्ये गिरणी कामगार कोठे राहिले आहेत असे सांगितले. अजूनही मुंबईमध्ये गिरणी कामगार मोठ्या संख्येने आहेत. ते निरनिराळया उद्योगांमध्ये लहानमोठे काम करतात. गिरणी कामगारांच्या मुली बारबाला म्हणून काम करतात, हे सांगण्यास लाज वाटते परंतु ती वस्तुस्थिती आहे. त्यांनी जीवन कसे जगावयाचे हा विचार कोणी केला आहे काय ? हा संपूर्ण कामगारवर्ग उद्ध्वस्त झालेला आहे. गिरणी कामगारांच्या प्रश्नाच्या संदर्भातील चर्चेमध्ये मला बोलावयाचे होते. गिरणी कामगारांच्या लढ्यामध्ये श्री. दत्ता सामंत यांच्याप्रमाणे मी सुध्दा जास्तीत जास्त लढा दिलेला होता. जीवावर खेळून मी लढा दिलेला आहे. त्याच्या पाठीमागे मुंबईतील माणूस सुखी राहावा हे एकमेव कारण

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

होते. त्यावेळी श्री. व्ही.पी.सिंग अर्थमंत्री होते. त्यांनी श्री. दत्ता सामंत यांच्याकडे प्रपोजल पाठवले की, आम्ही अमुक पैसे देतो, आपण संप मागे घ्यावा. परंतु त्यांनी संप मागे घेतला नाही. गिरणी मालकांनी त्यांना हाताशी धरुन तो संप आणखी वाढवा असे सांगितले होते. त्यामुळे तो संप वाढला. तो संप आजही चालू आहे. आपण जर गिरणी कामगारांना विचारले तर ते म्हणतात की, संप अजून मिटलेला नाही. गिरण्या बंद झाल्या परंतु संप चालू आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : 650 कोटी रुपयांचा प्रिमियर ऑटोमोबाईल कारखाना बंद केला. त्यामुळे तेथील कामगार देशोधडीला लागले ही देखील परिस्थिती आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : जे कामगार देशोधडीला लागले त्याचे पाप-पुण्य जे जे राज्यकर्ते होते त्यांनी त्या सगळ्यांनी वाटून घ्यावयास पाहिजे. त्यामध्ये युतीचे राज्य सुध्दा सहभागी आहे. असे घडावयास नको होते ही वस्तुस्थिती आहे. जे गिरणी कामगार होते त्यामध्ये केवळ मराठी माणसेच होती असे नाही. त्यामध्ये उत्तर प्रदेशचे पुष्कळ लोक होते. ते सगळे कामगार उद्‌ध्वस्त झाले. ही उद्‌ध्वस्त झालेली मुंबई नगरी आज मॉलच्या नव्या रुपात उभी राहात आहे. जे लहान व्यापारी होते त्यांची दुकाने बंद पडत आहेत आणि मॉलमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर विक्री सुरु झाली आहे. त्याचा परिणाम सर्वसामान्य ग्राहकांवर होतो. ज्यांच्या खिशामध्ये चार पैसे नाहीत ते उपाशी मरत आहेत. ज्यांच्या खिशामध्ये पैसे खुळखुळतात ते मॉलमध्ये दिसतात. त्यामुळे वर्गकलह निर्माण होईल की काय अशी भीती मनामध्ये निर्माण झाली आहे. या भीतीच्या पाठीमागे काही कारणे आहेत. ती कारणे दूर व्हावीत म्हणून शासन काही प्रयत्न करणार आहे काय ? शासनाने याकडे वेळीच लक्ष द्यावे. गिरणी कामगारांच्या संदर्भात असे ठरले होते की, जे भूखंड आहेत त्याचे तीन भाग करावायचे. त्यातील एक भाग म्हाडाला द्यावयाचा, एक भाग मुंबई महानगरपालिकेला द्यावयाचा आणि एक भाग मालकाला द्यावयाचा. त्या ठिकाणी गिरणी कामगारांसाठी, गरिबांसाठी घरे बांधावयाची अशी योजना होती. परंतु प्रत्यक्षात ती योजना कोठे गेली हे परमेश्वरालाच माहीत. M0ney makes miracles in this world. पैशाने काय होऊ शकत नाही असे विचारले तर मुंबई शहर हे त्याचे उदाहरण आहे. पैशाने सगळ्या गोष्टी प्राप्त होऊ शकतात. पैसा हा परमेश्वर झालेला आहे. माणुसकी बाजारात विकली गेली आहे असे चित्र मुंबई शहरामध्ये उभे आहे.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

मी कोणा एका व्यक्तीला दोष देत नाही किंवा कोणत्याही राजकीय पक्षाला दोष देत नाही. ही व्यवस्था सुधारली पाहिजे. सन्माननीय मुख्यमंत्री ज्यावेळी दुस-यांना मुख्यमंत्री झाले त्यावेळी मी त्यांना म्हटले होते की, तुम्हाला पुन्हा संधी मिळाली आहे. मुख्यमंत्री पद गाजवावयाचे असेल तर आपण मुंबईमधील रस्त्यांची स्थिती सुधारावी, पाण्याची व्यवस्था करावी, शिक्षण संस्थांमध्ये आमूलाग्र बदल करावा, कारखान्यांमधून बेरोजगारांना रोजगार कसा मिळेल यासाठी व्यवस्था करावी. आज परदेशातील अनेक पर्यटक विमानतळावरुन मुंबई शहरामध्ये थडकतात, सरळ नरिमन पॉईन्टला येतात, ताज हॉटेलमध्ये जातात, किंवा दुस-या हॉटेलमध्ये जातात. येथे आल्यावर मुंबई शहर पाहतात. मुंबईच्या दुरावस्थेमुळे जगामध्ये वाईट संदेश जातो. येथे येणारे जे पर्यटक आहेत ते पुन्हा आपल्या देशात गेल्यावर मुंबई शहराचे वर्णन आर्टिकलमधून लिहितात. आम्ही मात्र डोळे मिटून सगळया गोष्टींबाबत शांत बसलो आहोत. "शांत जाहली गती शेवटी, शांत धरित्री, शांत निशा ती, शांतच वारे, शांतच तारे, शांतच हृदयी झाले सारे." असे सर्व शांत चालले आहे. आपण मात्र असहाय होऊन या सर्व परिस्थितीकडे बघत आहोत.

सभापती महोदया, मुंबईमध्ये मोठया प्रमाणावर डेव्हलपमेंटची कामे सुरु आहेत, असे मघाशी कोणी तरी म्हटले. मुंबईत गगनचुंबी इमारती बांधल्या जात आहेत. त्यामध्ये तुमचा गरीब कोठे दिसतो काय ? ही परिस्थिती मुंबई शहराची आहे. आज शैक्षणिक जीवन उद्ध्वस्त होत चालले आहे. मैदाने शिल्लक राहिली नाहीत. शैक्षणिक संस्था बंद केल्या जात आहेत, कॉलेज बंद करुन त्या जागेवर मॉल, इमारती बांधण्याच्या योजना आखल्या जात आहेत. त्याला राज्यकर्ते, महानगरपालिका या सर्वांची साथ मिळते हे आमचे दु:ख आहे, हया आमच्या वेदना आहेत. त्या कोठे मांडावयाच्या ? त्या आम्ही येथेच मांडू शकतो, बाहेर तर आम्ही बोलतो. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी आपण सुध्दा हे नाकारु शकता काय ? मला एखादी गोष्ट खटकली की, मी सन्माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांना भेटून आपण लक्ष द्यावे असे सांगत असतो. परंतु त्यांना सांगूनही काही बदल घडत नाहीत हे आमचे दुर्दैव आहे. मुंबईतील पाणी पुरवठयाची मोठी समस्या आहे. मुंबईत असे अनेक भाग आहेत की जेथे दिवसातून एक तास सुध्दा पाणी मिळत

3...

श्री.मधुकर सरपोतदार....

नाही. हा महाराष्ट्र शासनाचा विषय नाही, मुंबई महानगरपालिकेचा विषय आहे असे शासन म्हणू शकेल. पण मुंबई महानगरपालिका ही देखील शासनाचाच एक भाग आहे. मुंबई महानगरपालिका स्वायत्त असली तरी राज्य सरकार महानगरपालिकेच्या कारभारामध्ये ढवळाढवळ करु शकते आणि तसे पूर्वी केलेले आहे आणि भविष्यामध्येही करेल हे नाकारता येत नाही. शासनाला व्यापक अधिकार आहेत आणि ते ब-याच वेळा वापरले जातात. सभापती महोदय, आज मुंबईत सर्वत्र सिमेंटीकरण सुरु आहे. सिमेंटचे जंगल उभे रहात आहे. चारही बाजूने मोठमोठया इमारती उभ्या रहात असल्यामुळे उन्हाळयात घरा बाहेर पडल्यावर उष्णता तीव्रतेने जाणवते. अशा उन्हामध्ये थोडा वेळ जरी फिरले तर माणूस चक्कर येऊन पडण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. काही दिवसांनी मुंबईत नॅनो नावाची गाडी येणार आहे. त्यामुळे वाहतुकीची समस्या अधिक गंभीर होईल. एक जमाना असा होता की, गाडयांच्या बाबतीत देशामध्ये मुंबईचा दुसरा क्रमांक होता, पहिला क्रमांक दिल्लीचा होता. आज दिल्लीचा क्रमांक दुसरा आणि महाराष्ट्राचा क्रमांक पहिला आहे. दिल्लीमधील वातावरण वेगळे असते. त्या शहराला सुध्दा मर्यादा आहेत. ते शहर सुध्दा वाढत चालले आहे. दिल्लीचे एक बरे आहे की, दिल्लीचे स्वतःचे काही नाही. दिल्लीत हवा हिमालयातून येते, पाणी बाहेरुन येते, रस्ते बाहेरुन येतात, वाहने बाहेरुन येतात. मुंबईमध्ये कोळी व आगरी बांधव मोठया प्रमाणावर राहतात. त्यांच्या कुटुंबांची स्थिती कशी आहे ती पहावी. त्यांच्या गावठाणांना जादा एफ.एस.आय.द्यावा, त्यांचे कुटुंब वाढले आहे, त्यांना अधिक जागा द्यावी. त्यांच्या व्यवसायाला जागा कमी पडत आहे, त्यांना राहण्यासाठी जागा कमी पडत आहे. स्मशान भूमीवर बिल्डर्स मंडळी अतिक्रमण करीत आहेत. त्यासाठी आमच्या सारख्यांना संघर्ष करावा लागतो. आम्ही संघर्ष केला की आम्हाला गुंड ठरविले जाते. आम्ही संघर्ष कशासाठी करतो ते समजून घेतले जात नाही. आमचा संघर्ष असतो आमच्या प्रगतीसाठी. भारतरत्न प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संघर्ष करुन प्रगती करावी असे सांगितले आहे. परंतु आमचे दलित मित्र आपापसात भांडत बसले आहेत. (अडथळा)

नंतर श्री.शिगम

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 12:00

(श्री. मधुकर सरपोतदार...)

तुमच्या मधील क्रिमिलिअर म्हणून जे वर गेले ते स्वत:ला दलित समजत नाहीत. अन्य समाजाचे लोक देखील नॉन क्रिमिलिअरची मागणी करीत असतात. हे जे सगळे चालले आहे ते देशाच्या हिताचे नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोणत्या एका जमातीची प्रॉपर्टी नाही. ते देशाची प्रॉपर्टी आहे. ज्या प्रमाणे शिवप्रभू हे संपूर्ण देशाची प्रापर्टी आहे त्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेकर हे देखील संपूर्ण देशाची प्रॉपर्टी आहे. या समजुतीने या महामानवांकडे पहायला पाहिजे. परंतु तसे होते का ? ...(अडथ्ळा...) माननीय बाळासाहेबांना हे माहीत आहे, त्यांना हे सांगण्याची गरज नाही. परंतु समजून घेण्याची बौध्दिक कुवत तुमच्यामध्ये नाही हे तुम्ही नाकारु शकत नाही आणि म्हणून तुम्ही असे बोलता.

सभापती महोदया, मुंबई हे प्रगतीचे महाद्वार आहे. हे महाद्वार बंद झाले तर आमचे जीवन कुंठीत होईल, श्वास कोंडला जाईल, प्रगती थांबेल. मुंबईचा विकास झाला तर महाराष्ट्राचा आणि देशाचा विकास होईल. या मुंबईतून केन्द्र सरकारला करापोटी 70 हजार कोटी रुपये जातात. असे असताना केन्द्र सरकारने या मुंबईला आतापर्यन्त काय दिले ? आता येथे असेही विचारले जाईल की, तुमची सत्ता होती त्यावेळी तुम्ही काय दिलेत ? राज्य तुमचे आहे की आमचे आहे हा प्रश्न गौण आहे. मी या देशाच्या राज्यकर्त्यांविषयी बोलतो मग ते राज्यकर्ते कोणीही असोत. तळागाळातील माणसाच्या कल्याणासाठी तुम्ही किती पावले उचललीत याचे उत्तर तुम्ही द्या. मी माननीय मुख्य मंत्र्यांना माझ्याबरोबर येण्यास सांगणार होतो. त्यांना प्रत्येक फूटपाथ दाखविणार होतो. काही फूटपाथवर कारखाने आणि वेश्या व्यवसाय चालू आहे. इतरही अनेक धंदे राजरोस सुरु आहेत. या मुंबईचे प्रश्न फार भीषण आहेत. फूटपाथवर कारखाने आहेत, वेश्या व्यवसाय फूटपाथवर आहे. या दोन टोकाच्या गोष्टी मी सांगितल्या. सांगण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. मी या मुंबई शहराचा खूप अभ्यास केलेला आहे, येथील समस्या मी अनुभवल्या आहेत म्हणून मी हे बोलत आहे. या मुंबई शहराचे स्वरुप बदलण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय राज्यमंत्री श्री.राजेश टोपे हे फार चांगले काम करतात. परंतु ते राज्यमंत्री असल्यामुळे कॅबिनेट दर्जाचे निर्णय माननीय मुख्यमंत्र्यांना विचारल्या शिवाय त्यांना घेता येत नाहीत. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांकडे ते ज्या गतिशीलतेने जातील त्या गतीने माननीय मुख्यमंत्री प्रतिसाद देतील. काही

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 12:00

(श्री. मधुकर सरपोतदार...

चांगली कामे झालेली आहेत. काही कामाच्या बाबतीत मला चांगला अनुभव आलेला आहे. मी फूटपाथ साफ करण्यास सांगितले त्यावेळी ते साफ झाले. मी रोज डिमेलो रस्त्यावरुन ये-जा करतो. त्या डिमेलो रोडवर पुन्हा झोपड्या उभ्या राहायला लागल्या आहेत. एखादी गोष्ट होऊ नये म्हणून कारवाई केल्यानंतर पुन्हा तीच गोष्ट होणे बरोबर नाही. एकदा चोरी झाल्यानंतर पुन्हा चोरी होऊ नये यासाठी 4 चोरांना पकडले. परंतु दुस-या दिवशी पुन्हा मोठा दरोडा पडला तर ते पोलिसांचे अपयश आहे. एकदा चोरी पकडल्यानंतर पुन्हा चोरी होणार नाही, दरोडा पडणार नाही यासाठी प्रिव्हेन्टीव्ह ॲक्शन घेणे हे पोलीस दलाचे काम आहे. त्यादृष्टीकोनातून या प्रश्नाकडे पहाणे गरजेचे आहे. परंतु तसे आपण पहातो काय ? आपण केवळ वेळ मारुन नेण्याचे काम करतो. महापूर आल्यानंतर काही कोटींची मदत लोकांना करण्यात आली. काहींना ती मिळाली, काहींना मिळाली नाही, काहींनी त्यातील काही भाग लुटून घेतला. या मुंबईमध्ये पाणी भरणार नाही, कोठेही वाहतूक जाम होणार नाही अशा त-हेची उत्कृष्ट दर्जाची सेवा उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने इलाज करणे महत्वाचे आहे. हा इलाज आपण करणार आहात काय हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे हे मला मुद्दाम या निमित्ताने सांगावयाचे आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

मुंबईमध्ये अनधिकृत बांधकामांचे पेव फुटलेले आहे. परवा माननीय मुख्यमंत्री एका कार्यक्रमात बोलले की, यापुढे आम्ही अनधिकृत बांधकामे सहन करणार नाही. ज्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे होतील तेथील पोलीस अधिका-यांवर कारवाई करु. वॉर्ड अधिका-यांवर कारवाई करु. यासंदर्भात कोणाही अधिका-यावर कारवाई होत नाही. त्यामुळे मुंबई शहरात अनधिकृत बांधकामे निर्वेधपणे सुरु आहेत. ही अनधिकृत बांधकामे कशा पध्दतीने थांबविली जाणार आहेत ? माझ्यासोबत आपण चला. मुंबई शहरात कोणकोणत्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे चालू आहेत ते मी आपल्याला दाखवून देतो. या कामांकडे कोणाही अधिका-यांचे लक्ष नाही. शासन म्हणते त्या कामांवर नियंत्रण ठेवण्याचे काम आमचे नाही. महानगरपालिका म्हणते ती कामे थांबविणे हे आमचे काम नाही. मी दोन,तीन दिवसापूर्वी माननीय मुख्यमत्र्यांना बोललो की, मुंबई शहरातील अतिक्रमणे हटविण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्याकडे देण्यात आली आहे. परंतु जिल्हाधिकारी कार्यालयाकडून फोटोपास देण्याचे काम मोठया प्रमाणात सुरु आहे. अतिक्रमण विरोधी पथक गेल्या 25 वर्षापासून काम करीत आहे. गेल्या 25 वर्षात अतिक्रमण विरोधी पथकाने किती अतिक्रमणे काढली याचा त्यांच्याकडून हिशोब घ्यावा तसेच गेल्या 25 वर्षात जिल्हाधिकारी कार्यालयाकडून किती फोटोपास दिले गेले याचा सुध्दा त्यांच्याकडून हिशोब घ्यावा आणि त्यासंबंधीची माहिती सभागृहात देण्यात यावी. आमच्या वांद्रे विभागात खाण्यासाठी पैसे मिळावेत म्हणून आपल्या झोपडयामध्ये पोटमाळा करतात. पोटमाळयामध्ये राहणारे लोक हे सर्व बांगला देशी आहेत. मी बांगला देशी म्हटले की, या सभागृहातील निधर्मी सदस्य माझ्यावर चिडतात. मला एकच म्हणावयाचे आहे की, प्रत्येकाने आपल्या धर्माप्रमाणेच काम केले पाहिजे. त्यात काही चूक आहे. पण दुस-या धर्मावर अतिक्रमण करु नये. धर्माप्रमाणे आपण जरुर वागले पाहिजे. धर्माचा मान ठेवताना या राष्ट्राचा देखील विचार केला गेला पाहिजे असे माझे मत आहे. धर्माचा मान ठेऊन सर्व कामे करावयाची आणि दुसरीकडे राष्ट्रविरोधी कारवाया करावयाचा हे कधीही योग्य नाही. हिंदुस्थान आणि पाकिस्तानची फाळणी झाली त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की, फाळणी करु नका. फाळणी करावयाची असेल तर लोकवस्तीची करा. पण त्यावेळी त्यांचे ऐकले गेले नाही. आपण प्रत्येक वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्योतीबा फुले, महात्मा गांधी अशा महापुरुषांची नावे घेतो. या महापुरुषांची नावे घ्यावयाची आणि राज्य कारभार तसाच चालू

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

ठेवावयाचा. माझी नम्रपणे विनंती आहे की, जनतेला फसवू नका. ज्याप्रमाणे आपण महापुरुषांची नावे घेतो, त्याप्रमाणे आपली कृती असली पाहिजे. आमच्याकडे असे लोक नाहीत असे मी म्हणत नाही. मनुष्य आहे तेथे स्वार्थ आला. स्वार्थ आला की, त्याचा गैरफायदा घेतला जातो ही वस्तुस्थिती आहे. जशी तुम्ही माणसे आहात, तशी आम्ही देखील माणसे आहोत. आमच्या देखील मनाला कधी तरी स्वार्थ शिवतो. म्हणून चूक होण्याची शक्यता आहे. परंतु चूक झाली तर ती चूक तुम्ही आमच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे. तुम्ही अशी चूक केली आहे, ती आपण सुधारावी असे सांगणा-याचे चारित्र्य शुध्द असले पाहिजे. मी या दृष्टीकोनातून सगळीकडे पाहतो आहे.

सभापती महोदया, मुंबईतील शिक्षण क्षेत्राबद्दल मी बोललो. मुंबईत विद्यापीठे आहेत, अनेक कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालये आहेत. मुंबईतील मराठी शाळेची अवस्था अशी झाली आहे की, त्या शाळांमध्ये मराठी विद्यार्थी राहिलेले नाहीत. त्या ठिकाणी परप्रांतीय विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेच्या मराठी शाळांमध्ये हिंदी वर्ग सुरु झाले आहेत. बाहेरुन येणारी सगळी मुले महानगरपालिकेच्या शाळांमध्ये प्रवेश घेत आहेत. मुंबईत गिरण्यांचा संप झाल्यामुळे गिरणी कामगार उद्ध्वस्त होऊन तो मुंबई शहराच्या बाहेर जाऊन राहू लागला आहे. मुंबईतील इतरही उद्योग बंद झाल्यामुळे तेथीलही मराठी कामगार मुंबईच्या बाहेर जाऊन जेथे जागा मिळेल तेथे रहावयास जात आहे. त्यामुळे मराठी विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे. मुंबईतील मराठी माणसे मुंबईच्या बाहेर जात आहेत ही एक फार मोठी शोकांतिका आहे. मुंबई शहर महाराष्ट्रात यावे म्हणून संयुक्त महाराष्ट्राचा तेजस्वी लढा झाला आहे. त्या लढयामध्ये गिरणी कामगारांनी खूप मोठी भूमिका बजावली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयात 105 लोक हुतात्मे झाले आहेत. या लढयात गरीब माणसे मारली गेली. श्रीमंताचा एकही पुत्र त्या लढयात मारला गेला नाही. गगनचुंबी इमारतीत राहणारी माणसे आंदोलनात कधीही उतरत नाहीत. ज्याला पोटाची काळजी असते तोच माणूस आंदोलनात उतरतो. गगनचुंबी इमारतीत राहणारे लोक कधीही मतदान करण्यासाठी बाहेर पडत नाहीत. सगळयात जास्त मतदान हे झोपडपट्या आणि मध्यमवर्गीयांच्या घरामधून होत असते. उच्चभ्रू वस्तीत गेलात तर तेथे 10 टक्क्यापेक्षा जास्त मतदार होत नाही. गेली अनेक वर्षे आपण निवडणुकांचा अनुभव घेतलेला आहे. उच्चभ्रू लोकांना निवडणुकीशी काही घेणे देणे नसते. त्यांना कोणाची गरज राहिलेली नाही. मी लोकसभेत बोललो होतो की, प्रत्येकाला मतदान हे कंपल्सरी केले पाहिजे.

.... यानंतर श्री.कानडे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MMP/ 12:10

श्री. मधुकर सरपोतदार....

जे मतदान करणार नाहीत त्यांना फोटोपास देऊ नका, पासपोर्ट देऊ नका, रेशनकार्ड देऊ नका. शासन ज्या सवलती देत आहे त्या बंद होऊ नये असे वाटत असेल तर मतदान करा. मतदान केले नाही तर लोकशाही टिकणार नाही. परंतु मतांच्या लाचारीसाठी झोपडपट्टया वाढू द्यावयाच्या. यासंदर्भात 1976 चा कायदा आहे. परंतु मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की 2000 सालापर्यंतच्या झोपडयांना अभय देत आहोत. निवडणुका लागल्या की 2005 सालापर्यंतच्या झोपडयांना अभय देत आहोत असे सांगतील. मतांच्या लाचारीसाठी हे सर्व चालले आहे. लोकप्रतिनिधी निवडून येतात त्यांचे हे काम आहे की ज्या क्षेत्रातून आपण निवडून आलो त्या क्षेत्रातील नागरिकांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देणे आणि मतदारसंघात कोणत्याही प्रकारच्या अडचणी राहणार नाहीत याची दक्षता घेणे हे लोकप्रतिनिधीचे काम आहे. आज लोकप्रतिनिधीला 1 कोटी रुपयाचा फंड मतदारसंघात विकास कामांसाठी मिळतो. कालच लोकसभेत खासदारांचा 2 कोटी रुपयांचा फंड 5 कोटी रुपये करण्याची मागणी करण्यात आली त्यावेळी लोकसभेचे सभापती श्री. सोमनाथ चॅटर्जी यांनी सांगितले की हा फंड बंद करुन टाका. या फंडाचा दुरुपयोग जास्त होतो आणि उपयोग कमी होतो लोकसभेच्या सभापतींनी कालच लोकसभेत सांगितले ते मी येथे उधृत केले आहे. यासाठी हे सांगतो आहे की मुंबई शहरामध्ये जे चालले आहे हे थांबविण्याची आवश्यकता आहे. अनावश्यक गोष्टींवर खर्च होणारा पैसा थांबला पाहिजे. मी ज्यावेळी पहिल्यांदा पाच वर्षासाठी निवडून आलो त्यावेळी माझ्या खेरवाडी मतदारसंघात 2000 शौचालये बांधली. आता एसआरए योजना आली म्हणून बिल्डरने धडाधड ही शौचालये पाडून टाकली. मी बिल्डरला विचारले की जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेतली आहे काय ? कारण शासनाच्या निधीतून ही शौचालये बांधण्यात आली आहेत. तसेच जर पाडायची असतील तर दुसरीकडे या लोकांची व्यवस्था केलेली आहे काय? कारण इमारती 3/4 वर्षानंतर उभ्या राहतील तोपर्यंत येथील लोकांना रस्त्यावर जायचे काय? अशा अनेक समस्या आज मुंबई शहराला भेडसावत आहेत आणि त्यावर उत्तर शोधण्याची आवश्यकता आहे. मंत्रीमहोदयांना मी विनंती करतो की मी हे सर्व प्रश्न मांडत आहे ते शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मांडत आहे. बिल्डर लॉबी स्ट्राँग झालेली आहे. ही लॉबी वाट्टेल ते करु शकते. कायदाही बदलवू शकते. स्लमच्या बाबतीत मी 1 तारखेला लक्षवेधी सूचना दिली होती अजून सभागृहात लागली नाही. मी माननीय सभापतींना भेटणार आहे. उद्या माझा सदनातील शेवटचा

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

दिवस आहे. अजूनही ती लक्षवेधी लागली नाही. स्लमच्या बाबतीत ही लक्षवेधी सूचना 1 तारखेला मी दिली होती. अद्याप का लागली नाही ? याचा अर्थ काय ? बिल्डरचा प्रभाव येथपर्यंत प्रभावी होत चालला आहे काय ? स्लम एरियामधील लोकांचे हाल होत आहेत. 3/4 वर्षे हा विषय मांडत आहे. या वस्त्यांमध्ये राहणारे सगळे दलित लोक आहेत त्यांची काळजी कोण घेणार आहे ? बोलताना खूप मोठया गोष्टी आपण बोलतो. पण प्रसंग आला तर आमच्या लोकांना धावून जावे लागते. आम्हांला विकत घेणारा खिसा अजून तयार झालेला नाही हे मान्य करावे लागेल. काम करताना तो दलित आहे, मुस्लीम आहे या गोष्टी आम्ही आमच्या आयुष्यात कधीही केल्या नाहीत. अशाच पध्दतीने सर्व लोकप्रतिनिधींनी काम करावे असे माझे मत आहे. या सगळया गोष्टींच्या मुळामध्ये माझा देश, माझी मातृभूमी आणि या देशावर प्रेम करणारे लोक हे आहे. मातृभूमीला उद्ध्वस्त करणाऱ्या ज्या शक्ती असतील त्यांना उद्ध्वस्त करण्याचे काम आपण केले पाहिजे. हा आमचा देश आहे यादृष्टीने आम्ही काम करीत आहोत.

( **सभापतीस्थानी माननीय उपसभापती** )

सभापती महोदय, मुंबईमध्ये विजेचा आणि गॅसचा प्रश्न खूप महत्वाचा आहे. मुंबईमध्ये आज वीज मिळते हे सत्य आहे. परंतु मुंबईमध्ये वीज मिळत असताना मुलुंड आणि भांडूप भागामध्ये राज्य वीज मंडळ पुरवठा करीत असल्यामुळे लोडशेडींग सुरु आहे. अजून आमच्या मुंबई शहरात लोडशेडींग सुरु झालेले नाही.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.......

परंतु रिलायन्स किंवा अन्य वीज पुरवठा करणाऱ्या कंपन्या सातत्याने दरामध्ये वाढ करीत आहेत. फ्युएल ॲडजस्टमेंट चार्जच्या नावाखाली ग्राहकांकडून पैसे वसूल केले जात आहेत. फ्युएल ॲडजस्टमेंट चार्ज कशासाठी वसूल केला जातो? याची माहिती जनतेला कळू द्या. वीज चोरी होते म्हणून फ्युएल ॲडजस्टमेंट चार्ज, वीज फुकट वापरली जाते म्हणून फ्युएल ॲडजस्टमेंट चार्ज आकारला जातो. म्हणजे काही लोकांनी गैरकारभार करायचा आणि पैसे भरणारा जो सर्वसाधारण ग्राहक आहे त्याच्या खिशातून पैसे काढून या वीज कंपन्यांचे नुकसान होऊ द्यायचे नाही हे शासनाचे धोरण दिसून येते. फ्युएल ॲडजस्टमेंट चार्जचे हे सगळ्यात मोठे शास्त्र आहे. हे कोणी पहायचे? याकडे कोणीतरी पाहण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मुंबई शहर व उपनगरामध्ये विजेचा प्रश्न आहे, गॅसचा प्रश्न आहे. मुंबईच्या उपनगरामध्ये आज घरोघरी गॅस पुरवठा केला जात आहे. अन्यत्र आज ना उद्या पुरवठा सुरु होईल. सीएनजी गॅस वाहनांना पुरविला जातो. बेस्टच्या बसेसना, रिक्षा, टॅक्सीना सीएनजी गॅसचा पुरवठा केला जातो. परंतु या गॅस पुरवठा केंद्रांची संख्या अतिशय मर्यादित आहे. त्यामुळे गॅस भरुन घेण्यासाठी केंद्रावर वाहनांच्या प्रचंड रांगा लागतात. सर्वसामान्य रिक्षा व टॅक्सीचालक जर अशा रांगामध्ये उभा राहिला तर त्याने धंदा कसा करायचा? धंदा झाला नाही तर त्याच्या कुटुंबाचा चरितार्थ त्याने कसा चालवायचा? उत्पन्न कमी झाले तर ते आपल्या कुटुंबाची देखभाल कशी करतील? मंत्रीमहोदयांनी या प्रश्नाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मंत्रीमहोदय या संदर्भात चांगल्या पध्दतीने काम करतील याबद्दल मला विश्वास आहे. परंतु जितक्या गतीने काम व्हावयास पाहिजे तेवढ्या गतीने ते झाले पाहिजे. Your speed is very much necessary in such respect. स्पीड नसेल तर उपयोग नाही. मुंबईतील जल वाहतूक आणि हवाई वाहतूक हा देखील महत्वाचा भाग आहे. हवाई वाहतूक सुधारण्याच्या मार्गावर आहे. परंतु मुंबई विमानतळ परिसरातील 80 हजार झोपडपट्टयांचे काय होणार याची मला फार काळजी आहे. सहार विमानतळाजवळील झोपडपट्टीत निवडणूक प्रचारानिमित्त मी गेलो होतो. तेथे मोठ्या प्रमाणात दलित समाज राहतो. तिथे गेल्यानंतर तेथील भगिनींनी मला ओवाळले. आम्ही तुम्हाला लोकसभेत निवडून पाठवतो असे सांगितले. त्यांनी विनंती केली की, तुम्ही काहीही करा परंतु आम्हाला वीज उपलब्ध करुन द्या. मी लोकसभेत गेल्यानंतर पहिला प्रश्न सहार येथील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार........

झोपडपट्टीमध्ये वीज पुरवठा करण्याबाबतचा हाती घेतला आणि त्यानंतर तेथे वीज पुरवठा सुरु झाला. हे मंत्रीमहोदयांनी लक्षात घ्यावे. लोकांची गरज ओळखून जो लोकप्रतिनिधी काम करतो, तो खरा लोकप्रतिनिधी समजला जातो. स्वत:च्या स्वार्थासाठी निवडून यायचे आणि निवडून आल्यानंतर लोकांना विसरुन जायचे असा अलिखित नियम या देशामध्ये निर्माण झाला आहे. हा नियम लोकशाहीला घातक आणि बाधक आहे. लोकशाहीचा गळा कापणारा आहे असे माझे स्वत:चे ठाम मत आहे. मी जे बोलतो आहे त्याबद्दल मला कोणाची भीती वाटत नाही.

सभापती महोदय, मुंबईतील गॅस, वीज पुरवठा, पाणी पुरवठा, दळणवळणाबद्दल मी बोललो आहे. दळणवळणाची आज जी साधने उपलब्ध आहेत ती लक्षात घेता यामध्ये त्वरेने सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. मी सन्माननीय सभापतींकडे हा विषय दिला आहे. अतिशय साधी गोष्ट आहे. आम्ही ज्यावेळी वांद्र्याहून विधानभवनाकडे यायला निघतो, इतर सन्माननीय सदस्य कांदिवली किंवा बोरीवलीहून निघतात त्यावेळी माहीम येथे आल्यानंतर ब्रेक लागतो. तेथे नेहमी ट्रॅफिक जाम असतो. त्याचा सामना करीत करीत चौपाटीपर्यंत यावे लागते. सगळ्या ठिकाणी ट्रॅफिक जाम असतो. याचा रोज सामना करावा लागतो. मी माहीम येथील ट्रॅफिक जामबद्दल शासनाला सूचना केली होती. माहीम वळणावरुन मुंबईकडे येणारा जो रस्ता आहे त्याला डावीकडे फुटपाथ कमी करुन विशेष छेदमार्ग निर्माण करुन स्पेशल फ्री वे तयार करावा अशी सूचना केली होती. यामुळे माहीमनंतर मच्छिमार नगरापुढे व्हिक्टोरिया चर्चमार्गे सेनापती बापट मार्गावरुन तुलसी पाईप मार्गावरुन पुढे मुंबईकडे येता येईल अशी ती सूचना होती. परंतु मागील 4-5 वर्षे सतत ही सूचना करुनही सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा रस्ते विकास महामंडळाला या सूचनेकडे पहायला वेळ मिळालेला नाही. ट्रॅफिक जाम ही मुंबईच्या शहर व उपनगरातील जनतेची खूप मोठी समस्या आहे. यामुळे इंधन किती प्रमाणात जळते याचा कोणी विचार करतो का? जो माणूस वाहन वापरतो त्याच्या खिशाला किती प्रमाणात चटका बसतो याचा विचार कोणी करीत नाही. या प्रश्नाचा शोध कधी घ्यायचा? आज वांद्रे-वरळी सेतू मार्गाचे काम सुरु आहे. शासन म्हणते की, डिसेंबर 2008 मध्ये हा मार्ग पूर्ण होईल. परंतु माझा यावर विश्वास नाही. मी स्वत: या कामाची पाहणी करुन आलो आहे. काम प्रगतीपथावर आहे. परंतु प्रत्यक्षात हा मार्ग सुरु होईल, प्रत्यक्षातील वळणे काढून मार्ग सुकर होण्यासाठी अद्यापही वेळ लागणार आहे. म्हणूनच

..3..



SGB/ SBT/ MMP/ 12:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार........

मुंबईचा प्रश्न आज आम्ही चर्चेला घेतला आहे. आमचे दु:ख एकच आहे ते म्हणजे ही चर्चा विशेष बैठकीमध्ये न होता दुपारच्या सत्रात व्हावयास पाहिजे होती.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

म्हणजे या चर्चेमध्ये अजून काही सन्माननीय सदस्यांना भाग घेता आला असता. खरे म्हणजे मुंबईच्या चर्चेवर आम्हाला पाच तासाचा वेळ द्यावयास पाहिजे होता परंतु दोन चर्चा एकत्र घेऊन या चर्चेला अडीच तासाचा वेळ देण्यात आलेला आहे. या अडीच तासामध्ये माननीय मंत्रीमहोदयांना एक तास उत्तरासाठी लागेल. ही चर्चा अडीच तासात होणार नाही याची आम्हाला देखील कल्पना आहे. मुंबईचा विषय हा खूप मोठा विषय आहे. मुंबई संपूर्ण देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईचे प्रश्न मांडण्यासाठी केवळ अडीच तासाचा वेळ देऊन सदस्यांना यावर आपले विचार मांडता येणार नाहीत. मुंबईला यातना मुक्त करा, वेदना मुक्त करा, मुंबईला सुविधा पुरवा, मुंबईचे जीवन सुखी करा, दळवळण इफेक्टीव्ह करा. आता मुंबईमध्ये गँगवॉरचे प्रमाण कमी होत चालले असल्यामुळे मला पोलिसांचे आभार मानायलाच पाहिजे. परंतु मुंबईमध्ये आता देशद्रोही माणसांचे अड्डे खूप वाढलेले आहे. कधी कोठे बॉम्ब ठेवून अपघात घडविला जाईल हे आता सांगता येत नाही. त्यामुळे देशद्रोही कारवायांना आळा बसावा, धाक बसावा यासाठी पोलीस खात्याला अधिक जागरुन राहून काम करावे लागणार आहे. मुंबईतील लोकांचे जीवन सुखी व्हावे, सुसहय् व्हावे आणि भविष्यकाळात मुंबईकरांना चांगले जीवन जगता येईल, मोकळा श्वास घेता येईल यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. प्रदुषणमुक्त मुंबई कशी करता येईल याचा विचार व्हावा एवढीच या निमित्ताने विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी मुंबईच्या प्रश्नासंदर्भात काही मुद्दे मांडू इच्छिते. मुंबई शहर हे सात बेटाचे मिळून तयार झाले असले तरी या शहराचा विकास करतांना वेगवेगळया संस्थांनी आणि वेगवेगळया लोकांचा याच्यामध्ये वाटा आहे. 1872 मध्ये मुंबई महानगरपालिकेची स्थापना झाली होती. मुंबई महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर वेगवेगळया पध्दतीने मग बोरीबंदर स्टेशन असू दे, मुंबई महानगरपालिकेची इमारत किंवा राजाबाई टॉवर अशा ऐतिहासीक इमारती या शहरात बांधल्या गेल्या. पहिली रेल्वे ठाणे ते मुंबई दरम्यान चालवली गेली होती. सुरुवातीला या गाडीची कॅपेसीटी 500 माणसांची होती परंतु आता आम्ही ज्यावेळेस बोरीबंदर स्टेशनवर रेल्वेतून उतरतो तेव्हा माणसांना चालता येत नाही एवढया मोठया प्रमाणात स्टेशनवर वर्दळ असते. माणसांना पाय ठेवायला सुध्दा रेल्वेस्टेशनवर जागा नसते अशी आज मुंबई शहराची भयावह अवस्था झालेली आहे. मुंबईच्या या अवस्थेसाठी कोण कोण जबाबदार आहे याची जंत्री मी या ठिकाणी वाचणार नाही. परंतु या जंत्रीमध्ये काही माणसे किंवा काही निर्णय चुकीचे असतील असेही मला वाटते. 1974 मध्ये मुंबई महानगरपालिकेला जेव्हा शंभर वर्षे पूर्ण झाली होती त्यावेळेस मी सुध्दा त्या ठिकाणी एक साक्षीदार होते. कारण या महानगरपालिकेत मी एक सभासद म्हणून काम केलेले आहे. त्यावेळेपासून 1992 पर्यंत मुंबई महानगरपालिकेला जवळून आणि 1992 मध्ये मुंबई महानगरपालिकेला बाहेरुन पाहिलेले आहे व या कालावधीत मी मुंबई महानगरपालिकेचा कारभार फार जवळून पाहिलेला आहे. मुंबई शहराचा वाहतुकीचा प्रश्न आज ऐरणीवर आलेला आहे. ऐरणीवर एवढयासाठी म्हणते की, माझ्या अगोदर सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी सांगितले आहे की, "सरकारच्या सगळया जबाबदा-या आहेत." परंतु सभापती महोदय, असे जर आपण म्हटले तर त्याला पूर्णविराम मिळणार नाही. पण सरकार हे आपले आहे, सरकार कामे करणार आहे परंतु आम्ही मुंबईची स्वायत्त बॉडी आहे या स्वायत्त बॉडीला आपल्याला मनमानी करु द्यावयाची आहे का ? तर याचे उत्तर आपल्याला नाही म्हणून च द्यावे लागेल. जेव्हा आपण एक बोट दुस-याकडे दाखवतो तेव्हा आपल्याकडे चार बोटे असतात हे आपण विसरु नये. 1995 ते 2000 या वर्षात जे काही निर्णय घेतले, ज्या काही घटना घडल्या, जी काही बांधकामे झालेली आहेत त्यामध्ये ते दडलेले आहे. अगोदरच्या काळात म्हाडामध्ये

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई......

गेल्यानंतर एका दिवसात तुम्हाला प्लॉट मंजूर होत होता आणि तीन दिवसामध्ये प्लॅन पास होऊन इमारती तयार होत होत्या. त्या काळात माणसे वाढत होती, परंतु खरे कोण वाढलेले आहे?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई..

मुंबई शहरातील माणसे वाढली आहेत परंतु त्यांच्यामध्ये अनेक मोठे भांडवलदार आले आहेत. 1995 ते 2000 सालापर्यंत या माणसांना आपणच निमंत्रण दिले आहे असे माझे म्हणणे आहे.मुंबई शहरात वाहतुकीची समस्या निर्माण झालेली आहे. मुंबईत 55 हजार टॅक्सीज आहेत त्याशिवाय खाजगी बस गाडया आणि बेस्टच्या बसेस मुंबईत धावतात . त्यामुळेच वाहतुकीची समस्या निर्माण झालेल्या आहेत. या सर्व वावरामध्ये सामान्य माणूस कोठे आहे याचा देखील शोध घेण्याची गरज आहे. एखाद्या व्यक्तीला जर बसमध्ये चढावयाचे असेल तर ही बस स्टॉपवर थांबवली जात नाही तर बस स्टॉप पासून लांब उभी राहते आणि अनेकजण धावत जाऊन बस पकडत असतात तेव्हा याबाबतीत सुधारणा घडवून आणण्याचा देखील विचार केला पाहिजे .

सभापती महोदय, मी आणखी एक मुद्दा मांडणार आहे. स्व. यशवंतराव चव्हाण जेव्हा मुबईचे मुख्यमंत्री होते तेव्हा 1960 साली पहिली महाराष्ट्र हौसिंग बोर्डाची स्थापना केली होती आणि मुंबईतील कामगारांना तीन महिन्याचे डिपॉझिट देऊन घर मिळाले पाहिजे अशा प्रकारची एक योजना राबवली होती . तीन महिन्याचे डिपॉझिट भरुन गिरणी कामगाराना तसेच कारखान्यातील कामगारांना लॉटरी पध्दतीने घर मिळाले पाहिजे अशी व्यवस्था करण्यात आली होती तेव्हा ही व्यवस्था आता कोठे गेली आहे ? याचा विचार गृह निर्माण विभागाने करावयास पाहिजे.याचे कारण असे की आज मुंबई शहरामध्ये मोठ मोठे टॉवर्स बांधले जात आहेत तेव्हा हे टॉवर्स कोण बांधत आहेत ? मोठ मोठे बिल्डर्स हे टॉवर्स मोठया लोकांसाठी बांधत असल्यामुळे सर्व सामान्य माणूस घरापासून वंचित रहात आहे. त्यातून झोपडपट्टयांची निर्मिती झाली आहे. सामान्य माणसाच्या खिशाला परवडणारे घर जर मिळाले असते तर झोपडपट्टयाची निर्मिती झाली नसती असे मला वाटते. तेव्हा याबाबतीत विचार करणे गरजेचे आहे .70 हजार घरांची मागणी असतांना शासन 30 हजार घरे बांधून लोकांना पुरवत असते त्यातून काय निष्पन्न होते याचासुध्दा विचार केला पाहिजे. आज मुंबई शहराची वाढ सातत्याने होत आहे परंतु सांडपाण्याची काय योजना करण्यात आली आहे. या ठिकाणी उत्तर देतांना असे सांगण्यात आले आहे की, यांसबंधीची योजना केन्द्र सरकारकडे पाठविण्यात आलेली आहे त्यांच्याकडून पैसे आलेले नाही. मी या ठिकाणी दाव्याने सांगू इच्छिते की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय श्री.विलासराव देशमुख आणि त्यावेळचे मुंबई कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष व खासदार श्री. गुरुदास कामत यांनी पाठपुरावा करुन मुंबई शहराच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई..

प्रगतीसाठी केन्द्र सरकारकडून योजना मंजूर करुन आणल्या असून त्याची अंमजबजावणी मुंबई शहरामध्ये केली जात असल्याचे आपल्याला पहावयास मिळत आहे. दिनांक 26 जुलै 2005 साली मुंबईमध्ये पावसामुळे हाहाकार उडाला होता. त्यावेळी रस्त्यावर फक्त महाराष्ट्र शासन काम करीत असतांना पहावयाला मिळत होते इतर कोणीही माणसे त्यावेळी काम करीत नप्व्हती. स्वत:ला स्वायत्त बॉडी असे समजावयाचे पंरतु दुस-या बाजूने मात्र काहीही चर्चा करावयाची हा प्रकार कोठे तरी थांबायला पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. सांडपाण्याची काय व्यवस्था करण्यात आलेली आहे ? 1989 साली सांडपाण्याची व्यवस्था करण्याकरिता घाटकोपर आणि विक्रोळीच्या दरम्यान टनेलचे काम झाले होते त्यानंतर घाटकोपरच्या पम्पीग स्टेशनला हा टनेल जोडण्याचे काम अजूनही झालेले नाही. मुबई महनगरपालिकेकडून हे काम करण्यात आले नाही त्याला कोण जबाबदार आहे ? हे पाहण्याची गरज आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.झ ाोपडपट्टयांसाठी एक योजना राबविण्यात आली असून 1976 पासून 2000 सालपर्यतच्या झोपडयांना फोटोपास देण्यात येईल, त्यांना संरक्षण देण्यात येईल या सदर्भात अनेक चर्चा करण्यात आल्या आहेत परंतु त्या झोपडपट्टयामध्ये नेमके कोण गेलेले आहे ? . बिल्डीगचे काम आपल्याला कसे मिळेल या दृष्टीने झोपडपट्टी दादा पाठपुरावा करीत आहेत.या झोपडपट्टयामध्ये स्वच्छतागृहे बांधण्यात आली पाहिजेत अशा प्रकारचा ठराव महानगरपालिकेच्या सभागृहाने पास केला होता त्या अंतर्गत 65 हजार स्वच्छतागृहे मुंबई शहरात वेगवेगळया ठिकाणी बांधली जावी अशा प्रकारची चर्चा स्वायत्त बॉडीमध्ये करण्यात आली होती पंरतु प्रत्यक्षात 15 हजार स्वच्छता गृहे बांधण्यात आली होती . त्यामुळे मुंबई शहरातील काही लोक रस्त्याच्या बाजूला किंवा रेल्वे लाईनच्या बाजूला नैसर्गिक विधी करावयास लागले आहेत. त्यामुळे मुंबई शहर बकाल झाले आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ....

आपण एका बाजूला ग्लोबल वॉर्मिंगबद्दल चर्चा करायची आणि दुसऱ्या बाजूला सगळी वृक्षतोड कशी होईल आणि त्यातून आपला फायदा कसा होईल हे पाहिले जाते. मी हे सारे माझ्या डोळ्याने पाहिले आहे आणि कानाने ऐकले आहे. म्हणूनच मी याबाबत येथे चर्चा करीत आहे. जगाच्या प्रगतीबरोबर मुंबईचीही प्रगती व्हायला पाहिजे याबद्दल कोणाचे दुमत नाही. मुंबई ही औद्योगिक नगरी आहे आणि या नगरीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सामान्य माणसाचा प्रेमाचा आहे तोच दृष्टिकोन भांडवलदारांचादेखील असला पाहिजे असे म्हणणाऱ्यांपैकी मी एक आहे. तो दृष्टीकोन सगळीकडे येईल असे मला पहायचे आहे. अन्यथा मुंबई शहर हे केवळ सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे एवढेच आपण त्यावर भाष्य करू नका. सभापती महोदय, मुंबई शहराच्या पाणी पुरवठ्याचा प्रश्न दिवसेंदिवस अत्यंत बिकट होत चालला आहे. 100-150 वर्षापूर्वी त्यासाठी टाकलेल्या लाईनमध्ये जराही प्रगती झालेली नाही, सुधारणा झाली नाही. आजही तानसा-वैतरणातून पाणी पुरवठा मुंबईला होतो आहे. आज मुंबई शहरामध्ये टोलेजंग इमारती उभ्या राहत आहेत आणि त्यांना पाणीपुरवठा करताना सामान्यांचे पाणी आपण काढून घेणार आहात का ? तेव्हा जोपर्यंत अप्पर वैतरणा ही योजना यासाठी कार्यान्वित होत नाही तोपर्यंत मुंबईला होणारा पाणी पुरवठा याच गतीने होत राहील आणि म्हणूनच त्या योजनेला चालना मिळेल की नाही हे पाहण्याची अत्यंत गरज आहे. एमयूटीपी आणि एमआयडीसी कडून हे काम चालू आहे. परंतु त्यामध्ये काही खोडे घालण्याचेही काम पद्धतशीरपणे काही जण करीत आहेत हेही मला येथे सांगावयाचे आहे. सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये आपण काही प्लेग्राऊंडस् राखून ठेवली आहेत, काही गार्डनस् राखून ठेवली आहेत. त्या राखीव भूखंडांकडे पाहिले तर आपल्याला दिसते आहे की, तेथे इनडोअर गेम्सच्या नावाखाली आत काही इमारती उभ्या करून ती मैदाने आपल्या ताब्यात घेण्याचे प्रकार सुरू आहेत आणि त्या ठिकाणी आतमध्ये हॉटेल्स चालविली जात आहेत. महाराजांचे नाव घेऊन संभाजी उद्यान म्हणून केलेले काम अशाच प्रकारे राबविण्याचा प्रयत्न केला गेला पण तेथील जनतेने त्याला विरोध केल्यानंतर मग मागे पाऊल घ्यायचे हे दुटप्पी धोरण बदलले पाहिजे. अन्यथा मुंबईची ही फुफ्फुसे कोठल्या तरी भांडवलदारांच्या हाती जातील आणि ही मैदाने त्यांच्या घशात गेल्याशिवाय राहणार नाहीत.

..... वाय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती देसाई ....

सभापती महोदय, घन-कचऱ्याबद्दल मी येथे बोलणार आहे. मुंबई शहरामध्ये दररोज जवळपास 19 हजार टन घनकचरा आपण काढतो आणि त्याची विल्हेवाट मुलुंड चेकनाक्या जवळील आणि गोवंडी येथील डंपिंग ग्राऊंडवर लावली जात आहे. पण आता या डंपिंग ग्राऊंडस्ची कॅपसिटी संपलेली आहे तेव्हा पुढे काय करायचे याचाही विचार आपण केला पाहिजे.

सभापती महोदय, वेळ अपुरा असल्याने मी माझे मुद्दे एकदोन वाक्यांमध्ये येथे मांडणार आहे. मुंबई शहरातून प्रवास करताना आपल्याला जागोजागी कचऱ्याचे ढीग दिसतात. अनधिकृतपणे अनेक ठिकाणी इमारती उभ्या राहतात, तसेच कचऱ्याचे ढीग देखील उभे केले जातात आणि ते सारे करण्यामध्ये आमचे काही अधिकारी, वॉर्ड ऑफिसरदेखील तेवढेच जबाबदार आहेत. सभापती महोदय, मी हे जबाबदारीने बोलते आहे की, त्यांना याबाबत सगळे मार्गदर्शन करणारे, ब्रेन देणारी ही पालिकेतील मंडळी बसली आहेत आणि म्हणूनच त्यांना बोलावून समज देण्याची अत्यंत गरज आहे. सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये खाजगी वनांच्या जागांवर काही इमारती उभ्या राहिल्या आहेत, या इमारती जरूर 8-10-15 वर्षापासून तेथ उभ्या राहिल्या असतील. मी जेथे नेतृत्त्व करते त्या मुलुंड भागाचा मी या संदर्भात उल्लेख करते. ...

( यानंतर सौ.रणदिवे. .... झेड 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ....

1980 मध्ये वन विभागाने कायदा केला. परंतु त्याच्या अंमलबजावणी संबंधीचे पत्र खालच्या स्तरापर्यंत का जाऊ नये ? जे देखील माझ्यासारख्या व्यक्तीला पडलेले कोडे आहे. म्हणून याबाबतीत विचार होणे अत्यंत गरजेचे आहे असे मी आपल्याला नम्रतापूर्वक सांगत आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरातील हॉस्पिटल्स् आणि येथील एकूणच आरोग्य सेवेच्या बाबतीत सांगितले तर वाईट वाटेल. सार्वजनिक दवाखान्यामध्ये कोण जाते ? मुंबई शहरातील सामान्य जनता आहे, ती या हॉस्पिटल्स्मध्ये जाते. आज के.ईम.,सायन हॉस्पिटल, राजावाडी हॉस्पिटल मधील अवस्था काय आहे ? त्याठिकाणी बेड उपलब्ध नाहीत, गादीवर टाकण्यासाठी बेडशीटस् नाहीत. औषधे आणि बाकीच्या गोष्टी तर बाजूलाच ठेवा. तसेच लहान-लहान हॉस्पिटल बद्दल तर काही बोलूच नये अशी स्थिती आहे. कॅन्सरसाठी टाटा हे एकमेव हॉस्पिटल आहे. दुसरे हॉस्पिटल अंधेरी येथे बांधण्यात यावे यासाठी आम्ही दहा वर्षापासून सर्वांनी मिळून प्रयत्न केला. त्याला मूर्त स्वरुप दिल्यानंतर कामाला सुरुवात झाली. पण सत्तांतर झाल्यानंतर तिकडच्या मंडळींनी ते काम एका खाजगी कंपनीला दिले. हा कसला प्रकार आहे ? येथे सामान्यांचे प्रश्न मांडावयाचे आणि या प्रश्नाला बगल द्यावयाची. अशा प्रकारे मुंबई शहराची दुरावस्था झालेली आहे. मला आपल्याला नम्रतापूर्वक सांगावयाचे आहे की, या मुंबई शहराकडे एक गणिका म्हणून पाहू नका. चांगले वास्तव्य देणारे, एक सुसंस्कृत शहर, संस्कृती देणारे आणि संस्कृतीतून माणसांना पुढे घेऊन जाणाऱ्या या शहराला आपण एक चांगला चेहेरा देऊ या एवढेच मी आपल्याला सांगते.

-----

. . . .झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचे शेवटचे भाषण दहा मिनिटामध्ये होईल आणि त्यानंतर या प्रस्तावासंबंधात माननीय मंत्री महोदय उत्तर देतील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझ्यावर अन्याय करु नका.

**उपसभापती** : शिवसेनेच्या दोन्ही सन्माननीय नेत्यांना 40-40 असा 80 मिनिटे वेळ दिलेला आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, येथे भारतीय जनता पक्षाचे सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : याठिकाणी कोणी उपस्थित असो किंवा नसो. जो वेळ आहे, त्यामध्ये मी सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. माननीय मंत्री महोदयांना विधानसभेमध्ये देखील काम आहे आणि विधान परिषदेमध्ये देखील काम आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या भाषणानंतर माननीय मंत्री महोदय उत्तर देतील.

----

. . . .झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, आज या प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने अनेक विषयांना स्पर्श करण्यात आलेला आहे. पण एक महत्वाचा विषय आहे, ज्याचा अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये ओझरता उल्लेख केलेला आहे. सध्या मुंबईमध्ये मॉलची संस्कृती वाढत आहे. मी केवळ याच विषयासंबंधात भाषण करणार आहे.आज मुंबई शहरात 54 मॉल्स आहेत आणि साधारणपणे 21 नवीन मॉल्स तयार होणार आहेत. या मॉल्सला किती जागा देण्यात येत आहे याचा तपशील पुढील प्रमाणे आहे. 1) फिनिक्स मिल कम्पाऊंड मध्ये जो मॉल आहे, त्याचा एरिया 3.3 मिलियन स्क्वेअर फीट आहे. 2) एटरिआ मॉलचा एरिया 2.5 लक्ष स्क्वेअर फीट आहे. 3) इनआर्बिट मॉलचा एरिया 5 लक्ष स्क्वेअर फीट आहे. 4) ठाकूर शॉपिंग मॉल व मल्टीप्लेक्सचा प्रत्येक फ्लोअरचा एरिया 7000 स्क्वेअर मीटर आहे. 5) इन्फिनिटी मॉलचा एरिया 2.5 लक्ष स्क्वेअर फीट आहे. 6) सेंटर वन मॉलचा एरिया 1.5 लक्ष स्क्वेअर फीट आहे. 7) इटर्निटी मॉलचा एरिया 2.3 लक्ष स्क्वेअर फीट आहे. 8) आर मॉलचा एरिया 2.5 लक्ष स्क्वेअर फीट आहे. 9) मुलुंड येथील निर्मल लाईफस्टाईल मॉलचा एरिया 5.5 लक्ष स्क्वेअर फीट आहे. सभापती महोदय, आपण या मॉल्स्साठी काही लाखांमध्ये जागा दिलेली आहे. यानंतर आणखी नवीन 27 मॉल्सनां परवानगी देण्यात येणार आहे. ज्यावेळी अशा प्रकारे मॉल्स् आणि मल्टीप्लेक्सनां परवानगी दिली जाते, त्यावेळी आपण काही नियम पाळणे आवश्यक होते. आपण मिराणी समितीची रचना केलेली आहे. त्या मिराणी समितीमध्ये डी.पी.प्लॅनचे लोक आहेत, फायर ब्रिगेडचे लोक आहेत, पी.डब्ल्यु.डी.चे लोक आहेत. या मॉल्स्नी आपल्या सर्व नियमांचे पालन केलेले आहे की नाही हे देखील पहाणे आवश्यक होते, पण आजपर्यंत आपण या गोष्टीकडे लक्ष दिलेले नाही. आज मुंबईमध्ये लाखो स्वे.फू.बांधकाम होत आहे. जे नियम आहेत त्या नुसार मल्टीफ्लेक्समध्ये 50 फुटाच्या वर सिनेमा हॉल असता कामा नये.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत..

येथे जो पहिला हॉल आहे, तेथे पहिल्या मजल्यावर 3 ते 4 सिनेमा गृहे आहेत. त्यांची स्क्रीन किती असावी, कँटीन किती असावे, याकरिता काही नियम आहेत. ते सगळे नियम धाब्यावर बसवले जातात. आताच निराणी अहवाल प्राप्त झाला आहे. त्यातील शिफारशीवंर शासन कधी कार्यवाही करणार आहे ? स्कायवे कोठे असावे त्यातील एन्ट्री किंवा एक्झीट किती असली पाहिजे, याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. मिनिमम किचन किती असले पाहिजे. प्रत्येक मॉलमध्ये, एक स्वतंत्र फायर स्टेशन असले पाहिजे असा नियम आहे. आपल्याकडे असलेले किती तरी मॉल या नियमांनुसार क्वालिफाय होत नाहीत. या मॉलवर व मल्टिप्लेक्सवर शासन कारवाई करणार आहे काय ?

सभापती महोदय, आपल्या शेजारी आयनॉक्स हा मॉल आहे. या मॉलच्या फूटपाथवर सुध्दा आपण उभे राहू शकत नाही. आपण तेथे उभे राहिलो तर तेथील वॉचमन येऊन सांगतो, साहेब येथे उभे राहू नका. ही कोणाच्या बापाची जागा आहे ? आपण मंत्री आहात अशी ओळख न दाखविता आपण केवळ तेथील लाईटवर हात ठेवून पहा. ताबडतोब तेथील वॉचमन आपल्याला हटवेल. तेथे आपण गाडया पार्क करु शकत नाही. अशी या मॉलवाल्यांची दादागिरी वाढत चालली आहे. असे असेल तर मुंबईमध्ये गाडया कोठे पार्क करायच्या ?

सभापती महोदय, आाता नवीन सागरी महामार्ग तयार केला जात आहे. त्याची परिस्थिती तर अत्यंत शोचनीय आहे. तेथे 8 लेनचा दृतगती सागरी महामार्ग तयार करण्यात येणार आहे. लवग्रोव्ह लेन येथे जंक्शन होणार आहे, एट्रीया मॉलच्या येथे हा मार्ग येणार आहे. त्यानंतर 8 चे 4 व 4चे 8 मार्ग होणार असे सांगितले जाते. लवग्रोव्ह लेन येथे बॉटलनेक होणार आहे. या संदर्भात श्री. कांबळे यांना विचारले असता ते म्हणाले की, याचा अभ्यास सुरु आहे. जॉइंट कमिशनर ऑफ पोलीस म्हणतात की, " We are deliberating on the issue with the civic and infrastructure Agencies." 2008 मध्ये सागरी महामार्ग तयार होणार आहे अशी घोषणा केली जात आहे. येथे सरळ म्हटलेले आहे की, जोपर्यंत माननीय लतादीदींच्या घरासमोरील पेडर रोडचा पूल तयार होत नाही तोपर्यंत हा बॉटलनेक कायम राहणार आहे. या समस्येचे सोल्युशन कधी काढले जाणार आहे ते आपण सांगावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत..

सभापती महोदय, आज मुंबईमधील हॉस्पीटलसंदर्भात या सभागृहामध्ये या पूर्वी देखील 3 वेळा मी मुद्दा मांडला होता. याबाबत आपल्याला पुर्नर्विचार करण्याची आवश्यकता आहे. सांताक्रूझ येथील आाशा पारेख, माहीमचे राधाबाई वाटूमल, वाडीया, रहेजा या रुग्णालयांचा उल्लेख झाला होता. ही रुग्णलये बंद आहेत. हॉस्पीटल्समध्ये अतिशय क्षुल्लक कारणावरुन युनियनशी तंटा तेथील मॅनेजमेंटने केला. आता 6 महिन्यापासून ही हॉस्पीटल्स बंद आहेत. आशा पारेख हॉस्पीटलच्या जमिनीचा सौदा 7.5 कोटी रुपयांना झाला. राज्य शासनाने व महानगरपालिकेने दिलेली जमीन आता विकली जात आहे. मुंबईतील जे गरीब माणसे आहेत, जे लोक नानावटी, लिलावती या रुग्णालयांमध्ये जाऊ शकत नाही. अशी माणसे आशा पारेख हॉस्पीटलमध्ये जात होती. ती माणसे आज कोठे जाणार ? त्यांच्या बाबतीत कोणता निर्णय घेण्यात येणार आहे ? या रुग्णालयांच्या जमिनी विकून तेथे मोठमोठे मॉल्स उभे राहत आहेत. लिंकींग रोड वर केएफसी नावाचा एक मॉल झालेला आहे. तेथे पूर्वी एक पेट्रोलपंप होता. आज मिठीबाई कॉर्नर जवळचा पेट्रोलपंप विकला जात आहे. सदा सरवणकर साहेबांनी तेथे एक बोर्ड लावला आहे की, पेट्रोलपंपाची जागा मॉलला विकली जात आहे. या जागा पेट्रोलपंपासाठी घेतलेल्या होत्या. आता त्या जागेवर मॉल्स तयार होत आहेत.

ही मॉल संस्कृती मारक ठरणार आहे. या मॉल्समध्ये नोकरी देताना मराठी माणसाला सामावून घेतले जात नाही. खरे तर 70 टक्के स्थानिक लोकांना तेथे नोकरी दिली गेली पाहिजे असा नियम आहे. परंतु या नियमांचे पालन केले जात नाही. या मॉलमध्ये मराठी सिनेमे लागत नाही. मराठी सिनेमाचे शो सकाळी 9 किंवा 10 वाजता लावतात. याबाबत मी पार्ले येथील सनसिटी मॉलमधील विचारले त्यावेळी त्यांनी सांगितले की, मराठी शो संध्याकाळी लावला तर त्यास पब्लिक येत नाहीत. मी आपणास सांगतो की, मी स्वत: वळू हा सिनेमा बघण्याकरिता संध्याकाळच्या शोला गेलो होतो. त्यावेळी तो शो हाऊसफुल्ल होता. आपण जे नियम तयार करीत असतो त्या नियमांचे पालन अधिकारी करीत नाहीत अशी आमची तक्रार आहे.

सभापती महोदय, आपण आता वांद्रे येथे स्काय वॉक बांधणार आहात. माननीय राज्यपालांनी त्यांच्या भाषणामध्ये तसे सांगितले होते. तेथे फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्यात येणार

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत..

आहे. फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्यासंबंधी सकाळ या वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आली होती की, या संबंधी एमएमआरडीए चाचपणी करीत आहे. मुंबई व ठाणे येथील फेरीवाल्यांना कर्ज दिले जाणार आहे, त्यांना दुकाने दिली जाणार आहेत.

यानंतर श्री. बरवड..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

फेरीवाल्यांचा प्रश्न मुंबईमध्ये फार महत्वाचा आहे. आपण नॉन हॉकीन्ग झोन तसेच हॉकीन्ग झोन काढलेले आहेत. त्याचे नेमके काय झाले ते सांगावे. या फेरीवाल्यांमध्ये जेवढे मराठी फेरीवाले असतील त्यांना आपण प्राधान्य देणार काय हा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सांगितले की, ज्या दराने टॉवरला पाणीपुरवठा केला जातो त्याच दराने चाळीला पाणीपुरवठा केला जातो. मी सांगू इच्छितो की, मुंबईकरांना होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या अनुषंगाने दोन प्रकारचे दर आहेत. टॉवरमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी हा दर 1 हजार लीटरला साडेतीन रुपये आहे आणि इतरांसाठी 1 हजार लीटरला 2 रुपये 25 पैसे आहे. जे लोक कोट्यवधी रुपयांचा फ्लॅट घेऊ शकतात त्यांना चौपट दर का आकारत नाही ? टॉवरमध्ये राहणाऱ्यांच्या बाबतीत महानगरपालिका आणि राज्य शासन एवढे उदार का झाले आहे ? टॉवरमध्ये राहणाऱ्यांना फुकट पाणी का देत आहात ? त्यांना चौपट दर लावावयास पाहिजे. त्यांना जवळपास कमर्शियल रेट लावावयास पाहिजे. आपल्यापैकी कोणी टॉवरमध्ये राहात असले तरी गरिबांवर अन्याय करुन टॉवरवाल्यांना सगळे मोफत देऊ नका.

सभापती महोदय, दुसरा एक महत्वाचा विषय या सभागृहामध्ये चर्चिला गेला नाही. त्या विषयावर मला दोन मिनिटे बोलावयाचे आहे. आज मुंबईला भिकाऱ्यांची मक्का मानली जाते.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, मक्का हे धार्मिक स्थान आहे. अशा प्रकारे त्याचे नाव घेऊ नये.

डॉ. दीपक सावंत : "इंडिया टूडे"ने काढलेल्या रिपोर्टमध्ये याचा उल्लेख आहे. त्यांनी रिपोर्टमध्ये असे म्हटले आहे की," Mumbai is Mecca of beggars." या ठिकाणी भिकारी 180 कोटी रुपयांचा व्यापार करतात. प्रत्येक भिकाऱ्याचे रोजचे उत्पन्न 80 ते 120 रुपये असते. यामध्ये तीन लोक आहेत. त्यात मासू, हाजी यांचा समावेश आहे. त्यांचे बेसिक व्यवसाय दुसरे आहेत. त्यांनी भीक मागण्यासाठी मुलांना कामाला लावून मुंबईमध्ये व्यवसाय सुरु केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांच्या माहितीसाठी रिपोर्ट वाचून दाखवतो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, " Mumbai is the Mecca of beggars. According to the

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

डॉ. दीपक सावंत .....

Maharashtra Government they are worth Rs. 180 crores a year, with daily income ranging between Rs. 20 to Rs. 80. Three of the richest beggars are Haji, Massu and Bharat Jain allegedly have assets ranging from Rs. 5 lakhs to Rs. 70 Lakhs." त्यांचे ॲसेट्स 5 लाख रुपये ते 70 लाख रुपयांचे आहेत. भिकारी कोणाला म्हणावयाचे याबाबत केंद्र शासनाकडे आणि राज्य शासनाकडे सुध्दा कायदा नाही. यामध्ये छोटी मुले काम करतात. भिकाऱ्यांच्या संदर्भात एवढे वाचून दाखवून माझे भाषण संपवणार आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, " Rs. 80 is the average daily income of beggars in metros. 75 % spend Rs. 50 a day, 27% spend upto Rs. 100. Most earn more than the daily wage earners. Graduate and Post Graduate beggars are increasing. Rs. 25,000/- is the average bank balance of beggars."

**उपसभापती** : भिकाऱ्यांमध्ये गरीब, मध्यम, श्रीमंत असे वर्गीकरण आहे काय ?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, त्यांच्यामध्येही वर्गीकरण आहे. काही लोक रोज 20 रुपये ते 80 रुपये कमवित आहेत. काही लोक 80 रुपये ते 150 रुपये कमवित आहेत. काही लोक 150 ते 250 रुपये कमवित आहेत. दक्षिण मुंबईमध्ये भीक मागावयाची असेल, सिग्नलवर भीक मागावयाची असेल त्यांचा वेगळा ग्रुप आहे. त्यांना लायसनसुध्दा देतात. भिकाऱ्यांकडून वसुली करण्यासाठी दादा असतात.

**उपसभापती** : सर्वात जास्त श्रीमंत भिकारी कोणत्या वस्तीत आहेत ?

डॉ. दीपक सावंत : दक्षिण मुंबईमध्ये, मलबार हिल भागात सर्वात श्रीमंत भिकारी आहेत. ट्राफीक सिग्नलच्या ठिकाणी जे काम करतात त्यांच्या बाबतीतला रिपोर्ट सादर झालेला आहे. त्या ठिकाणी जे लोक व्यवसाय करतात, जे लोक पुस्तके विकतात, फुले विकतात त्यांची एक गँग आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

या मुलांच्या हातामध्ये फुले असतात. ही मुले गाडीजवळ फुले घेऊन उभी असतात. फुले विकणारी मुले फुले कोठून आणतात ते सांगतो. या भागामध्ये विवाह समारंभ होतात त्याठिकाणची फुले गोळा करुन विकत फिरतात. तोंडात पाण्याची चूळ भरुन ते फुलांवर मारतात. एवढा भयानक प्रकार असतो. (अडथळा) माझ्याकडे असलेल्या अहवालात नमूद केलेली वस्तुस्थिती आहे. माननीय मंत्रिमहोदय त्याबाबत विचार करणार आहे काय ? या भिका-यांसाठी कायदा करणार आहे काय ? असा प्रश्न विचारुन मला आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो आणि येथेच थांबतो.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, आज जब इस प्रस्ताव पर चर्चा करने के लिए विशेष बैठक रखी गई है तो इस प्रस्ताव पर बोलने के लिए हम तैयारी करके आए है और शुरु से ही सदन में बैठे हैं. समय का नियोजन नहीं किया जाता है. इस प्रस्ताव पर बोलने वाले पहले सदस्य को एक घंटा बोलने के लिए दिया गया.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, एखाद्या प्रस्तावावर चर्चा सुरु होण्यापूर्वी बोलू इच्छिणा-या सन्माननीय सदस्यांची नावे यावीत अशी साधारणपणे अपेक्षा असते. परंतु एकदा प्रस्ताव चालू झाला की, नावांची यादी शेपटासारखी वाढत जाते. मैं आपको दोष नहीं दे रहा हूं. मैं खुद को दोष दे रहा हूं. यहां पर जिन सम्माननीय सदस्यों के नाम भेजे जाते हैं. प्रत्येक पक्षाकडून चर्चा सुरु होण्यापूर्वी नावे देण्यात यावी असे मी सांगतो. त्यामुळे वेळेचे नियोजन करता येते. पण काही वेळाने एक एक नाव येत राहते. मंत्रिमहोदयांकडून सुध्दा उत्तर सुरु करु द्यावे असे सांगितले जाते. मला वाटते की, अजूनही अनेक सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावांवर बोलावयाचे असल्यामुळे मंत्रिमहोदयांचे उत्तर उद्या झाले तरी त्याला माझी काही हरकत नाही, आता ज्या ज्या सदस्यांना बोलावयाचे आहे त्यांनी आपली नावे द्यावीत.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण असे म्हणालात की, प्रस्ताव सुरु होताना काही नावे येतात, त्यानंतर नावांची यादी शेपटासारखी वाढते. त्यामुळे मला वेळेचे नियोजन करणे अवघड होते. सभागृहाची प्रथा आहे, परंपरा आहे. सभागृहातील वेळेचे नियोजन व्यक्तीच्या आधारावर केले जात नाही. एखाद्या विषयाबाबत प्रस्ताव देण्यात आल्यावर दोन्ही बाजूला निम्मा निम्मा वेळ वाटून दिला जातो....

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मला हे माहीत आहे. मला आपल्याकडून जाणून घेण्याची आवश्यकता नाही. पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी मांडला. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी त्यांचा प्रस्ताव मांडला. मी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांना प्रथम भाषण करण्यास सांगितले होते. परंतु त्यांनी नंतर भाषण केले. मी नाव पुकारलेले सदस्य कधी कधी उपस्थित नसतात, त्यामुळे अन्य सदस्यांना संधी देतो. मी सर्वांना बोलण्याची संधी देतो. पण या जागेवर बसणा-या पीठासीन अधिका-यांची अडचण देखील सन्माननीय सदस्यांनी लक्षात घ्यावी. या प्रस्तावावर ज्या सदस्यांना

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

**उपसभापती**...

बोलावयाचे असेल त्या सगळयांना संधी दिली जाईल. ज्यांना जेवढा वेळ बोलावयाचे असेल तेवढा वेळ बोलावे. माझ्याकडे सर्व सदस्यांनी आपापली नावे द्यावीत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, दोन प्रस्ताव एकत्र केल्यामुळे थोडा अधिक वेळ लागेल.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्रीमती फौजिया खान यांनी आपले भाषण सुरु करावे.

Smt. Fouzia Khan : My Party is forbidding me to speak, that is why I will not speak.

**उपसभापती** : आप बोलिए.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या सभागृहाचे कामकाज पक्षाच्या सूचनेनुसार चालणार आहे की सभापतींच्या निर्णयानुसार चालणार आहे ?

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभागृहामध्ये जेव्हा एखादा प्रस्ताव चर्चेसाठी असतो त्यावेळी त्या प्रस्तावावर कोणत्या सदस्यांनी बोलायचे हे त्या पक्षाचे प्रतोद ठरवितात आणि त्याप्रमाणे सदस्यांची नावे माननीय सभापतींकडे दिली जातात. प्रत्येक सदस्याने प्रत्येक विषयावर बोललेच पाहिजे असे नाही.....

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उपसभापती** : सभागृहाचे नियमित कामकाज दुपारी 1.15 वाजता सुरु होईल.

( दुपारी 12.56 ते 1.15 पर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विविध कामांमध्ये झालेला भ्रष्टाचार**

**(१) * ४१९३२ श्री. अनिल परब :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या शहरविकास प्रकल्प, भुयारी गटार योजना, मजूर सोसायट्यांना एकहाती दिलेली कामे, इत्यादि कामांवर अव्वाच्यासव्वा खर्च झाल्याबाबत व या कामाद्वारे झालेल्या प्रचंड भ्रष्टाचारास संबंधित कार्यकारी अभियंता जबाबदार असल्याने, या संपूर्ण गैरव्यवहाराची सीआयडी मार्फत चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ फेब्रुवारी, २००८ रोजी वा त्या दरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रार लक्षात घेऊन संबंधित कार्यकारी अभियंत्याचे अधिकार काढून घेण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) उक्त कार्यकारी अभियंता यांचा सेवा कालावधी व शैक्षणिक पात्रता लक्षात घेता महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता पद धारण करण्यास योग्य नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, प्रकरणाची नेमकी वस्तुस्थिती काय आहे व त्यानुसार संबंधित कार्यकारी अभियंत्याविरुद्ध काय कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) होय.

(२), (३), (४) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

२...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल परब : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येत आहे. ही चौकशी कधीपर्यंत पूर्ण करण्यात येईल ?

श्री. राजेश टोपे : सदरहू चौकशी एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येईल.

---------------

३.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वजने व काटे नुतनीकरण करतेवेळी वैद्यमापन खात्याकडून**
**व्यापाऱ्यांची होत असलेली पिळवणूक**

**(२) * ४०८२२ श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वजने व काटे नुतनीकरण करतेवेळी वैद्यमापन खात्याकडून व्यापाऱ्यांची पिळवणूक होत असल्याने, व्यापाऱ्यांनी दिनांक २५ जानेवारी, २००८ रोजी सोलापूर येथे आंदोलन केले होते, तसेच याबाबतचे निवेदन दिनांक ३० डिसेंबर, २००७ रोजी मा.मुख्यमंत्र्यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काटे व वजने नुतनीकरण करण्यासाठी नेमलेल्या परवानाधारकांबरोबर बोगस परवानाधारकही सोलापूरमध्ये व्यापाऱ्यांची पिळवणूक करतात, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन बोगस परवानाधारकांवर तसेच इतर संबंधित दोषींवर काय कारवाई करणार आहे वा करीत आहे ?

**श्री.सुनिल तटकरे** : (१) वजन मापे तपासणी फी व दुरुस्ती फी एकाच दराने ठेवावी, अशा आशयाची मागणी सोलापूर जिल्हा सराफ सुवर्णकार असोसिएशन यांनी मा.मुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे केली आहे. सदर निवेदन दिनांक १.१.२००८ रोजी सहाय्यक नियंत्रक, वैधमापन शास्त्र, सोलापूर यांचेकडे प्राप्त झाले आहे. या निवेदनासंदर्भात दिनांक २५.१.२००८ रोजी आंदोलन झाल्याचे दिसून येत नाही.

(२) नाही, या विभागास बोगस परवानाधारकाबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रणजितसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, वजन मापे तपासणी फी व दुरुस्ती फी एकाच दराने ठेवावी, अशा आशयाची मागणी सोलापूर जिल्हा सराफ सुवर्णकार असोसिएशन यांनी माननीय मुख्यमंत्री यांना निवेदनाव्दारे केली आहे. सदर निवेदन दिनांक १ जानेवारी २००८ रोजी सहाय्यक नियंत्रक, वैधमापन शास्त्र, सोलापूर यांचेकडे प्राप्त झाले आहे. या निवेदनाच्या बाबतीत काय निर्णय घेण्यात आला आहे ? या राज्यात परवानाधारक सराफी व्यापा-यांची संख्या किती

४....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.शिगम

१३:१५

ता.प्र.क्र. ४०८२२ .....

श्री.रणजितसिंह मोहिते पाटील..

आहे ? वजने व काटे नुतनीकरण करतेवेळी वैद्यमापन खात्याकडून व्यापा-यांची खूप मोठी पिळवणूक होते व नुतनीकरणाच्या कामास जाणीवपूर्वक दिरंगाई करण्यात येते. व्यापा-यांची अडवणूक आणि दिरंगाई कमी करण्यासाठी शासनाने काही उपाययोजना केल्या आहेत काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, विशिष्ट कालावधीत व्यापा-यांना परवाने आणि नुतनीकरण करुन देण्यासंबंधीचे आदेश संबंधितांना देण्यात येतील. सोलापूर जिल्हा सराफ सुवर्णकार असोसिएशनचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे. यासंदर्भात असोएिशनच्या पदाधिका-यांची आणि परवाना आणि नुतनीकरण करुन देणा-या अधिका-यांची एक संयुक्त बैठक बोलावून यातून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 40822 पुढे सुरु....

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, नवीन परवान्यासाठी ज्या व्यापाऱ्यांनी अर्ज केलेले आहेत त्यांना अजूनही परवाने मिळालेले नाही. नंदुरबार जिल्हयासाठी एकमेव परवानाधारक आहे त्यामुळे त्यांची मोनोपली होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नवीन परवान्यासाठी अर्ज मागविले आणि शिफारस करुन नाशिक आयुक्त कार्यालयात पाठविले आहेत. परंतु त्यांच्याकडून अजूनही नवीन परवाने मिळत नाहीत. माझा प्रश्न असा आहे की, नवीन परवाने किती दिवसात दिले जातील ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, गरजेनुसार काही परवाने देण्यासाठी अर्ज मागविले असतील तर त्याची छाननी करुन आठ दिवसांच्या आत तसे परवाने देण्यात येतील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, वजन आणि मापे विभागात परवान्यांची तपासणी करण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग आहे काय आणि नसल्यास किती दिवसात हा कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन दिला जाणार आहे ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्य शासनाच्या विविध विभागात काही पदे रिक्त आहेत. या विभागात सुध्दा पदांची आवश्यकता आहे. मध्यंतरीच्या काळात पदे भरण्यासाठी उच्च न्यायालयाची स्थगिती होती. ही स्थगिती आता उठली असून पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---------

**<u>ता. प्र. क्र. 41544</u>**

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

----

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सोमठाण देश (ता.येवला, जि.नाशिक) येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातील मुख्याध्यापकावर फौजदारी कारवाई करण्याबाबत**

**(४) * ४१५३४ श्री. जयंत पाटील** : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोमठाण देश (ता.येवला, जि.नाशिक) येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातील मुख्याध्यापकाने प्रत्यक्ष सेवेत नसतांनाही श्री.रमेश रामदास आहिरराव व इतर व्यक्तींना उपशिक्षक म्हणून शाळेत सेवा केल्याचे खोटे प्रमाणपत्र दिल्याने त्यांच्यावर फौजदारी कारवाई करावी अशा आशयाचे निवेदन श्री.मोहन गुंजाळ यांनी शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद नाशिक यांच्याकडे दिनांक ६ जुन, २००६, दिनांक १४ डिसेंबर, २००७ रोजी वा तत्पूर्वी करण्यात आलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, याबाबत खोट्या कागदपत्राद्वारे शाळा न्यायाधिकरण, नाशिक यांची दिशाभूल करुन शाळेत रुजू करुन घेण्याचे आदेश मिळविणाऱ्या सर्व संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता** : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) संस्थेच्या सेवेत नसल्याने संबंधीतांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, तक्रार केल्यानंतर शिक्षकाची चौकशी करण्यात आली. शिक्षणाधिकाऱ्यांनी तसे पत्र सुध्दा दिलेले आहे. त्याची वेतनवाढ थांबविली आहे. सभापती महोदय, नोकरीमध्ये खोटा दाखला दिला होता. यासंबंधातील कागदपत्र मी देण्यास तयार आहे. संबंधित संस्थेमध्ये खोटा दाखल देऊन नोकरीला आहे असे दाखविले याची शासन पुन्हा चौकशी करणार आहे काय ? ज्या शिक्षकाने खोटा दाखला दिला आहे त्याच्यावर शासन कडक कारवाई करणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, याप्रकरणाची पुन्हा चौकशी करण्यात येईल आणि दोषी असतील तर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

-----------

....३



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन फाऊंडेशन कोर्सच्या अभ्यासक्रमात सुधारणा करण्याबाबत**

**(५) * ४१७५४ श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन व्यवसाय शिक्षण कर्मचारी यांनी नविन अभ्यासक्रमामध्ये फाऊंडेशन कोर्सचा सिलॅबस अतिशय किचकट झाला आहे, तसेच त्यात बराच अनावश्यक भाग समाविष्ठ झाला आहे, तरी त्यात पुन: सुधारणा करण्याबाबतचा दिलेला प्रस्ताव शासकीय स्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता** : (१) नाही.

(२),(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रामनाथ मोते :सभापती महोदय, हा प्रश्न उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाशी संबंधित आहे. परंतु शालेय शिक्षण विभागाचे राज्यमंत्री उत्तर देणार आहेत असे दिसते. कनिष्ठ महाविद्यालयातील एमसीव्हीसी शिक्षकांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. फाऊंडेशनचा कोर्सच्या सिलॅबसमध्ये अतिशय क्लिष्टता निर्माण झालेली आहे. याचा परिणाम शिक्षणावर आणि विद्यार्थ्यांवर होत आहे. यादृष्टीने फाऊंडेशन कोर्स बदलण्याच्या संदर्भात आणि अन्य राज्यांप्रमाणे हा कोर्स ऑप्शनल ठेवण्याच्या संदर्भात संघटनेबरोबर २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी चर्चा झाली. त्या चर्चेच्या अनुषंगाने शासन कोणता निर्णय घेणार आहे ? उत्तरामध्ये म्हटले आहे की अशा प्रकारे कोणतीही चर्चा झालेली नाही. पण चर्चा झालेली आहे. यासंदर्भातील निर्णय किती दिवसात घेतला जाणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पायाभूत सुविधा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी काय विषय असावेत यासंबंधात मार्गदर्शक तत्वे आहेत ती किचकट आहेत असे वाटत नाही. पुन्हा पुन्हा ही बाब तपासून आणि बाकीच्या राज्यामध्ये जी पध्दत आहे ती तपासून जी पध्दत सुलभ करता येईल ती पध्दत सुरु करु.

------

......४



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**हिंगणघाट (जि.वर्धा) येथील नगरपरिषदेमध्ये झालेल्या**
**गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(६) * ३९२५९ श्री. नितीन गडकरी , श्री.केशवराव मानकर , श्री.सागर मेघे , श्री. जगदीश गुप्ता :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) येथील नगरपरिषदेच्या सन २००५-२००६ च्या वित्तीय वर्षाच्या दिनांक २७ सप्टेंबर, २००६ ते १८ डिसेंबर, २००६ या कालावधीत कथित आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचे लेखा परिक्षणाच्या अहवालातून दिनांक २९ ऑगस्ट, २००७ वा त्यासुमारास निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिक्षकांनी जो अहवाल दिला आहे त्याचा तपशिल काय आहे,

(३) असल्यास, उक्त परिक्षकांच्या अहवालानुसार संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता:** (१) होय.

(२) लेखा परिक्षा अहवालात काही मुद्यांमध्ये आर्थिक व्यवहार नियमबाह्य झाले असल्याचे लेखा परिक्षक यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

(३) मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० चे कलम ११ नुसार जबाबदार अधिकारी / पदाधिकारी यांचेवर कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० च्या कलम ११ अनुसार या प्रकरणामध्ये कोणकोणते पदाधिकारी जबाबदार आहेत आणि या पदाधिकाऱ्यांविरुध्द या कलमाप्रमाणे कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हिंगणघाट नगरपालिकेमध्ये २००५-०६ या लेखा परिक्षण अहवालामध्ये जे काही दोष दाखविले गेले त्याबाबतीत कलम ११ खाली कारवाई विभागीय आयुक्तांकडून करण्यात येत आहे. या प्रकरणात ५ अधिकारी गुंतले आहेत.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.39259.......... श्री.राजेश टोपे.........

5 अधिकारी आणि नगरपालिकेचे सदस्य व पदाधिकारी मिळून 37 असे एकूण 42 आहेत. या 42 लोकांना विभागीय आयुक्तांनी नोटीस दिली. विभागीय आयुक्तांच्या नोटीसनंतर त्यांच्यासंबंधीचे हिअरिंग 25 एप्रिल रोजी ठेवण्यात आले होते. हिअरिंग घेऊन भार व अधिभार ठरवून वसुली करावयाची आहे, ती वसुली केली जाईल. अधिकारी दोषी असतील तर विभागीय चौकशीची सुध्दा कारवाई केली जाईल. सेक्शन 11 चा अधिकार विभागीय आयुक्तांचा असतो. ऑडिट दोषाच्या संदर्भात हिअरिंग घेऊन विभागीय आयुक्त निर्णय देत असतात.

श्री.नितीन गडकरी : ही कारवाई किती दिवसापासून सुरु आहे आणि किती दिवसात संपणार आहे?

श्री.राजेश टोपे : कारणे दाखवा नोटीसनंतर सुनावणीची पहिली तारीख 11 मार्च रोजी होती. 25 एप्रिल रोजी बैठक झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी प्रश्न विचारल्याप्रमाणे एका महिन्याच्या आत कारवाई पूर्ण केली जाईल.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ग्रांटरोड, मुंबई येथील मिनर्व्हा थिएटरने महानगरपालिकेच्या रस्त्याची २० फूट जागा व्यापल्याबाबत**

**(७) * ३९८९५ श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ग्रांटरोड येथील मिनर्व्हा थिएटरने मुंबई महापालिकेच्या रस्त्याची २० फूट जागा व्यापली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही जागा आता मुंबईच्या रस्त्यांच्या व मल:निसरण वाहिन्यांच्या कामाकरीता महापालिकेने परत मागितली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागा पालिकेने स्वत:च्या ताब्यात घेतली आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे कोणती ?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) मिर्नव्हा थिएटरचा सुमारे १५ फुटाचा भाग डॉ.भडकमकर मार्गाच्या नियमित रेषेमध्ये येतो.

(२) नाही.

(३) नाही.

(४) सदर चित्रपटगृहाच्या दोन्ही बाजूला पिछेहाटीच्या जागेवर अधिकृत इमारतीचे बांधकाम आहे. सदर भूखंडाच्या लगतच्या दोन्ही बाजूंच्या भू-भागाचे पुनर्वसन महानगरपालिकेकडून जो पर्यंत हाती घेतले जात नाही तो पर्यंत नजीकच्या काळात रस्त्यांच्या रुंदीकरणाची शक्यता नाही. तथापि, रस्त्याच्या नियमित रेषेवर जुळ्या खांबांची (ट्वीन कॉलम) व्यवस्था करुन व जेव्हा महानगरपालिकेस आवश्यकता भासेल त्यावेळी संदर्भीत पिछेहाटीची जागा कोणत्याही भरपाईचा दावा न करता हस्तांतरित करण्यासाठीचे हमीपत्र महानगरपालिकेने मालकाकडून घेतले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मिनर्व्हा थिएटरचा १५ फुटाचा भाग डॉ.भडकमकर मार्गाच्या नियमित रेषेमध्ये येतो असे उत्तरात म्हटले आहे. ही जागा मिनर्व्हा थिएटरच्या ताब्यात आहे की हा रस्ता आहे? मिनर्व्हा थिएटरच्या ताब्यात अनधिकृतपणे असेल तर कारवाई का करण्यात आली नाही? यापुढे कारवाई करण्यात येईल काय?

श्री.राजेश टोपे : ही जागा मिनर्व्हा थिएटरची स्वत:ची आहे. या मार्गाचे वाईडनिंग करावयाचे असून प्रस्तावित रोड लाईनमध्ये काही मोकळ्या जागा आणि काही स्ट्रक्चर येत आहेत. केवळ मिनर्व्हा थिएटर नव्हे तर आजूबाजूच्या अधिकृत इमारतींचे स्ट्रक्चर येणार आहे. महापालिकेची जागा मिनर्व्हा थिएटरने अतिक्रमित केली असा भाग नाही. ज्यावेळी प्रस्तावित रोड लाईनप्रमाणे वाईडनिंग करावयाचे आहे त्यावेळी या संदर्भात नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**घाटकोपर (मुंबई) येथील मानखुर्द लिंक रोडवर**
**नाल्यामध्ये भर टाकून जमीन बळकाविल्याबाबत**

**(८) * ४०७०० श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९३ मध्ये घाटकोपर (मुंबई) येथील मानखुर्द लिंक रोडवरील जय अंबे नगर येथील सिटी सर्व्हे क्रं.३९७ या शासकीय भूखंडातील ५०० चौ.फू. जमीन श्री.महेश व श्रीमती गायत्रीदेवी तसेच २६४ चौ.फू. जमीन श्री.दिनेश जयस्वाल यांना देण्यात आली होती व त्यांनी जमिनीलगतच्या नाल्यामध्ये भर टाकून ५७८५ चौ.फू.जमीन बळकावल्याप्रकरणी शासनाने त्यांना माहे फेब्रुवारी, २००४ मध्ये नोटीस पाठवली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अतिक्रमणाविरोधात जयस्वाल बंधूवर कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी केली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बेकायदेशीर बांधकाम व शासनाची जागा ताब्यात घेण्याच्या कार्यवाही विरोधात काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(४) सदर जमीन उपरोक्त व्यक्तींच्या नावावर होण्याकरिता मदत करणाऱ्या शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचेविरोधात काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री.विलासराव देशमुख** : (१) होय, श्री.महेशचंद्र जयस्वाल यांना ४५० चौ.फू., श्रीमती गायत्रीदेवी जयस्वाल यांना ३७५ चौ.फूट पर्यायी जागा स.नं. ३९७, छेडा नगर मध्ये दिनांक २०.११.१९९३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे. तसेच, श्री.जी.एस.खान यांना १५० चौ.फू.ची पर्यायी जागा देण्यात आली होती. सदर जागा श्री.दिनेश जयस्वाल यांनी श्री.जी.एस.खान यांचेकडून खरेदी केल्याचे दिसून येते. दिनांक ७.२.२००४ च्या पत्रान्वये सबंधितांनी त्यांनी केलेले वाढीव बांधकाम काढून टाकावे अन्यथा निष्कासित करण्यात येईल, असे आदेश बजाविण्यात आले होते.

(२) होय. दिनांक ७.१.२००८ च्या पत्रान्वये जयस्वाल बंधूवर एम.आर.टी.पी. नुसार कारवाई करणेबाबत मागणी केली आहे.

(३) व (४) सदरचे बेकायदेशीर बांधकाम नियमानुसार कार्यवाही पूर्ण करुन दिनांक ७.३.२००८ रोजी निष्कासित करण्यात आले आहे. सदरची जमीन संबंधितांचे नावे करण्यात आलेली नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा प्रश्न दाखल केल्यानंतर कारवाई झालेली आहे. फक्त प्रश्न विचारुन कारवाई करुन घ्यावी लागते याची नोंद घ्यावी.

श्री.विलासराव देशमुख : त्यासाठीच हे सभागृह आहे.

श्री.विनोद तावडे : याठिकाणी उत्तरात म्हटले आहे की, जे अनधिकृत बांधकाम होते ते तोडले आहे. त्यामुळे माझ्या दृष्टीने हा विषय संपला आहे.

-----

(नंतर श्री.जुन्नरे....

**राज्यातील मागासवर्गीय समाजातील बेरोजगारांनी**
**उद्योगधंद्यासाठी घेतलेली कर्जे माफ करण्याबाबत**

**(९) * ३८६४१ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. सुरेशदादा देशमुख :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चर्मकार, मातंग, दलित, धनगर व इतर मागासवर्गीय समाजातील बेरोजगारांनी राज्य सरकारच्या आर्थिक विकास महामंडळाकडून विविध उद्योगधंद्यासाठी घेतलेली कर्जे त्वरीत माफ करावी, या मागणीसाठी या मागासवर्गीय समाजाने दिनांक १४ फेब्रुवारी, २००८ रोजी आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याचे माहे जानेवारी, २००८ रोजी वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागासवर्गीय बेरोजगारांनी विविध उद्योगधंद्यासाठी घेतलेले कर्ज माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) होय.

(२) मागणीतील मुद्दयांची छाननी सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

श्री. गोविंदराव आदिक : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. मागासवर्गीय समाज आणि इतर समाजातील तरुणांना रोजगार उपलब्ध करुन त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे यासाठी महाराष्ट्र शासनाने वेगवेगळया महामंडळांची स्थापना केलेली आहे. या महामंडळाच्या मार्फत तरुण उद्योजकांना कर्ज देण्याची आपली पध्दत आहे, प्रथा आहे. परंतु अर्जदारांची संख्या विचारात घेतली तर उपलब्ध होणारे कर्जाचे प्रमाण फार कमी आहे. जे तरुण अशा प्रकारचे कर्ज घेतात ते हे कर्ज फेडू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. कर्ज न फेडल्यामुळे महामंडळ स्थापनेच्या पाठीमागे जो उद्देश आहे तो उद्देशच सफल होत नाही ही बाब लक्षात घेऊन ज्यांनी कर्ज घेतले आहे अशांचे कर्ज माफ करुन हा प्रश्न काही सुटणार नाही तर ज्या बरोजगारांनी कर्ज घेतलेले आहे त्यांची कर्ज फेडण्याची क्षमता तयार व्हावी यासाठी शासन काही नवीन योजना राबविणार आहे काय?

श्री. धर्मरावबाब आत्राम : सभापती महोदय, जवळ जवळ आपल्याकडे सहा महामंडळे असून या सहा महामंडळांना एकूण ४३० कोटी रुपयांचे भागभांडवल शासनाने उपलब्ध करुन दिलेले आहे. जे लोक कर्ज मागण्यासाठी येत असतात त्यांना कर्ज उपलब्ध करुन दिले जात असते.

...२

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 38641** .......

श्री. धर्मरावबाब आत्राम .......
ज्यांनी कर्ज घेतले त्यांनी आपले कर्ज वेळेवर फेडले पाहिजे. कर्ज फेड झाली नाही तर या महामंडळाचा फायदा दुस-या लाभार्थ्यांना घेता येणे कठीण होईल. परंतु ओबीसी महामंडळ चांगल्या प्रकारे कर्ज फेड करीत आहे. तसेच या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्याबाबतही विचार करण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. गोविंदराव आदिक : सभापती महोदय, मी असा प्रश्न विचारला होता की, महामंडळामार्फत बेरोजगारांना कर्ज उपलब्ध करुन दिले जात असते परंतु जे तरुण अशा प्रकारचे कर्ज घेतात त्यांना कर्ज फेड करणे शक्य होत नाही त्यामुळे ज्यांनी कर्ज घेतलेले आहे त्यांची कर्जफेड करण्याची क्षमता वाढविण्यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे काय? कर्ज फेडीची क्षमता वाढविण्यासाठी शासन काही उपाययोजना करणार आहे काय?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, कर्जमाफी हे पर्मनंट सोल्यूशन नसून तो तात्पुरती रिलीफ होऊ शकतो. या महामंडळाच्या वतीने पूर्वीच्या काळात मर्यादित स्वरुपात कर्ज पुरवठा केला जात होता. सुरुवातीच्या काळात ५००,१०००,५ हजार, १० हजार एवढया प्रमाणात कर्ज मिळत होते. त्यामुळे कर्ज घेणा-याला माहिती होते की, ज्या कामासाठी आपण कर्ज घेतलेले आहे ते काम काही यातून पूर्ण होणार नाही. त्यामुळे महामंडळाकडून जे काही कर्ज मिळत आहे ते पदरात पाडून घ्यावे व आपल्याला कर्जफेड करण्यास कोणी सांगणार नाही अशी मानसिकता त्यांच्यामध्ये त्यावेळेस झालेली होती. त्यामुळे परवा मी या महामंडळाच्या संदर्भात संपूर्ण आढावा घेऊन चर्चा केली. एखादा उद्योग सुरु करावयाचा असेल तर प्रथम ज्याला कर्ज हवे आहे त्याला प्रथम ट्रेनिंग देण्याची आवश्यकता आहे. ट्रेनिंग दिल्यानंतर त्याला भागभांडवल दिले पाहिजे. या तरुणांना आपण काही शंभर टक्के कर्ज देत नाही तर आपण त्यांना १५-२० टक्के रक्कम देत असतो व बाकीचे कर्ज बँकाकडून उपलब्ध करुन दिले जात असते. त्यामुळे या सर्व योजनांचा अभ्यास करण्याचे शासनाने ठरवलेले आहे. जे लोक कर्ज घेऊन आपल्या पायावर स्वाभिमानाने उभे राहू शकतील अशांनाच आपण कर्ज दिले पाहिजे व त्यादृष्टीने शासन निश्चितपणे विचार करीत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KTG/ KGS/ SBT/ MMP/ प्रथम श्री. भोगले....

१३:३०

**ता.प्र.क्र.** : **38641** .......

श्री. गोविंदराव आदिक : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्रीमहोदयांनी या ठिकाणी चांगल्या प्रकारचा खुलासा केलेला आहे परंतु मला असे सुचवावयाचे आहे की, जे तरुण अशा प्रकारचे कर्ज घेतात त्यांना मार्केटींगची माहिती नसल्यामुळे त्यांचे उद्योग चांगल्या प्रकारे चालत नाही त्यामुळे मार्केटींगचा प्रश्न सर्वात महत्वाचा आहे. एखादा तरुण कर्ज घेऊन उद्योग सुरु करतो परंतु त्याला बाजारात जाऊन आपला माल विकण्याची कला अवगत नसते. त्यामुळे त्याच्या त्याच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे त्याला कर्जाची फेड करणे शक्य होत नाही. माननीय मंत्रीमहोदयांनी महामंडळाच्या कामाच्या संदर्भात फेर आढावा घेतलेला असल्यामुळे मी त्यांचे धन्यवाद मानतो. परंतु ज्यावेळेस फेरविचाराला सुरुवात होईल त्यावेळी मार्केटींगच्या विषयाला प्राधान्य दिले गेले पाहिजे अशी आमची सूचना आहे.

श्री. विलासराव देशमुख : सन्माननीय सदस्यांनी अतिशय योग्य प्रश्न उपस्थित केलेला आहे. या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने वेळोवेळी जी.आर. सुध्दा काढलेले आहेत. या संस्थामध्ये तयार झालेल्या वस्तू शासनाच्या कामामध्ये घ्याव्यात अशा प्रकारचा सूचना देण्यात आलेल्या आहेत परंतु मार्केटींगच्या संदर्भात तरुणांना माहिती मिळण्याची आवश्यकता आहे अशा प्रकारचा सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचा रोख होता. बचत गटाच्या बाबतीमध्ये नगरपालिकेने जर दुकाने बांधली तर त्यातील काही दुकाने राखीव ठेवली पाहिजेत किंवा जिल्हा परिषदेने शॉपिंग कॉम्पलेक्स बांधले तर त्या ठिकाणीही काही गाळे राखीव पाहिजेत. अशा पध्दतीमुळे वस्तूंना योग्य बाजारपेठ मिळेल याचा सुध्दा विचार नव्या धोरणात आम्ही नक्की करु.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38641..

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, विविध मंडळाकडून सुशिक्षित बेरोजगार कर्ज घेत असतात.या महामंडळाकडून मिळणा-या लाभाचा हे लोक फायदा घेत असतात व त्यांना लाभ मिळणे अपेक्षित आहे त्यांना सरसकट कर्ज माफ करण्यात यावे हे या समस्येचे उत्तर होऊ शकत नाही हे मी देखील समजू शकते. गेल्या दोन वर्षामध्ये अनेक कारणामुळे विविध व्यावसायिकांचे नुकसान झालेले आहे अकाली पावसामुळे शेतीचे वा अन्य व्यावसायिकाचे नुकसान झालेले आहे. या प्रश्नामध्ये धनगर समाजातील बेरोजगारांनी राज्य सरकारच्या आर्थिक विकास महामडळाकडून विविध उद्योगासाठी कर्ज घेतलेली आहेत असा उल्लेख करण्यात आलेला आहे. तसेच बारा बलुतेदारांचा किंवा इतर व्यावसायिकांचे व्यवसाय शेतीशी संबंधित असतात. शेती व्यवसायाला जेव्हा फटका बसतो तेव्हा इतर व्यवसायावर सुध्दा त्याचा परिणाम होत असतो. ज्यावेळी भूकंप झाला होता त्यावेळी बारा बलुतेदारांवरील कर्ज माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. गेल्या दोन वर्षात अशा प्रकारची आपत्कालिन परिस्थिती ज्या ज्या वेळी आली होती त्या त्या वेळी विशेष नियम लावून बारा बलुतेदार किंवा इतर मागासवर्गीयापैकी ज्या लोकांना या कारणामुळे कर्ज फेडणे शक्य झालेले नाही त्या कर्जाबद्दल सवलतीची भूमिका घेण्यात येणार आहे काय ?

श्री.विलासराव देशमुख :सभापती महोदय, आतापर्यंत या पाच सहा महामंडळाच्या वतीने 430 कोटी रुपये भाग भांडवलाच्या रुपाने त्यांना दिलेले आहेत त्या व्यतिरिक्त विविध बॅन्कांनी भाग भांडवलाच्या आधाराने कर्ज पुरवठा केलेला आहे. ही सगळी माहिती आम्ही एकत्रित करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे नैसर्गिक आपत्तीमुळे वा अन्य काही कारणामुळे त्यांना व्यवसाय करणे अशक्य झाले असेल तर अशा व्यक्तीच्या बाबतीत राज्य सरकार सहानुभूतीपूर्वक विचार करणार आहे. श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या महामंडळाच्या मार्फत कर्ज पुरवठा करण्यात आलेला आहे व सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यांचे कर्ज माफ करण्याबाबत सूचना करण्यात आलेली आहे ती जास्त योग्य आहे. त्या संदर्भात शासन विचार करणार आहे. या बाबतीत माझी शासनाला अशी विनंती आहे की, बोनाफाईड डिफॉलकेशन आणि मालाफाईड डिफॉलकेशन असे दोन प्रकार आहेत. ज्या लोकाना पाच सहा हजार रुपये कर्ज देतो त्यांचे लहान लहान व्यवसाय आहेत. कधी पावसामुळे त्यांचे धंदे अडचणीत येतात आणि ते उद्ध्वस्त होतात. याबाबतीत आताच

23-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) II 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी सांगितलेले आहे. मला असे सांगावयाचे आहे की,या संदर्भात ओ.टी.एस. टाईपची स्कीम सुरु केली तर बरे होईल . काही लोकांचे मुद्दल माफ केले तर त्यांच्यावरील कर्जाचा भार कमी होईल . कर्ज आणि व्याजाच्या बोज्यामुळे ते अडचणीत आलेले आहेत आणि या लोकांना सवलत दिली नाही तर ते सुध्दा आत्महत्या करु लागतील. तेव्हा ओ.टी.एस. टाईप सिस्टीम केली व त्यांच्याकडून फक्त मुद्दलाची रक्कम वसूल केली तसेच व्याज दंड माफ केला तर या लोकांना दिलासा मिळेल. यानंतर मला दुसरी विनंती अशी करावयाची आहे की, या लोकांना जास्त व्याज दर द्यावा लागतो. केन्द्र सरकारकडून यासाठी जे पैसे दिले जातात त्यावर आकारला जाणारा व्याजाचा दर आणि या वित्तीय महामंळाकडून घेतलेल्या कर्जावर आकारला जाणारा व्याजाचा दर यामध्ये पुष्कळ तफावत आहे. या सगळया लोकांना स्वस्त दराने कर्ज उपलब्ध होईल या दृष्टीने शासन प्रयत्न करणार आहे काय ? या लोकांना जास्त व्याज दराने कर्ज घ्यावे लागत असल्यामुळे ते आर्थिक दृष्टया अडचणीत येतात तेव्हा याबाबतीत विचार करण्यात येणार आहे काय ?.

श्री.विलासराव देशमुख : सन्माननीय सदस्यांनी ज्या दोन सूचना केलेल्या आहेत त्याचा देखील राज्य सरकार विचार करील. वन टाईम सेटलमेन्ट करण्यासाठी व्याजामध्ये किंवा मुद्दलामध्ये काही सवलत द्यावयाची असेल तर या जे काही पर्याय आहेत त्या सगळया पर्यायाचा शासन विचार करणार आहे. जे कर्ज जुने आहे , जे कर्ज वसूल होणे शक्यच नाही, ज्या व्यक्तीला हे कर्ज देण्यात आलेले आहे त्याला शोधण्याचा प्रयत्न करुनही ती व्यक्ती सापडत नाही त्याचबरोबर हे कर्ज कशासाठी दिलेले आहे त्याची देखील माहिती मिळत नाही अशा प्रकरणातील कर्ज राईट ऑफ केल्याशिवाय पर्याय राहत नाही. परंतु जे नियमितपणे कर्ज भरतात परंतु काही कारणामुळे थकबाकीत गेलेले असतील अशा व्यक्तींना सुध्दा ओ.टी.एस.चा फायदा देऊ त्याचप्रमाणे व्याजाच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे प्रायॉरिटी सेक्टरमध्ये हा विषय येत असतो राष्ट्रीयकृत बॅन्कांनी त्यांना चार ते सहा टक्यापेक्षा जास्त दराने कर्ज देऊ नये अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत परंतु अवास्तव व्याजाची आकारणी होत असेल तर हे व्याज रिझलेबल लेव्हलवर कसे आणता येईल यासंबंधी देखील शासन विचार करील.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नवी मुंबईतील पामबीच मार्गावरील करावे येथील मैदान व उद्यानासाठी राखीव असलेल्या भूखंडावरील अनधिकृत बांधकाम

**(१०) * ३९५३७ श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री.सय्यद पाशा पटेल :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ७ जानेवारी, २००८ रोजी वा त्यासुमारास नवी मुंबईतील पामबीच मार्गावरील करावे येथील मैदान व उद्यानासाठी राखीव असलेल्या भूखंडावरील २० ते २५ चाळी सिडको व महानगरपालिकेच्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विरोधी पथकाने पाडल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या २० ते २५ अनधिकृत चाळी गेल्या किती वर्षापासून बांधण्यात आल्या होत्या, तसेच त्या बांधण्याकरीता शासनाने परवानगी दिली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बेकायदेशीर वसाहतीला पाणी व वीज पुरवठा दिला होता, हे खरे आहे काय,

(४) सदर घरांवर महानगरपालिकेची घरपट्टी आकारण्यात आली होती काय,

(५) या सर्व प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता**: (१) व (२) करावे, नवी मुंबई येथील सेक्टर-३६ मधील पामबीच रोड लगत उद्यान व मैदानासाठी राखीव असलेल्या भूखंडावर अनधिकृत बांधकाम होत असल्याचे नवी मुंबई महानगरपालिकेने दिनांक २६.१२.२००७ रोजी सिडकोच्या निदर्शनास आणले. त्यानंतर दिनांक ७.१.२००८ रोजी नवी मुंबई महानगरपालिका व सिडको यांनी संयुक्तपणे तेथील ४२ खोल्या व पायापर्यंत काम झालेली ७० अनधिकृत बांधकामे निष्कासित केली. सदर बांधकाम विनापरवानगीने १-२ महिन्यांपूर्वी सुरु झाले होते.

(३) व (४) सदर, अनधिकृत बांधकामांना पाणीपुरवठा केला नव्हता व घरपट्टीही आकारली नव्हती.

(५) व (६) अनधिकृत बांधकामांचे निष्कासन केलेले असून संबंधित दोषी व्यक्तींवर कारवाई करण्यात येईल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा विषय असून नवीन मुंबईत करावे येथे 112 बांधकामे करण्यात आलेली आहेत. उत्तरामध्ये असे सांगण्यात आलेले आहे की, 42 खोल्या व पायापर्यंत काम झालेली अशी 70 बांधकामे म्हणजेच 112 बांधकामे झालेली आहेत.. वास्तविक त्याही पेक्षा जास्त बांधकामे तेथे करण्यात आलेली आहेत.सहा महिने अगोदर ही बांधकामे करण्यात आलेली आहेत. जेव्हा ही बाब लक्षात आली त्यानंतर बांधकामे पाडण्याची कारवाई करण्यात आलेली आहे. परंतु सहा महिने बांधकामे सुरुच होती तेव्हा अनधिकृत बांधकामे होऊ नयेत हे पाहणारे तेथील अधिकारी कोण आहेत व या दोषी अधिका-याविरुध्द किती दिवसात कारवाई करण्यात येणार आहे ? त्याचबरोबर नवीन मुंबई महानगरपालिकेमध्येच नव्हे तर ठाणे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जिल्हयातील इतर महानगरपालिकेमध्ये बगिचे व मैदानासाठी ठेवलेल्या राखीव भूखंडावर अनधिकृत बांधकामे सुरु आहेत. तेव्हा ही बांधकामे होऊ नयेत या दृष्टीने शासन कठोर धोरण आखणार आहे काय ?

नतर श्री.सुंबरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 39537 ....

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी या ठिकाणी उत्तरातदेखील अतिशय स्पष्टपणे सांगितले आहे की, कारवाई पूर्ण करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, हे विटांचे कच्चे बांधकाम आणि काही ओटे तेथे करण्यात आले होते. या सगळ्या बाबींवर लक्ष ठेवण्याचे काम महापालिकेचे आहे आणि महापालिकेने सिडकोला याबाबत सूचना केल्यानंतर सिडकोच्या सर्व्हे विभागाच्या अधिकाऱ्यांनी इन्स्पेक्शन केले आणि कायदेशीर पद्धतीने पोलीस अधिकाऱ्यांना पाठवून त्यांनीही इन्स्पेक्शन करून, याबाबत सिडकोला 21.2.2007 ला रिपोर्ट आला आणि पोलीस अधिकाऱ्यांसमवेत सिडकोच्या अधिकाऱ्यांनी या जागेची पाहणी 1.1.2008 केली आणि लगेच 7.1.2008 ला निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. तेव्हा हे निष्कासन योग्य वेळेत आपण केलेले आहे. सभापती महोदय, हे कच्चे बांधकाम असल्याने अतिशय द्रूतगतीने ते काम केलेले होते त्यामुळेच ते त्याचवेळी लक्षात आले नाही. मात्र जेव्हा लक्षात आले त्यावेळी लगेचच आपण इन्स्पेक्शन करून निष्कासनाची कारवाई देखील केलेली आहे. सभापती महोदय, तो जो भूखंड आहे तो कंपाऊंड वॉल करून आणि तेथे पुन्हा अतिक्रमण होऊ नये अशा सूचना सिडकोला देण्यात येतील. अशा प्रकारचे सर्व भूखंडांना सुरक्षितता देण्याचे काम आपण केलेले आहे. त्यामुळे नवी मुंबई महापालिकेला मुंबई महापालिकेसारखे डेडीकेटेड पोलीस फोर्स दिला तर हे काम परिणामकारक होऊ शकेल. कारण वेळेत पोलीस फोर्स न मिळाल्यानेदेखील अशा प्रकारची कारवाई वेळेत करता येत नाही. म्हणूनच डेडीकेटेड पोलीस फोर्सची त्यांची मागणी असेल तर ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने देखील कारवाई केली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, करावे गावामध्ये हे झालेले बांधकाम गावठाणालगत होते काय ? आणि गावठाणाच्या बाहेर यांना जागा देण्याचे जे आश्वासन दिले होते ते पाळले जात नसल्यामुळे या गावठाणालगतच गावकऱ्यांनी हे बेकायदा बांधकाम केले होते हे खरे आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, करावे गावाच्या हद्दीजवळ हे अतिक्रमण झालेले आहे. त्यामुळे तेथे गावाला विस्तारित गावठाण असले तरी त्याबाबत शासन निश्चित विचार करील.

****

..... जेजे 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सावंतवाडी (जि.सिंधूदूर्ग) येथील नाट्यगृहाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(11) * 41507 श्री.परशुराम उपरकर** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी शहरात कोट्यावधी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या नाट्यगृहाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(3) तद्नुसार यात दोषी असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) नाही.
(2), (3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या ठिकाणी बांधकाम चालू असताना स्लॅब कोसळून एका व्यक्तीचा मृत्यू होऊन काही जखमी झालेले आहेत हे खरे आहे काय ? आणि या बांधकामाची पुन: चौकशी करण्यात येईल काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती आहे त्यामध्ये दोन वर्षापासून हे शॉपिंग कॉम्प्लेक्स आणि बहुउद्देशीय सभागृह सावंतवाडी येथे सुरू आहे. या ठिकाणी दोन वर्षांपासून या सगळ्या गोष्टींचा वापर चालू आहे. बांधकाम करीत असताना कदाचित स्लॅब पडली असेल किंवा असा काही प्रश्न निर्माण झाला असेल, त्याची माहिती आता माझ्याकडे नाही. परंतु दोन वर्षांपासून तेथे काही बिकट झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तरी सन्माननीय सदस्यांनी या बाबत अधिकची माहिती दिली तर जरूर त्याबाबत चौकशी करण्यास शासन तयार आहे.

***



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पातनहळ्ळी (ता.जत जि.सांगली) येथे अथणीजत रस्त्यावर बस विहिरीत कोसळून झालेला अपघात**

**(12) * 41092 श्री. गुरुमुख जगवानी, श्री. जगदीश गुप्ता, श्री. प्रतापराव सोनवणे, श्री.सागर मेघे** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक 15 सप्टेंबर, 2007 रोजी वा त्या सुमारास पातनहळ्ळी (ता.जत जि.सांगली) येथे अथणीजत रस्त्यावर कर्नाटक एस.टी.महामंडळाची एक बस विहिरीत कोसळून किमान 10 ते 12 व्यक्ती ठार व अनेक जण जखमी झाले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(3) असल्यास, या रस्त्याचा एक भाग या पूर्वीच कोसळून विहिरीत पडला होता व त्या जागी सार्वजनिक बांधकाम खात्याने फक्त चूना लावून दगड ठेवले होते, हे खरे आहे काय,
(4) चौकशीत दोषी आढळलेल्या व्यक्तींच्याविरुद्ध काय कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) कर्नाटक राज्य परिवहन महामंडळाच्या बसला पातनहळ्ळी ता.अथणी, जि.बेळगांव या ठिकाणी (कर्नाटक राज्य) अपघात झालेला आहे. तो महाराष्ट्राच्या हद्दीबाहेर झालेला आहे.
(2),(3) व (4) सदरहू अपघात हा राज्याच्या हद्दीबाहेर झाला असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. गुरूमुख जगवानी : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने उत्तर दिया है कि यह अपघात कर्नाटक राज्य परिवहन महामंडल की बस को हुआ है और महाराष्ट्र राज्य के बाहर हुआ है. यह बस इन्टरस्टेट रुट पर चल रही थी और इसमें 10 लोगों की मृत्यु हुई है और 30 लोग जख्मी हुए हैं और इसमें ज्यादातर स्कूल के बच्चे थे. मेरा प्रश्न यह है कि इसमें महाराष्ट्र के कितने लोग थे और महाराष्ट्र सरकार ने उनको कितनी आर्थिक मदद की है ? अगर ये लोग महाराष्ट्र के नहीं थे तो क्या महाराष्ट्र सरकार ने कर्नाटक सरकार से उनको आर्थिक मदद देने की सिफारिश की है ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : यह गाड़ी कर्नाटक सरकार की थी और महाराष्ट्र से कर्नाटक जा रही थी और इसमें सभी व्यक्ति कर्नाटक के थे. जो 10-12 व्यक्ति गुजर गए, वे सभी कर्नाटक के हैं, महाराष्ट्र का कोई व्यक्ति इसमें नहीं था.

. . . नंतर रणदिवे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ SBT/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 13:45

ता.प्र.क्र.41092 . . . .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये शासनातर्फे राजीव गांधी अपघात विमा योजना लागू करण्यात आली आहे. त्यानुसार या अपघातामध्ये सापडलेल्या मुलांना राजीव गांधी अपघात विमा योजनेचा लाभ देणार आहात काय ? कारण आजपर्यंत या योजनेचे एकही लाभार्थी झालेले नाहीत.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, ही बस कर्नाटक राज्याची होती आणि त्या बसमधील प्रवासी देखील कर्नाटकमधील होते. तसेच या बसला कर्नाटक राज्यामध्ये अपघात झालेला आहे. त्यामुळे आपण मदत देण्याचा प्रश्न येत नाही.

----

. . . .2 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे महानगरपालिकेतील कचरा उचलणाऱ्या ठेकेदारांच्या आंदोलनाबाबत**

**(13) * 38871 श्री. शरद रणपिसे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुधाकर गणगणे** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे महानगरपालिकेने कचरा उचलणाऱ्या ठेकेदाराला बेकायदा मुदतवाढ दिल्याचा ठपका ठेवून पालिका आयुक्त यांनी तीन अधिकाऱ्यांना निलंबित केल्याने, ठेकेदारांनी विविध मागण्यांसाठी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्यामुळे कचऱ्याचे ढीग सर्वत्र आढळून येत आहेत, हे खरे आहे काय,

(3) सदर आंदोलन बेकायदा ठरवून या ठेकेदारांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे वा येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) ठाणे महानगरपालिका आयुक्त यांनी 3 अधिकाऱ्यांना निलंबित केल्याची बाब खरी आहे. मात्र ठेकेदारांनी आंदोलन करण्याचा ईशारा दिला, हे खरे नाही.

(2) हे खरे नाही.

(3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.गोविंदराव आदिक : सभापती महोदय, ठाणे महानगरपालिकेने कचरा उचलणाऱ्या ठेकेदाराला बेकायदा मुदतवाढ दिली म्हणून 3 अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. ते ठीक आहे. परंतु ज्या ठेकेदारांना बेकायदा मुदतवाढ दिलेली आहे, ते अजूनही काम करीत आहेत काय ? त्यांची काय परिस्थिती आहे ? ज्या तीन अधिकाऱ्यांनी ठेकेदारांना बेकायदा मुदतवाढ दिलेली आहे, त्या तीन निलंबित अधिकाऱ्यांच्या विरोधातील कारवाई केव्हा आणि किती दिवसामध्ये पूर्ण होणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ठाणे येथे 9 प्रभाग आहेत आणि त्यामध्ये एकूण 13 रस्ते आहेत आणि त्यांची लांबी 112 कि.मी. आहे आणि 13 गट आहेत. अशा वेळी प्रत्येक गटासाठी एक कॉन्ट्रॅक्टर, याप्रमाणे 13 कॉन्ट्रॅक्टर आहेत. ठाणे महानगरपालिकेच्या प्रशासनाने साफसफाईच्या दृष्टीकोनातून ही व्यवस्था केली होती. या सर्व कॉन्ट्रॅक्टरची मुदत दि.31-12-2006 रोजी संपली होती. त्यानंतर त्यांना तीन-तीन महिन्यांची मुदतवाढ देत, त्यांना फेब्रुवारी 2007 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. यासंदर्भात तीन अधिकाऱ्यांना म्हणजे 1) श्री.प्रकाश साळी, मुख्य स्वच्छता निरीक्षक 2) श्री.मनिष जोशी - सहाय्यक आयुक्त 3) डॉ.हैदेकर - वैद्यकीय अधिकारी यांना सस्पेंड करण्यात आले आहे. मात्र या तीन अधिकाऱ्यांपैकी एक अधिकारी रिटायर झालेला आहे. दुसऱ्या

. . . .2 के-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे . . . .

ता.प्र.क्र.38871 . . . .

अधिकाऱ्याची डी.ई.सुरु केलेली आहे. आता त्याठिकाणी नवीन कॉन्ट्रॅक्टर नेमण्याच्या बाबतीत कार्यवाही झालेली आहे. त्यानुसार मार्च 2008 मध्ये पाच वर्षासाठी चार प्रभागांसाठी चार कॉन्ट्रॅक्टर नेमलेले आहेत. तसेच 4 प्रभागांसाठी पूर्वी जे कॉन्ट्रॅक्टर नेमले होते, त्यांची मुदत संपल्यामुळे याबाबतीत कार्यवाही सुरु आहे.

-----

यानंतर कु.गायकवाड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण नगर परिषद हद्दीतील नाईक कंपनीसमोर असणाऱ्या पुलाची नव्याने उभारणी करणेबाबत**

**(१४) * ३८४१३ श्री.भास्कर जाधव :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण नगर परिषद हद्दीतील नाईक कंपनीसमोर असणाऱ्या जुन्या व वाहतूकीस धोकादायक अशा पुलाची नव्याने उभारणी करुन ग्रामस्थांची होणारी गैरसोय दूर व्हावी या करिता आंदोलन झाले होते हे खरे आहे काय,

(२) या ठिकाणी नवीन पूल व्हावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली होती हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या रहदारीसाठी महत्वाच्या पुलाचे नव्याने बांधकाम होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, या प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सदर पुलाचे बांधकामासाठी रुपये ३.९५ कोटी खर्चाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार करुन चिपळूण नगरपरिषदेला सादर केले आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, चिपळूण जिल्हयातील पुलाची नव्याने उभारणी करावी याकरिता मी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. आता या राज्याचे आदरणीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख सभागृहामध्ये हजर आहेत. हा पूल केवळ दोन शहरांमधून जाणारा पूल नसून चिपळूण शहराच्या मध्यामधून जाणारा पूल आहे. 1960 साली हा पूल बांधलेला आहे. सन 2005 च्या महापूराच्या वेळेस हा अतिशय डॅमेज झाला होता. या पुलामुळे केवळ शहरामधील वाहतूक होत नसून त्यामुळे, हा पूल खेड व चिपळूण या शहरांना जोडणारा आहे. हा पूल आपण आता बांधला नाही तर तेथे मोठी दुर्घटना होऊ शकते. यासंदर्भात मी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. या पुलाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाने 3 कोटी 95 लाख रुपयांचे बजेट नगरपालिकेकडे दिले होते. या विषयासंदर्भात ज्या वेळी मी प्रश्न विचारला होता त्यावेळी माननीय राज्यमंत्री उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ यांनी सांगितले होते की, हा पूल पाटबंधारे विभागाने बांधलेला आहे. या पुलाची देखरेख बांधकाम विभाग करीत नसून, नगरपालिका देखरेखीचे काम करीत आहे. त्यामुळे हा पूल बांधणे शक्य नाही.

सभापती महोदय, नगरपालिकेच्या बजेटमधून पूल बांधता येणे शक्य नाही हे मला माहीत आहे. माननीय मंत्री महोदय त्यावेळी म्हणाले होते की, नगरपालिकांनी निधी दिला नाही तर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव.... ता.प्र.क्र. 38413...

सार्वजनिक बांधकाम खात्याकडून निधी दिला जाईल. तसेच उत्तर माननीय राज्यमंत्री महोदयांनी देखील दिले होते. निधी देण्यात येईल असे सांगितले जाते परंतु निधी दिला जात नाही. त्यामुळे या पुलाकरिता या वर्षी एकूण एस्टीमेटच्या रकमेपैकी 1/3 रकमेची तरतूद करण्यात येईल काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी या ठिकाणी हा प्रश्न उपस्थित केला आहे. हा पूल महत्वाचा आहे. 1960 साली या पुलाचे बांधकाम करण्यात आले होते. बांधकाम विभागाने 1980 -84 साली उंची वाढविण्याचे काम केले होते. या पुलाच्या बांधकामाकरिता 3 कोटी 95 लाख रुपयांचे एस्टीमेट तयार केले होते. दोन्ही माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले होते की, त्यांनी नाही दिले तर आम्ही पैसे देऊ. त्याबाबत मी आपणास सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांबरोबर बैठक..

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा प्रश्न बांधकाम विभागाशी संबंधित नसून नगरपालिकेचा प्रश्न आहे. पद्धत अशी आहे की, पूल दुरुस्त करण्याकरिता नगर विकास विभाग निधी देत असते.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, बांधकाम विभागाने एस्टीमेट तयार केलेले आहे. त्यामुळे त्यांच्याबरोबर बैठक घेईन व हा प्रश्न नगरपालिकेच्या कक्षेत असल्यामुळे, नगरपालिकांना निधी पुरविण्याच्या संदर्भात या वर्षीच्या बजेटमध्ये तरतूद करण्याचा प्रयत्न केला जाईल. ही तरतूद मिळविण्याच्या दृष्टीने सन्माननीय सदस्यांनी सातत्याने पाठपुरावा केलेला आहे. तसेच याबाबत मी देखील या पूर्वी आश्वासन दिलेले आहे. नगर विकास विभागाच्या रोड ग्रँट या हेड अंतर्गत निधी देण्याच्या संदर्भात सकारात्मक भूमिका घेण्यात येईल.

श्री. मंदा म्हात्रे : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, नवीन पूल बांधण्यासाठी बजेट दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, सध्या हा पूल अतिशय धोकादायक झालेला आहे. हा पूल बांधत असताना वाहतुकीसाठी तेथे दुसरा पूल आहे काय ?

( उत्तर नाही.)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, चिपळूण शहर पूरामध्ये, पाण्याखाली गेले होते त्यावेळी तेथे पाहणी करण्यासाठी मी या पुलावरुन गेलेलो आहे.

यानंतर श्री. बरवड..

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38413 ..... श्री. नितीन गडकरी ....

राष्ट्रीय महामार्गावरील चिपळूणचा जो पूल आहे तो वेगळा आहे. मागच्या वेळी कोकणामध्ये पुराचे पाणी मोठ्या प्रमाणावर घुसले होते आणि अनेक गावे उद्ध्वस्त झाली होती. त्यावेळी हा पूल कमजोर झाला. मी स्वत: त्या ठिकाणी जाऊन त्या पुलाची परिस्थिती बघितली. त्या पुलाची उंची सुध्दा कमी आहे. दुसरा जो राष्ट्रीय महामार्ग आहे तो वरुन येणारा आहे आणि हा पूल एकदम खाली आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी याबाबत गोलगोल उत्तर देऊ नये. हा पूल नगरविकास खात्याच्या अंतर्गत येतो. या वर्षी त्याची किंमत 3 कोटी 95 लाख रुपये आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सोपा प्रश्न विचारलेला आहे. यामध्ये बांधकाम विभाग एजन्सी असते. नगरविकास विभाग ते पैसे रिएम्बर्स करीत असते. हे काम त्यांच्यावर ढकलत आहेत. बांधकाम विभागाला नगरविकासच्या भागामध्ये काम करण्याचा अधिकार नाही. आपण पैसे दिल्यानंतर ते काम करु शकतात. कोकण हा मागासलेला भाग आहे. अशा वेळी या पुलाकरिता सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी सांगितल्याप्रमाणे एक तृतीयांश तरतूद या वर्षी देणार काय ? ते दिले तरच काम सुरु होईल. नाही तर धोकादायक परिस्थिती निर्माण होईल.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, हा पूल बांधकाम खात्याने बांधलेला आहे. मधल्या काळामध्ये दुरुस्ती सुध्दा बांधकाम विभागाने केली. हद्द वाढल्यामुळे आता हा पूल नगरपालिका हद्दीमध्ये आलेला आहे. हा पूल नगरविकास विभागाने बांधलेला आहे किंवा नगरविकास विभागाने रस्ता बांधलेला आहे अशातील भाग नाही. हद्द वाढल्यामुळे हा पूल नगरपालिकेच्या हद्दीमध्ये आलेला आहे. परंतु ही सगळी जबाबदारी नगरपालिकेवर टाकणे हे त्यांच्या बजेटमध्ये बसणारे नाही. नगरपालिकेला जे अनुदान देत असतो ते गावातील छोट्यामोठ्या रस्त्यांसाठी देत असतो. या पुलाचे नवीन एस्टीमेट्स बांधकाम खात्याने तयार करुन नगरपालिकेकडे पाठविलेले आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याने एस्टीमेट्स तयार करुन नगरपालिकेकडे पाठवणे आणि नगरपालिकेने आपल्या फंडातून ते काम करणे शक्य नाही. परंतु या पुलाच्या नुकसानीच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी सांगितलेला अंदाज तसेच सातत्याने त्या पुलावरुन पाणी वाहते तसेच तेथील सगळी वाहतूक लक्षात घेता हा पूल बांधकाम विभागाच्या मार्फत बजेटमध्ये तरतूद करुन केला जाईल असे स्पष्ट आश्वासन मी या ठिकाणी देऊ इच्छितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

**श्री.माणिकपूरी यांना पर्यायी जागा मिळण्याबाबत**

**(१५) * ४१९२५ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी नगर-लक्ष्मी नगर, मुलुंड (पूर्व), मुंबई येथे गेल्या १५-२० वर्षापासून रहात असलेल्या व मतदार यादीत नावाचा समावेश असलेल्या श्री.गोपाळदास प.माणिकपुरी यांचे राहते घर सन २००५ मध्ये अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का), पूर्व उपनगर यांनी पाडले, हे खरे आहे काय,

(२) श्री.माणिकपुरी यांचे घर सन १९९५ पूर्वीचे असून त्यांना पात्र झोपडीधारक म्हणून शासनाने घोषित केले असल्यामुळे पर्यायी जागा मिळण्याबाबत त्यांनी शासनाकडे मागणी केली असता अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का), पूर्व उपनगर यांनी श्री. माणिकपुरी यांनाच मुलुंड येथे कोणत्या ठिकाणी सरकारी जागा उपलब्ध आहे हे कळविण्याबाबत दिनांक २ ऑगस्ट, २००६ रोजी पत्राद्वारे विचारणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त सरकारी जागांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातच उपलब्ध असताना त्याआधारे पर्यायी जागा न देता वेळकाढूपणाचे धोरण अवलंबिल्यामुळे श्री.माणिकपुरी हे अद्यापपर्यंत पर्यायी जागा मिळण्यापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री. माणिकपुरी यांनी कोणत्या ठिकाणी सरकारी जागा रिक्त आहे हे कळविण्यास, त्यांच्या दिनांक १६ नोव्हेंबर, २००७ च्या पत्रान्वये असमर्थता व्यक्त केल्यामुळे त्यांना पर्यायी जागा देण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**ॲड. प्रितमकुमार शेगावकर, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) होय, दिनांक १.१.१९९५ नंतर झालेली अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे सन २००५ नंतर वेळोवेळी निष्कासित करण्यात आली असून त्यात श्री.मणिकपुरी यांचे झोपडे निष्कासित करण्यात आले आहे.

(२) होय.

(३) नाही. दिनांक १.७.२००५ रोजी मा.अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.) पूर्व उपनगरे यांच्या आदेशानुसार श्री.मणिकपूरी यांना नवीन मंडाळा चेंबूर येथे पुनर्वसनासाठी भूखंडाचा ताबा देणेसाठी गेले असता त्यांनी तेथे नागरी सुविधा नसल्यामुळे तसेच, मुलुंड ते चेंबूर अंतर जास्त असल्याने सदर भूखंडाचा ताबा घेणेस त्यांनी नकार दिला.

(४) श्री.मणिकपूरी यांनी दिनांक २९.७.२००७ च्या पत्रान्वये मा.अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.) पूर्व उपनगरे यांना भूखंडाचा ताबा घेण्यास तयार असल्याबाबत कळविले आहे. त्यानुसार त्यांना मंडाळा चेंबूर स.क्र.८० येथील रिक्त असलेल्या शासनाच्या जमिनीवर पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, श्री. माणिकपुरी यांचे घर 2005 मध्ये पाडले आणि 2005 पासून त्यांना पर्यायी घर दिलेले नाही. त्यांनी शासनाकडे सातत्याने विनंती केलेली आहे. त्यांना जी जागा दाखवली होती त्यातील एक जागा त्यांनी नाकारली. या ठिकाणी उत्तरामध्ये

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

ता. प्र. क्र. 41925 ...... श्री. पांडुरंग फुंडकर......

असे म्हटले आहे की, श्री. माणिकपुरी यांनी दिनांक 29.7.2007 च्या पत्रान्वये माननीय अपर जिल्हाधिकारी, पूर्व उपनगरे यांना भूखंडाचा ताबा घेण्यास तयार असल्याबाबत कळविले आहे. त्यानुसार त्यांना मंडळा, चेंबूर स.क्र. 80 येथील रिक्त असलेल्या शासनाच्या जमिनीवर पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यांनी मुलुंड येथे जागा मागितलेली आहे. त्यासंबंधीचे पत्र त्यांनी अपर जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहे. त्यामध्ये त्यांनी मुलुंड येथे कोणत्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे, हे कळविले आहे. त्यांनी सुचविलेली मुलुंडची जागा त्यांना देणार काय आणि किती दिवसात देणार ? 2005 साली त्याचे घर पाडले. आता 2008 साल सुरु आहे. त्यांच्यावर इतकी वर्षे अन्याय झालेला आहे. त्यांना किती दिवसात ती जागा देणार ?

ॲड. प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, श्री. माणिकपुरी यांनी 10.4.2008 ला एक पत्र दिले आहे. त्यांनी सी.टी.एस. क्रमांक 1320 अे, मुलुंड येथील 30 बाय 30 ची सरकारी जागा मागितलेली आहे. त्यांचा अर्ज आलेला आहे. त्यांचा अर्ज शिफारस करुन महसूल खात्याकडून मंजुरी आल्यानंतर ती जागा त्यांना देण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्यांचे 7 एप्रिलचे पत्र माझ्याकडे आहे. त्यांनी त्या पत्रामध्ये अपर जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, "या अर्जाव्दारे विनंती करतो की, मला पर्यायी जागा म्हणून न्यू मंडाळा, चेंबूर येथील जागा मंजूर करण्यात आली आहे परंतु या जागेला सोयीसुविधा उपलब्ध नसल्याने मी त्याचा ताबा घेण्यात नकार दिला असता मौजे मुलुंड येथील 1320 अ, 115 मि.प. येथील फायर ब्रिगेडच्या समोरील हायवेलगतची जागा मोकळी आहे त्यामुळे त्या जागेवर माझे पुनर्वसन करण्यास विनंती आहे."

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41925.... श्री.पांडुरंग फुंडकर....

अपर जिल्हाधिका-यांनी तुम्ही मुलुंडमधील जागा सुचवावी असे सांगितल्यावर त्यांनी जागा सुचविली आहे. त्याठिकाणी पुनर्वसन करण्यासाठी जागा देणार आहे काय ? हे पत्र दिनांक 7.4.2008 रोजीचे आहे.

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, त्यांच्याकडून अर्ज आलेला आहे. जिल्हाधिका-यांनी मंजुरी दिल्याशिवाय त्यांना जागेचा ताबा देता येणार नाही. त्यांनी कबूल केले होते की, सर्वे नंबर 80 मधील जागा घेण्यास तयार आहे. परंतु त्यांना सूचना केल्यानंतर दुसरा अर्ज केला. शासनाला त्यांना मदत करावयाची आहे. मुलुंडमधील जागा देण्यास काही हरकत नाही, ती त्यांना दिली जाईल.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

**मुंबईतील आर.टी.ओ. कार्यालयांची संख्या वाढविण्याबाबत**

**(१६) * ३८२५० श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. शरद रणपिसे , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुरेशदादा देशमुख :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये दररोज सरासरी ५३१ नव्या वाहनांची नोंद होत असते, तसेच चालकांना लर्निंग लायसन्स, ड्रायव्हिंग टेस्ट, गाडीच्या कागदपत्रांची ट्रान्सफर आदी कामांमुळे मुंबईत असलेल्या तीन आर.टी.ओ. कार्यालयांवर प्रचंड ताण असल्याचे दिनांक ९ ऑगस्ट, २००७ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आर.टी.ओ. कार्यालयांवर पडणारा अतिरिक्त ताण कमी करण्यासाठी मुंबईमध्ये आणखी आर.टी.ओ. कार्यालयांची गरज निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईमध्ये आर.टी.ओ. कार्यालयांची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.गोविंदराव आदिक : सभापती महोदय, एखाद्या प्रश्नाच्या उत्तराला कशी टाळाटाळ करता येते याचे वस्तुनिष्ठ हे उदाहरण आहे. सगळया प्रश्नांना नाही, नाही अशी उत्तरे दिली आहेत. वरळीहून येथे येईपर्यंत 1 ते 1.30 तास लागतो. इतकी वाहनांची संख्या वाढलेली आहे. मुंबईत वाहनांची संख्या वाढली आहे तशी ती संपूर्ण देशात वाढली आहे. पण आर.टी.ओ.कार्यालयांची संख्या 30 च आहे, कर्मचा-यांची संख्या पूर्वी होती तेवढीच आहे. अपु-या व्यवस्थेमुळे समाजातील नागरिकांना त्रास होत आहे, लोकांचा त्रास कमी झालेला नाही. आर.टी.ओ.कार्यालयांची संख्या कमी, कर्मचा-यांची संख्या कमी आणि वाहन चालकांना किंवा मालकांना आर.टी.ओ.कार्यालयात जाण्या येण्यासाठी किंवा आपली कामे करुन घेण्यासाठी खूप त्रास होतो. तेथे प्रचंड भ्रष्टाचार चालू आहे, याबाबत सर्वांच्या तक्रारी असताना येथे प्रश्न उद्‌भवत नाही असे उत्तर दिले जाते. आर.टी.ओ.कार्यालयांची आवश्यकता नाही, वाहने मात्र वाढत आहेत, वाहने वाढत आहेत हे सुध्दा माननीय मंत्रिमहोदय मान्य करतील की नाही याबद्दल शंका आहे. सभागृहात जे टाळाटाळ करणारे उत्तर दिले आहे त्यामध्ये दुरुस्ती करुन नव्याने उत्तर दिले जाईल काय ?

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

ता.प्र.क्र.38250....

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, या प्रश्नाला तांत्रिक स्वरुपाचे उत्तर दिलेले आहे. आर.टी.ओ.कार्यालयांवर ताण वाढला आहे काय असा प्रश्न विचारलेला असल्यामुळे नाही असे उत्तर दिले आहे. ताण वाढलेला नाही असे तांत्रिक उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, मुंबईमध्ये दररोज 500-550 वाहनांची नोंदणी होत असते. तरी सुध्दा ताण वाढलेला नाही असे म्हणण्याचे कारण असे की, आता त्या कार्यालयात संगणकीकरण झालेले आहे. त्यामुळे तेथील कामे तातडीने होतात. नवीन पध्दतीमुळे भ्रष्टाचाराला आळा बसलेला आहे हे मी सांगू इच्छितो. मुंबईमध्ये दररोज किती लायसन्स दिले जातात त्याची आकडेवारी सांगू इच्छितो. मध्य मुंबईत 300 ते 500, पूर्व मुंबईत 200 आणि पश्चिम मुंबईत 994 दिली जातात. नवीन परवाने मध्य मुंबईत 200-250, पूर्व मुंबईत 200-210 आणि पश्चिम मुंबईत 521 दिली जातात. नवीन वाहनांसाठी मध्य मुंबईत 150-200, पूर्व मुंबईत 80-100 आणि पश्चिम मुंबईत 250 परवाने दिले जातात. अशाप्रकारे दररोज 500 ते 550 वाहनांची नोंद होत आहे. मोटर वाहनांची नोंदणी, हस्तांतरणाची प्रकरणे, ना हरकत प्रमाणपत्र अशी सर्व कामे संगणकीकरणाद्वारे केली जातात. त्यामुळे नवीन लायसन्स देणे किंवा लर्निंग लायसन्स देणे ही सर्व कामे संगणकाद्वारे होत आहेत त्यामुळे काम करणे सुकर झाले आहे. आर.टी.ओ.संबंधी साधारणपणे लोकांच्या मनामध्ये अनेक कारणामुळे नाराजी असू शकते. ती कमी करण्यासाठी शासनाकडून अनेक उपाय केले जात आहेत.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 14:05

(ता.प्र.क्र. 38250..... (श्री. विलासराव देशमुख....)

त्यामध्ये प्रामुख्याने लर्निंग लायसन्स किंवा परमनण्ट लायसन्स कॉम्प्युटरवर देण्याची व्यवस्था उपलब्ध झालेली आहे. रजिस्ट्रेशनचे काम सुध्दा बीओटी तत्वाप्रमाणे पीपीपी मॉडेल प्रमाणे द्यावे असा आपण नेहमी पुरस्कार करीत आहात, त्या मॉडेलद्वारे हे काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे काम थोडेसे सुसह्य आणि सुकर झालेले आहे. संपूर्णपणे ताण संपलेला आहे काय या प्रश्नाच्या संदर्भात तांत्रिक उत्तर दिलेले आहे.

श्री. नितीन गडकरी : अडचण अशी आहे की, कॉम्प्युटरायझेशन झालेले आहे आणि जुन्या पध्दतीनेही काम सुरु आहे. दोन्ही पध्दतीने काम सुरु आहे. मंत्रालयामध्ये देखील अशाच पध्दतीने कॉम्प्युअरवर आणि कागदावरही काम सुरु आहे. या दोन्ही पध्दतीमुळे फार मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आणि लोकांना ताप होतो. नवीन गाडीच्या रजिस्ट्रेशनसाठी डिलर हजार रुपये अधिक घेतो. त्यामध्ये आर.टी.ओ. आणि इतर खर्च आहे असे सांगतो. त्याची पावती देखील तो देत नाही. सर्व प्रकारची लायसन्स पैसे दिल्या शिवाय मिळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. जगातील काही राष्ट्रांमध्ये माणसाना कार्यालयात जावे लागत नाही. इंटरनेटद्वारे फॉर्म भरुन बॅंकेतून पैसे ट्रान्स्फर होऊन लायसन्स मिळतात. यातील अर्धा स्टाफ कमी करुन कॉम्प्युटरायझेशनद्वारे चांगले काम होऊ शकेल. माझी याबाबतीत आपणास विनंती आहे की, या ऑफिसच्या आणि जनतेच्या सोयीच्या दृष्टीने या क्षेत्रातील एक्स्पर्ट व्यक्तीकडून तपासणी करुन त्यांचा अहवाल घ्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. विलासराव देशमुख : जेव्हा नवीन आय.टी.क्षेत्रामध्ये नव्या पध्दतीचा अवलंब करतो तेव्हा जुन्या पध्दतीवरुन नव्या पध्दतीकडे जाण्यासाठी एक अंतर्गत विरोध असतो, त्या कामाकडे जाण्याच्या दिशेने एक मानसिकता, माईंडसेट फारसा मिळत नाही. ब-याच जुन्या सवयी लागलेल्या आहेत... (अडथळा)...मी कामाच्या सवयी म्हणत नाहीत. सन्माननीय सदस्य ज्या प्रमाणे शब्द वापरतात तसे शब्द मला वापरता येणार नाही. म्हणून ज्या जुन्या सवयी लागलेल्या आहेत त्यामधून नव्या पध्दतीकडे जाण्यासाठी मानसिकता नसते, त्याबाबतीत सतत संघर्ष घडत असतो. लायसन्स, रजिस्ट्रेशन हे नव्या पध्दतीने ऑन लाईनद्वारे घरपोच मिळाले तर जनतेची ऑफीसमधील गर्दी आपोआपच कमी होईल यादृष्टीने सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेली आहे. आपण कॉम्प्युटरायझेशन करीत आहोत त्यामध्ये येणा-या अडचणी, नव्या आणि जुन्या पध्दतीने होणारे

..2..



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. विलासराव देशमुख.... ता.प्र.क्र.38250....

काम, याचा तज्ज्ञ व्यक्तीकडून अभ्यास करुन घेण्यात येईल आणि आता असलेल्या व्यवस्थेमध्ये आणखी कोणत्या सुधारणा करता येतील, जनतेचा त्रास कमी होऊन समाधान कसे वाढविता येईल यादृष्टीने राज्य सरकार निश्चितपणे प्रयत्न करील.

. श्री. मधुकर सरपोतदार : बांद्रा विभागासाठी वर्सोवा आणि पूर्वमुंबई विभागासाठी घाटकोपर येथे ही कार्यालये आहेत. इतक्या अंतरावर ही कार्यालये असल्यामुळे तेथे जाण्यासाठी दीड-दीड तास लागतो. रस्त्यावर वाहनांची प्रचंड गर्दीअसल्यामुळे वाहनांची गतीही वाढवता येत नाही. नवीन फ्लायओव्हर्स ब्रिजची योजना पूर्ण होईपर्यन्त दोन वर्षाचा कालावधी लागेल. त्या ठिकाणी लायसन्य, रिन्युव्हेशन आणि रजिस्ट्रेशनसाठी दलाल आहेत. ही सर्व कामे दलालांच्या माध्यमातून केली तरच ती लवकर होतात, अन्यथा ती होत नाहीत. यावर शासन परिणामकारक उपाययोजना करील काय ?

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री. शिगम 14:10

ता.प्र.क्र.38250....

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, मधल्या काळात शासनाने एक प्रयत्न केला होता. नवीन वाहने डिलर्सकडून विकत घेतल्यानंतर त्या वाहनाच्या रजिस्ट्रेशनच्या कामासाठी आर.टी.ओ.कार्यालयात जावे लागते. रजिस्ट्रेशनच्या कमासाठी आर.टी.ओ.च्या कार्यालयात जावे लागू नये. डिलर्सकडे रजिस्ट्रेशनचे काम व्हावे असा मधल्या काळात निर्णय घेतला होता. परंतु काही कारणामुळे तो निर्णय थांबविण्यात आला. डिलर्सकडे रजिस्ट्रेशनचे काम दिले तर त्या डिलर्सला प्रत्येक वाहनाचे रजिस्ट्रेशन करुन घेण्यासाठी आर.टी.ओ. कार्यालयात उपस्थित राहणे शक्य होणार नव्हते म्हणून तो निर्णय थांबविण्यात आला आहे. आपण म्हणता त्या प्रमाणे आर.टी.ओ. कार्यालयांची संख्या कमी आणि अंतर अधिक त्यामुळे वाहनांची गर्दी त्या ठिकाणी वाढते. ही व्यवस्था सोपी कशी करता येईल यादृष्टीने आम्ही विचार करीत आहोत. एखादे काम आऊटसोर्स कसे करता येते काय ? तज्ज्ञ समितीकडें आम्ही जावू त्या वेळेला त्यांना सांगू की, याबाबतीत शिफारस करावी. त्यांना येथेपर्यंत येण्याची गरजही पडू नये. आऊटसोर्स कामे करता येतात काय असाही विचार निश्चितपणाने केला जाईल. परंतु हा विषय सरकारला मिळणा-या महसुलाशी संबंधित आहे. कारण या ठिकाणचा महसूल हा सरकारकडे जमा होत असतो. त्या ठिकाणचे पैसे वसुलीचे अधिकार आपल्याला कायद्याने देता येतात काय यासंबंधीचा देखील सल्ला घ्यावा लागेल. याबाबतीत मायन्यूट डिटेल्स आहेत, त्याचा अभ्यास करुन निश्चितपणाने ही व्यवस्था सुटसुटीत कशी करता येईल या गोष्टीचा सरकार विचार करील.

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्यांनी या कार्यालयावर ताण पडलेला आहे काय असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. आदिक यांनी विचारला होता, त्यासंदर्भात "नाही" असे उत्तर शासनाकडून देण्यात आले आहे. या ठिकाणी सांगितले गेले की, आता लायसन्स संगणकाच्या माध्यमातून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु लायसन्स काढण्यासाठी आर.टी.ओ.कार्यालयात वाहन आणणे आवश्यक असते. कारण आर.टी.ओ.यांच्यासमोर ते वाहन त्यांना चालवून दाखवावे लागते. एक चार चाकी वाहनास एका फेरीसाठी 20 मिनिटे वेळ लागतो आणि टू व्हीलरला एक फेरी मारुन येण्यास 8 ते 10 मिनिटे लागतात. आपण या ठिकाणी सांगितले की, एका दिवसात वाहन चालकांची 300 लायसन्स दिली जातात. म्हणजे 50 तास आर.टी.ओ.कार्यालयात काम होते. दिवसाचे ऑफीस वर्कींग धरले तर 25 तासाचे काम दलाल





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

करीत असतात. त्यामुळे या कार्यालयावर किती ताण पडतो हे प्रत्यक्ष यातून दिसून येते. ज्या ठिकाणी तीन कार्यालये आहेत, त्या ठिकाणी पाच अथवा सहा कार्यालये सुरु झाली तर लोकांना येण्या जाण्याचा ताण कमी होईल. लर्नींग लायसन्स, कायमचे लायसन्स, वाहनांचे रजिस्ट्रेशन ही कामे संगणकाच्या माध्यमातून होतील. लोकांचा आ.टी.ओ.कार्यालयात जाण्या-येण्याचा त्रास कमी व्हावा म्हणून अतिरिक्त कार्यालयांची निर्मिती शासन करील काय ?

श्री. विलासराव देशमुख : ड्रायव्हींग लायसन्स देण्याच्या पध्दतीत नवीन बदल करीत आहोत. ड्रायव्हींगची टेस्ट घेण्यासाठी आता नवीन ड्रायव्हींग ट्रॅक प्रायोगिक तत्वावर नाशिक येथे सुरु केले आहे. त्या ट्रॅकने गाडी व्यवस्थित चालविली तर त्या व्यक्तीस वाहन चालकाचे लायसन्स देण्यास अडचण येऊ नये. जुन्या पध्दतीने मोटार सायकलचे लायसन्स द्यावयाचे असेल तर आठचा आकडयाप्रमाणे त्या व्यक्त्ीने व्हेईकल चालवून दाखविले पाहिजे. चार चाकी वाहनाचे लायसन्स द्यावयाचे असेल तर त्या व्यक्तीने वाहन मागे-पुढे घेऊन वाहन चालविले पाहिजे अशा प्रकारच्या टेस्ट घेतल्या जात होत्या. आता सिम्युलेटर आले आहे. आपण आता पुढे गेले पाहिजे. सिम्युलेटरवरच त्या व्यक्तींनी ड्रायव्हींग टेस्ट दिली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांनी सांगितले की,नवीन सिस्टीम या ठिकाणी सुरु झाली पाहिजे. पूर्वीची लायसन्स देण्याची पध्दत ही कालबाहय झालेली आहे. आमचा प्रयत्न आहे की, या कार्यालयांना सिम्युलेटर अर्थ खात्याच्या सल्ल्याने प्रोव्हाईड केले तर निश्चितपणे या सिस्टीममध्ये सुधारणा होतील.

श्री. अरविंद सावंत : मुंबईतील अनेक लोक आपल्या वाहनांचे रजिस्ट्रेशन ठाणे अथवा उपनगरामध्ये जाऊन करुन घेतात. त्यामुळे शासनाच्या तिजोरीत कमी पैसे येतात. मी मुंबईत राहतो, परंतु तिकडे मोटार टॅक्स कमी पडतो म्हणून तेथील पत्ता देऊन वाहने रजिस्ट्रेशन करुन घेतात. आपण मुंबई शहरातील मोटार टॅक्स कमी केला तर मुंबई शहरात वाहनांचे रजिस्ट्रेशन मोठया प्रमाणात होतील आणि तेवढा महसूल शासनास जास्त मिळेल. यासंदर्भात शासनास काही करता येईल काय ?

श्री. विलासराव देशमुख : मुंबई आणि ठाणे येथील मोटार टॅक्स स्ट्रक्चर सारखे ठेवण्याचा आम्ही विचार करु. म्हणजे दोघात फरक ठेवण्याची गरज नाही.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---------- यानंतर श्री. कानडे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MMP/ 14:15

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. जयंत पाटील (वित्तमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008-09 या वर्षाचे मासिक निधी विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

......2

पृ.शी./मु.शी. : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा विशेष (सोळावा) अहवाल सादर करतो.

**उपसभापती** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा चौदावा अहवाल सादर करणे.

डॉ. नीलम गोऱ्हे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिलांचे हक्क व कल्याण समितीचा चौदावा अहवाल सभागृहाला सादर करते.

सभापती महोदय, यातील काही शिफारशींचा सदनामध्ये उल्लेख करणे अत्यावश्यक आहे. राज्य महिला आयोगाच्या संदर्भात या अहवालामध्ये एकूण 20 शिफारशी केलेल्या आहेत. यातील एक महत्वाची शिफारस म्हणजे राज्य महिला आयोगामध्ये तीन सदस्यांच्या जागा गेल्या 4 वर्षापासून रिक्त आहेत. राज्य महिला आयोगाची स्थापना 15 वर्षापूर्वी झालेली आहे. राज्यातील महिलांसाठी महत्वपूर्ण काम या आयोगामार्फत केले जाते. या आयोगासाठी जी तरतूद केलेली आहे ती तरतूद अतिशय अत्यल्प आहे याबद्दल समितीने तीव्र नापसंती व्यक्त केलेली आहे. याखेरीज राज्य महिला आयोगाच्या कार्यालयाचे 71 लाख 61 हजार रुपयांचे भाडे थकीत आहे. हे भाडे भरले नाही तर राज्य महिला आयोगाला स्वतःच्या कार्यालयातून बाहेर जावे लागेल अशी परिस्थिती आहे. म्हणून शासनाने हे थकीत भाडे माफ करावे अशी समितीने शिफारस केलेली आहे. राज्य महिला आयोगाची स्थापना झाली तेव्हा 40 पदे मंजूर करण्यात आली होती परंतु मार्च 2003 मध्ये शासनाने मंजूर पदांची संख्या कमी करुन ती आता 29 केलेली आहे. याखेरिज राज्य महिला आयोगाचे कामाकाम प्रभावी व्हावे यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यापूर्वी महिलांसाठी ज्या योजना केल्या जातात आणि राज्यात कायदे केले जातात त्यात महिलांविषय दृष्टीकोन जोपासण्यासाठी राज्य महिला आयोगाचे मत विचारात घेण्यात यावे अशी समितीने शिफारस केलेली आहे. दुसरी एक महत्वाची शिफारस अशी आहे की, प्रत्येक विभागीय कार्यालयामध्ये एक कार्यालय राज्य महिला आयोगाचे असावे आणि त्यासाठी एक व्यवस्थापक, दोन समुपदेशक आणि दोन संघटक यांची पदे निर्माण करण्यात यावीत व त्यासाठी आर्थिक तरतूद करावी. शासनाने महिलांना जो दर्जा दिला आहे तो दर्जा राज्य महिला आयोगाला शासन देत नाही. त्यामुळे राज्य महिला आयोगाने न्यायालयीन पध्दतीने काम न केल्यामुळे त्यांनी दिलेल्या निदेशांवर कारवाई सरकारकडून होत नाही. ज्याप्रमाणे राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाला अधिकार आहेत तसे अधिकार राज्य महिला आयोगाला द्यावेत आणि त्यासाठी कायदेशीर बदल करण्यात यावा अशी समितीची

......4

शिफारस आहे. या कामासाठी आम्ही बऱ्याचशा साक्षी घेतल्या. खास करुन महिला व बालकल्याण विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. त्यामुळे राज्य महिला आयोगाचे काम अजून वेगाने झाले पाहिजे अशा प्रकारची शिफारस केलेली आहे.

**उपसभापती** : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



<u>**नियम 289 च्या प्रस्तावासंबंधी**</u>

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, काल मी नियम 289 अन्वये शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात एक प्रस्ताव दिला होता. त्यावेळी त्या प्रस्तावावर चर्चा करण्याचे सरकारने मान्य केले म्हणून आम्ही थांबलो होतो. आज प्रश्नोत्तराचा तास झालेला आहे. सरकारची चर्चेची तयारी आहे. या चर्चेला सुरुवात करणे अत्यंत गरजेचे आहे. आजचा दिवस आहे. परवा अधिवेशन संपणार आहे. सरकारने चर्चा करण्याचे मान्य केलेले आहे. आजचे बाकीचे कामकाज बाजूला ठेवा. शेतकऱ्यांच्या कर्जासंबंधातील विषय असल्यामुळे तातडीने चर्चा होणे आवश्यक आहे. सरकारने चर्चा स्वीकारली असल्यामुळे कामकाज थांबवून चर्चेला सुरुवात करावी. आम्हांला कामकाज करावयाचे आहे आणि शासनाकडून उत्तर ऐकायचे आहे. शेतकऱ्यांबद्दलची शासनाची भूमिका समजावून घ्यावयाची आहे. हा विषय सर्व समावेशक आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 14:20

श्री.दिवाकर रावते.......

शेतकऱ्यांच्या संदर्भातील विषय हा सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांचा आहे. या संदर्भात खुलासा होणे आवश्यक आहे. शासनाची चर्चा करण्याची तयारी आहे असे काल सांगितले होते. आता प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. त्यामुळे पुढील कामकाज न घेता शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नासंबंधी चर्चा घेण्यात यावी अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही काल सदनात उपस्थित नव्हतो. परंतु सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्याशी चर्चा केल्यानंतर असे कळले की, काल सदनामध्ये 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना मांडण्यात आली होती. केंद्र सरकारने जाहीर केले की, 5 एकरपेक्षा जास्त जमीन असलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंबंधी कोणताही विचार केला जाणार नाही. त्यामुळे विधानसभा सभागृहात काल गोंधळ झाला. आम्हाला या सभागृहामध्ये गोंधळ करावयाचा नाही. शेतकऱ्यांसंबधी या राज्य सरकारचे निश्चित धोरण काय आहे हे शेतकऱ्यांना समजले पाहिजे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. सन्माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी घोषणा केली. परंतु विदर्भातील 6 जिल्हयातील 5 एकरपेक्षा जास्त जमीन असलेले शेतकरी कर्जमाफीच्या फायद्यापासून वंचित राहणार आहेत. म्हणून या विषयावर चर्चा झाली पाहिजे. केंद्र सरकारने आतापर्यंत राज्य शासनाला एकही पत्र पाठविलेले नाही. मात्र राज्य शासन घोषणा करुन मोकळे झाले आहे. स्वत:चा सत्कार करुन बसले, मोठमोठे मेळावे घेतले. जर केंद्र शासनाकडून पत्र आले नसेल तर विदर्भातील सहा जिल्हयातील 5 एकरपेक्षा जास्त जमीन असलेले शेतकरी फायद्यापासून वंचित राहणार आहेत. मी स्वत: एका सोसायटीला विचारले असता त्यांनी कळविले की, आमच्या सोसायटीचे फक्त 5 शेतकरी पात्र ठरणार आहेत. कर्जाचे पुनर्गठन झाले असून 31 मार्च ही मुदतीची तारीख सुध्दा बदललेली नाही. त्यामुळे शेतकरी संभ्रमात आहेत. पेरणी दीड महिन्यावर आलेली आहे. शेतकऱ्यांना कर्ज मिळाले नाही तर ते पेरणी करु शकणार नाहीत. म्हणून शासनाने काल मान्य केल्याप्रमाणे पुढील कामकाज बाजूला सारुन या विषयावर चर्चा घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या संदर्भात काल सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये मांडलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेद्वारे हा विषय सभागृहात उपस्थित केला होता. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी समर्थन दिले होते आणि

श्री.नितीन गडकरी.........

शासनातर्फे सन्माननीय मंत्री श्री.अजित पवार यांनी चर्चा घेण्याचे मान्य केले होते. आता ती चर्चा सुरु व्हावयास पाहिजे. पार्लमेंटमध्ये दिलेले उत्तर हे राज्य शासनाच्या घोषणेविरुध्द आहे. काल दिल्लीमध्ये आम्हाला अशी माहिती मिळाली की, सोसायट्यांना सुध्दा कर्ज मिळणार नाही. 5 एकरपेक्षा जास्त जमीन असलेल्या विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांना काहीच फायदा मिळणार नाही. सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्या सांगली जिल्हयात काम जमले आहे. परंतु विदर्भावर तुम्ही का अन्याय करीत आहात? विदर्भातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा काहीच फायदा मिळणार नाही. सन्माननीय मंत्री श्री.अनिस अहमद या ठिकाणी बसले आहेत. यवतमाळ व वर्धा जिल्हयात काय परिणाम झालेला आहे याची त्यांना कल्पना आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात यावी आणि तामिळनाडू राज्याने ज्याप्रमाणे घोषणा केली त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्याने घोषणा करावी, शेतकऱ्यांची पूर्ण कर्जमाफी करावी. हा फार गंभीर प्रश्न आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढणार आहेत. सरकारने ताबडतोब या विषयावर चर्चा घेतली पाहिजे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या संदर्भात मला एवढीच विनंती करावयाची आहे की, काल नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना मांडल्यानंतर त्यावर दोन-तीन सन्माननीय सदस्यांनी आपले मत मांडले. त्यानंतर स्वत: सन्माननीय मंत्री श्री.अजित पवार उठून उभे राहिले आणि त्यांनी सांगितले की, चर्चा करण्यास शासनाचा विरोध नाही. शासन चर्चा करण्यास तयार आहे. केंद्र सरकारकडून माहिती मागविली जाईल, ती माहिती तपासून पाहिली जाईल आणि आवश्यकता भासल्यास कॅबिनेटची बैठक घेतली जाईल आणि उद्या या विषयावर चर्चा घेण्यात यावी अशी मंत्रीमहोदयांनी विनंती केली होती. त्यानुसार सन्माननीय सभापतींनी सांगितले होते की, ठीक आहे, उद्या चर्चेसाठी वेळ देण्यात येईल.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

शेतक-यांच्या संदर्भातील विषय आजच्या कार्यक्रमपत्रिकेत दाखविण्यात आलेला दिसत नाही. त्यामुळे माझी सूचनावजा विनंती आहे की, शेतक-यांच्या प्रश्नाच्या चर्चेला आता सुरुवात करण्यास काहीच हरकत नाही.

**उपसभापती** : या विषयाच्या संदर्भात या ठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधुकर सरपोतदार यांनी विचार मांडलेले आहे. त्यामुळे शेतक-यांच्या संदर्भातील चर्चेला आता सुरुवात करावयाची असेल तर अगोदर सन्माननीय सभापती महोदयांबरोबर आपल्याला चर्चा करावी लागेल. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात ज्यांनी या ठिकाणी विचार मांडलेले आहेत त्यांनी माननीय सभापती महोदयांच्या दालनात चर्चेसाठी यावे तसेच या चर्चेसाठी माननीय श्री.पतंगराव कदम यांनी सुध्दा हजर राहण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सभागृहाचे कामकाज मी अर्ध्या तासाकरिता स्थगित करीत आहे.

आता सभागृहाची बैठक स्थगित होईल आणि दुपारी 3.00 वाजता पुन: भरेल.

( 2.26 ते 3.00 वाजेपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित करण्यात आली.)

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभागृह स्थगितीनंतर --- )

**सभापतीस्थानी - माननीय उपसभापती**

**पृ.शी.** : ऑटो रिक्शांना इलेक्ट्रॉनिक मीटर लावणे.

**मु.शी.** : ऑटो रिक्शांना इलेक्ट्रॉनिक मीटर लावणे यासंबंधी माननीय परिवहन राज्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री. धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो. -

" इलेक्ट्रॉनिक मीटर वापरासंदर्भात ऑटो रिक्शॉ मालक-चालक संयुक्त कृती समिती, महाराष्ट्र यांनी सादर केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने दिनांक 22 एप्रिल 2008 रोजी संघटनेचे प्रतिनिधी तसेच काही विधानसभा / विधान परिषद सदस्यांसमवेत संयुक्त कृती समितीने सादर केलेल्या मागण्यांसंदर्भात माननीय मुख्यमंत्री यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. संयुक्त कृती समितीने सादर केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने,

(1) इलेक्ट्रॉनिक मीटर वापरासंदर्भात राज्यमंत्री, परिवहन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात यावी. या समितीमध्ये रिक्शॉ संघटनेचे प्रतिनिधी तसेच ग्राहक प्रतिनिधी यांचा समावेश असावा. दोन महिन्यात सदर समितीने आपला अहवाल सादर करावा. तोपर्यंत रिक्शाँसाठी इलेक्ट्रॉनिक मीटर वापरासंदर्भात करण्यात येत असलेल्या कार्यवाहीस स्थगिती देण्यात यावी.

(2) परिवहन संबंधित इतर मागण्यांच्या संदर्भात प्रधान सचिव, परिवहन यांच्या अध्यक्षते खाली संघटनेच्या प्रतिनिधींसह समिती नेमावी.

असे माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आले आहेत.

***

**( सभापतीस्थानी - माननीय सभापती )**



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विधीमंडळ अधिवेशन काळात समित्यांच्या बैठका न घेण्याबाबत औचित्त्याचा मुद्दा**

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, अधिवेशन चालू असताना कोठल्याही समितीच्या बैठकी लावण्यात येऊ नयेत असे यापूर्वी आपण या सदनात निर्देश दिल्यानंतरही आज तीन बैठकांचे आमंत्रण मला आलेले आहे आणि त्यापैकी दोन बैठकांना मी हजर राहिलो आहे. आता कोकणातील आंबा उत्पादकांचे अवेळी झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानी बाबत निर्णय घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाची बैठक आजच दुपारी 3.00 वाजता बोलाविण्यात आल्याचे निमंत्रण मला मिळालेले आहे. आता याच वेळी आपल्या सभागृहाची बैठक देखील चालू असल्याने मी त्या बैठकीला इच्छा असूनही उपस्थित राहू शकत नाही. तेव्हा कमीत कमी आपण ही बैठक पुढे ढकलण्याची कृपा करावी ही विनंती.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आज बोलाविण्यात आलेल्या बैठकांबाबतचा मुद्दा मांडला आहे. त्याबाबत मी त्यांना आणि आपणा सर्वांना सांगू इच्छितो की, ठाणे जिल्ह्यातील मनोरूग्णांचे जे हॉस्पिटल आहे त्याला अंदाज समितीने मध्यंतरी भेट दिली होती आणि त्यावेळी तेथील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनी समितीला थांबवून भेट घेतली व आपले निवेदन दिले. त्या संदर्भात आज बैठक मी बोलाविली होती. यापूर्वी मी ही बैठक बोलाविली होती ती तहकूब केली होती. खरे तर त्या दिवशीच्या बैठकीला अनेक आमदार आले होते आणि अंदाज समितीच्या समिती प्रमुखांना देखील बोलाविले होते. आता अपवाद म्हणून किंवा तुम्ही त्या दिवशीदेखील 8-10 आमदारांनी हा प्रश्न मांडला होता म्हणून ...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी आंबा उत्पादकांच्या झालेल्या नुकसानी संदर्भात आज बोलाविण्यात आलेल्या बैठकीबाबत मुद्दा मांडला आहे. सदरहू बैठक दुपारी 3.00 वाजता, सभागृहाची बैठक चालू असतानाच घेण्यात येत आहे आणि म्हणून मी विनंती केली की, आपण ही बैठक किमान पुढे ढकलण्यास सांगावे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, शेवटी आपण दोन्ही गोष्टी पाहिल्या पाहिजेत. काही विषय असे असतात की, त्या संबंधात तातडीने बैठक घ्यायची असल्यास अधिवेशन काळात बैठक घ्यावी लागते. मात्र या संदर्भात मी एक पथ्य जरूर पाळले आहे की, अशा बैठक सकाळी 11.00 वाजता किंवा सायंकाळी 5.00 वाजल्यानंतर घ्याव्यात अशा सूचना दिल्या

..... टीटी 3 ...

**सभापती** .....

आहेत. परंतु असे असले तरी एखाद वेळी तातडी म्हणून मध्ये बैठक लावली जाते. पण तरीही मी अशी बैठक यापूर्वी तहकूब केलेली आहे. आताही मी बोलाविलेली बैठक तहकूब करतो आणि नॉन-सेशन काळात ती घेतो. परंतु माझी इच्छा अशी आहे की, सदनातील दोन्ही बाजूच्या सदस्यांनी सहकार्य करावे. ...

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, कोकणातील आंब्याचे अवेळी पावसाने झालेल्या नुकसानी संबंधात जी बैठक लावली आहे ती आज व्हायला पाहिजे. कारण हे अधिवेशन संपण्याच्या आत त्याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

**सभापती** : पण आंबा विषयक जी बैठक आहे ती मी बोलाविलेली नाही ....

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ती बैठक मंत्री महोदयांनी बोलाविलेली आहे. ..

**सभापती** : तर मग सन्माननीय सदस्यांनी हेही लक्षात घ्यावे की, आंब्याच्या नुकसानी संदर्भात असलेली ही बैठक आहे आणि ती मंत्री महोदयांनी बोलाविलेली आहे. अवेळी पडलेल्या पावसाने आंबा उत्पादकांचे दरवर्षी पेक्षा किती तरी पटीने यंदा नुकसान झालेले असून ते सहजी भरून काढता येणारे नाही आणि म्हणून मी सांगेन की, ही जी बैठक आहे ठरल्यानुसार आजच घ्यावी असे माझे मत आहे.

( **सभापतीस्थानी - माननीय उपसभापती** )

***

( यानंतर सौ. रणदिवे .... यूयू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उपसभापती** :सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, पाशा पटेल, मधुकर चव्हाण यांनी " कवठे महांकाळ, जि. सांगली येथील शेतकरी सहकारी दूध संघ गेल्या 10 वर्षापासून बंद असून या संस्थेला अवसायानात न काढणे तसेच दूध पुरवठा करणा-या संस्थांचे पैसे न देणे, कर्मचा-यांचा पगार, ग्रॅच्युईटी इत्यादि न देणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे यांनी " उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय जमीनीवरील बांधकामे सध्याच्या प्रचलित दराने महसूल वसूली करुन नियमित करण्याची प्रक्रिया सुरु असणे, या अनधिकृत बांधकामांमध्ये मराठी माध्यमाच्या शाळांचा समावेश असणे, त्यांना प्रचलित दराने महसूल देणे अशक्य होणे, त्यामुळे त्यांना सवलत देण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, शरद पाटील यांनी " दिनांक 16 मार्च, 2008 रोजी मुरुड तालुक्यात (जिल्हा रायगड ) झालेल्या ग्रामपंचायत निवडणूकीमध्ये अनुसूचित जमातीच्या जागांवरील निवडणूकांवर कोळी बांधवांनी टाकलेला बहिष्कार " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी " यवतमाळ जिल्हयातील कळसा अरुणावती प्रकल्पासाठी सन 1990 मध्ये शेतक-यांच्या जमिनी संपादित केल्या असून सदर जमीनीचा वाढीव मोबदला 88 पैकी 82 शेतक-यांनी न्यायालयात जाऊन मिळविला असून उर्वरित 2 शेतक-यांना आर्थिक परिस्थितीमुळे कोर्टात जाणे शक्य नसल्यामुळे त्यांना तो न मिळणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ...

यानंतर सन्माननीय सदस्य श्री संजय केळकर यांनी " सन 1990 मध्ये कल्याण-डोबिवली महानगरपालिका क्षेत्रातील काही अनधिकृत बांधकामे दंड आकारुन नियमानुकूल करण्याची काकोडकर समितीने शिफारस केली असून या शिफारशींवर विधि मंडळात चर्चा होऊनही त्यावर कार्यवाही न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री अरविंद सावंत यांनी " ठाणे जिल्हयातील तुंगारेश्वर डोंगराच्या पायथ्याशी मुंबईतील परमार या बडया बिल्डरने आदिवासींच्या नावे असलेल्या जमिनीवर सर्व कायदे पायदळी तुडवून सागांच्या झाडांची विनापरवानगी कत्तल करुन तेथे 15 एकराच्या जागेवर बंगले, क्लब हाऊस इत्यादीचे सुरु केलेले बांधकाम " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री अनिल परब, परशुराम उपरकर, अरविंद सावंत यानी " राज्य सरकारच्या राजपत्रित अधिका-यांना कामानिमित्त मुंबईला यावे लागत असून त्यांना निवासाची सोय नसल्याने वांद्रे येथील भूखंड शासनाने देण्याचे जाहीर करुनही त्याची पूर्तता न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी " विदर्भामध्ये मोठया प्रमाणावर लाखी डाळीचे उत्पादन होत असून सदर डाळ मानवी आरोग्याला अपायकारक असल्याचा कारणावरुन त्यावर घातलेली बंदी ही गेली 47 वर्षे सुरु असून ती उठविण्यासाठी नागपूर येथे गेले 50 दिवसांपासून सुरु असलेले उपोषण " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, लाखी डाळीवरील बंदी उठविण्यात यावी, या मागणीसाठी गेले 50 दिवसांपासून उपोषण सुरु आहे. परवा हे अधिवेशन संपणार आहे. त्यामुळे त्यापूर्वी निवेदन येईल की नाही, हे निश्चित नसल्याने माझी आपणास विनंती आहे की आज किंवा

..3



APR/ KGS/ KTG/ 15:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री दिवाकर रावते ....

उद्या या विषयावर शासनास निवेदन करण्यास सांगावे.

**उपसभापती** : ठीक आहे, या विषयावर शासनाने आज निवेदन करावे.

श्री नारायण राणे : सभापती महोदय, आज निवेदन करणे शक्य होणार नाही कारण आता 3.00 वाजले आहे. नागपूर येथून या विषयाबाबत संपूर्ण माहिती घ्यावी लागेल त्यामुळे आज निवेदन करणे शक्य होणार नाही.

**उपसभापती** : ठीक आहे. या विषयावर शासनाने उद्या निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यानी " दिनांक 22 एप्रिल, 2008 रोजी चोपडा, जि. जळगांव येथे हनुमान मंदिरात हनुमान चालीसाची कॅसेट वाजत असताना दोन गटांमध्ये भांडण होऊन त्याचे पर्यावसान दंगलीत होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**..

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे यांनी " नागपूर विभाग सार्वजनिक बांधकाम मंडळ येथील 27 कनिष्ट अभियंत्यांना प्रदान केलेल्या मानीव दिनांकानुसार शाखा अभियंता दर्जा देण्याबाबत शासनाकडे दिनांक 15/11/2007 पासून मंजुरीकरिता प्रस्ताव सादर केलेला असूनही सदर प्रस्तावास मंजुरी देण्यास होत असलेला टाळाटाळ " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी शासनास अनुमती नाकारत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "मुंबईतील प्रतिक्षानगरातील संक्रमण शिबिरात सन 1969 पासून कामगार राहत असून तेथील दलालांनी मोठया रकमा घेऊन त्यांना गाळे दिले असून म्हाडा या कामगारांना तेथून हुसकावून लावून त्यांना बेघर करीत असल्याबाबत" या विषयावर नियम93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी शासनास अनुमती नाकारत आहे.मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. इतर सर्व 93च्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

---------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : निम्न पेढी,पंढरी व पाकनदी( अमरावती जिल्हा) येथील प्रकल्पाकरिता सरळ पद्धतीने झालेनी जमीन खरेदी

**मु. शी.** : निम्न पेढी,पंढरी व पाकनदी( अमरावती जिल्हा) येथील प्रकल्पाकरिता सरळ पद्धतीने झालेनी जमीन खरेदी याबाबत प्रा. बी.टी. देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, व्ही.यू. डायगव्हाणे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. नारायण राणे ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, व्ही.यू. डायगव्हाणे यांनी "निम्न पेढी, पंढरी व पाकनदी( अमरावती जिल्हा) येथील प्रकल्पाकरिता सरळ पद्धतीने झालेनी जमीन खरेदी " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, या ठिकाणी जे निवेदन दिलेले आहे त्यास समाधानकारक उत्तर देण्यात आले आहे. विदर्भातील प्रकल्प लहान कारणासाठी बंद पडत आहेत. महत्तम अनुशेष असलेल्या जिल्हयामध्ये अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्याच बरोबर गैर आदिवर्सींच्या जमिनीबाबतही अडचण होती. माननीय मंत्री महोदयांनी यामध्ये भेदभाव करु नये असे आदेश निर्गमित केले होते. बिगर आदिवासी खातेदारांच्या जमिनी ज्या प्रमाणे सरळ खरेदी पद्धतीने खरेदी केल्या जात आहेत. त्याचप्रमाणे आदिवासी खातेदारांच्या जमिनी खरेदी करण्याची कारवाई तातडीने पूर्ण करावी तसेच या प्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल मानीनय मंत्री महोदयांना सादर करावा असे स्पष्ट आदेश माननीय मंत्री महोदयांनी याची प्रत माझ्याकडे दिलेली आहे. ही कार्यवाही 3 दिवसामध्ये झाली तर ठीक आहे. परंतु गैर आदिवासीं ची जमीन खरेदी करण्याचे प्रकार 6 महिन्यापासून सुरु आहे. हे साधारण 60 ते 70 लोक आहेत. त्यांच्या जमिनी खरेदी करण्याचे काम प्राथम्याने पूर्ण करावे. यामध्ये एक -दोन दिवस मागे पुढे झाले तरी चालेल अशा प्रकारच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात येतील काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख यांनी या ठिकाणी सूचना दिलेली आहे. त्या बाबत त्यांना अपेक्षित होते असे उत्तर मी दिलेले आहे. तसेच त्या बाबीची पूर्तता देखील केलेली आहे व ती फाईल एका तासात क्लीअर करुन त्याप्रमाणे कार्यवाही केलेली आहे. याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केलेले आहे. 37 आदिवासींच्या जमिनी संपादित करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

--------------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्य परिवहन महामंडळाने नागपूर मनपाला शहर बस वाहतूक हस्तांतरित करणे

**मु. शी.** : राज्य परिवहन महामंडळाने नागपूर मनपाला शहर बस वाहतूक हस्तांतरित करणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. धर्मरावबाबा आत्राम ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख यांनी "राज्य परिवहन महामंडळाने नागपूर मनपाला शहर बस वाहतूक हस्तांतरित करणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, नागपूर येथील शहर बस वाहतूक महानगरपालिकेने चालवावी अशी शासनाची व राज्य परिवहन महामंडळाची इच्छा होती. ही जबाबदारी महानगरपालिकेची आहे. ही बससेवा बंद करु अशी धमकी देखील त्या काळातील माननीय मंत्री महोदयांनी दिली होती. आता ही बस वाहतूक नागपूर महानगरपालिका चालवित आहे. नागपूर महानगरपालिकेने शहर बस वाहतुकीकरिता जे प्लॉटस दिले होते ते देखील परत केले पाहिजे. परंतु ते प्लॉटस परत देण्यास तयार नाहीत. ज्या रुट वर शहर एसटी वाहतूक सुरु आहे त्याच रुटवर एसटीची बसवाहतूक सुरु आहे. आपण त्यांनाही चालवू देत नाही. हे बरोबर नाही. आपल्याला ही सेवा चालवायची आहे काय ? असे असल्यास महानगरपालिकेची सेवा बंद करा आणि आपण सुरु करा. आपले जे दुहेरी काम सुरु आहे याच्यामुळे लोकांचा गोंधळ होत आहे, त्यांना त्रास होत आहे. या संदर्भात निर्णय घेण्याकरिता मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना पत्र पाठविले होते. याच्याबाबत कोणी प्रॅक्टीकल विचार करीत नाही. एक मंत्री एक भूमिका मांडतात तर दुसरे मंत्री दुसरी भूमिका मांडतात. या 400 बसेस त्यांनी कोठे ठेवायच्या ? महानगरपालिकेने जागा दिली, आपण ती हडपून घेतली. तेव्हा नागपूर बस वाहतूक जर महानगरपालिकेला चालवायची असेल तर जी जागा शहर वाहतूक चालविण्याकरिता महानगरपालिकेने दिलेली आहे, ती जागा पुन्हा महानगरपालिकेला देणार काय ? तसेच यासंबंधी अधिवेशन संपल्यानंतर 8 दिवसांच्या आत माननीय मुख्यमंत्री व इतर अधिकारी मिळून एक बैठक घ्या. या बैठकीस तेथील महापौर, नागरपूरमधील माननीय आमदार व मला देखील बोलवा व या समस्येमधून काहीतरी मार्ग काढा. नागपूरमधील जनतेचे हाल होत आहेत.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, ही जी बैठक आहे ती या ठिकाणी घेण्यापेक्षा नागपूरला मी स्वत: येतो. आपण नागपूरला बैठक घेऊ. महापालिकेचे तसेच एस.टी.महामंडळाचे जे अधिकारी आहेत तेही असतील. त्या ठिकाणी काय करता येईल, कोणती जागा कोणाची आहे ही सर्व परिस्थिती पाहून त्याच ठिकाणी आपण निर्णय घेऊ.

श्री. नितीन गडकरी : ही बैठक केव्हा घेणार ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, 8 दिवसात निश्चित करु. 8 दिवसात बैठक घेऊ.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आरे कॉलनी येथील सरकारी रुग्णालयाचे खाजगीकरण करण्याच्या शासनाच्या निर्णयामुळे रहिवाशांसाठी असलेली सुविधा संपुष्टात येण्याची निर्माण झालेली परिस्थिती

**मु. शी.** : आरे कॉलनी येथील सरकारी रुग्णालयाचे खाजगीकरण करण्याच्या शासनाच्या निर्णयामुळे रहिवाशांसाठी असलेली सुविधा संपुष्टात येण्याची निर्माण झालेली परिस्थिती याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. अनिस अहमद ( दुग्धविकास मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण यांनी " आरे कॉलनी येथील सरकारी रुग्णालयाचे खाजगीकरण करण्याच्या शासनाच्या निर्णयामुळे रहिवाशांसाठी असलेली सुविधा संपुष्टात येण्याची निर्माण झालेली परिस्थिती " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आरे कॉलनीमधील हे हॉस्पिटल आदिवासींकरिता आहे. हे हॉस्पिटल खाजगी माणसाला देऊ नये अशी तेथील जनतेची भावना आहे. हे हॉस्पिटल चांगले करुन, त्याला खात्याकडून निधी उपलब्ध करुन कोणत्याही प्रकारे ते हॉस्पिटल खाजगी माणसाला न देता त्या ठिकाणच्या आदिवासींच्या वैद्यकीय सुविधाची काळजी शासन घेणार आहे काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, आरे कॉलोनी में बहुत सारे गरीब एवम् आदिवासी समुदाय के लोग रहते हैं. वहां एक शासकीय अस्पताल है जो 1970 में शुरु हुआ था, वह फिलहाल बंद है. इस अस्पताल की बिल्डिंग की हालत बहुत खराब है. अगर यह अस्पताल शुरु करना हो तो प्राईवेट लोगों को शामिल करके और यह करते समय उनको यह कहा जा सकता है कि आदिवासी और गरीब लोगों का इलाज फ्री में करना होगा. तो इस प्रकार से संयुक्त रुप से प्रोग्राम बना सकते हैं. मगर सरकार के द्वारा चलाना हो तो काम कब शुरु होगा, डॉक्टर नहीं है, अस्पताल की बिल्डिंग खराब हो गई है इसलिए नई बिल्डिंग बनानी पड़ेगी, इन्फ्रास्ट्रक्चर नया खरीदना पड़ेगा और इन सब चीज़ों को करने के लिए काफी पैसा लगेगा. आज की स्थिति में यह अस्पताल बंद पड़ा है. वहां कोई सुविधा नहीं है. अगर शासन के द्वारा ही करना हो तो सब कुछ नये सिरे से ही करना पड़ेगा.

-----

**नियम 93 चे निवेदन क्रमांक 3 नंतर घेण्याबाबत**

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : नियम 93 चे निवेदन क्रमांक 3 नंतर घेण्यात यावे अशी मी विनंती करतो.

**उपसभापती** : ठीक आहे. निवेदन क्रमांक 3 नंतर घेण्यात येईल.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG

**पृ. शी.** : रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील लोकांची कुवेत येथे नोकरी देण्याचे आमिष दाखवून केलेली फसवणूक

**मु. शी.** : रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील लोकांची कुवेत येथे नोकरी देण्याचे आमिष दाखवून केलेली फसवणूक याबाबत श्री. जयंत प्र. पाटील व प्रा. शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील व प्रा.शरद पाटील यांनी "रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील लोकांची कुवेत येथे नोकरी देण्याचे आमिष दाखवून केलेली फसवणूक" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील गरीब व गरजू बेरोजगारांना परदेशी पाठवून त्या ठिकाणी त्यांची फसवणूक झाली. त्याची तक्रार त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये केली. त्यांची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये घेत नव्हते. मी तेथील आमदार म्हणून पत्र दिल्यानंतर त्यांनी तक्रार नोंदवून घेतली. तक्रार घेतल्यानंतर 21 दिवसांनी त्यांना अटक केलेली आहे. ज्या पोलिसांनी दिरंगाई केली त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हे एकाच गावातील लोक आहेत. त्यांना बाहेरच्या देशात नोकरीला लावतो म्हणून पाठवून दिले. यामध्ये जी महिला होती तिचे पती व भाऊ कुवेतला राहात होते. गावातील लोक हे प्रकरण मिटविण्यासाठी तंटामुक्त समितीकडे गेले होते. तो तंटा मिटला नव्हता त्यामुळे त्यांना अटक करण्यास उशीर झालेला आहे. यामध्ये कारवाईचा प्रश्न नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी स्वत: त्या ठिकाणी गेलो होतो. मी तक्रार करण्यास सांगितली. पोलिसांनी तक्रार घेण्यास टाळाटाळ केली. मी आमदार म्हणून पत्र दिले. मी पोलीस अधीक्षकांना सांगितले. त्या लोकांनी आपले दागिने आणि जमिनी विकून ते परदेशात गेले. मी कुवेतला आमच्या माहितीतल्या लोकांना फोन केला आणि त्यांना सोडवून आणलेले आहे. पोलीस त्यांना पाठीशी घालत आहेत. या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून शासन काळजी घेणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, याबाबत निश्चितपणे काळजी घेण्यात येईल.

-----

....6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अमरावती जिल्ह्यात 2007 मधील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने डागडुजीच्या व अन्य कामांकडे झालेले दुर्लक्ष

**मु. शी.** : अमरावती जिल्ह्यात 2007 मधील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने डागडुजीच्या व अन्य कामांकडे झालेले दुर्लक्ष याबाबत सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. पतंगराव कदम ( पुनर्वसन व मदतकार्य मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे यांनी "अमरावती जिल्ह्यात 2007 मधील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने डागडुजीच्या व अन्य कामांकडे झालेले दुर्लक्ष " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जून व जुलै महिन्यामध्ये अमरावती जिल्हयात अतिवृष्टी झाली. 14 तालुक्यातील 1 हजार गावातील 60 हजार कुटुंबांचे नुकसान झालेले आहे आणि 67 व्यक्ती मरण पावल्या आहेत, 800-850 जनावरे मेली आहेत. सर्वात जास्त अचलपूर तालुक्याचे नुकसान झालेले आहे. शासनाने 10 कोटी रुपये निधी दिल्याचे उत्तरात नमूद केले आहे. या निधीचे वाटप कशाप्रकारे करण्यात आले ? ज्या तालुक्यामध्ये जास्त नुकसान झालेले आहे त्या तालुक्याला कमी निधी दिला आहे आणि ज्या तालुक्यात कमी नुकसान झाले त्या तालुक्याला जास्त निधीचे वाटप केले आहे. हे वाटप मुंबईतून करण्यात आले काय आणि 10 कोटी रुपये कोणत्या कामावर खर्च झाले व 10 कोटी रुपये अमरावती जिल्हयासाठी केव्हा देण्यात आले ?

डॉ.पतंगराव कदम : मुंबईहून कोणत्याही निधीचे वाटप जिल्हानिहाय वाटले जात नाही. जिल्हाधिकारी त्या त्याठिकाणच्या नुकसानीचा विचार करुन अहवाल तयार करतात. त्याप्रमाणे अचलपूर तालुक्याला 54 लाख, धारणी 48 लाख, दर्यापूर 75 लाख, तिवसा 40 लाख, वरुड 30 लाख, चांदूर बाजार 105 लाख, चिखलदरा 57 लाख, अंजनगाव 85 लाख, चांदूर रेल्वे 35 लाख आणि भातुकली तालुक्याला 59 लाख रुपयांचे वाटप केले आहे. या निधीचे वाटप जिल्हाधिका-यांकडून केले जाते. त्यांच्याकडून कोणत्या तालुक्यामध्ये किती नुकसान झाले आहे त्याबाबतचा अहवाल शासनाकडे येतो आणि त्याप्रमाणे त्यांच्याकडून मागणी आल्यावर निधी दिलेला आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी पूरामुळे झालेल्या नुकसानीची माहिती दिलेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे सर्वात जास्त नुकसान अचलपूर आणि चांदूर बाजार या तालुक्यांमध्ये झालेले आहे. त्याठिकाणची जमीन गाळाची असल्यामुळे प्रचंड नुकसान झालेले आहे. त्याठिकाणचा गाळ काढणे हा सर्वोत्तम उपाय आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात दिनांक 11.7.2007 रोजी बैठक घेतली होती त्याचे कार्यवृत्त माझ्याकडे आहे. त्या बैठकीत त्यांनी मार्गदर्शन केले आणि असे स्पष्टपणे म्हटले होते की, "नदी पात्रातील गाळ काढण्याचे काम मनुष्यबळ उपलब्ध नसल्यास यंत्रसामुग्रीच्या साहाय्याने करावे." सन्माननीय

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

मंत्रिमहोदय डॉ.पतंगराव कदम यांनी देखील सभागृहामध्ये असेच सांगितले होते. त्यांचे जसेच्या तसे शब्द मी वाचतो. त्यांनी असे म्हटले होते की, "अमरावती जिल्हयासाठी ताबडतोबीने पावसाळा उलटल्यानंतर नद्यांमधील गाळ काढण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या 5 कोटी रुपयांमधून कामे करुन घेण्याबाबत जिल्हाधिका-यांना सूचना देण्यात येतील." त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी पुन्हा दिनांक 26.11.2007 रोजी बैठक घेऊन त्या बैठकीत निदेश दिले आहेत. त्यावेळी त्यांनी असे म्हटले होते की, "प्रत्यक्ष सर्वे करुन नदी व नाल्याच्या काठावरील जमिनीचे नुकसान पाहून बेशरम व गाळ काढण्यासाठी जेसीबी लावण्याची आवश्यकता वाटल्यास त्याचा अंतर्भाव करुन वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक तयार करावे." परंतु आजपर्यंत मंत्रिमहोदयांनी या कामासाठी पैसा उपलब्ध करुन दिलेला नाही. आता पावसाळा जवळ येऊन ठेपलेला आहे त्यामुळे पुन्हा तसेच नुकसान होईल. तेच तेच नुकसान दरवर्षी होणे बरोबर आहे काय ? कास्तकार आपल्या बाजूचा गाळ उपसतील, ते संपूर्ण नदीचा गाळ उपसणार नाहीत. तेव्हा 8 दिवसामध्ये गाळ काढण्याची व्यवस्था करण्यात येईल काय आणि जेसीबीसाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल काय ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता सन्माननीय बी.टी.देशमुख यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याच उद्देशाने मी प्रश्न विचारला होता. परंतु माझ्या प्रश्नाला मघाशी उत्तर देण्यात आले नाही. त्याठिकाणी पूर आला, अतिवृष्टी झाली, माणसे वाहून गेली आहेत. त्यानंतर माननीय उपमुख्यमंत्र्यांचा दौरा झाला. मी स्वत: 2-3 दिवस दौ-यावर होतो. अचलपूर तालुक्यामध्ये प्रचंड नुकसान झाल्यामुळे 54 लाख रुपये दिले आहेत, हे खरे आहे, पण तेथील गाळ किती दिवसात काढला जाणार आहे ? 10 कोटी रुपयांमध्ये कोणती कामे केली आहेत ?

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी तालुक्यांना किती निधी दिला असा स्पेसिफिक प्रश्न विचारला होता. त्या निधीचे वाटप मी सांगितले. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख म्हणाले ते बरोबर आहे. त्या ठिकाणी पहिल्यांदा 5 कोटी दिल्यानंतर 10 कोटी दिले. ताबडतोब जेसीबी पाठवून गाळ काढण्याच्या सूचना कलेक्टरांना दिल्या होत्या. नदीपात्रातील आणि इतर गाळ काढण्याचे काम जलसंपदा विभागालाही सूचविले होते. त्याठिकाणी मी तसेच माननीय मुख्यमंत्री देखील येऊन गेले होते. महाराष्ट्रामध्ये अमरावती जिल्हयामध्ये जास्त खराबी झालेली होती.

श्री. पांडुरंग फुंडकर : जून-जुलै महिन्यामध्ये पूर आल्यानंतर कोणकोणत्या कामावर पैसे खर्च करण्यात आले ? 10 कोटी पैकी कोणकोणत्या कामावर कोठे आणि किती खर्च झाला या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले नाही. ते उत्तर कृपया त्यांनी द्यावे.

डॉ. पतंगराव कदम : हा पैसा खर्च करण्याची जबाबदारी जिल्हास्तरावर कलेक्टरना दिली होती. निधी प्राप्त करण्याची आमची जबाबदारी होती ती आम्ही पार पाडली.

प्रा. बी.टी. देशमुख : हा गाळ उपसण्याचे काम किती दिवसात पूर्ण केले जाईल ?

डॉ. पतंगराव कदम : जेसीबी पाठवून गाळ काढून घ्या अशा सूचना जिल्हाधिका-यांना आपण दिलेल्या होत्या. गाळ काढला का यासंबंधी कलेक्टरकडून माहिती घेऊन निर्णय घेतला जाईल.

प्रा. बी.टी.देखमुख : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर निषेधार्ह आहे. आपण कोट्यवधी रुपयाची मदत देता, जेसीबी उपलब्ध करुन देता. 6 महिन्यापूर्वी मी हा प्रश्न विचारलेला होता आणि आता तीन महिन्यानंतर पाऊस सुरु होईल. तेथील गाळ काढलेला नसल्यामुळे पुन्हा पूर्वी सारखीच परिस्थिती निर्माण होईल. तेवहा आपण दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी किती दिवसात करणार ?

श्री. पांडुरंग फुंडकर : हा संपूर्ण गाळ किती दिवसात काढणार ?

प्रा. बी.टी. देशमुख : माननीय मंत्री महोदय नुसती मान हलवित आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : कलेक्टरला तातडीने सूचना देण्यात येतील. पहिल्यांदा गाळ काढण्याच्या सूचना देऊन सुध्दा गाळ का काढला नाही याचे एक्स्प्लनेशन मागितले जाईल आणि ती कारवाई 1 महिन्याच्या आत पूर्ण करा अशा सूचना देण्यात येतील.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भारतीय चित्रपटाच्या अनधिकृत प्रतीची खुलेआम होत असलेली विक्री

**मु. शी.** : : भारतीय चित्रपटाच्या अनधिकृत प्रतीची खुलेआम होत असलेली विक्री याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे व मधुकर चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे व मधुकर चव्हाण यांनी "भारतीय चित्रपटाच्या अनधिकृत प्रतीची खुलेआम होत असलेली विक्री" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : हा अतिशय गंभीर विषय आहे. हिंदी चित्रपटाच्या पायरटेड व्ही.सी.डी. बनविल्या जात आहेत. 16 हजार कोटीची ही इंडस्ट्री आहे. यामुळे फिल्म इंडस्ट्रीजचे कोटयवधी रुपयांचे नुकसान होत आहे. मद्रासच्या रियल इमेज या कंपनीने जोधा अकबर, तारे जमींपर, ओम शांती ओम अशा प्रकारच्या अनेक हिंदी चित्रपटांच्या अनधिकृत व्ही.सी.डी. बनविल्या आहेत. फिक्कीने असे सांगितलेले आहे की फिल्म इंडस्ट्रीजचे साडेतीन हजार कोटीचे नुकसान झालेले आहे. अशा प्रकारे पायरेटेड व्हि.सी.डी. करणा-यांवर अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येईल असे माननीय गृहमंत्र्यांनी सांगितलेले आहे. तेव्हा अशा प्रकारे अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यासंबंधी अध्यादेश का काढला नाही ? मद्रास मधील रियल इमेज कंपनीचे जे डिजिटल स्टोर आहे त्यामध्ये कोडनंबर जुळलेला आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम 15:35

श्री. नितीन गडकरी....

पोलीस विभागाने यासंदर्भात रिपोर्ट दिलेला आहे. या कंपनीने दीड हजार कोटी रुपयांची फसवणूक केली आहे. एवढी मोठी फसवणूक करुन देखील या कंपनीच्या संचालकांना अद्याप अटक का करण्यात आली नाही ? त्या कंपनीच्या संचालकांवर एवढी मेहरबानी करण्याची कारणे काय आहेत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, व्हिडीओ पायरसी करणा-यांना एम.पी.डी.कायद्याखाली कारवाई करण्यासंबंधीचे विधेयक आणावयाचे आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत विधेयकाचा मसुदा मंजूर करण्यात आला आहे. परंतु अशा प्रकारचा कायदा तयार करण्यासाठी केंद्र शासनाची परवानगी लागते. सदर विधेयक विधिमंडळात मांडण्यासाठी माननीय राष्ट्रपतीं महोदयांच्या संमतीसाठी केंद्र शासनाच्या प्रशासकीय विभागाची मान्यता मिळणे आवश्यक असल्यामुळे तसा प्रस्ताव दिनांक 25.10.07 रोजी सादर केला आहे...

श्री. नितीन गडकरी : मला केंद्र शासनाबद्दलची माहिती देऊ नका. मी या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांना एका मार्काचा एक प्रश्न विचारतो. मद्रास येथील रियल इमेज कंपनी आहे त्या कंपनीचा डिजिटल स्टुडिओ आहे. त्याला कोड नंबर दिला आहे. जगात सगळया ठिकाणी मी मघाशी सांगितलेल्या चित्रपटाच्या व्ही.सी.डी.मिळाल्या आहेत. त्यासंदर्भात फिल्म प्रोडयुसरचे बयान घेतले गेले आहेत. श्री. सुभाष घई पासून अनेक प्रोडयुसरचे बयान माझ्याकडे उपलब्ध आहेत. या प्रकरणाची पूर्णपणे कागदपत्रे माझ्याकडे उपलब्ध आहेत. फिक्कीने सांगितले आहे की, या प्रकरणी 3.50 हजार कोटी रुपयांचा घोटाळा झालेला आहे. आज 16 लाख माणसे फिल्म इंडस्ट्रीजमध्ये काम करीत आहे. ही सर्व माणसे रस्त्यावर आली आहेत. चित्रपटगृहे बंद पडत आहेत. बनावट सी.डी.,व्ही.सी.डी.चा सर्रास वापर सुरु आहे. मद्रासच्या या कंपनीच्या डिजिटल स्टुडिओच्या कोडनंबर वरुन दिसून आले आहे या सगळया सी.डी. आणि व्ही.सी.डी. खोटया तयार करण्यात आलेल्या आहेत. ही गोष्ट तुमच्या पोलिसांसमोर सिध्द झालेले आहे. गैरप्रकारे व्यवसाय करणा-या व्यक्तींना अटक करण्यासाठी माननीय राष्ट्रपतींच्या मान्यतेची गरज नाही. यासंदर्भात एम.पी.डी.कायदा आणणार आहात तो आणा, त्यास आमची हरकत नाही. ही कंपनी गुन्हेगार आहे. ही कंपनी गुन्हेगार आहे अशा प्रकारचा रिपोर्ट पोलीस विभागाकडून तुम्हाला प्राप्त झाला आहे काय ? सदर रिपोर्ट प्राप्त झाला असेल तर त्या कंपनीच्या संचालकास, मालकास क्रिमीनल

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रोसीजर कोडप्रमाणे आजच्या वर्तमान कायद्याप्रमाणे अटक का केली नाही ? त्यांना अटक न करण्यामागचे रहस्य काय आहे ? सदर कंपनीच्या संचालक आणि मालकांना अटक का केली जात नाही ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी तेच उत्तर सांगणार होतो. परंतु आपण एम.पी.डी.च्या अनुषंगाने माहिती विचारली होती, म्हणून प्रथम ती माहिती देण्यास मी सुरुवात केली होती. या संदर्भात पोलिसांकडे तक्रार आलेली नाही. यासंदर्भात वृत्तपत्रात बातमी आली होती त्या अनुषंगाने पोलिसांनी सु-मोटो कारवाई केली आहे. यासंदर्भात 17 प्रोडयुसरांना पत्रे लिहिण्यात आली आहेत. ज्या कंपनीमध्ये व्ही.डी.ओ.पायरसी होते, ज्या कंपनीकडून प्रिंट निघते, त्या प्रिंटमध्ये कंपनीचे एक वॉटर मॉर्क असते. या क्षेत्रातील तज्ज्ञ ही गोष्ट ओळखू शकतात. रियल इमेज या कंपनीकडे जी प्रिंट गेली होती, त्या कंपनीने 700 ते 800 थिएटरमध्ये ते चित्रपट प्रसारीत केले. व्ही.डी.ओ.पायरसीचे काम रियल इमेज कंपनीकडून झाले आहे असे सिध्द झाले आहे. यासंदर्भात कोणाचीही तक्रार पोलीस स्टेशनमध्ये प्राप्त झालेली नाही.

श्री. नितीन गडकरी : तक्रार नाही असे कसे होईल ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : वृत्तपत्रात ही बातमी आली होती आणि त्या अनुषंगाने पोलिसांनी सु-मोटो कारवाई केली आहे. व्ही.डी.ओ. पायरसीमुळे चित्रपट व्यवसायाचे आणि शासनाच्या महसुलाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे ही गोष्ट खरी आहे आणि म्हणून रिअर इमेज कंपनीचे कार्यालय सील करण्यात येईल आणि संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : मी पोलीस अधिका-यांचे अभिनंदन करतो. समाजसेवा खात्याचे अधिकारी आहेत त्यांचे मी जाहीरपणे अभिनंदन करतो. त्यांनी सु-मोटो अतिशय चांगला तपास केला आहे. त्यांनी त्या कंपनीचा कोड नंबर शोधून काढला. या रियल इमेज कंपनीने बनावट सी.डी.आणि डी.व्ही.डी. सगळया जगात पाठविल्या. आणि हे प्रकरण पोलिसांनी शोधून काढले. त्यामुळे मी तुमच्या अधिका-यांचे अभिनंदन करतो. परंतु या प्रकरणाच्या फाईलवर तुम्ही बसला आहात. आज या ठिकाणी सांगता आहात की, त्या कंपनीचे कार्यालय सील करु.

श्री. नारायण राणे : मंत्री फाईलवर बसले आहेत असे बोलणे योग्य नाही..

3...


ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम 15:35

श्री. नितीन गडकरी : मी या ठिकाणी अतिशय जबाबदारीने बोलतो आहे. मला जास्त खोलात बोलावयास लावू नका. मी आतापर्यंत खूप आदराने बोललो आहे. माझ्याकडे या प्रकरणाचे सर्व पुरावे आहेत. मी खूप सांभाळून बोलत आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ 15:40

श्री. नितीन गडकरी....

सभापती महोदय, पोलीस त्यांच्याकडे अटकेसाठी गेले होते परंतु मंत्र्यांच्या आदेशाने ही कारवाई थांबलेली आहे. कोण मंत्री आहेत याची पोलिसांना माहिती आहे. आजपर्यंत हजारो कोटी रुपयांचा चुना लावून ही मद्रासची कंपनी मुंबईच्या फिल्म इंडस्ट्रीजला लुटते आहे. परंतु या कंपनीवर कोणत्याही प्रकारची कारवाई आजपर्यंत झालेली नाही. कंपनीचे ऑफीस सील करण्याची कारवाई करण्याचे मंत्रीमहोदयांनी सांगितले. राज्य शासनाचा कायदा होईल त्याचा संबंध या केसशी येत नाही. तो कधीच होणार नाही कारण लॉबी जोरात आहे. मंत्रीमहोदयांनी कबूल केले की या कंपनीच्या ऑफीसला सील लावले जाईल. हा गुन्हा करणारी जी माणसे आहेत त्यांच्यावर क्रिमिनल प्रोसिजर कोडखाली नॉन बेलेबल ऑफेन्स रजिस्टर करुन ऑफीस सील केल्यानंतर त्यांना अटक करुन आणि त्यांची मालमत्ता जप्त करुन कठोर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, प्रचलित कायद्यानुसार म्हणजे कॉपी राईट कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. त्यानंतर तपासामध्ये जे जे आढळून येईल त्याप्रमाणे आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. पोलिसांनी चांगले काम केल्याबद्दल सन्माननीय सदस्यांनी पोलिसांचे अभिनंदन केले आहे.

------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विदर्भातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देणे

**मु. शी.** : विदर्भातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. अशोक चव्हाण : ( उद्योग मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे यांनी विदर्भातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--

... ...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, उद्योगमंत्री मराठवाडा, विदर्भ आणि कोकणावर अन्याय करीत आहेत. महसूल मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की तुमच्या जिव्हाळयाचा विषय आहे. तुमच्याकडे आर्यन ओर आहे. व्हॅल्यू ॲडीशनचे प्रोजेक्ट सिंधुदूर्ग जिल्हयात नाहीत. ते सगळे समुद्रातून दुसऱ्या राज्यात चालले आहेत आणि टॅक्स मिळविते आहे तिसरे राज्य. गडचिरोली जिल्हयामध्ये सिमेंटच्या चुनखडया आहेत त्या चालल्या दुसऱ्या राज्यात. लोखंड चालले तिसरीकडे. उद्योग खात्याने लीज देण्यासाठी टेंडर काढले. आमच्या विदर्भाची खनिज संपत्ती 80 टक्के आहे ती लूट करुन महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील सगळया लोकांना शासन देऊ लागले आहे. या उठा विदर्भातील खनिज संपत्ती न्या. आम्हांला खोदाईचे काम सुध्दा नाही. आमच्या इथे स्टील आणि लोखंड तयार होणार नाही. आमच्या मुलांना रोजगार मिळणार नाही. हा आमच्यावर अन्याय आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, ज्या ठिकाणी जी खनिज संपत्ती असेल तिच्या आधारावर व्हॅल्यू ॲडीशन उद्योग त्याच जिल्हयात सुरु झाला पाहिजे. ही भूमिका झारखंड आणि छत्तीसगड सरकारने घेतली. म्हणून ही भूमिका महाराष्ट्र सरकार मागासलेल्या भागाकरिता घेणार आहे काय आणि लीज देण्याचे जे टेंडर्स काढलेले आहेत आणि मोठमोठया कंपन्या ते घेऊन चालले आहेत ते थांबविणार काय ? विदर्भ, मराठवाडा विभागातील बेरोजगारांना काम मिळेल तेथे उद्योग येतील असे धोरण शासन स्वीकारणार काय ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांनी ज्याचा उल्लेख केला ती वस्तुस्थिती नाही. गडकरी साहेबांचे असे असते की काहीही बोलायचे तरी रेटून बोलायचे असे चालले आहे. वस्तुस्थिती याठिकाणी स्पष्ट केली पाहिजे. सभापती महोदय, आज विदर्भामध्ये जे काही उद्योजकांना माईन्स दिलेल्या आहेत त्याच्यामध्ये गुजरात अंबुजा, अल्ट्राटेक सिमेंट, माणिकगढ, असीसी, गोपानी आयर्न, ग्रेस इंडस्ट्रीज, सनफ्लॅग आयर्न, इस्पात, गुप्ता मेटॅलीक्स, सुमन मेटॅलिक्स अशी काही नांवे मी आपल्यासमोर वाचून दाखविली आहेत. प्रत्येकाची येथे मोठी गुंतवणूक आहे आणि स्थानिक रोजगार किती लोकांना दिला याची आकडेवारी माझ्याकडे आहे. मी पटलावर माहिती ठेवीन. ज्यांना लीज देण्यात आली आणि प्रस्तावित उद्योग आहेत ज्यांची प्रक्रिया सुरु आहे त्यामध्ये मुरली इंडस्टीज, धारिवाल सिमेंट , वर्धा पॉवर, केपीसीएल या कंपन्या आहेत. दुसरा विषय असा आहे की, मायनिंगसाठी लीज देण्याचे अधिकार हे राज्य शासनाने फक्त रेकमंडेशन करण्यापुरते आहेत. राज्यामध्ये मायनिंगच्या संदर्भात नोटिफिकेशन काढतो

....नंतर भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-8......... श्री.अशोक चव्हाण.....

प्रेस नोटच्या माध्यमातून अर्ज मागविले जातात, सुनावणी घेऊन रिकमेंडेशन केले जाते. अंतिम निर्णय हा केंद्र सरकारकडून घेतला जातो. एम.एम.डी.आर. हा कायदा केंद्र सरकारचा आहे. त्यामुळे लिज प्रदान करीत असताना अंतिम मंजुरी केंद्र शासन देत असते. यामध्ये अमूक भागातील खनिज दुस-या राज्यात किंवा दुसऱ्या भागात जाऊ नये अशी भूमिका कायदेशीररित्या घेता येत नाही. मघाशी सन्माननीय सदस्यांनी झारखंड, ओरिसा आणि छत्तीसगढ राज्याचा उल्लेख केला. मी स्वत: अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली आहे. सन्माननीय सदस्यांकडे जर काही वेगळी माहिती असेल तर ती त्यांनी जरुर द्यावी. परंतु मला आमच्या अधिकाऱ्यांकडून माहिती प्राप्त झाली त्यानुसार अशा प्रकारचे कोणतेही लिखित धोरण अन्य राज्यांनी स्वीकारलेले नाही. अलिखित धोरण असू शकेल. राज्यातील खनिज संपत्तीचा विनियोग झाला पाहिजे, त्याठिकाणी कारखाने आले पाहिजेत, गुंतवणूक झाली पाहिजे अशा प्रकारची अपेक्षा आहे आणि आपण तेच करीत आहोत. परंतु लिखित स्वरुपाचे बंधन घालता येत नाही. उदाहरण द्यायचे झाले तर आज लोह खनिजचा महाराष्ट्रातील साठा 300 दशलक्ष टन आहे. ओरिसा राज्यात 4 हजार दशलक्ष टन आहे. झारखंड राज्यात 5 हजार दशलक्ष टन आहे आणि छत्तीसगढ राज्यात 3500 दशलक्ष टनापेक्षा जास्त आहे. कोळसा हा महाराष्ट्रामध्ये 1000 दशलक्ष टन आहे. ओरिसा राज्यात 65 हजार दशलक्ष टन आहे. झारखंडमध्ये 40 हजार दशलक्ष टन आहे आणि छत्तीसगढ राज्यात 35 हजार दशलक्ष टनापेक्षा जास्त आहे. हा निर्णय आपण लिखित स्वरुपात घेतला. येथील खनिज बाहेर न्यायचे नाही. आज आपल्या राज्यातील कारखान्यांना स्पाँज आयर्न मिळत नाही. अन्य राज्यातून आपल्याकडे आणले जाते. ओरिसा, छत्तीसगढ, झारखंडमधून आणले जाते. महाराष्ट्रातील मोठ्या प्लँटची गरज आहे. कोळसा किंवा आयर्न ओर अन्य राज्यातून घेतले जाते. केंद्र शासनाकडून कोल बॉक्स मंजूर झाले. केंद्र शासनाने दोन कोळशाच्या खाणी मंजूर केल्या. त्या खाणी अन्य राज्यातून कोळसा आणण्याकरिता मंजूर केल्या आहेत. त्यामुळे अशा प्रकारचे बंधन आणणे ही अशक्य गोष्ट आहे. सर्वसाधारणपणे भूमिका हीच आहे की, राज्यातील खनिज उत्पादन आहे त्याचा विनियोग, त्याचे व्हॅल्यू ॲडिशन महाराष्ट्रात झाले पाहिजे हीच राज्याची सर्वसाधारण निश्चित भूमिका आहे. हा विचार डोळयासमोर ठेवूनच निर्णय घेतला जातो.

..2..

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, कोळशाबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. त्याबद्दल बंधन टाकता येणार नाही. परंतु चुनखडीचा वाहतूक खर्च जास्त असल्यामुळे त्याच ठिकाणी उद्योग टाकावा लागतो. मॅंगनिज, लोह आणि बॉक्साईट ही महत्वाची खनिजे आहेत. श्री.लक्ष्मीनारायण मित्तल हे जगातील प्रसिध्द उद्योगपती आहेत. त्यांच्याशी ओरिसा राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी करार केला आणि सांगितले की, तुम्हाला आयर्न ओर पाहिजे असेल तर ओरिसा राज्यातच तुम्ही उद्योग टाकावा. तेव्हाच परवानगी दिली गेली. ते पहिल्यांदा झारखंडला गेले होते. माझ्या एका मित्राला इंडस्ट्री सुरु करावयाची होती म्हणून मी छत्तीसगढ राज्याचे मुख्यमंत्री श्री.रमणसिंग यांच्याशी फोनवरुन बोललो. ते म्हणाले की, "गडकरीजी, हम माइनिंग मिल दे सकते हैं, पर इसकी इन्डस्ट्री भी यहीं पर होनी चाहिए." गडचिरोली हा राज्यातील सगळ्यात मागासलेला जिल्हा आहे. खनिज संपत्तीच्या बाबतीत गडचिरोली हा महाराष्ट्रातील श्रीमंत जिल्हा आहे. सन्माननीय मंत्री श्री.धर्मरावबाबा आत्राम याठिकाणी बसले आहेत. त्याठिकाणी आजही लोक मीठाऐवजी लाल मुंग्यांचा कुटून वापर करतात ही वस्तुस्थिती आहे. बेरोजगारीमुळे नक्षलवाद वाढत आहे. रस्त्यांचे जाळे मर्यादित झाले आहे. रेड कार्पेट एरिया म्हणून लाल राज्य निर्माण करण्याचा प्लॅन सुरु आहे. तरुणवर्ग नक्षलवादी सैन्यामध्ये भरती होत आहे. लोखंडाची खनिज संपत्ती आहे. त्यावर आधारित व्हॅल्यू ॲडिशन उद्योग गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्हयात आले तर लोकांना रोजगार मिळू शकेल, ट्रान्सपोर्टची कामे मिळतील. या जिल्हयांमध्ये प्रचंड खनिज साठा आहे. कोकण, विदर्भ हा मागासलेला भाग आहे. याठिकाणी खनिज संपत्तीच्या आधारावरील उद्योग सुरु करता येतील. मी स्वत: महाराष्ट्राच्या खनिज संपत्ती समितीचा अध्यक्ष होतो. सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे हे राज्याचे मुख्यमंत्री असताना मी राज्य शासनाला अहवाल सादर केला होता. राज्याने त्या अहवालाची अंमलबजावणी केली आहे. त्या अहवालात म्हटले होते की, पहिल्यांदा त्या जिल्हयात उद्योग सुरु झाले पाहिजेत. माझी तीन मुद्याबाबत शासनाला विनंती आहे. विशेषत: मॅंगेनिज, लोह आणि बॉक्साईट या खनिजावर आधारित उद्योग सुरु झाले तर............

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

त्यामुळे तुम्हाला टॅक्स मिळेल आणि त्या भागाचा विकास देखील होईल जे उद्योग त्या जिल्हयात आपला उद्योग उभारतील त्यांना लिज देतांना आम्ही प्राधान्याने शिफारस करु असे जर आपण सांगितले तर त्यांना प्रोत्साहन दिले मिळेल. गडचिरोली जिल्हयात जर लोह असेल आणि उद्योग तेथे आला तर त्या उद्योगला लिज देतांना प्राधान्य दिले जाईल असें सांगितले तर गडचिरोली जिल्हयात चार उद्योग येऊ शकतील. गडचिरोली जिल्हा नो इंडस्ट्रीज जिल्हा आहे. गडचिरोली मध्ये तरुण मुले नक्षलवादी चळवळीत मोठया प्रमाणात जात आहेत अशी परिस्थिती आहे अशामुळे विकासाचा समतोल राखला जाणार नाही त्यामुळे त्या जिल्हयात जे उद्योग टाकतील त्यांना आम्ही प्राधान्य देऊ असे धोरण कमीतकमी शासनाने स्वीकारावे तसेच दुसरा मुद्दा असा आहे की, ओरिसा, झारखंड आणि छत्तीसगढ या राज्यामध्ये जर अशा प्रकारचे धोरण अवलंबवले जात असेल तर आपल्या येथे अशा प्रकारचे धोरण अवलंबविली जाण्याची आवश्यकता आहे. जुन्या उद्योगासाठी नाही परंतु नवीन उद्योग येत असतांना इतर राज्यांनी जे धोरण अवलंबविले आहे ते धोरण हे सरकार अवलंबेल याबाबतीत शासन काही विचार करणार आहे काय ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी अतिशय महत्वाच्या विषयावर आपले विचार व्यक्त केलेले आहेत. सन्माननीय सदस्यांच्या विचारासारखीच शासनाची सुध्दा भूमिका आहे. गडचिरोलीमध्ये उद्योग वाढले पाहिजेत ही शासनाची भूमिका आहे. सन 2008 मध्ये नवीन मिनरल पॉलिसी बाबत केंद्रशासनाचा ड्राफ्ट नुकताच मंजूर झालेला आहे. त्यामुळे मायनिंगच्या बाबत केंद्र शासनाचे धोरण बदलू लागले आहे. त्यामुळे नवीन मिनरल पॉलिसीच्या संदर्भात देखील बदल अपेक्षित आहे. यासंदर्भात मी पूर्ण माहिती घेतली नाही परंतु जी काही माहिती माझ्याकडे आहे त्यामध्ये माईन ऑक्शनिंगची पध्दती अपेक्षित आहे. ऑक्शन झाल्यावर ते काही महाराष्ट्रापुरते राहणार नसून ते ऑक्शन पूर्ण देशाचे होईल. त्यामुळे नवीन मिनरल पॉलिसीच्या अनुषंगाने कायद्यामध्ये अपेक्षित बदल झाल्यानंतर नेमकी काय परिस्थिती निर्माण होणार आहे हे आता सांगणे कठीण आहे परंतु सन्माननीय सदस्यांनी गडचिरोलीचा जो विषय मांडलेला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, गडचिरोली जिल्हयामध्ये 8 खनिज पट्टे मंजूर करण्यात आलेले असून प्रॉस्पेक्टींगसाठी 2 मंजूर करण्यात आलेले आहेत.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

ज्यांना लेटर ऑफ इंटेंट दिलेले आहे असे 9 प्रस्ताव केंद्रशासनाकडे विविध एनओसीसाठी पडून आहेत व 17 ठिकाणी सुनावणी बाकी आहे. यामध्ये 4 प्रकल्प मायनिंगचे असून 13 प्रॉस्पेक्टींगचे आहेत. त्यामुळे गडचिरोली जिल्हयात अधिकाधिक फोकस करण्याची गरज आहे हे शासनाला मान्य आहे . गडचिरोलीसारख्या भागात नक्षलवादी चळवळ मोठया प्रमाणात आहे. गडचिरोली आणि हिंगोली हे राज्यातील नो इंडस्ट्रीअल जिल्हे आहेत. दोन्ही जिल्हयांना पॅकेज स्किम ऑफ इन्सेंटिव्हच्या अंतर्गत वेगवेगळया सवलती देण्यात आलेल्या आहेत. गडचिरोलीची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन अधिक लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे हे आपले म्हणणे शासनाला मान्य आहे. आपण सांगितले आहे की, याबाबत इतर राज्यांनी जे धोरण स्वीकारले आहे ते धोरण लक्षात घेऊन आपल्याला त्या अनुषंगाने काही करता येणे शक्य आहे काय? परंतु या राज्याकडे अशा प्रकारचे कोणतेही धोरण लिखित स्वरुपात नाही परंतु हा विचार जरुर केला जातो आणि आपलीही तीच भूमिका आहे की, सर्वसाधारण एखादा खनिज पट्टा मंजूर करीत असतांना त्या जिल्हयातच त्याचा फायदा व्हावा अशी अपेक्षा निश्चित आहे. जेथे साठे कमी प्रमाणात आहेत म्हणजे् कोठे 20 हेक्टर, 10 हेक्टरच्या एरियात हे साठे असतील तर अशा ठिकाणी करता येणे शक्य नाही परंतु ज्या ठिकाणी मोठया प्रमाणात क्षेत्र उपलब्ध आहे त्या ठिकाणी निश्चितपणे आपल्याला करता येईल परंतु हे कायद्याच्या चौकटीत करतांना यामध्ये अडचणी आहेत. कायद्याच्या चौकटीत राहून हे करणे शक्य आहे काय हे तपासले जाईल.

-------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील मेडिकल पदव्युत्तर शिक्षणाच्या जागा कमी होणे

**मु. शी.** : राज्यातील मेडिकल पदव्युत्तर शिक्षणाच्या जागा कमी होणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी ( वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे यांनी राज्यातील मेडिकल पदव्युत्तर शिक्षणाच्या जागा कमी होणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** ( श्रीमती उषा दराडे ) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, महाराष्ट्रातील मेडिकल कॉलेजच्या 200 जागा कमी झालेल्या आहेत. दरवर्षी कॉलेजमध्ये सुधारणा, कॉलेजचे प्लॅनिंग, कॉलेजचा विकास करण्यासाठी शासन काहीही काम करीत नाही. नागपूरच्या मेओ मेडिकल कॉलेजच्या 200 जागा कमी झालेल्या आहेत. या करिता ऑल इंडियन मेडिकल कौन्सिलला माननीय मंत्रीमहोदयांनी भेट सुध्दा दिलेली आहे त्यामुळे याबाबतीत मेडिकलच्या जागा कमी न होता पुन्हा कशा रिइन्स्टेट होतील व नवीन जागा वाढण्याकरिता शासन काय प्रयत्न करणार आहे?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, हे खरे आहे की, नागपूरमध्येच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व म्हणजे शासकीय तसेच महापालिकांच्या आणि खाजगी मेडिकल कॉलेजेसमध्ये 194 सीटस् आहेत. या जागा एमसीआयने रेकग्नाईज केलेल्या नाहीत त्याबाबतचा हा प्रश्न आहे. या संदर्भात माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी स्वत: दिल्ली येथे जाऊन एमसीआय च्या अधिकाऱ्यांबरोबर तसेच केंद्रीय मंत्र्यांचीदेखील भेट घेऊन या संदर्भात बैठका घेतल्या आहेत. आता देखील आमच, शासनाचे अधिकारी दिल्लीमध्ये यासाठी बसले आहेत आणि त्यांना या संदर्भात जी माहिती पाहिजे ती देत आहेत. आम्हाला खात्री आहे की, लवकरात लवकर या सीटस् ज्या थांबवून ठेवल्या आहेत, कारण मुंबई हायकोर्टामध्ये या संदर्भात तीन रिट पिटीशन्स पेंडींग आहेत. त्यामुळे एमसीआयने या जागा रेकग्नाईज केल्या नाहीत पण एमयूएचएसने रेकग्नाईज केल्या होत्या म्हणून त्या सीटस् या वर्षी भरण्याचे आपण बंद केले होते. परंतु या वर्षी यासाठी केंद्र सरकार आणि एमसीआय आपल्याला परवानगी देणार आहे त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात 194 डिप्लोमा आणि पीजी कोर्सेस आहेत ते लवकरात लवकर आपण करून घेऊ.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, इंदिरा गांधी मेडिकल कॉलेजमध्ये 13 अभ्यासक्रमांना एमसीआयची मान्यता नाही. तर मग आपले अधिकारी, वैद्यकीय शिक्षण संचालकांचे अधिकारी तेथे काय करीत आहेत ? वैद्यकीय शिक्षण संचालक हे मंत्र्यांना बरोबर काही सांगत नाहीत. हे किती दुर्लक्षित आहे. किती वर्ष झाली हा प्रश्न सुरू आहे. तेथे ॲप्रेटस् नाही, इक्विप्मेंटस् बंद असतात. इतका सारा घोळ तेथे आहे. राज्याचे नुकसान होत आहे. आम्हाला याची खरोखरी लाज वाटते. तेथे कर्नाटकाच्या जागा आपल्यापेक्षा अधिक वाढल्या आहेत आणि आपण यामध्ये मागे पडतो आहोत. कारण महाराष्ट्र शासनाची या बाबत उदासीनता आहे. तेव्हा इंदिरा गांधी मेडिकल कॉलेजमधील 13 अभ्यासक्रमांना एमसीआयची मान्यता नाही हे खरे आहे काय ? 13 कोर्सेसना मान्यता नाही तरीही तुम्ही ॲडमिशन्स करून राहिला आहात, कशासाठी आपण लोकांची फसवणूक करता आहात ?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो की, इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज,नागपूर येथील 43 पैकी केवळ 3 अभ्यासक्रमांना मान्यता आहे.

..... 3डी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आपल्याला या संदर्भातील संपूर्ण महाराष्ट्राचे चित्र सांगितले आहे. तरीही प्रत्येक इंडिव्हिज्युअल कॉलेजचा डाटा माझ्याकडे आता उपलब्ध आहे तो मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे किंवा येथे वाचून देखील दाखवू शकतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी माननीय राज्यमंत्र्यांना विचारू इच्छितो की, आमच्या नागपूर येथील इंदिरा गांधी मेडिकल कॉलेजमधील 43 पैकी किती अभ्यासक्रमांना मान्यता आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे त्यांच्या पक्षाचे राष्ट्रीय नेता आहेत आणि राज्य पातळीवरील नेते आहेत. तेव्हा त्यांनी केवळ नागपूर पुरते न बोलता पूर्ण राज्याचा विचार करून बोलले पाहिजे. मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, जी शासकीय मेडिकल कॉलेजेस आहेत त्यामध्ये 24 अभ्यासक्रम रेकग्नाईज्ड आहेत आणि 2 अभ्यासक्रम नॉनरेकग्नाईज्ड आहेत. एकूण 28 कोर्सेस आहेत तसेच डिप्लोमाचे 12 अभ्यासक्रम रेकग्नाईज्ड आहेत आणि नॉनरेकग्नाईज्ड असा एकही अभ्यासक्रम नाही. नागपूर येथील इंदिरा गांधी मेडिकल कॉलेजमधील तीन अभ्यासक्रम रेकग्नाईज्ड आहेत आणि 29 नॉन रेकग्नाईज्ड आहेत. नॉन रेकग्नाईज्ड म्हणजे नॉन रेकग्नाईज्ड बाय मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया, पण एमयूएचएस कडून रेकग्नाईज्ड आहेत. एमसीआयने रेकग्निशन दिले नाही पण ते कोर्सेस आपण महाराष्ट्रात चालू ठेवत होतो. सर्व हॉस्पिटल्समध्ये तीच पोझिशन आहे. कारण तेथे काही ठिकाणी प्रोफेसर्स उपलब्ध नव्हते., काही ठिकाणी इक्विपमेंटस् नव्हती., इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध नव्हते. तरीही आम्ही अपग्रेडेशन करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. सभापती महोदया, आमचा संपूर्ण विभाग हे सर्व कोर्सेस रेकग्नाईज्ड करून घेऊन जितक्या कॉलेजांमध्ये भरतीची प्रक्रिया सुरू केलेली आहे. एकदा भरती झाल्यानंतर जेथे इन्फ्रास्ट्रक्चर कमी आहे तेही पूर्ण करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, येथे जी माहिती दिलेली आहे त्यावरून असे दिसते की, विदर्भ आणि मराठवाड्यातील जागा कमी झालेल्या आहेत आणि त्या जागा कायमच्या कमी होऊ नयेत त्यासाठी आपण प्रयत्न करीत आहात, त्यासाठी जरूर मी आपल्याला सुयश चिंतितो. परंतु या जागा कमी झाल्या तर हे राज्य देशाच्या घटनेच्या कलम 371(2) अंतर्गत आहे आणि त्या

...... 3डी 3 ...



KBS/ श्री. जुन्नरे नंतर --- 15:55

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कलमानुसार या सीटस्ना देखील समन्यायी वाटपाचे तत्त्व लागू होते आणि त्याची काळजी आपल्याला घ्यावी लागेल. यामुळेच माननीय श्री.शरद पवार मुख्यमंत्री असताना त्यांनी 50 जागा यांनी तळेगाव दाभाडला विदर्भासाठी दिल्या होत्या. मी आज ते पान नंबर काढून आणले नाही. माझे म्हणणे असे आहे की, या जागा कधीच आपल्याकडून जाणार नाही यासाठी आपण जरूर प्रयत्न करावेत. पण दुर्दैवाने त्या कमी झाल्या तर आहे त्या जागांचे विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये समन्यायी वाटप करण्याची काळजी आपण घ्यावी, तशी ती घेणार का ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, जे पीजी कोर्सेस आहेत ते विदर्भाचे कमी होवोत, मराठवाड्याचे कमी होवोत कोठेही कमी झाल्या तरी संपूर्ण राज्याचे नुकसान होते. कारण पीजी कोर्सेसमध्ये ज्या ॲडमिशनस् आपण देतो तेव्हा रिजनवाईज आपण पाहत नाही. म्हणजे विदर्भातील कॉलेजमध्ये विदर्भातील मुलांनाच प्रवेश देतो असे नाही तर पीजी कोर्सेससाठी सीइटी घेऊनच मेरिटवर आपण सर्वांना ॲडमिशन्स देत असतो. तेव्हा विदर्भाच्या सीटस् कमी झाल्या म्हणजे केवळ विदर्भाचेच ते नुकसान नाही तर महाराष्ट्र राज्याचे नुकसान आहे.

( यानंतर सौ. रणदिवे .... 3इ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, 200 जागा कमी झाल्या तर विदर्भ, मराठवाडयातील प्रवर्गामध्ये नव्याने वाटाव्या लागतात आणि याबाबतीत माननीय राज्यपालांचे निर्देश आहेत. घटनेप्रमाणे तसे करावे लागते. मघाशी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारले की, मागच्या वेळी अशी परिस्थिती निर्माण झाली, तेव्हा तळेगाव-दाभाडी मधील जागा विदर्भासाठी द्याव्या लागल्या होत्या आणि तशा प्रकारचे सरकारवर कायदेशीर बंधन आहे. तेव्हा माझा तुम्हाला एक मार्काचा सोपा प्रश्न आहे की, जर या जागा कमी झाल्या तर घटनेच्या 371 (2) (8) च्या निदेशाप्रमाणे महाराष्ट्रातील जागांचे इक्वल डिस्ट्रीब्युशन होईल काय ? होय किंवा नाही ते सांगावे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदया, आता सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेब आणि प्रा.बी.टी.देशमुखसाहेब यांनी जो मुद्दा मांडलेला आहे, तो तपासून घेऊ.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, यामध्ये काय तपासणार आहात ? ही पध्दत बरोबर आहे काय ? घटनेच्या मुद्याला टाळत . . . .

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : माननीय मंत्री महोदयांनी घटनेच्या मुद्याला टाळलेले नाही. याबाबतीत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मांडलेल्या प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा देखील झालेली आहे. त्यावेळी त्यांनी भूमिका मांडलेली आहे. आता आपण पुढचा विषय घेऊ.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी काहीच भूमिका मांडलेली नाही. तुम्ही आमच्यावर अन्याय करता काय ?

**तालिका सभापती** : असे होणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेब, आपण सिनिअर सदस्य आहात.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदया, घटनेच्या कलम 371 (2) बाबत अंमलबजावणी करावयाची आहे की नाही असा मी प्रश्न विचारला होता. तर माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत तपासून पाहू असे उत्तर दिले आहे. सभापती महोदया, आपण वकील आहात. आपण मराठवाडयातील आहात.

**तालिका सभापती** : याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेब, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, तो खरोखरच गंभीर आहे. माननीय

. . . .3ई-2



**तालिका सभापती** . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मंत्री महोदयांनी याबाबतीत गांभीर्याने चर्चा करुन सभागृहासमोर उत्तर द्यावयास पाहिजे. घटनेच्या कलमानुसार ज्या डिरेक्शन्स् दिलेल्या आहेत. त्या तर आपल्याला मान्यच कराव्या लागतील. घटनेच्या चौकटीमध्ये त्याप्रमाणे कोणत्या उपाययोजना करता येईल, त्या केल्या पाहिजेत अशा प्रकारचे उत्तर सन्माननीय सदस्यांना अभिप्रेत आहे.

-----

. . . .3 ई-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ. शी. : नागरी सहकारी पतसंस्थांमध्ये अडचणीतील पतसंस्थांच्या विलिनीकरणाचे काढलेले आदेश

मु. शी. : नागरी सहकारी पतसंस्थांमध्ये अडचणीतील पतसंस्थांच्या विलिनीकरणाचे काढलेले आदेश याबाबत सर्वश्री शरद पाटील, जयंत प्र.पाटील , वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री शरद पाटील यांनी "नागरी सहकारी पतसंस्थांमध्ये अडचणीतील पतसंस्थांच्या विलिनीकरणाचे काढलेले आदेश" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .3 ई-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.शरद पाटील : सभापती महोदया, महाराष्ट्रातील नागरी सहकारी पतसंस्था आर्थिक घोटाळयांमुळे अडचणीमध्ये आलेल्या आहेत. एकंदर 462 सहकारी पतसंस्था दुसऱ्या सक्षम पतसंस्थांमध्ये विलीन करण्यासंबंधीचा आदेश सहकार आयुक्तांनी काढलेला आहे. ज्या संस्थांमध्ये गैरप्रकार झाले, त्या संस्थांमधील ठेवीदारांच्या ठेवी धोक्यामध्ये आल्या आहेत. त्यांना संरक्षण मिळावे

यासाठी सहकार खात्याने सोपा मार्ग अवलंबिलेला दिसतो. आपल्यावरील जबाबदारी बऱ्यापैकी चालणाऱ्या पतसंस्थांवर ढकलण्याचा हा प्रयत्न दिसत आहे. त्यामुळे ज्या चांगल्या संस्था आहेत, त्या देखील अडचणीमध्ये येण्याची शक्यता आहे. माननीय मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये असे सांगितले की, पतसंस्थांचे विलिनीकरण हे संमतीनेच झालेले आहे. कोणत्याही प्रकारची सक्ती करण्यात आलेली नाही. हे उत्तर योग्य नाही. कारण कोणत्याही पतसंस्थेने अडचणीमध्ये आलेल्या पतसंस्थेचे आपल्या संस्थेमध्ये विलिनीकरण करुन घेण्यासाठी संमती दिलेली नाही. किमान आमच्या सांगली जिल्ह्यामध्ये 25 अकार्यक्षम किंवा अडचणीमध्ये आलेल्या पतसंस्थांचे सक्षम पतसंस्थांमध्ये विलिनीकरण करण्याचा आदेश सहकार उपनिबंधकांनी काढला. पण कोणत्याही पतसंस्थेने त्यासाठी संमती दिलेली नव्हती. नंतर देखील त्यांनी तक्रारी केल्या आहेत, विरोध केला आहे. तसेच त्यांनी जनरल बॉडीची बैठक बोलावून त्यामध्ये विलिनीकरणाच्या विरोधात ठराव केलेले आहेत. यासंबंधी मी माननीय मंत्री महोदयांना प्रश्न विचारु इच्छितो की, ज्या पतसंस्था अडचणीमध्ये आलेल्या पतसंस्था ताब्यात घेण्यास तयार आहेत, त्या संस्थांना ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी काही मुदत देणार आहात काय ? कारण आता याबाबतीत आदेश निघाल्याबरोबर ठेवीदार या संस्थांच्या मागे लागलेले आहेत आणि ठेवी परत करा असे सांगत आहेत. ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित रहातील, परंतु त्यांना या ठेवी परत करण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. तो दिला जाणार आहे काय? त्याचबरोबर ज्यांची या संस्था ताब्यात घेण्याची इच्छा नाही, त्या संस्थांवर सक्तीने विलिनीकरण लादण्यात येणार नाही असे आश्वासन माननीय मंत्री महोदय देतील काय ? तसेच जे गैरप्रकार झालेले आहेत, त्याची रितसर चौकशी करुन, याला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करणार आहात काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदया, महाराष्ट्रातील साधारणपणे 462 पतसंस्था अडचणीमध्ये आलेल्या आहेत. आतापर्यंत 114 पतसंस्थांच्या विलिनीकरणाचे आदेश काढलेले आहेत. त्या विरोधात 6 पतसंस्थांनी अपील केले आहे की, आम्हाला हे विलिनीकरण नको.याबाबत

. . . .3 ई-5



श्री.जयप्रकाश दांडेगावकर . . . .

कुठेही जबरदस्ती केली जाणार नाही. विलिनीकरणाच्या बाबतीत दोन्ही संस्थांची संमती असेल तरच ही कार्यवाही करण्यात येईल. सहा संस्थांनी जॉईंट रजिस्टारकडे अपील केलेले आहे. त्यांना सूचना देण्यात येतील की, ज्यांची इच्छा नाही, त्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे राहू दे. वसुलीच्या बाबतीत सुध्दा सूचना देण्यात येतील. कारण विलिनीकरण केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ठेवी परत देता येऊ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शकत नाहीत. त्यामुळे जरुर त्यांना काही वेळ देण्यात येईल. त्यासंदर्भात सूचना देण्यात येतील. कार्यवाही एवढयासाठीच करीत नाही, कारण हे सर्व चांगल्या उद्देशाने सुरु आहे. अनेक ठेवीदार अडचणीमध्ये आलेले आहेत. त्यामुळे एखाद्या अधिकाऱ्याने चांगल्या उद्देशाने कार्यवाही केली तर विनाकारण त्यांना अडचण नको म्हणून कार्यवाही करणार नाही. फक्त जेवढया ऑर्डर्स् काढलेल्या आहेत, ज्यांची संमती नाही, त्यांनी जॉईंट रजिस्टारकडे अपील केले तर त्या विड्रॉ करण्याच्या सूचना देण्यात येतील.

-----

यानंतर कु.गायकवाड . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 16:05

**पृ. शी.** : सन 2008-09 या शैक्षणिक वर्षात जि.प.प्राथमिक सेवक भरती प्रक्रियेमध्ये आंतरवासिताधारक डी.एड. विद्यार्थ्यांचा समावेश केल्यामुळे जुन्या डी.एड. विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला प्रश्न

**मु. शी.** : सन 2008-09 या शैक्षणिक वर्षात जि.प.प्राथमिक सेवक भरती प्रक्रियेमध्ये आंतरवासिताधारक डी.एड. विद्यार्थ्यांचा समावेश केल्यामुळे जुन्या डी.एड. विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला प्रश्न याबाबत सर्वश्री पाशा पटेल, रामनाथ मोते,संजय केळकर, शरद पाटील,जयंत प्र.पाटील, दिलीपराव सोनावणे, गुरुमुख जागवाणी, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल, रामनाथ मोते,संजय केळकर, शरद पाटील, जयंत प्र.पाटील, दिलीपराव सोनावणे, गुरुमुख जागवाणी, यांनी "सन 2008-09 या शैक्षणिक वर्षात जि.प.प्राथमिक सेवक भरती प्रक्रियेमध्ये आंतरवासिताधारक डी.एड. विद्यार्थ्यांचा समावेश केल्यामुळे जुन्या डी.एड. विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला प्रश्न " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील शिक्षण सेवकांच्या डी.एड प्रशिक्षणा संदर्भातील हा विषय आहे. यावर्षीपासून शासनाने डी.एड विद्यार्थ्यांकरिता इंटर्नशीप सुरु केलेली आहे. तसेच त्यांच्याकरिता आंतरवासिता कालावधी लागू केलेला आहे. पूर्वी डी.एड झालेल्या विद्यार्थी व नवीन डी.एड होणारे विद्यार्थी यांच्या गुणांमध्ये तफावत आहे. विद्यार्थ्यांमध्ये अशा प्रकारची भावना निर्माण झाली आहे की, जुन्या अभ्यासक्रमानुसार डी.एड झालेले विद्यार्थी व नवीन अभ्यासक्रमानुसार डी.एड होणारे विद्यार्थी यांची तुलना होऊ शकत नाही. डी.एड. करीता जी प्रवेश परीक्षा सुरु करण्यात येत आह त्यासाठी निवड प्रक्रीया सुरु झालेली आहे. या प्रक्रीयेमध्ये आंतरवासिता कालावधी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पात्र ठरविण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी उपोषण सुरु केले होते. त्यासंदर्भात शासनाने नुकताच निर्णय घेतला होता. मी या पूर्वी देखील सांगितले होते की, जुन्या डी.एड विद्यार्थ्यांच्या किंवा नवीन डी.एड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी कोणाच्याही विरोधात आपल्याला जाता येणार नाही. त्यामुळे यामधून काही तरी मार्ग काढणे आवश्यक आहे. शासनाने डी.एड करीता प्रवेश देण्यासाठी शासन सीइटी परीक्षा घेणार आहे असे सांगण्यात आले होते. सीईटी परीक्षा या वर्षापासून लागू करणार आहे काय ? जर सीईटी परीक्षा लागू करण्यात येणार असेल तर ज्या जिल्हयामध्ये जागा रिक्त आहेत त्यांच्याकरिता निवड प्रक्रीया करण्यात येत आहे, तेथील प्रक्रीया थांबविणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अनेक दिवसांपासून डी.एड पदवीधारक उपोषणास बसलेले आहेत ही गोष्ट खरी आहे. परंतु पुढील वर्षापासून डी.एड करिता सीईटी लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यामुळे जुने डी.एड पदवीधारक उपोषणाला बसले होते त्यांची माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर एक बैठक झाली. तसेच आता विधानसभेमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेले आहे की, जुन्या डी.एड पदवीधारकांवर अन्याय होणार नाही अशा पद्धतीने लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

श्री. शरद पाटील : सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके यांनी सभागृहामध्ये सध्या सुरु असलेली प्रक्रीया थांबवून सर्व विद्यार्थ्यांची सीईटी प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून निवड केली जाईल असे सांगितले होते. त्याची अंमलबजावणी करण्यात येईल काय ?

..3..

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पुढील वर्षी डी.एड विद्यार्थ्यांना सीईटी परीक्षेच्या माध्यमातून प्रवेश देण्याचा निर्णय झालेला आहे. ही प्रक्रीया आता पुढे गेलेली आहे. परंतु जुन्या डी.एड पदवीधारकांवर अन्याय होणार नाही.

**तालिका सभापती** ( श्रीमती उषा दराडे ) : विद्यार्थ्यांवर अन्याय होणार नाही यासाठी शासन काय करणार आहे हे सांगावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेमध्ये अशी घोषणा केली आहे की, यासंबंधी लवकरात लवकर बैठक घेऊन चांगला निर्णय घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, दोन्ही सभागृहे समान आहेत माननीय मुख्यमंत्र्यानी या विषयासंबंधी विधानसभेमध्ये उत्तर दिले आहे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

या सभागृहालाही सन्मान आणि प्रतिष्ठा आहे. जर माननीय मंत्रिमहोदयांना सांगावयाचे असेल तर त्यांनी या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभा सभागृहात असे असे निदेश दिलेले आहेत आणि ते निदेश याला लागू असल्यामुळे ते लागू होतील असे उत्तर द्यावयास पाहिजे. परंतु माननीय मंत्रिमहोदय ज्या पध्दतीने उत्तर देत आहेत ती पध्दत या सभागृहाचा अवमान करणारी आहे. आम्हाला टरकवून लावणे किंवा "क" पदार्थासारखे वागवणे योग्य नाही. या सभागृहातील सदस्य सुध्दा महत्वाचे आहेत. या ठिकाणी उत्तर देत असताना त्याचा आधार घेऊन नीट उत्तर द्यावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, मी अवमान केलेला नाही. 10 मिनिटांपूर्वीच सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी तसे सांगितले आहे आणि मी तेच या ठिकाणी सांगण्याचा प्रयत्न केला. मी वस्तुस्थिती सांगितलेली आहे.

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : हा प्रश्न या अधिवेशनामध्ये तीन-चार वेळा चर्चेला आलेला आहे. आपण काही लोकांचे फॉर्म भरुन घेतलेले आहेत. हा गुंतागुंतीचा प्रश्न आहे. याबाबत सन्माननीय तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ताबडतोबीने निर्णय घ्यावा. पुढच्या वर्षी सी.ई.टी. घेतली तरी या वर्षी निर्माण झालेला गोंधळ दूर होणार नाही. सर्व परीक्षा रद्द करुन सी.ई.टी. घेता येईल काय यादृष्टीने प्रयत्न केला पाहिजे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदया, या वर्षी सी.ई.टी. घेता येणार नाही. यावर्षी जे पात्र आहेत त्याचा विचार केला जाईल एवढा खुलासा केला तरी जुन्या विद्यार्थ्यांना प्रश्न सुटतो.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, आम्ही सर्वमान्य तोडगा काढू.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अकरावी बारावीच्या अभ्यासक्रमातील बदलानुसार नेमणूक केलेल्या नवीन शिक्षकांच्या पदाला मान्यता न मिळणे

**मु. शी.** : अकरावी बारावीच्या अभ्यासक्रमातील बदलानुसार नेमणूक केलेल्या नवीन शिक्षकांच्या पदाला मान्यता न मिळणे याबाबत श्री. कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "अकरावी बारावीच्या अभ्यासक्रमातील बदलानुसार नेमणूक केलेल्या नवीन शिक्षकांच्या पदाला मान्यता न मिळणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदया, सन 2000 व 2005 चा जो राष्ट्रीय आराखडा होता त्यानुसार आणि पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार अकरावी आणि बारावीच्या शिक्षकांची पदे वाढलेली आहेत. निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, आता ही मान्यता घेण्याची प्रक्रिया सुरु करणार आहेत. म्हणजे तो प्रस्ताव वित्त विभागाकडे जाईल आणि त्यांची मान्यता मिळाल्यानंतर पगार सुरु होणार. म्हणजे मागची दोन वर्षे आणि पुढची दोन वर्षे या शिक्षकांनी विनापगार काम करावे असे शासनाचे म्हणणे आहे काय ? त्यांचा पगार कोण देणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, राष्ट्रीय आराखड्याप्रमाणे इयत्ता अकरावी आणि बारावीच्या पुनर्रचित अभ्यासक्रम विषय योजना, विषयनिहाय तासिका विभागणी व परीक्षा योजना याकरिता पुनर्रचित अभ्यासक्रमास मान्यता दिलेली आहे. आता अकरावी आणि बारावीच्या पुनर्रचित अभ्यासक्रमासाठी इयत्ता अकरावी आणि बारावीसाठी ही पदे कार्यान्वित झालेली आहेत. सी.एच.बी. तत्वावर ही परवानगी देण्यात आलेली आहे. ही जी पदे वाढलेली आहेत त्यासंदर्भात शासनाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे पदे वाढली तर त्यासंदर्भात अर्थ विभागाची समिती आहे तसेच मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली जी एक समिती आहे त्या समितीचा निर्णय झाल्यानंतर आपण त्या पदाला मान्यता देतो. ज्या ठिकाणी वर्कलोड वाढतो, जे शिक्षक अतिरिक्त होतात त्यांचा प्रश्न ताबडतोबीने मिळविण्यासाठी प्रयत्न करुन त्यांच्या पगाराचा प्रश्न मिटवण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदया, दोन वर्षे झालेली आहेत. आता प्रस्ताव जाणार आणि नंतर मान्यता मिळणार. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, निधीच्या उपलब्धतेनुसार मान्यता देण्यात येईल. राष्ट्रीय आराखड्यानुसार दोन वर्षापूर्वी जी पदे निर्माण झाली त्यांची तरतूद त्याचवेळी करणे आवश्यक होते. आता पुन्हा नव्याने सुरुवात करणार. हा जो निर्णय करणार तो या महिनाभरात करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, महिनाभरात करु असे सांगता येणार नाही पण लवकरात लवकर निर्णय करु.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, लवकरात लवकर निर्णय करु. हा विषय एका वर्षाचा नाही. सन 2005-06, 2006-07 आणि 2007-08 ही तीन वर्षे संपलेली आहेत. संचालकांकडून शासनाकडे प्रस्ताव आलेला आहे. हे सगळे शिक्षक अनुदानित शाळांमध्ये तीन वर्षे काम करीत आहेत. अनुदानित शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांचे वेतन देण्याची जबाबदारी संस्था चालकांची नसून ती शासनाची जबाबदारी आहे. तातडीने मान्यता दिली तर हा प्रश्न सुटेल. सन 2005-06, 2006-07 आणि 2007-08 या तीन वर्षाचे प्रस्ताव किती दिवसात मंजूर करणार ? मागच्या तीन वर्षाच्या 569 प्रस्तावांपैकी फक्त 511 प्रस्तावांना मान्यता दिलेली आहे. 58 प्रस्ताव प्रलंबित आहेत. त्यांचाही निर्णय शासन केव्हा घेणार ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, वित्त विभागाकडे प्रस्ताव गेलेला आहे. तो प्रस्ताव मुख्य सचिवांच्या समितीपुढे जाणार आहे. मी स्वत: लक्ष घालून हे लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न करु.

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : बुलढाणा जिल्ह्यातील डोंगरखंडाळा जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत राबविण्यात आलेल्या रोजगार हमी योजनेच्या अनेक प्रकल्पांमध्ये झ ाालेला गैरव्यवहार व भ्रष्टाचार

**मु. शी**. : बुलढाणा जिल्ह्यातील डोंगरखंडाळा जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत राबविण्यात आलेल्या रोजगार हमी योजनेच्या अनेक प्रकल्पांमध्ये झ ाालेला गैरव्यवहार व भ्रष्टाचार याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( रोजगार हमी योजना राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "बुलढाणा जिल्ह्यातील डोंगरखंडाळा जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत राबविण्यात आलेल्या रोजगार हमी योजनेच्या अनेक प्रकल्पांमध्ये झालेला गैरव्यवहार व भ्रष्टाचार " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/ श्री.बरवडनंतर 16:15

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या निवेदनामध्ये जे उत्तर आलेले आहे ते खूप अपूर्ण आहे. यामध्ये बुलढाणा जिल्हयातील डोंगरखंडाळा या एकाच जिल्हा परिषद सर्कलचा उल्लेख केला आहे. संपूर्ण जिल्हयाचा हा प्रश्न आहे. या कार्यकारी अभियंत्यांनी संपूर्ण जिल्हयात रोहयोच्या अपूर्ण कामांची पूर्ण बिले घेतलेली आहेत. त्यामध्ये कोटयवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. काही काम न करता बिल घेतलेले आहे. निवेदनात जे.ई.ला निलंबित केल्याचे नमूद केले आहे. परंतु डोंगरखंडाळा या जिल्हा परिषदेच्या सर्कलमधील रस्त्याच्या कामाची चौकशी केली, त्यामध्ये अंशत: तथ्य असल्याचे निदर्शनास आले आहे असे म्हटले आहे. एका शाखा अभियंत्यांना दोषी धरुन चालणार नाही. जे कार्यकारी अभियंता आहेत त्यांच्या सहीने बिले मंजूर होतात त्यांच्यावर कारवाई करणार आहे काय आणि अंशत: तथ्य निदर्शनास आले आहे, त्याची रक्कम किती आणि किती रस्त्यांच्या कामावर भ्रष्टाचार झाला आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, बुलढाणा जिल्हयातील डोंगरखंडाळा सर्कलमधील साधारणपणे 14 रस्त्यांच्या कामांची चौकशी करण्यात आली आहे. त्या रस्त्यांची अंदाजे 180 लाख रुपये किंमत होती. प्राथमिक चौकशीत 34 लाखांची तफावत आढळली आहे. सध्या प्राथमिक चौकशी झालेली आहे, सविस्तर चौकशीचे आदेश विभागीय आयुक्तांनी दिलेले आहेत. ते काम प्रगतीपथावर आहे. ही कार्यवाही मे अखेर पूर्ण होईल....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, हा गैरव्यवहार नोव्हेंबर, 2007 मध्ये उघडकीस आलेला आहे. निलंबन निधी निश्चित करण्यासाठी दिनांक 17.3.2008 रोजी पथक स्थापन केलेले आहे. असे असताना चौकशी पूर्ण न होण्याचे काय काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी चौकशीचा घटनाक्रम सांगतो. दिनांक 6.11.07 ते 6.11.07 या कालावधीत प्राथमिक चौकशीचे काम पूर्ण झाले. जिल्हाधिकारी बुलढाणा यांना आयुक्तांनी दिनांक 11.1.2008 रोजी आदेश दिले. दिनांक 17.3.2008 रोजी स्थानिक अधिक्षक अभियंता, अकोला सा.बां.मंडळ यांनी 2 अभियंत्यांचे पथक नेमले आहे. सविस्तर चौकशीची कार्यवाही सध्या सुरु आहे. एकदा ही कार्यवाही पूर्ण झाली की निलंबन निधी निश्चित करण्यात येईल. त्या अनुषंगाने विभागीय चौकशी करुन पुढील कार्यवाही करता येईल.

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील.....

सध्या शाखा अभियंत्यांना निलंबित करण्याचे कारण असे आहे की, 100 टक्के कामांची तपासणी करण्याची त्यांची जबाबदारी होती. त्यामुळे त्यांना डायरेक्ट निलंबित केले आहे. दिनांक 8.11.2000 ते 2005 पर्यंतच्या कालावधीत उप अभियंता, कार्यकारी अभियंता या सर्व लोकांची जशी जशी जबाबदारी आहे ती निश्चित करुन त्यांच्याकडून ती रक्कम वसूल करण्यात येईल.

------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

**पृ. शी.** : चेंबूर येथील घाटला व्हीलेजमध्ये संतोष चंद्रकांत माने यांची झालेली हत्या

**मु. शी.** : चेंबूर येथील घाटला व्हीलेजमध्ये संतोष चंद्रकांत माने यांची झालेली हत्या याबाबत डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी " चेंबूर येथील घाटला व्हीलेजमध्ये संतोष चंद्रकांत माने यांची झालेली हत्या " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, दिनांक 6.4.2008 रोजी चेंबूर येथील घाटला व्हीलेजमध्ये खारदेव नगरात "भैया हातपाय पसरी" या नाटकाचे मराठी युवक संघाचे श्री.संतोष चंद्रकांत माने यांची हत्या झाली. याबाबत निवेदनामध्ये कोणत्याही प्रकारचे विश्लेषण करण्यात आलेले नाही. या निवेदनात असे म्हटले आहे की, " पोलिसांना पाहिजे असलेला आरोपी देवेंद्र बाबुराव जगताप उर्फ जेडी हा मराठी असून अटक आरोपी सुनिल बस्तीया हा ओरिया राज्यातील, दुसरा अटक आरोपी हसमुख सोळंखी हा गुजरात राज्यातील व आणखी एक पाहिजे असलेला आरोपी हा कर्नाटक राज्यातील आहे. " मला वाटते की, या तपासाला वेगळी कलाटणी देण्याचा प्रयत्न झालेला आहे. या हत्ये मागील कारण शासनाला माहीत आहे काय ? हा गुन्हा आंतरराज्यीय टोळीकडून झाला आहे असे मंत्रिमहोदयांना म्हणावयाचे आहे काय ? मंत्रिमहोदयांनी गोल गोल उत्तर देऊ नये, स्पष्ट उत्तर द्यावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मराठी युवक संघामार्फत चेंबूरमध्ये "भैया हातपास पसरी" या नाटकाचा कार्यक्रम होणार होता. त्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून तेथील कॉंग्रेसचे सरचिटणीस श्री.अनिल पाटणकर येणार होते. बॅनरवर त्यांचा फोटो होता. मुळात श्री.अनिल पाटणकर यांना मारण्याची सुपारी देण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. श्री.पाटणकर यांनी त्यादिवशी सफेत शर्ट आणि जीन्स घातली होती.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सिध्दाराम म्हेत्रे...)

तसाच शर्ट आणि जीन्स संतोष माने यानी घातला होता. मारेक-यांना वाटले की याच माणसाला संपवायचे आहे म्हणून नाटक संपल्यानंतर मारेक-यांनी त्यांना गोळया घातल्या. सुनील बस्तीया याने त्याच्या जबानीत सविस्तर सांगितलेले आहे.

डॉ. दीपक सावंत : काँग्रेसच्या पदाधिका-याला मारण्यासाठी कोणी आणि कशासाठी सुपारी दिली होती ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : देवेंद्र बाबुराव जगताप उर्फ जेडी याचा तपास चालू आहे. या माणसाने सुपारी दिली असे बस्तीया याने सांगितले. कोणत्या माणसाला उडवायचे हे दीपक खैरनार यानी दाखवले. देवेंद्र बाबुराव जगताप उर्फ जेडी आणि कृष्णा गौडा हे दोन आरोपी सापडलेले नाहीत. त्यांचा तपास चालू आहे.

डॉ. दीपक सावंत : 6 एप्रिलला गुन्हा होऊन देखील अजून पर्यन्त आरोपी का सापडलेले नाहीत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : 6 एप्रिलला गुन्हा घडल्यानंतर पोलिसांनी एका आरोपीस पाठलाग करुन ताबडतोब पकडलेले आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जिल्हा परिषदेतील कनिष्ठ व शाखा अभियंत्यांना स्वतंत्र श्रेणी न मिळणे

**मु. शी.** : जिल्हा परिषदेतील कनिष्ठ व शाखा अभियंत्यांना स्वतंत्र श्रेणी न मिळणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण व श्रीकांत जोशी वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : तालिका सभापती महोदया, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण व श्रीकांत जोशी यांनी "जिल्हा परिषदेतील कनिष्ठ व शाखा अभियंत्यांना स्वतंत्र श्रेणी न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : स्थानिक स्वराज्य संस्थाचे सक्षमीकरण होण्यासाठी शासनाने प्रा. पी.बी. पाटील समिती गठित केली होती. या समितीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात शासनाला काही शिफारशी केलेल्या आहेत. या समितीचा अहवाल 1986 मध्ये शासनाला सादर झालेला आहे. या अहवालामध्ये प्रत्येक संवर्गास स्वतंत्र विकास श्रेणी असावी अशी शिफारस करण्यात आलेली असताना उपअभियंता आणि कार्यकारी अभियंता या पदावरील पदोन्नतीसाठी कनिष्ठ अभियंता आणि शाखा हे पात्र असून देखील त्यांना पदोन्नती दिली जात नाही. यासंबंधीचा हा प्रश्न आहे. त्यांना पदोन्नती मिळण्याच्या दृष्टीने प्रा. पी.बी.पाटील समितीच्या अहवालानुसार शासनस्तरावर विचार चालू आहे. तेव्हा या संदर्भात माननीय मंत्री महोदय त्या संघटांनाचे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी यांना एकत्र घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन 1 महिन्याच्या आत बैठक लावून निर्णय घेणार आहेत काय ?

श्री. रणजित कांबळे : होय.

----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीसाठी जागा हस्तांतरित न करणे

**मु. शी**. : कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीसाठी जागा हसतांतरित न करणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बबनराव पाचपुते (वन मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व संजय केळकर यांनी "कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीसाठी जागा हसतांतरित न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : नगरपालिकेला हा बंगला आणि जागा देण्याच्या बाबतीत विभागाने शिफारस केलेली आहे. माननीय मंत्री महोदयांकडे फाईल आलेली आहे. विभागाने अनुकूलता दर्शविलेली आहे. यामध्ये लहानसहान राजकारण करु नये. तेव्हा ज्याप्रमाणे माननीय मंत्री महोदयांकडे प्रस्ताव आलेला आहे त्याप्रमाणे त्या प्रस्तावाला मान्यता देण्यात येईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : या जागेवर वन खात्याचे कार्यालय आहे आणि कर्मचारी निवासस्थान आहे. त्याठिकाणी कर्मचारी राहात आहेत, तसेच तेथे एक मोठा टॉवर आहे.

श्री. नितीन गडकरी : जिल्हाधिका-यांनी नगरपालिकेच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. नगरपालिकेने 45 लाख रु. महसूल खात्याकडे जमा केलेले आहेत.

श्री. बबनराव पाचपुते : ती चूक झालेली आहे...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 16:25

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सदर नगरपालिकेकडून पैसे घेतले, त्यांना अजून जागा देत नाही. सरकार कसे न्याय देते बघा. नगरपालिकेकडून पैसे देण्यास उशीर झाला म्हणून 36 लाख रुपयाऐवजी व्याजासह 45 लाख रुपये तुम्ही घेतले. त्यांचे पैसे अडकवून ठेवले आहेत. तेथील आमदार नाही म्हणतो म्हणून तुम्ही नगरपालिकेस जागा देत नाहीत. माननीय श्री. बबनरावजी, त्या नगरपालिकेने तुमच्याकडे पैसे भरले. तरी देखील त्यांना जमीन देत नाहीत हे बरोबर नाही. ते हायकोर्टात जातील. हायकोर्टाकडून त्यांना न्याय मिळेल. माननीय वन मंत्री साहेब, तुम्ही राजे आहात. तुम्ही कोणा पक्षाचे नाहीत. तुम्ही न्यायाने वागले पाहिजे. जिल्हाधिकारी यांनी आदेश दिला, त्यामुळे त्या नगरपालिकेने तुमच्याकडे पैसे भरले. तुमच्या विभागाने जागा देण्याविषयी शिफारस केली. ते प्रकरण फक्त तुमच्याकडे अडकलेले आहे. व्देष बुध्दीने वागण्याचा तुमचा स्वभाव नाही. तुम्ही उमद्या स्वभावाचे आहात. कोणाच्या दबावामुळे या बाबतचा निर्णय तुम्हाला घेता येत नसेल. नगरपालिकेकडून सदरहू जागेचे पैसे घेऊन झाले आहेत, म्हणून त्या नगरपालिकेला सदरहू जागा तातडीने हस्तांतरीत करण्यात येईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सन्माननीय सभापती महोदया, ही गोष्ट खरी आहे की, या संदर्भात एक बैठक झाली आणि जिल्हाधिकारी यांनी 7774 चौरस मीटर जागेची किंमत 36 लाख 94 हजार रुपये ठरविली. त्या नगरपालिकेने सदरहू जागेचे पैसे भरलेले आहेत ही गोष्ट देखील खरी आहे. यासंदर्भात 2006 या वर्षी पुन्हा बैठक झाली. त्या बैठकीत चर्चा झाली की, ही जमीन वनाची असेल तर त्या जमिनीवर काय आहे ते पहावे. तेथे वन विभागाच्या काही वास्तू असतील तर त्यासाठी सी.सी.एफ.ची परवानगी घ्यावी लागेल. यासंदर्भात नंतर जिल्हाधिकारी यांनी बैठक घेतली होती. ही जमीन वनाची आहे किंवा नाही याबाबतची चौकशी न करता जमीन देण्यासंदर्भात एकतर्फी निर्णय झाला. या जमिनीच्या संदर्भातील आजची परिस्थिती अशी आहे की, दरम्यानच्या काळामध्ये श्री. राजेंद्र घोरपडे विरुध्द महाराष्ट्र शासन क्रमांक 149/2007 उच्च न्यायालयात केस दाखल झाली आहे. या प्रकरणाच्या बाबतीत उच्च न्यायालयाचा निर्णय प्राप्त होत नाही तोपर्यंत या जागेच्या संदर्भात काहीही निर्णय होणार नाही. ही जमीन वन खात्याची असेल तर तशा प्रकारे परवानगी घ्यावी लागेल की काय याबाबतीत हे प्रकरण आमच्या खात्याकडे देण्यात आलेले आहे. या प्रकरणाचा कोर्टाकडून निर्णय आल्यानंतर यासंदर्भात पॉझिटीव्ह निर्णय घेतला जाईल. वन खात्याला त्या ठिकाणी पर्यायी जागा नाही. त्या भागात ग्लोबल वॉर्मिंगची परिस्थिती निर्माण झाली

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आहे. तसेच तेथे चो-यांचे प्रमाण वाढले आहे. पोलिसांशी सतत संपर्क ठेवावा लागतो. ही जागा मध्यवर्ती ठिकाणी आहे. वन विभागाच्या कर्मचा-यांनी गृहनिर्माण संस्था तयार करण्यासाठी या ठिकाणी 40 आर.जमीन मागितली आहे. या प्रकरणाचा हायकोर्टात निर्णय झाल्यानंतर या जागे संदर्भात निर्णय घेता येईल. या जमिनीच्या बाबतीत लागलीच काही निर्णय घेऊ शकत नाही. हायकोर्टाचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर कोर्टाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

श्रीृ नितीन गडकरी : सदर जागेचे पैसे नगरपालिकेने भरलेले आहेत. नगरपालिकेकडून व्याजासह पैसे घेतले आहे. सदरहू नगरपालिका वन विभागास दुसरीकडे जागा देण्यास तयार आहे. वन विभागाने देखील परवानगी दिली आहे. माननीय वन मंत्र्यांनी फाईल दाबून ठेवली आहे. त्या फाईलवर माननीय वन मंत्री सही करीत नाहीत.

श्री. बबनराव पाचपुते : याबाबतीत शासनाने पॉझिटिव्ह भूमिका घेतलेली आहे.सदर प्रकरण न्यायालयात गेलेले आहे. न्यायप्रविष्ट गोष्टीवर आपण कशी काय चर्चा करु शकतो.? कोर्टातून केस परत घेतली तर शासनाला काही तरी निर्णय घेता येईल. न्यायालयीन प्रकरणावर आपण चर्चा करु शकत नाही.

श्री. सुरेश केळकर : माननीय मंत्र्यांनी सांगितले की, सदर प्रकरण न्यायालयात गेलेले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोक या जमिनीच्या बाबतीत कोर्टात गेलेले आहेत. यासंबंधीचा निर्णय वन विभागाकडून 14 वर्षापासून घेतला गेला नाही, म्हणून ते लोक कोर्टात गेले आहेत. सदरहू स्थानिक स्वराज्य संस्था वन विभागास पर्यायी जागा उपलब्ध करुन देऊन तेथे नव्याने बंगला बांधून देण्यास तयार आहेत. नगरपालिकेने जमिनीचे पैसे भरलेले आहेत. 7/12 उता-यावर नगरपालिकेचे नाव आलेले आहे. वन विभागाच्या परवानगी शिवाय नगरपालिका बांधकाम करु शकत नाही म्हणून ते प्रकरण प्रलंबित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेची आपण कशासाठी अडवणूक करीत आहात ? स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोक कोर्टातील केस मागे घेण्यास तयार आहेत.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्रीमती उषा दराडे ) :सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. माननीय मंत्र्यांनी जे उत्तर दिले आहे, त्यापेक्षा दुसरे काही उत्तर माननीय मंत्री महोदयांकडून मिळेल असे मला वाटत नाही. माननीय वन मंत्र्यांनी या विषयाच्या बाबतीत एक बैठक घ्यावी आणि त्या बैठकीस संबंधित सर्व सन्माननीय सदस्यांना निमंत्रित करावे अशी माझी सूचना आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सजेशन फॉर ॲक्शन.

----------------

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मेळघाट भागात रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे पुरविण्याबाबत

**मु. शी.** : मेळघाट भागात रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे पुरविणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

राणा जगजिसिंह पाटील : ( रोजगार हमी योजना राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मेळघाट भागात रोजगार हमी योजनेतून कामे पुरविणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मेळघाट भाग कुपोषित भाग समजला जातो. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून प्रश्न विचारला आहे. याचे कारण असे की 0 ते 6 वयोगटातील 8000 बालकामगारांनी स्थलांतर केले आहे. एका संस्थेच्या पाहणीमध्ये हे दिसून आले आहे आणि दै.लोकमत या वर्तमानपत्रात याबाबतीत बातमी देखील आली होती. मजुरांना कामेच नसतील तर स्थानिक पातळीवर कल्याणपासून ते सोलापूरपर्यंत 8000 बालकामगारांनी स्थलांतर केले आहे. कामाच्या शोधात या मजुरांनी स्थलांतर केले आहे काय याची चौकशी शासन करणार आहे काय ? 50 टक्के कामे ग्रामपंचायतीमार्फत पुरविण्याची मागणी किती ग्रामपंचायतींनी केली आणि त्याबाबतीत काय कार्यवाही केली ?

राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, बाल कामगारांनी स्थलांतर केल्याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला आहे त्याची चौकशी करण्यात येईल. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून किती कामे चालू आहेत आणि कामांची किती मागणी आली याची माहिती मी सदनाच्या पटलावर ठेवतो. धारणी आणि चिखलदरा या दोन्ही ठिकाणी कामे चालू आहेत. धारणी येथे 62 कामे चालू असून 21 तारखेची मजुरांची उपस्थिती 1610 इतकी आहे. चिखलदरा येथे 66 कामे चालू आहेत आणि 1750 मजुरांची उपस्थिती आहे. त्याचप्रमाणे शेल्फवर 150 कामे आहेत. मजुरांची क्षमता धारणी येथे 10000 आणि चिखलदरा येथे 20000 इतकी आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, प्रत्येक गावामध्ये किती मजुरांनी स्थलांतर केले आणि कामांची मागणी किती आली याची माहिती द्यावी. त्याचप्रमाणे ग्राम पातळीवर ग्रामसभा घेऊन रोजगार हमी योजनेची कामे करण्याचा प्रयत्न करण्यात येईल काय ?

राणा जगजिसिंह पाटील : सभापती महोदय, कामे घेण्याच्या बाबतीत निश्चितच प्रयत्न केला जाईल. 21 तारखेला पालकमंत्र्यांनी याबाबतीत एक बैठक घेतली होती. या बैठकीला विभागीय आयुक्त आणि रोजगार हमी खात्याचे सचिव यांना देखील बोलाविण्यात आले होते. वनखात्याच्या कामांचे प्रमाण कमी आहे त्यासंबंधात कामे वाढविण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. प्रत्येक गावामध्ये याबाबतीत एक कार्यशाळा घ्यावी अशी जी सूचना आहे त्याबाबतीत निश्चितच कार्यवाही करण्यात येईल.

--------

.......3



**पृ. शी.** : नाशिकमधील एका "विनयार्ड"वरील वाईनबारमध्ये फिल्मी स्टाईल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पार्टीचे आयोजन

**मु. शी.** : नाशिकमधील एका "विनयार्ड"वरील वाईनबारमध्ये फिल्मी स्टाईल पार्टीचे आयोजन करणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे यांनी "नाशिकमधील एका "विनयार्ड"वरील वाईनबारमध्ये फिल्मी स्टाईल पार्टीचे आयोजन करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पार्टी झाली होती परंतु तक्रार केली नाही. तक्रार नाही म्हणून कारवाई नाही. त्याठिकाणी बारबाला नाचल्या, डान्स झाला. नाशिक मधील जनतेने ते पाहिले. म्हणजे बलात्कार झाला तरी गुन्हा दाखल करावयाचा नाही कारण पोलिसांकडे कुणी तक्रार केली नाही अशी बाणेदार भूमिका राज्य शासनाची आहे. परंतु हे बरोबर नाही. चॅनेलवर मुली नाचल्या हे दाखविले गेले. गडबड झालेली आहे. रेकॉर्ड बघा आणि पुढील कारवाई करा.

श्री. सिध्दारा म्हेत्रे : सभापती महोदय, 'होय'.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, शासनाने डान्सबारवर बंदी आणली. परंतु क्रिकेटच्या मॅचच्या वेळी बिभत्सपणे मुली नाचतात. मुंबईत मॅचेस होतात त्यावेळी मुली नाचतात. क्रिकेटचा हा तमाशा आणि बाजार सुरु आहे. क्रिकेटच्या मॅचेसच्यावेळी अशा नाचणाऱ्या मुलींवर कायदेशीर बंदी घातली जाईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, तपासून कारवाई करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, तपासून काय बघणार ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, न तपासता कारवाई कशी करणार ? नियमानुसार ही बाब तपासून कारवाई करावी लागेल.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-18.........

श्री.नितीन गडकरी : यात काय तपासणी करायची आहे? बीभत्स चाळे उघड्या डोळयांनी लोक पहात आहेत.

श्री.नारायण राणे : सन्माननीय सदस्यांना जे अभिप्रेत आहे ते तपासून पाहण्यात येईल असे मंत्रीमहोदयांना म्हणावयाचे आहे.

श्री.नितीन गडकरी : प्रश्न महत्वाचा आहे. क्रिकेटच्या मॅचच्या वेळी चौकार किंवा षटकार मारल्यानंतर अर्धनग्न अवस्थेतील मुली बीभत्स चाळे करुन नाचत असतात हे महिलांच्या दृष्टीने योग्य नाही. डान्सबारवर शासनाने बंदी आणली. त्यामुळे या प्रकारावर बंदी आणणार आहात का?

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : निवेदनाचा विषय वेगळा आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी जे बोलले आहेत तेच बोलणे या अधिवेशनात सहा-सात वेळा रेकॉर्डवर आलेले आहे. त्याचे रिपिटेशन होत आहे हे मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : संत नरसी नामदेव जन्मस्थळ या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देणे

**मु. शी.** : संत नरसी नामदेव जन्मस्थळ या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देणे याबाबत सर्वश्री श्रीकांत जोशी, पाशा पटेल, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे ( पर्यटन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, पाशा पटेल, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी "संत नरसी नामदेव जन्मस्थळ या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-19...........

श्री.पाशा पटेल : सभापती महोदया, येत्या ऑक्टोबर महिन्यात 50 लाख शीख भाविक मराठवाड्यात येणार आहेत. संत नामदेव महाराजांचे जन्मस्थान नरसी नामदेव येथे आहे. या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी एक कोटी रुपये खर्च येणार आहे. 900 कोटी रुपये नांदेड येथील गुरु ता गद्दी कार्यक्रमासाठी खर्च करीत असताना फक्त एक कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याऐवजी प्रस्तावामध्ये त्रुटी आहेत म्हणून कार्यवाही करता आलेली नाही असे निवेदनामध्ये सांगितले आहे. प्रस्तावातील त्रुटी दूर करण्यासाठी फोनवरुन सूचना देता येतील. परंतु प्रस्तावातील त्रुटींचे कारण सांगून निधी नाकारणे योग्य नाही. हा निधी ऑक्टोबर महिन्यापूर्वी उपलब्ध करुन दिला जाईल काय?

श्री.रणजित कांबळे : जिल्हाधिकाऱ्यांमार्फत प्रस्ताव दुरुस्त करुन पाठवावयाचा आहे. तीर्थक्षेत्र विकासाची अंमलबजावणी जिल्हा परिषद करीत असते. कार्यकारी अभियंत्यांकडून प्रस्ताव तयार केला जातो. पैसे देण्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. महत्वाचे तीर्थक्षेत्र असून नांदेडमध्ये मोठा कार्यक्रम होणार आहे. जागेबाबतचे 7/12 चे कागदपत्र आणि सीईओ यांची शिफारस आवश्यक आहे. जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यांनी प्रस्ताव तयार करुन पाठविला तर निश्चितपणे निधी दिला जाईल. काही कामे करु शकतो, काही कामे करता येणार नाहीत आणि काही कामांसाठी यापूर्वीच निधी दिला आहे. प्रस्ताव तयार करुन पाठविला तर निश्चितपणे निधी दिला जाईल.

**तालिका सभापती** : त्यांनी प्रस्ताव दुरुस्त करुन पाठवावा असे म्हणण्यापेक्षा विषयाचे महत्व लक्षात घेऊन जाणीवपूर्वक लक्ष देऊन प्रस्ताव लवकरात लवकर कसा येईल याचा विचार करुन निधी देण्याबाबत प्रयत्न करावा.

श्री.रणजित कांबळे : होय.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शिक्षणाधिकाऱ्यांची खोटी सही करुन बोगस मान्यता आदेश तयार केले जाणे

**मु. शी.** : शिक्षणाधिकाऱ्यांची खोटी सही करुन बोगस मान्यता आदेश तयार केले जाणे याबाबत सर्वश्री गुरुमुख जागवानी, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरुमुख जागवानी, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "शिक्षणाधिकाऱ्यांची खोटी सही करुन बोगस मान्यता आदेश तयार केले जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-20...........

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, अत्यंत गंभीर प्रकरण आहे. परंतु शासनाने याकडे दुर्लक्ष करुन केवळ दोन ओळीचे निवेदन सादर केले आहे. नगर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळातील शिक्षक व शिक्षकेतर पदाच्या मान्यतेच्या संदर्भातील विषय आहे. शिक्षणाधिकारी म्हणून काम करणारे जे अधिकारी होते त्यांची त्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी बदली झाल्यानंतर नवीन शिक्षणाधिकारी त्याठिकाणी रुजू झालेले आहेत. त्यांनी जवळजवळ 110 शाळांच्या संदर्भात गैरमार्गाने मान्यता दिली आहे. मान्यता देत असताना पूर्वीच्या शिक्षणाधिकाऱ्यांची सही आता या कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली. जे अधिकारी त्याठिकाणी काम करीत नाहीत त्या अधिकाऱ्यांची सही करुन या शाळामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना मान्यता देण्याची प्रकरणे जिल्हा परिषदेने केली आहेत.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ प्रथम श्री. भोगले..... 16:40

श्री. रामनाथ मोते ....

यामध्ये जवळ जवळ 1 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला असून यासंदर्भात वर्तमानपत्रात रकानेच्या रकाने भरुन येत होते. हे प्रकरण केवळ एक-दोन शाळेच्या बाबतीत बाहेर आलेले आहे परंतु अशा 1-2 शाळा नसून अशा जवळ जवळ 110 शाळा असून त्यातील 111 कर्मचा-यांचा हा विषय आहे. शासनाने उत्तर दिलेले आहे की, या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्याचे शिक्षण संचालकांना दिलेले आहेत. संचालकांना सांगून चौकशी झाली असे हे साधे प्रकरण नाही. छोटया अधिका-यांकडून या प्रकरणाची चौकशी होऊ शकणार नाही त्यामुळे या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता या प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करण्यात येणार आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 16 एप्रिल, 2008 रोजी दैनिक लोकमत या वर्तमानत्रामध्ये यासंदर्भात पहिल्यांदा बातमी आली होती. ही बातमी आल्याबरोबर संचालक माध्यमिक आणि उच्च माध्यमिक यांना चौकशी करण्याचे कळवले आहे. सनमाननीय सदस्य ही गंभीर बाब सांगत असल्यामुळे मी सुध्दा गंभीर झालेला आहे. त्यामुळे यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, एक महिन्याच्या आत चौकशी करतो व संबंधितांवर ताबडतोब कारवाई करतो. अगोदर चौकशी न करता हे प्रकरण आपल्याला सीआयडी कडे देता येणार नाही त्यामुळे एक महिन्यात चौकशी करुन संबंधितावर कारवाई करतो एवढे या निमित्ताने सांगू इच्छितो.

-------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शेगांव जि. बुलढाणा येथील तहसीलदार व तलाठी यांनी रेकॉर्डमध्ये केलेला फेरफार

**मु. शी.** : शेगांव जि. बुलढाणा येथील तहसीलदार व तलाठी यांनी रेकॉर्डमध्ये केलेला फेरफार

याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ( सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "तहसीलदार व तलाठी यांनी रेकॉर्डमध्ये केलेला फेरफार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी मी जी 93 ची सूचना दिलेली आहे त्यामध्ये तहसिलदार आणि तलाठी यांनी गडबड केलेली आहे. ज्यावेळेला श्री. टिबडेवाल यांनी बँकेचे कर्ज घेतले तेव्हा त्यांनी आपली कुठलीही मालमत्ता बँकेला गहाण करुन दिली नाही. गहाण करुन न देता एका स्थानिक लोकप्रतिनिधीच्या दबावाने त्यांच्या प्रॉपर्टीवर तहसीलदार आणि तलाठयांनी बोजा चढवलेला आहे. रजिस्टर नोंदणीपत्र झाल्यावर किंवा रजिस्टर गहाणखत झाले असेल तरच बोजा चढवला जात असतो. परंतु अशा प्रकारे काही झाले नसतांना त्यांच्या प्रॉपर्टीवर बोजा चढवण्यात आलेला आहे. त्यामुळे तहसीलदारांवर व तलाठयांवर आपण कारवाई करणार आहात काय?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, जामीनदार म्हणून या लोकांच्या प्लॉटवर बोजा चढवण्यात आलेला आहे. त्याचा फेरफार 363865 नुसार फेरुार 17.8.99 ला घेण्यात आलेली आहे परंतु त्याची नोंद करावयाची राहिली होती. बँकेने तक्रार केल्यानंतर तहसीलदाराने तपासणी केली, डेप्युटी कलेक्टरांकडे याबाबत अपिल झाले होते. या प्रकरणातील सगळया गोष्टींची शहानिशा झालेली आहे. त्यामुळे तहसीलदार आणि तलाठयाने काहीही चुकीचे केलेले नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण उत्तरामध्ये दिलेले आहे की, 15 फेब्रुवारी, 2003 रोजी रेकॉर्डवर कोणत्याही प्रकारची नोंद आढळून आलेली नाही. त्यामुळे सन 2003 संबंधिताचे रेकॉर्ड क्लिअर होते असा त्याचा अर्थ होतो. तेव्हा बोजा चढवला नव्हता, कर्ज आधीचे होते. बँक कर्ज देतांनाच गहाणखत करुन घेते आणि बोजा चढवल्यानंतर बँक पैसे देत असते. परंतु या ठिकाणी असे काही झाले नाही. नंतर हा बोजा जामीनदाराच्या प्रॉपटीवर चढवण्यात आला, नंतर पोलीस स्टेशनला तक्रार करुन त्यांना अटक करण्यात आले. या ठिकाणी अन्याय झालेला असल्यामुळे या प्रकरणाची आपण चौकशी करण्याची आवश्यकता आहे. तहसीलदाराने एका आमदाराच्या दबावाखाली हे कृत्य केलेले आहे त्यामुळे फेर चौकशी करुन पटवारी आणि तहसीलदारावर कारवाई केली जाणार आहे काय?

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदया, गहाणखत जवळ जवळ 8 प्रकारची असतात या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेण्याचा प्रयत्न केला होता. यामध्ये काहीही चुकीचे किंवा इल्लीगल झालेले नाही. तरी सन्माननीय सदस्यांच्या मागणी प्रमाणे या प्रकरणाची फेर चौकशी करण्यात येईल.

---------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील वाळकेश्वर भागातील मूळ भाडेकरुना वगळून विकासकाने शासनाची केलेली फसवणूक

**मु.शी.** मुंबईतील वाळकेश्वर भागातील मूळ भाडेकरुना वगळून विकासकाने शासनाची केलेली फसवणूक याबाबत सर्वश्री पांडुरग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

ॲड. प्रितमकुमार शेगावकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी मुंबईतील वाळकेश्वर भागातील मूळ भाडेकरुना वगळून विकासकाने शासनाची केलेली फसवणूक या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, वाळकेश्वरला जाताना जो चौपाटी लगतचा रस्ता आहे त्याच्या बाजूलाच ही इमारत आहे आणि त्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी परवानगी देण्यात आली आहे. माझ्याकडे त्यातील भाडेकरूंचे एक शिष्टमंडळ भेटावयास आले होते. दाणी चाळ म्हणून ती इमारत आहे आणि त्यामध्ये मूळचे 42 भाडेकरू होते. परंतु त्यांची नावे त्या इमारतीतील भाडेकरूंच्या यादीतून काढून टाकून नवीन नावे टाकण्यात आली आहेत आणि त्या मूळच्या 42 भाडेकरूंना वंचित करण्यात आले आहे. शिवाय जी नवीन नावे त्यात टाकली आहेत त्यामध्ये एकाच माणसाची 3-3 वेगवेगळी नावे टाकण्यात आली आहेत. अशा पद्धतीने मूळच्या 42 भाडेकरूंवर अन्याय झालेला आहे, त्यांना तेथून हाकलून देण्यात आले आहे. तेथे विकासकाला इमारत पुनर्विकासासाठी परवानगी आपण दिलेली आहे. सभापती महोदय, आपण राजभवनला जातो तेथून जवळ हा रस्ता आहे आणि तेथे वाहतूक नेहमीच जाम होत असते. अशा रस्त्या लगत ही इमारत असून तेथे त्यांना पुनर्विकासाठी 2 एफएसआय दिलेला आहे. त्या इमारतीतील मूळच्या भाडेकरूंनी या अन्यायाबाबत गृहनिर्माण मंत्र्यांना निवेदन दिलेले आहे आणि त्याची प्रत आता माझ्याकडे आहे. त्यांना तेथून हाकलून देण्यात येऊन त्यांना फसविण्यात आले आहे. तेव्हा असे करणारे जे कोणी आहेत त्यांच्यावर तुम्ही कारवाई करणार आहात काय ? दुसरे म्हणजे या इमारतीची उंची ग्राऊंड पासून 31.35 मीटर धरली आहे, खरे तर समुद्र सपाटीपासून ती तेथे गृहीत धरली गेली आहे. त्यामुळे त्यात 6 मीटरचा फरक पडतो आहे. तेव्हा त्याबाबतही चौकशी आपण करणार काय ? तसेच त्याचे जे काही बांधकाम सध्या चालू आहे ते थांबविणार काय ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेता यांनी येथे जी माहिती दिली आहे त्या संदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, हे जे 42 निवासी भाडेकरू आहेत त्यातील कोणीही लेखी तक्रार त्यांच्यावर झालेल्या अन्यायाबाबत केलेली नाही ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझ्याकडे त्यांची यादी आहे आणि माननीय राज्यमंत्र्यांकडे जी यादी आहे ती देखील आहे. त्यात एकाच माणसाची तीन तीन नावे आहेत...

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, मला असे सांगावयाचे आहे की, त्यांनी त्यांच्यावरील अन्यायाबाबत तक्रार केली तर जरूर त्याबाबत चौकशी करण्यात येईल. पण तशी तक्रार त्यांच्याकडून आलेली नाही. किंवा उपजिल्हाधिकारी तसेच महापालिकेचे वॉर्ड ऑफिसर

...... 3एन 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. शेगावकर .....

यांच्याकडे देखील कोणत्याही प्रकारे लेखी तक्रार केलेली नाही. त्यामुळेच त्याबाबत अजून चौकशी केली गेलेली नाही. मात्र आता माननीय विरोधी पक्षनेता यांनी सांगितले आहे तेव्हा त्याबाबत जरूर चौकशी करून त्यांना आपण न्याय देऊ. तसेच ही जी परवानगी या विकासकाला दिलेली आहे ती महापालिकेने दिली आहे ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, त्यांना परवानगी दिल्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. परंतु जे त्या इमारतीतील मूळ भाडेकरू आहेत त्यांनाच त्या यादीतून त्यांनी बाजूला सारले आहे, त्याबद्दल आपण काय करणार आहात ?

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदया, एका माणसाच्या नावावर, म्हणजे एक उदाहरण म्हणून आपण असे समजू की, श्री. प्रीतमकुमार शेगावकर यांचे नाव त्या यादीत आहे आणि त्यांच्या नावावर अचानक तीन खोल्या झाल्या असतील तर ते निश्चितच गैर आहे.. त्यामुळे ...

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदया, अजून तेथे बांधकामच झालेले नाही त्यामुळे काही प्रश्नच येत नाही. ..

श्री. जितेंद्र आव्हाड : परंतु त्यांची नावे त्या इमारतीतील भाडेकरूंच्या यादीतून काढली आहेत ना ? त्या जागी दुसरीच नावे आली आहेत आणि एकाच माणसाच्या नावे 3-3 खोल्या दाखविल्या असतील तर ते योग्य नाही. ..

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : त्या नावांचे व्हेरिफिकेशन करू. ..

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, आता सन्माननीय सदस्य श्री.आव्हाड यांनी जे उदाहरण दिले आहे ते येथे लागू होत नाही. त्यांनी उदाहरण देताना 'श्री.प्रीतमकुमार शेगावकर' असा उल्लेख केला आहे. खरे तर श्री.प्रीतमकुमार शेगावकर हे येथे राज्यमंत्री आहेत आणि त्यांच्या नावाचा उल्लेख अशा प्रकारे करता येणार नाही. तरी आपण ते रेकॉर्डवरून काढून टाकण्यात यावे.

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : तो रेकॉर्डवरून काढून टाकण्यात येईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदया, पण त्या इमारतीत जे मूळचे 42 भाडेकरू होते आणि त्यांची नावे नव्या यादीतून काढून टाकण्यात आली आहेत. मुंबईतील एक असेच प्रकरण मी दोन तीन वर्षापूर्वी काढले होते. एसआरए मध्ये टॉवर इमारत बांधली गेली आणि त्यात सगळ्यांची

..... 3एन 3 ...





श्री. आव्हाड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नावे दिलेली होती . तेव्हा अशाप्रकारे एकाच नावावर जर 3-3 खोल्या असतील तर त्यांच्यावर कारवाई करून तो झालेला घोटाळा आहे त्याची चौकशी करून आपण ती यादी रद्द करणार का ?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, जे मूळचे असे 42 भाडेकरू आहेत ते तेथे जागा मिळण्यापासून वंचित होणार आहेत वा झालेले आहेत तेव्हा त्यांचा समावेश त्या इमारतीतील भाडेकरूंच्या यादीत आपण करणार काय आणि एका माणसाच्या नावे 3-3 खोल्या घेतल्या गेल्या आहेत त्याची चौकशी करणार काय ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदया, याबाबत चौकशी करण्यात येईल आणि आपण जे अन्य प्रश्न उपस्थित केले आहे त्या सर्वांबद्दल चौकशी करण्यात येईल.

***

<u>**नियम 93 खालील निवेदन क्र. 3 बाबत ....**</u>

**तालिका सभापती** : नियम 93 खालील निवेदन क्रमांक 3 माननीय सदस्य तसेच माननीय राज्यमंत्री यांच्या विनंतीनुसार उद्या घेण्यात येईल.

****

( यानंतर सौ.रणदिवे..... 3ओ 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : गोंदिया जिल्हयातील मौ.कारंजा येथील जिल्हा कारागृहाचे बांधकाम करण्यासाठी शेतकऱ्यांची जमीन संपादन करणे

मु. शी. : गोंदिया जिल्हयातील मौ.कारंजा येथील जिल्हा कारागृहाचे बांधकाम करण्यासाठी शेतकऱ्यांची जमीन संपादन करणे याबाबत सर्वश्री.नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर,केशवराव मानकर, जगदीश गुप्ता वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, केशवराव मानकर, जगदीश गुप्ता यांनी "गोंदिया जिल्हयातील मौ.कारंजा येथील जिल्हा कारागृहाचे बांधकाम करण्यासाठी शेतकऱ्यांची जमीन संपादन करणे"या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ओ-2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदया, हाय कोर्टामध्ये याचिका क्र.176/02 रिट पिटीशन दाखल करण्यात आला. यासंदर्भात दि.29-9-2004 रोजी जो निकाल देण्यात आला, त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,"शासकीय जमीन उपलब्ध नसल्यास शासनाने खाजगी जमीन संपादित करुन कारागृहाचे बांधकाम करावे" असे निर्देश दिलेले आहेत. याच जागेच्या बाजूला तेथे जमीन उपलब्ध आहे. शासन ज्यांची जमीन घेणार आहे, ती घेतल्यामुळे संपूर्ण परिवारच बेधर होणार आहे. या परिवारामध्ये श्री.राधेलाल गोसू बलबद्रे, विधवा, श्रीमती तेजनाबाई दूधबोंद्रे आणि श्रीमती हेमलता टेकचंद बलबद्रे अशा लोकांची 100 टक्के जमीन शासन घेत आहे. याठिकाणी वडील, बहीण आणि पत्नी रहात आहेत. शासनाला हाय कोर्टाने आदेश दिलेले आहेत की, तेथे शासकीय जमीन असेल तर ही जमीन घेऊ नका. त्यामुळे हाय कोर्टाच्या आदेशानुसार पुन्हा ही केस तपासून जर त्याठिकाणी बाजूला शासकीय जमीन उपलब्ध असेल तर या लोकांची जमीन तुम्ही संपादित करणार नाही असे माननीय मंत्री महोदय आश्वासन देणार आहेत काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय,यामध्ये जमीन संपादित करणारी संस्था ही कारागृह विभाग असून कारागृहासाठी जागा संपादित करावयाची आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी येथे माहिती दिलेली आहे की, हाय कोर्टाने खाजगी जमीन संपादित करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जर या कुटुंबाची सर्व जागा संपादित होत असेल तर त्याबाबत माहिती घेऊ आणि तेथे शासकीय जमीन उपलब्ध असल्याचे आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यांबरोबर पुन्हा एकदा चर्चा केली जाईल आणि सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती तंतोतंत खरी असेल तर आपल्याला अभिप्रेत अशी कारवाई करु.

-----

. . . .3 ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



<u>औचित्याच्या मुद्याबाबत</u>

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : 93 च्या निवेदनांवरील चर्चा संपलेली आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, मला औचित्याचा मुद्दा मांडावयाचा आहे.

**तालिका सभापती** : आता संध्याकाळचे 5.00 वाजलेले आहेत आणि अजून लक्षवेधी सूचनांवरील प्रश्नोत्तरे व्हावयाची आहेत. परंतु याठिकाणी लक्षवेधी क्रमांक 1 चे निवेदन प्राप्त झ ाालेले नाही.

श्री.नारायण राणे : सभापती महोदया, सदनामध्ये निवेदन देण्यात आलेले आहे. परंतु मला एक गोष्ट सांगावयाची आहे की, सदनामध्ये हा विषय जवळजवळ सहा वेळा आलेला आहे. या लक्षवेधी सूचनेचे निवेदन सर्वांना वितरित केलेले आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आता लक्षवेधी सूचना क्र.1 घेण्यात येईल.

----

. . . .3 ओ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ. शी. : घोडबंदर रोडवरील हिरानंदानी कॉम्प्लेक्सच्या बाजूला असलेल्या आदिवासींच्या जमिनीवर

उभारलेला प्रकल्प

मु. शी. : घोडबंदर रोडवरील हिरानंदानी कॉम्प्लेक्सच्या
बाजूला असलेल्या आदिवासींच्या जमिनीवर
उभारलेला प्रकल्प यासंबंधी सर्वश्री.पांडुरंग फुंडकर,
जगदीश गुप्ता वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"श्री.मुंकुंद पटेल हे विकासक असलेल्या ऋतू डेव्हलपर्स प्रा.लि.यांनी ठाणे येथील घोडबंदर रोडवरील हिरानंदानी कॉम्प्लेक्सच्या बाजुला असलेल्या जमिनीवर उभारलेला प्रकल्प हा आदिवासींच्या जमिनीवर उभारला असल्साची उघडकीस आलेली घटना, श्री.मुकुंद पटेल यांनी या ठिकाणी रहात असलेल्या आदिवासींना धाकधपटशा दाखवून त्यांची जागा हडप करणे, त्याप्रमाणे खोटी कागदपत्रे बनवून या जागेवर अनधिकृतपणे इमारत बांधून या इमारतीतील सदनिका विकण्यास सुरुवात करणे, आदिवासींवर झालेल्या अन्यायाची त्यांनी श्री.पटेल यांच्याकडे दाद मागण्याचा प्रयत्न केला असता श्री.पटेल हे आपल्या गुंडामार्फत त्यांना मारहाण करीत असल्याच्या तक्रारी आदिवासींनी स्थानिक पोलीस स्थानकात नोंदवूनही याकडे पोलिसांचे होणारे दुर्लक्ष, कायद्यानुसार आदिवासींच्या जमिनीची खरेदी-विक्री करता येत नसतानाही श्री.मुकुंद पटेल या आदिवासींच्या जमिनीवरील या प्रकल्पाला स्थगिती देऊन आदिवासींच्या जमिनीची खरेदी-विक्री करणाऱ्या श्री.मुकुंद पटेल या ऋतु डेव्हलपर्स या विकासकावर शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका."

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.



निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . .3 ओ-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आताच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, सदनामध्ये हा विषय सहा वेळा आलेला आहे. परंतु माझा ही लक्षवेधी सूचना मांडण्याचा मूळ हेतू असा आहे की, याठिकाणी सात आदिवासींची हत्त्या झालेली आहे. आदिवासींना बळजबरीने धाक दाखवून, त्यांच्यावर दबाव आणून त्यांच्याकडून जमीन लिहून घेतली, या जमिनी ताब्यात घेतल्या आणि त्याठिकाणी इमारत बांधण्यास सुरुवात केली. परंतु याबाबतीत चौकशी होत नाही. या सदना

मध्ये हा विषय सहा वेळा आलेला आहे. इतका हा सिरिअस विषय आहे. याठिकाणी बोगस कागदपत्रे तयार करण्यात आली आणि दबावाने त्यावर आदिवासींच्या सह्या घेतल्या आहेत. याची चौकशी केली जाणार आहे काय ?

यानंतर कु.गायकवाड . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KGS/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 16:55

श्री. पांडुरंग फुंडकर..

विकासक किंवा बिल्डर्स तेथील आदिवासी लोकांकडून दमदाटी करुन किंवा खोटया सहया त्यांना करायला लावतात. तसे केले नाही तर त्यांची हत्या देखील करतात. यासंदर्भात सीआयडी चौकशी करण्याबाबत माननीय मंत्री महोदय कार्यवाही करतील काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जो प्रश्न येथे विचारला आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, कोलशेत येथील सर्व्हे नंबर 120/10 व सर्व्हे नंबर 114/ 7 या दोन जमिनींवर त्यांची मालकी होती. सर्व्हे नंबर 114/7 या जमिनीवर कोणतेही बांधकाम झालेले नाही. ती जागा मोकळी आहे. हा प्रश्न 120/10 या सर्व्हे नंबरशी संबंधित आहे. या जमिनीचा एरिया 8680 चौमी. आहे. श्री. महाले हे तेथील मूळ मालक कूळ होते. ते मयत झाल्यानंतर त्यांचे वारस श्रीमती जानकीबाई खाडे, यमुनाबाई वाघमारे यांना कूळ कायद्याच्या कलम 32 (ग) अंतर्गत विक्री व फेरफार क्रमांक 1780 अन्वये त्यांचे वारस यांना जमीन देण्यात आली आहे. हा निर्णय 25/1/91मध्ये झालेला आहे. लक्षवेधीचा विषय व सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न हा विषय वेगळा आहे. या बाबत नियमानुसार नोंदी झालेल्या आहेत. या जमिनी बोगस व दमदाटीने हस्तांतरित केलेल्या आहेत असा मुद्दा येथे उपस्थित करण्यात आला होता. ही जमीन वारसांकडे आल्यानंतर त्यांनी बिनशेतीची परवानगी घेतली. तसेच त्यानंतर डेव्हलपमेंटचे अधिकार श्री. पटेल यांना दिल्यामुळे त्यांनी या इमारती रीतसर परवानगी घेऊन बांधलेल्या आहेत. त्यांनी नंतर परत अर्ज केला की, ही जमीन आम्हाला ताब्यात द्या असे त्यांनी मागणी केली. ही जमीन त्यानंतर विकण्यात आली. त्यास परवानगी देण्यात आली होती. 1966, कलम 36 अंतर्गत कार्यवाही झाली. आता सर्व गोष्टी झालेल्या आहेत. पुन्हा ती जमीन मागण्यासाठी सदर मालक कोर्टामध्ये गेला आहे व कोर्टाने त्यास स्थगिती दिलेली आहे. हा विषय कोर्टामध्ये आहे. हे कागदपत्रे बोगस आहेत, दमदाटी देण्यात आली हा वेगळा विषय आहे. तरी देखील या दोन्ही गोष्टींची चौकशी केली जाईल. तसेच आदिवासींच्या जमिनीवर कब्जा केला असेल तर त्यासंबंधी योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ठाणे शहरातील वाढत्या नागरिकरणासंदर्भातील महत्वाचा विषय आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये आदिवासी भाग आहे. ऋतुराज डेव्हलपर्स यांनी काही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड..

ठिकाणी सेल परमिशन घेतलेली नाही. तसेच थर्ड पार्टी इंटरेस्ट करुन हे प्रकरण कोर्टात गेलेले आहे. अशाच प्रकारची अनेक प्रकरणे ठाणे जिल्हयामध्ये आहेत. महसूल विभागाकडून आदिवासी लोकांना न्याय मिळेल असे वाटत नाही. त्यांच्याकडून जातीची दाखले धेतले जातात, तारखांवर तारखा दिल्या जातात व त्यांची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे कालांतराने ते या प्रक्रीयेमध्ये थकून जातात व नाईलाजाने खटले मागे घेतात. ऋतुराज डेव्हलपर्स यांनी घेतलेल्या जमिनीची आजच्या बाजारभावानुसार 20 कोटी रुपये आहे. या पैकी आदिवासी लोकांना किती रुपये मिळालेले आहेत हे ईश्वरच जाणो. प्रत्येक बिल्डरकडे अशा प्रकारे आदिवासीच्या 10 -10 एकर जमिनी असतील. हे मी आपणास खात्रीशीरपणे सांगत आहे. जमीन विकण्याची परवानगी न घेता बिल्डराने तेथे इमारती बांधून पूर्ण केलेल्या आहेत अशा जमिनींच्या बाबत एखादा अर्ज आपल्याकडे आल्यास त्याबाबत चांगला अधिकारी नेमून काही कारवाई केली जाईल काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मूळ प्रश्नाचा व लक्षवेधीमधील प्रश्नातील विषयाचा काहीही ंसबंध नाही. तरी देखील सन्माननीय सदस्यांना अभिप्रेत आहे त्याप्रमाणे मी सांगू इच्छितो की, अशा प्रकारच्या तक्रारी आल्यास खास अधिकारी नेमून चौकशी करण्यात येईल. परंतु तशा तक्रारी येणे आवश्यक आहे.

**तालिका सभापती** ( श्रीमती उषा दराडे ) : या लक्षवेधीच्या संदर्भात मला माझे समाधान करुन घ्यावयाचे आहे. येथे उल्लेख केलेला आहे की, श्री. मुकुंद पटेल यांनी दिनांक 14.1.08च्या सुनावणीचक वेळी मा. सिव्हील जज सिनियर डिव्हीजन ठाणे यांचेकडील स्पेशल सिव्हील सूट क्रमांक 4/. अन्वये दिनांक 4.7.2007 च्या आदेशाची प्रत सादर केली असून सदर ओदश पुढीलप्रमाणे आहे. "Defendants are here restrained by way of temporary "injunction to obstruct Plaintiffs possession by themselves or through anybody claiming through them or to create any third party interest therein and so issue false public notice in respect of suit property till disposal of the suit."

यानंतर श्री. बरवड..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ......

त्यांचे ओनरशीप झालेले आहे की नाही, सेलडीड खरे आहे की नाही हे कोर्ट ठरविणर. त्याची चौकशी आपण कशी करणार ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदया, मी सुरुवातीलाच सांगितले की, ही केस कोर्टामध्ये आहे. त्या विषयावर मी भाष्य केलेले नाही. सन्माननीय सदस्यांनी दमदाटी करुन सह्या घेतल्या आहेत किंवा त्या ठिकाणी फसवणूक झालेली आहे हा जो वेगळा विषय सांगितला त्याची चौकशी करु असे मी सांगितले आहे. मूळ जो विषय आहे त्या संदर्भात मी सांगितले आहे की, केस कोर्टात असल्यामुळे आम्हाला काही करता येत नाही.

**तालिका सभापती** : दम देऊन हे सेलडीड खोटे झालेले आहे असा आरोप कोणी सिव्हिल कोर्टात केलेला आहे काय हे आधी तपासून घ्यावे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदया, ते तपासल्यानंतरच मी सांगितले आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुलुंड (पूर्व) नवघर मार्ग येथील छत्रपती संभाजी राजे क्रीडांगणाचा काही भाग बिल्डरला देण्यात येणे

**मु. शी.** : मुलुंड (पूर्व) नवघर मार्ग येथील छत्रपती संभाजी राजे क्रीडांगणाचा काही भाग बिल्डरला देण्यात येणे यासंबंधी श्रीमती अलका देसाई, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती अलका देसाई ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"मुलुंड (पूर्व) नवघर मार्ग येथील 'मुलुंड जिमखान्या' लगतचा महानगर पालिकेचा गार्डन करिता राखीव भुखंड (भुभाग क्र. 713 ते 715) तसेच छत्रपती संभाजी राजे क्रीडांगणाचा काही भाग अनधिकृतरित्या आरक्षणमुक्त करुन बिल्डरला देण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, 2008 मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास येणे, सदरहू बिल्डरने तेथे अर्धे गार्डन तोडून तसेच मैदानाचा काही भाग अनधिकृतरित्या ताब्यात घेऊन स्वत:च्या फायद्यासाठी खासगी रस्ता बांधणे, याबाबत संबंधित प्रशासनाकडे चौकशी केली असता त्यांनी दिशाभूल करणारी माहिती देणे, जनतेची होणारी गैरसोय दूर करण्याकरिता स्थानिक नागरिकांनी माहितीचा आधार घेतला असता सदरहू राखीव भूखंड सार्वजनिक रस्त्याचे बांधकाम करण्याकरिता उक्त बिल्डरला देण्यात आलेला असून सदरहू जागेवर बिल्डरने त्या नियमाचा गैरवापर करुन बांधकाम केल्यानंतर त्याचा वापर स्वत:च्या फायद्याकरिता सध्या करित असल्याचे उघड होणे, परिणामी जनतेमध्ये निर्माण झालेली चिडीची भावना, याप्रकरणी शासनाने त्वरीत चौकशी करुन दोषी व्यक्तींविरुध्द करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदया, मुलुंड (पूर्व) नवघर येथील छत्रपती शिवाजी मैदान भूभाग क्रमांक 713 ते 715 मधील 464 चौरस मीटरचा भूखंड एका विकासकाने जबरदस्तीने घेतलेला आहे. त्यांनी नियमाप्रमाणे त्या ठिकाणी काम केले असते तर त्यांना सातच मजल्यांच्या इमारतीची परवानगी मिळाली असती. परंतु त्या विकासकाने मुंबई महानगरपालिकेच्या सुधार समितीमध्ये ठराव आणून छत्रपती संभाजी राजे मैदानातून जबरदस्तीने रस्ता घेतलेला आहे आणि तेथील नागरिकांसाठी ही खेदाची गोष्ट आहे. हे खेळाचे मैदान आहे. या संबंधित गोष्टींची चौकशी करुन त्या विकासकाला जास्तीत जास्त शिक्षा करावी अशी माझी मागणी आहे, शासन त्यांना जास्तीत जास्त शिक्षा करील काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदया, या ठिकाणी उपरोक्त प्लॉटच्या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आलेली आहे त्या प्लॉटला जो ॲक्सेस होता त्याची लांबी 260 मीटर होती. 260 मीटर लांबी असेल तर त्यांची रुंदी विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे 9 मीटर असावयास पाहिजे. त्याशिवाय त्यांना परवानगी देता येत नाही. त्या रस्त्याची लांबी कमी होती. त्या कारणाने त्या ठिकाणी मुंबई महानगरपालिकेचा जो अधिनियम आहे त्या अधिनियमाच्या कलम 92(सी) प्रमाणे लायसन्स फी घेऊन महानगरपालिकेला अशा पध्दतीची परवानगी देता येते. त्यामुळे त्यांनी सुधार समितीचा ठराव आणि जनरल बॉडीचा ठराव असे ठराव घेऊन वार्षिक 37,950 रुपये लायसन्स फी आकारण्यात आली आहे. ती फी दरवर्षी घेण्यात येते. यासंदर्भात हे सर्व नियमात बसवून करण्यात आलेले आहे. परंतु सन्माननीय सदस्यांकडे जी उपलब्ध माहिती आहे त्या अनुषंगाने चौकशी करणे आवश्यक आहे असे जर सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल तर जरुर चौकशी करण्यास शासनाची हरकत नाही. संबंधित माहिती त्यांनी शासनाकडे किंवा आयुक्तांकडे द्यावी. शासनाच्या वतीने त्यासंबंधी चौकशी करता येऊ शकेल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदया, इतर लोकांना गार्डनमधून रस्ता घेण्यासाठी परवानगी शासनाकडून मिळणार आहे काय, असा माझा पहिला प्रश्न आहे. माननीय मंत्रिमहोदयांना नक्की कोणत्या प्रकारची माहिती हवी आहे ? त्या ठिकाणी खेळाच्या मैदानातील जागा तो विकासक परत खेळाच्या मैदानासाठी देणार आहे काय ? त्यांची तशी इच्छा आहे काय ?

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, त्या ठिकाणी जो प्लॉट आहे तेथे बांधकाम चालू आहे. या खेळाच्या मैदानामधून कडेच्या बाजूने ॲक्सेससाठी 9 मीटरचा रस्ता घेतलेला आहे. त्या ठिकाणी खेळाचे मैदान कमी होते असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. ही वस्तुस्थिती आहे की, त्या ठिकाणी 464 चौरस मीटर खेळाचे मैदान कमी होत आहे. तेवढ्या जमिनीच्या पट्टयासंबंधी विकासकाकडून किंवा सिटी सर्व्हे क्रमांक 712 चे जे ओनर आहेत त्यांच्याकडून त्या जमिनीची पट्टी घेण्याच्या संदर्भात शासनाकडून महानगरपालिकेला सूचना देण्यात येतील.

-----

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/ श्री.बरवडनंतर 17:05

**पृ. शी.** : ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांना देय वेतनापेक्षा कमी वेतन देण्यात येणे

**मु. शी.** : ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांना देय वेतनापेक्षा कमी वेतन देण्यात येणे यासंबंधी सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आलेल्या अनुदानित व विना अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतरांचे शासनाकडून मिळणारे वेतन अनुदान शिक्षक-शिक्षकेतरांच्या वैयक्तिक बँक खात्यावर जमा न होता ठाणे महानगरपालिकेच्या खात्यावर जमा होणे, महापालिकेने देय वेतनापेक्षा कमी वेतन देणे, अशाप्रकारे वेतन अनुदानातील लाखो रुपये ठाणे महापालिकेकडून हडप केले जात असल्याचा व्यक्त होत असलेला संशय, विना अनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेतरांना अनुदान मिळेपर्यंत महापालिकेने शासनाच्या वेतनश्रेणीनुसार वेतन देणे बंधनकारक असतानाही कमी वेतन देणे, निम्न वेतनश्रेणी दिल्यामुळे शिक्षक शिक्षकेतरांच्या निवृत्ती वेतनामध्ये होणारे प्रचंड नुकसान, प्रशिक्षित पदवीधारकांना (बीए/बीएससी/बीएड) शिक्षकांना डी.एड्. शिक्षकाची वेतनश्रेणी देणे, 24 वर्षाच्या सेवेनंतर निवडश्रेणीचा लाभ न देणे, याबाबत शिक्षक शिक्षकेतरांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, यासंबंधी शासनाची करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.राजेश टोपे ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती ( श्रीमती उषा दराडे )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदया, ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या जशा प्राथमिक शाळा आहेत तशा काही माध्यमिक शाळा सुध्दा आहेत. माध्यमिक शाळांपैकी अनुदानित काही शाळांना शासनाचे अनुदान मिळत आहे. शासनाच्या धोरणानुसार त्या शाळांना अनुदान मिळते. त्या शाळांसाठी शासनाने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांसाठी वेतनश्रेणी निश्चित केलेल्या आहेत. त्याप्रमाणे त्यांना वेतनश्रेणी देणे बंधनकारक आहे. या ठाणे महानगरपालिकेच्या ज्या अनुदानित शाळा आहेत त्या शाळांमध्ये काम करणारे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना शासकीय नियमाप्रमाणे आतापर्यंत वेतन मिळत होते. त्यावेळी चौथा वेतन आयोग लागू झाला त्यावेळी त्यांना लिमये आयोगाप्रमाणे वेतन मिळत होते. लिमये आयोगाची वेतनश्रेणी शासनाच्या वेतन आयोगापेक्षा जास्त होती. शासनाच्या वेतनश्रेणीप्रमाणे शासन पगार देत होते आणि लिमये आयोगाप्रमाणे महानगरपालिका पगार देत होती. त्याच आधाराचा फायदा घेऊन दिनांक 1.4.2006 पासून शासनाकडून मिळणारे वेतन बंद करण्यात आले. शासनाकडून 10 लाख रुपये शिक्षकांचे वेतन मिळत होते पण त्यांना 8 लाख रुपये दिले जात होते. त्यामुळे शासनाचे 2 लाख रुपये शिल्लक रहात होते. ही रक्कम महापालिका शासनाकडे जमा करीत होती. याबाबत तक्रार केल्यानंतर शासनाकडे रक्कम दिली असेल हा भाग वेगळा. परंतु महाराष्ट्रामध्ये शासकीय अनुदान मिळणारी एकही शाळा मग नगरपालिकेची असो, महानगरपालिकेची असो किंवा खाजगी असो. त्यांना शासनाच्या वेतनश्रेणीपेक्षा कमी वेतन मिळत नाही. एक विचित्र परिस्थिती ठाणे जिल्हयामध्ये आहे. महानगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षकांना शासनाच्या वेतनश्रेणीपेक्षा कमी वेतन मिळते. याबाबत शिक्षण उपसंचालक यांनी महानगरपालिकेला एक पत्र दिले आहे त्यात असे म्हटले आहे की, "महानगरपालिका माध्यमिक शाळा इतर खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांशी समांतर आहेत. महानगरपालिका शाळातील मान्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना शासनाने मंजूर केलेल्या वेतन श्रेणीपेक्षा कमी वेतनश्रेणी देऊ शकणार नाही. व तसे केल्यास माध्यमिक शाळा संहितेत नमूद केल्याप्रमाणे कारवाईस पात्र ठरतील. तसेच शासनाने मंजूर केलेल्या वेतनश्रेणी पेक्षा जादा वेतनश्रेणी दिल्यास शासनाने मंजूर केलेल्या वेतनश्रेणी इतकेच अनुदान महानगरपालिका नियमानुसार दिले जाईल" हे मान्य आहे. त्यांना शासनाच्या वेतनापेक्षा कमी वेतन मिळत आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

सभापती महोदया, माझे 2-3 प्रश्न आहेत. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांपैकी असे कोणीही म्हणणार नाही की, शासनाकडून मिळत असलेल्या 10 हजार रुपयांपैकी आम्हाला 8 हजार रुपये पगार द्यावा. शासनाच्या नियमानुसार त्यांची वेतनश्रेणी सुरु झाली आहे तोच पगार त्यांना दिला जाईल काय आणि त्या कर्मचा-यांकडून जो पगार वसूल केला आहे तो त्यांना परत केला जाईल काय आणि ज्या अनुदानित शाळा आहेत त्यांचा पगार शासनाच्या नियमानुसार देणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी बराच वेळ हा प्रश्न डेव्हलप केला आहे त्यामुळे मी देखील उत्तर डेव्हलप करु इच्छितो. मला सुरुवातीलाच सांगितले पाहिजे की, महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे. महापालिकेच्या कर्मचा-यांची वेतनश्रेणी ठरविण्यासाठी आयोगाची स्थापना केली होती. त्या आयोगाच्या माध्यमातून 2001-2005 या 5 वर्षाकरिता पगार ठरविण्यासाठी कांबळे आयोग निर्माण करण्यात आला होता.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजेश टोपे...

याबाबतीत शिक्षक संघटना आणि शिक्षकेतर संघटना यांना विचारण्यात येते, त्यांच्या हरकती व सूचना घेण्यात येतात. पूर्वी लिमये आयोगाप्रमाणे राज्य शासनाच्या शिक्षण विभागाचा पगार मिळत होता. त्यांनी विनंती केली की आम्हाला महानगरपालिकेच्या वेतनश्रेणीप्रमाणे पगार मिळावा. कांबळे आयोगाप्रमाणे पगार धेण्याचे संधटनेने मान्य केले. त्या संघटनेने मागणी केल्यानंतर महानगरपालिकेने त्या संदर्भात ठराव केला. त्या ठरावाला शासनाच्या शिक्षण आणि नगर विकास विभागाने मंजुरी दिली. त्यानंतर महानगरपालिकेने शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी महानगरपालिकेची नवीन वेतनश्रेणी लागू झाली. संघटनेच्या मर्जीने या गोष्टी झालेल्या आहेत. एवढेच नाही तर प्रत्येक शिक्षकाने प्रतिज्ञापत्रावर लिहून दिलेले आहे की आम्हाला या संदर्भातील सर्व अटी व शर्ती तसेच महानगरपालिकेचा पगार मान्य आहे.त्यामुळे या प्रकरणी सर्व गोष्टी नियमाने झालेल्या आहेत. महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे.तसेच सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेल्या सर्कुलर व पत्राच्या उल्लेख करुन ठाणे महानगरपालिकासाठी शासन निर्णय काढण्यात आला आहे. त्यामुळे ठाणे महानगरपालिका माध्यमिक शाळातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याना महाराष्ट्र शाजगी शाळा सेवाशर्ती नियमावली, 1981 लागू होण्याऐवजी ठाणे महानगरपालिकेचे सेवाशर्ती नियम लागू होतील, असे आदेश काढले. मला हे स्पष्ट करावयाचे आहे की, शिक्षकांना या संदर्भाने जो फायदा दिला जातो तो मान्य करुन कांबळे आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी लागू केलेली आहे. शिक्षकेतर संधटनांचे म्हणणे असे आहे की राज्य शासनाची जी वेतनश्रेणी आहे त्यापेक्षा महानगरपालिकेची शिक्षकेतर कर्मचा-यांना मिळणारी वेतनश्रेणी जास्त आहे. शिक्षकेतर कर्मचा-यांना जी रजा आहे ती रजा राज्य शासनाच्या कर्मचा-यांना नाही. परंतु महानगरपालिकेच्या शिक्षकेतर कर्मचा-यांना बोनस, प्रवास भत्ते या अधिकच्या गोष्टी मिळत आहेत. त्यामुळे काही फायदे आणि काही तोटे आहेत. परंतु जे काही असेल ते आयोगानुसार मान्य झालेले आहे आणि त्या गोष्टी चालू आहेत. त्यामुळे शासनाची वेतनश्रेणी लागू करावी, ही त्यांची मागणी मान्य करता येणार नाही. कारण शिक्षकेतर संघटनेनेच महानगरपालिकेची वेतनश्रेणी मान्य केल्यामुळे आता शासनाची वेतनश्रेणी लागू करणे उचित होणार नाही. तसेच वसूल केलेला पगार परत करावा अशी मागणी केलेली आहे. पगार वसूल करुन तो परत करण्याचे राज्य शासनाचे काम झालेले आहे. त्यामुळे परत केलेला पगार परत वसूल करुन देऊ शकत नाही.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजेश टोपे...

तिस-या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, विनाअनुदानित शाळातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना महानगरपालिकेची वेतनश्रेणी लागू आहे.

श्री. संजय केळकर : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते आणि मी, आम्ही दोघांनी या माध्यमिक शिक्षकांच्या प्रश्नासंबंधी महानगरपालिकेमध्ये बैठक घेतली होती. अनेक मागण्या अधिका-यांनी मान्य देखील केलेल्या आहेत. शिक्षकांनी प्रतिज्ञापत्रावर लिहून दिले होते, असे माननीय मंत्री महोदयांनी सांगिले. आता हे प्रतिज्ञापत्र त्यांनी लिहून दिले होते की त्यांच्याकडून लिहून घेतले होते, याचा शोध मंत्री महोदयांनी घ्यावा. कोणताही शिक्षक जास्त वेतन नको कमी वेतन द्या असे लिहून देणार नाही.

..नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश केळकर ...

माझा पहिला प्रश्न असा आहे की, वेळेवर वेतन न मिळाल्यामुळे एका शिक्षकाने आत्महत्या करुन घेतली आहे ही गोष्ट खरी आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, बी.ए.बी.एड. शिक्षकाची शासनमान्य वेतनश्रेणी काय आहे ? तिसरा माझा प्रश्न असा आहे की, बी.एड.शिक्षकांना डी.एड.ची वेतनश्रेणी देतात ही गोष्ट खरी आहे काय ? माझा शवेटचा प्रश्न असा आहे की, शासनाकडून आलेल्या वेतनापेक्षा कमी वेतन दिल्याने अनुदानाची रक्कम किती आहे व ती रक्कम किती दिवस वापरली गेली आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदया, शासनाकडून मिळणारे शिक्षकांचे पगार, जिल्हा परिषदेकडून शिक्षकांना मिळणारे पगार सारखे आहेत. महानगरपालिकेच्या वेतनश्रेणीत स्वत: आयोगाकडून मागणी करुन शिफ्ट झाले आहेत. पूर्वीच्या काळात कदाचित तीन,तीन, चार,चार महिने पगार मिळत नव्हते. म्हणून महानगरपालिकेच्या त्या वेतनश्रेणीमध्ये मान्यता देण्याचे काम शिक्षक आणि शिक्षकेतर संघटनेने केले होते. दुस-या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, बी.एड.शिक्षकाची वेतनश्रेणी 5500 रुपये एवढी आहे आणि डी.एड.ची वेतनश्रेणी 4500 रुपये एवढी आहे. तिसरा प्रश्न किती रक्कम वापरली यासंबंधी विचारला गेला आहे, त्याबाबतीत सांगू इच्छितो की, 2006 ते 2008 या कालावधीत जे वेतन मिळत होते, तेवढे वेतन ॲडजेस्ट करुन उरलेली रक्कम 11 लाख,82 हजार 170 रुपये एवढी होती. सदर रक्कम दिनांक 31.3.2008 रोजी परत करण्यात आली आहे.

श्री. रामनाथ मोते : माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, शिक्षकांनी हमी पत्र लिहून दिले म्हणून आम्ही त्यांना शासनमान्य वेतनश्रेणीपेक्षा शासन अनुदान मिळत असतानाही कमी वेतनश्रेणी दिली जात आहे. सगळे शिक्षक शासनास लिहून द्यावयास तयार आहे की, आम्हाला शासनाकडून जे वेतन मिळते तेच वेतन आम्हाला दिले जावे. शासनाकडून दिले जाणारे वेतन त्या शिक्षकांना देण्यात येईल काय ?

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्यांनी माझे पूर्ण उत्तर ऐकलेले दिसत नाही. माझ्या उत्तरास सुरुवात अशी की, वेतनश्रेणीसंदर्भात आयोग स्थापन केला जातो. 2001 ते 2005 या कालावधीसाठीचा हा आयोग होता. या आयोगाकडून वेतनश्रेणी निश्चित केली जाते. नवीन आयोग लवकरच आयोग स्थापन होणार आहे. संघटनेने शासनाच्या वेतनश्रेणीप्रमाणेच वेतन पाहिजे अशा

2...

श्री. राजेश टोपे..

प्रकारची मागणी आयोगासमोर पुन्हा मांडली तर त्या मागणीच्या संदर्भात आयोग निश्चितपणे विचार करील. त्यासंबंधी महानगरपालिका ठराव करील. राज्य शासनाच्या वेतनश्रेणीसारखा पगार त्यांना देण्याच्या दृष्टीने अडचण असणार नाही. ही स्वायत्त संस्था असल्यामुळे महानगरपालिका यासंबंधी स्वतंत्र निर्णय घेत असते.

श्री. रामनाथ मोते : शासनाकडून अनुदान मिळत असताना त्यांना शासनातील कर्मचा-यांप्रमाणे पगार दिला जात नाही. राज्य शासनात बी.एड.शिक्षकाची वेतनश्रेणी 5500 रुपये एवढी आहे आणि डी.एड.ची वेतनश्रेणी 4500 रुपये एवढी आहे. महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांसाठी आयोग नेमले जातात ही गोष्ट आम्हाला मान्य आहे. पण ज्या अनुदानित शाळा आहेत, त्या शाळांतील शिक्षकांच्या पगारासाठीचे वेतन शासनाकडून दिले जात आहे. शासनाकडून शिक्षकांना जेवढे वेतन दिले जाते तेवढेच वेतन मिळावे अशी आमची मागणी आहे. या कर्मचा-यांच्या पेन्शनरी लॉस होत आहे. आयोग हे इतर कर्मचा-यांसाठी आम्ही समजू शकतो. त्यांचा आयोग आणि वेतनश्रेण्या याचा या शिक्षकांचा काहीही संबंध नाही. माननीय आबासाहेब आम्हाला आपण मदत करावी अशी माझी विनंती आहे.

श्री. राजेश टोपे : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांना विनंती करतो की, मी काही फॅक्ट फिगर सांगितल्या आहेत, जी काही माहिती सांगितली आहे ती वस्तुस्थितीला धरुन आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, राज्य शासनाची वेतनश्रेणी आणि महानगरपालिकेची वेतनश्रेणी यामध्ये फरक आहे. या विषयाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांच्या समवेत माझ्या दालनात बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीस शिक्षण विभागाचे सचिव, नगरविकास विभागाचे सचिव यांना देखील निमंत्रित करण्यात येईल. या बैठकीत सन्माननीय सदस्यांकडे जी माहिती आहे ती माहिती घेतली जाईल व त्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करुन योग्य तो मार्ग निश्चितपणे काढला जाईल.

**तालिका सभापती** : शिक्षण क्षेत्रातील इतरही आमदार आहेत त्यांना देखील त्या बैठकीस निमंत्रीत करावे.

श्री. राजेश टोपे : ठीक आहे.

------- यानंतर श्री. कानडे..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचनेबाबत**

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : लक्षवेधी सूचना क्रमांक 4 च्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी पत्र दिले आहे. या लक्षवेधी संदर्भात माहिती येणे बाकी असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात यावी अशी विनंती त्यांनी केली असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

-----

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुणे येथील कोझीकॉर्नर सोसायटीने मुसलमान व्यक्तिस सोसायटीचा सभासद करुन घेण्यास दिलेला नकार

**मु. शी.**: पुणे येथील कोझीकॉर्नर सोसायटीने मुसलमान व्यक्तीस सोसायटीचा सभासद करुन घेण्यास दिलेला नका यासंबंधी श्रीमती फौजिया खान, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, सदाशिवराव पोळ, विक्रम काळे, रणजितसिंह मोहिते-पाटील, रमेश शेंडगे श्रीमती उषाताई दराडे, श्रीमती मंदा म्हात्रे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती फौजिया खान ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" पुणे येथील अपमार्केट बोट क्लब रस्त्यावरील कोझी कॉर्नर या गृहनिर्माण सोसायटीत राहणाऱ्या श्रीमती कपूर यांनी त्यांची जागा श्री. हिराणी यांना विकण्याचा घेतलेला निर्णय व त्याप्रमाणे त्यांनी श्री. हिराणी यांच्याशी करार करुन गृहनिर्माण सोसायटीकडे ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज करणे, परंतु गृहनिर्माण सोसायटीने श्रीमती कपूर यांना तुम्ही एका मुसलमान व्यक्तिला जागा विकू शकणार नाही, असे बजावून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास दिलेला नका, भारतीय घटनेप्रमाणे कोणत्याही व्यक्तिला कोणत्याही ठिकाणी जागा घेऊन राहण्याचा हक्क असताना या सोसायटीने मुसलमान व्यक्तीला जागा विकण्यास केलेला प्रतिबंध, अशा प्रकारच्या घटना इतरत्रही घडणे, त्यामुळे तेथील मुस्लीम समाजात पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया "

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर (सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे ) ......3





<u>निवेदनानंतर</u>

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, वैसे तो इस लक्षवेधी सूचना का उत्तर मुझे सहकार मंत्री से पूछना नहीं था क्योंकि मैं इस लक्षवेधी के माध्यम से सदनिका के बारे में नहीं बल्कि एटीट्यूड के बारे में बात करना चाहती हूं. सौभाग्य से उप मुख्यमंत्री सदन में मौजूद है. हमारे देश में अनटचेबिलिटी को क्राईम माना गया है और उसके संबंध में शासन ने कानून बनाए हैं. लेकिन यह एटीट्यूड मुस्लिम समाज के लिए नया रुप ले रहा है, यह वस्तुस्थिति है. यह आप और हम सब जानते हैं. सच्चर समिति ने इस बात को दर्ज भी किया है. इसी संबंध में India Today, 2002 में "Muslim the New Untouchables" इस शीर्षक से cover story छपी है. घर देने के लिए अगर यह मानसिकता रखी जाती है कि मुस्लिम है इसलिए किराए पर घर नहीं दे सकते हैं, मुस्लिम व्यक्ति को घर नहीं बेचेंगे, उचित नहीं है. मैं खुद भी यह अनुभव ले चुकी है. मुझे भी एक बार यह कहा गया था कि आप मुस्लिम है इसलिए हम आपको हमारे यहाँ पर घर नहीं दे सकते हैं. उस समय मुझे जो मानसिक वेदना हुई थी वह आज भी मुझे याद है. प्रश्न यह है कि ऐसी घटनाएं आज आम हो गई है. इसलिए ऐसी घटनाओं को रोकने के लिए क्या प्रचलित कानून पर्याप्त है, अगर नहीं है तो क्या इन कानूनों में संशोधन किया जाएगा ? महाराष्ट्र में कई बहादुर सेक्युलर लोग है. भाई चारा और धार्मिक सद्भावना बनाए रखने और प्रोत्साहन देने संबंधी काम के लिए जिस तरह से " डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार " दिया जाता है. उसी तरह से हिन्दू-मुस्लिम एकता और भाई-चारा बनाए रखने और प्रोत्साहन देने के लिए "डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार " की धरती पर क्या "महात्मा गांधी कौमी एकता पुरस्कार " शुरु करके श्रीमती माधवी कपूर को पुरस्कार दिया जाएगा ? दूसरा मेरा यह प्रश्न है कि जिस प्रकार से गृहनिर्माण सोसायटी में एस.सी. समुदाय के व्यक्तियों के लिए मेंबरशिप अनिवार्य की जाती है उसी तरह सच्चर समिति की रिपोर्ट के बॅकग्राउण्ड में क्या मुस्लिम समुदाय के व्यक्तियों के लिए मेंबरशिप अनिवार्य की जाएगी ?

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांपैकी तिसरा प्रश्न माझ्या विभागाशी संबंधित आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे श्री. अमीर हिरानी यांना 31 मार्च 2003 रोजी सदनिकेचा ताबा दिलेला आहे. सेल डीड झालेले आहे. श्रीमती माधवी कपूर यांनी ही सदनिका विकली आहे आणि ती श्री. अमीन हिरानी यांनी घेतली. त्यासाठी बिर्ला हौसिंग फायनान्स या कंपनीकडून 20 लाखाचे कर्ज घेतलेले आहे. सोसायटीने एनओसी दिलेली आहे.

नंतर श्री. भोगले.

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सहकार खात्याच्या संदर्भातील मूळ प्रश्न आहे. गृहमंत्र्यांनी दोन प्रश्नाची उत्तरे द्यावीत असे सन्माननीय सदस्या म्हणाल्या हे योग्य नाही. ही वेगळी प्रथा पडत आहे. सहकार विभागाशी संबंधित लक्षवेधी सूचना आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये सदस्य करुन घेत नाही एवढा मर्यादित स्वरुपाचा विषय आहे. तिथे काय होणार, काय होणार नाही हा विषय वेगळा आहे. चुकीची प्रथा पडू नये. गृहमंत्री उत्तर देतील, महसूल मंत्री उत्तर देतील ही चुकीची पध्दत आहे.

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : अशी पध्दत पडणार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांचे म्हणणे रास्त आहे. परंतु अशा पध्दतीने चर्चा होऊ लागली तर लक्षवेधी सूचना संपणार नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, लक्षवेधी सूचनेचा विषय हा सहकार विभागाशी संबंधित आहे. श्रीमती माधवी कपूर यांनी पुणे येथील गृहनिर्माण संस्थेतील फ्लॅट श्री.इराणी यांना विकला. सोसायटीकडे ज्यावेळी ट्रान्सफरसंबंधीची कागदपत्रे सादर करण्यात आली त्यावेळी त्यांना वाटले की, खरेदीदार हे पारशी आहेत. परंतु ती व्यक्ती मुस्लिम असल्याचे कळून आले. ही सोसायटी 100 टक्के सिंधी समाजातील लोकांची आहे. खरेदी-विक्रीसंबंधीची सर्व कागदपत्रे तयार झाल्यानंतर सोसायटीकडे एनओसीसाठी प्रकरण गेले त्यावेळी सोसायटीने मुस्लिम व्यक्तीला सभासद करुन घेतले जाणार नाही असे सांगितले. प्रचलित नियम धाब्यावर बसवून सोसायटी मुस्लीम व्यक्तिला सदस्य करुन घेत नाही. मुस्लीम समाजातील व्यक्तिला सोसायटीचे सदस्यत्व द्यायचे की नाही एवढे मर्यादित स्वरुप नसून मुंबईमध्ये कित्येक सोसायट्यांमध्ये जैन विरुध्द हिंदू आणि शाकाहारी विरुध्द मांसाहारी असे तुंबळ युध्द सुरु आहे. हे प्रकार थांबविण्यासाठी सहकार विभाग योग्य ती पावले उचलणार आहे का?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, हा विषय अत्यंत व्यापक आहे. वेगवेगळ्या घटकांचा संबंध आहे. सहकार विभागाने सांगून एका मिनिटात कारवाई होणार नाही. हजारो वर्षाच्या मानसिकतेचा हा प्रश्न आहे. तरी देखील अशा गोष्टी घडू नयेत म्हणून सहकार कायद्यात बदल करता येतो का हे पाहिले जाईल. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी प्रतिनिधीत्वाबाबत सांगितले आहे. ही बाब तपासून पाहण्यात येईल. काही प्रमाणात प्रतिनिधीत्व

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.5.......... श्री.जयप्रकाश दांडेगावकर...

देता येते का हे तपासून पाहण्यात येईल. पुण्यातील वादग्रस्त सदनिका आणि ताबा या संदर्भातील वाद होता. 31.3 रोजी खरेदी खत झाले असून बिर्ला फायनान्सकडून कर्ज मिळाले आहे आणि सदनिका राहण्यास उपलब्ध होईल. पुण्यापुरता आणि लक्षवेधी सूचनेपुरता वाद मिटला आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदया, एक महत्वाचा प्रश्न या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत तसेच सन्माननीय सदस्या श्रमती फौजिया खान यांनी उपस्थित केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांना मुस्लीम सोसायटीत जागा मिळाली नाही तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांना हिंदू सोसायटीत जागा मिळाली नाही असे या ठिकाणी सांगण्यात आलेले आहे. कायद्याप्रमाणे भाषिक, वांशिक, धार्मिक आधारावर कोणीही अनटचेबल नाही, कोणालाही अशा प्रकारे नाकारता येणार नाही. कायद्यामध्ये जर त्रुटी असतील आणि त्या त्रुटींचा जर अशा प्रकारे फायदा कोणी घेत असेल तर त्रुटी शोधून त्यावर उपाययोजना केल्या जातील. एकंदरच धार्मिक सलोखा राखण्यासाठी त्यांनी अत्यंत चांगली सूचना केलेली आहे की, महात्मा गांधी कौमी एकता पुरस्कार दिला गेला पाहिजे. धार्मिक सलोखा निर्माण करण्याबाबत ज्या संघटना चांगले काम करतील, ज्या व्यक्ती चांगली कामे करतील त्यांना पुरस्कार देण्याच्या बाबतीत शासनाकडून योग्य पावले उचलले जातील.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ. शी.** : यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विविध स्तरावरील पदे रिक्त असल्यामुळे पसरलेला असंतोष

**मु. शी.** : यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विविध स्तरावरील पदे रिक्त असल्यामुळे पसरलेला असंतोष यासंबंधी सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, डॉ दीपक सावंत, डॉ. नीलम गो-हे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय येथील निवासी डॉक्टरांच्या ५१, परिचारिकांच्या सुमारे २५३, कर्मचाऱ्यांच्या १५६ व इतर १७६ जागा रिक्त असणे, त्यामुळे आरोग्य सेवेवर झालेला गंभीर परिणाम, निवासी वैद्यकिय अधिकारी परिचारिका व इतर कर्मचाऱ्यांच्या सेवा अत्यावश्यक असून सदर जागा रिक्त असल्याने तेथील डॉक्टरांवर व कर्मचाऱ्यांवर पडणारा अतिरिक्त ताण परिणामी रुग्णांना सेवा न मिळणे, अखिल भारतीय वैद्यक परिषदेच्या निकषानुसार वैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पिटलमध्ये कर्मचारी नसणे, तेथे रुग्णांची वाढलेली प्रचंड संख्या, वार्डमध्ये कर्मचाऱ्यांअभावी स्वच्छता नसणे, अपुऱ्या सुविधा असणे, परिणामी जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया "

श्री. सुरेश शेट्टी ( वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे ) ...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकसन बाजोरिया : सभापती महोदय, यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये रुग्णांची अत्यंत गैरसोय होत आहे. ही गैरसोय होण्यामध्ये महत्वाचे कारण म्हणजे या रुग्णालयात 154 पदे रिक्त आहेत. या ठिकाणी लक्षवेधी सूचनेच्या उत्तरातील पाचव्या पॅरेग्राफमध्ये जी माहिती दिलेली आहे त्यामध्ये विसंगती आहे. एकीकडे आपण म्हणत आहात की, 154 पदे रिक्त आहेत. पॅरा क्र. 4 मध्ये म्हणत आहात की, डॉक्टर्स व कर्मचा-यांच्या अभावी रुग्ण सेवेवकर कोणताही परिणाम झालेला नसून रुगण सेवा सुरळीत चालू आहे. पुढे असे लिहिले आहे की, विविध पदे संस्थेच्या मानकाप्रमाणे निर्मित करण्याबाबत विचार करण्यात येईल त्यामुळे माझा प्रश्न असा आहे या ठिकाणी एकूण किती पदे रिक्त आहेत तसेच ही पदे केव्हा भरली जाणार आहेत?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, उत्तरामध्ये सांगण्यात आले आहे की, 154 पदे रिक्त आहेत. यामध्ये वर्ग एक ची 25 पदे रिक्त असून वर्ग दोनची 22 पदे रिक्त आहेत. वेगवेगळया कॅटेगरीमिळून 154 पदे रिक्त आहेत. 154 पदे रिक्त असल्यामुळे या ठिकाणच्या सर्व सेवाच बंद झाल्या आहेत असा त्याचा अर्थ होत नाही. संपूर्ण राज्यात गेल्या पाच वर्षापासून पदांची रिक्रूटमेंट करण्यात आली नव्हती, यासंदर्भात आढावा घेतला जात होता. प्रत्येक मेडीकल कॉलेजमध्ये 100-150,200 पदे रिक्त आहेत हे आम्ही सभागृहात सुध्दा मान्य केलेले आहे. यवतमाळच्या हॉस्पीटलमधील पदे लवकरात लवकर पदे भरली जातील. सर्व हॉस्पीटलमध्ये पेशंटची संख्या वाढलेली आहे परंतु या ठिकाणी जी पदे सँक्शन केलेली आहेत ती खूप वर्षापूर्वी सँक्शन केलेली आहे. यवतमाळ येथे 1019 पदे सँक्शन आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 17.35

श्री. सुरेश शेट्टी ...

आता तेथील लोकसंख्या वाढलेली आहे. या प्रश्नाच्या बाबतीत चर्चा झाली आहे या पदांची संख्या वाढवून घेण्यात येणार आहे काय अशा प्रकारची विचारणा करण्यात आली होती . त्याचबरोबर येत्या काही दिवसात एक उच्च स्तरीय समिती नियुक्त करुन सर्व मेडिकल कॉलेजचा आढावा घेण्यात येणार आहे त्याचप्रमाणें किती जादा पदे लागणार आहेत याचा देखील आढावा घेण्यात येणार असून त्या संदर्भात आश्वासन देण्यात आलेले आहे. वर्ग तीन आणि वर्ग चारची पदे जास्त रिक्त आहेत ती पदे लवकरात लवकर भरण्यात येणार आहेत.

----

**लक्षवेधी क्रमांक 7 पुढे ढकलण्याबाबत**

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे आणि इतर सन्माननीय सदस्यांनी सातवी लक्षवेधी सूचना दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी मला पत्र पाठवून विनंती केलेली आहे की, आजच्या कामकाजपत्रिकेतील अनुक्रमांक सातची लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात यावी . त्यानुसार ही लक्षवेधी सूचना उद्या किंवा परवा घेण्यात येईल. यानंतर विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी : नियोजना अभावी सिंधुदूर्ग जिल्हयातील रोजगार हमी योजनेचा निधी केन्द्रसरकारकडे परत जाणे
मु.शी : नियोजना अभावी सिंधुदूर्ग जिल्हयातील रोजगार हमी योजनेचा निधी केन्द सरकारकडे परत जाण्याबाबत श्री.संजय केळकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**सभापती** : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सिंधुदूर्ग जिल्हयात रोजगार हमी योजनेवर खर्च करण्यासाठी केन्द्र सरकारकडून आलेले 22 कोटी रुपये वेळेवर खर्च होऊ न शकल्याने परत केन्द्राकडे गेलेले आहेत, केवळ जिल्हा प्रशासनाने आलेल्या निधीचे व्यवस्थित नियोजन न केल्याने व आलेला निधी स्थानिक लोकप्रतिनिधींना व्यवस्थित कल्पनाच न दिल्याने पैसा परत गेला व पर्यायाने सिंधुदूर्ग जिल्हा विकासापासून वंचित राहिला यास केवळ जिल्हा प्रशासनच जबाबदार आहे यासाठी जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई व्हावी व यापुढे असा हलगर्जीपणा घडू नये म्हणून सदरची बाब विशेष उल्लेखाव्दारे शासनाच्या निदर्शनास आणत आहे तरी याबाबत तातडीने कारवाई करावी ही नम्र विनंती."

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : साईबाबाचे मंदिर बांधल्यास रॉयल्टी देण्यासंबंधी शिर्डीच्या साई मंदिर विश्वस्त मंडळाने केलेला ठराव

मु.शी : साईबाबाचे मंदिर बांधल्यास रॉयल्टी देण्यासंबंधी शिर्डीच्या साई मंदिर विश्वस्त मंडळाने केलेल्या ठरावा बाबत डॉ.नीलम गो-हे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**सभापती** : माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गो-हे ( विधान सभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते :-

" जगातील आणि हिंदुस्थानातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या शिर्डीच्या साईसंस्थानाने नुकताच असा ठराव केला आहे की, जगामध्ये किंवा भारतात साईबाबाचे मंदिर कोठेही बांधण्यात आले तरी शिर्डीच्या साई संस्थानाला रॉयल्टी दिली पाहिजे. डॉ.एकनाथराव गोंदकर या विश्वस्तांनी हा ठराव मांडलेला आहे. दिनांक 21 एप्रिल 2008 च्या सामना या वर्तमानपत्रात याबद्दल स्पष्ट भूमिका मांडण्यात आली होती. या पैशाचा उपयोग सर्वसामान्य माणसासाठी होण्या ऐवजी जर एंजट कारभार करीत असतील तर धर्म स्वातंत्र्यावर आक्रमण तर होणार आहेच परंतु साईबाबा संस्थानने इतरांकडून रॉयल्टी मागण्याचा ठराव कोणत्या नियमामध्ये बसतो या संदर्भात शासनाने हस्तक्षेप करुन साईबाबा संस्थानला अशा प्रकारे कोणत्याही प्रकारची रॉयल्टी मागता येणार नाही अशी समज द्यावी "

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी : नॉन क्रिमिलेयरसाठी उत्पन्नाची मर्यादा वाढविणे

मु.शी : नॉन क्रिमिलेअरसाठी उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याबाबत
श्री.प्रतापराव सोनवणे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**सभापती** : माननीय सदस्य श्री. प्रतापराव सोनवणे यांनी विशेष उल्लेंखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी

श्री.प्रतापराव सोनवणे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" इतर मागासवर्गीय व भटक्या जमातीतील मुलांना/ मुलींना उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतांना जातीचा दाखला आणि वैधता प्रमाणपत्र घेणे जसे बंधनकारक आहे त्याचबरोबर शैक्षणिक सवलती मिळण्यासाठी पालकाच्या वार्षिक उत्पन्नाची अट घालण्यात आली आहे. ही उत्पन्नाची वार्षिक मर्यादा आजमितीस 4 लाख रुपये आहे.

सभापती महोदय, सध्याचे रुपयाचे मूल्य विचारात घेऊन क्रिमिलेअरची उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत केन्द्र शासनाने दिनांक 2.9.2003 चे आदेश आहेत. जून 1994 ला पहिल्यांदा ही मर्यादा एक लाख होती तेव्हा पासून आजपर्यंत महागाई इंडेक्स बराच वाढलेला आहे आणि आता सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू होणार आहेत अशा परिस्थितीत प्रगत उत्पन्न गट प्रवर्गाची म्हणजेच क्रिमीलेअरची उत्पन्न मर्यादा न वाढविल्यास इतर मागासवर्गामधील चतुर्थ श्रेणी कर्मचा-याच्या मुलांनासुध्दा इतर मागासवर्गीयाच्या आरक्षणाचा फायदा मिळू शकणार नाही. या सर्व प्रवर्गातील विद्यार्थी / विद्यार्थीनीं उच्च शिक्षणापासून वंचित राहू शकतात तेव्हा आज तारखेचा महागाई इंडेक्स, रुपयाचे मूल्य व उच्च शिक्षण क्षेत्राच्या खर्चात झालेली भरमसाठ वाढ लक्षात घेता या प्रवर्गातील पालकांची उत्पन्न मर्यादा 7. 50 लाख रुपये करणे ही काळाची गरज आहे.

सभापती महोदय, या प्रकरणात पालकांचे उत्पन्न काढतांना उत्पन्नातून इनकम टॅक्स व इतर टॅक्सही वजा करुन प्रत्यक्षात शिल्लक राहणारे उत्पन्नच ग्राहय धरावे हया बाबतीतसुध्दा काळजी घेतली जावी अशी सूचना मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, राज्यातील विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या भवितव्याच्या तसेच हिताच्या दृष्टीने व त्यांच्या उच्च शिक्षण घेण्याच्या प्रक्रियेत त्यांच्या हक्कांना बाधा येऊ नये म्हणून महाराष्ट्र

5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाने क्रिमिलेअरची उत्पन्न मर्यादा वार्षिक 7.50 लाख रुपये या प्रमाणे तात्काळ मंजूर करापवी व या निकषा प्रमाणे त्वरित अंमलबजावणी सुरु करावी अशी आग्रही मागणी या विशेष उल्लेखाव्दारे मी करीत आहे.

----

नंतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कुर्मि/कुणबी जातीचा ओबीसी मध्ये समावेश करणे.

**मु. शी.** : कुर्मि/कुणबी जातीचा ओबीसी मध्ये समावेश करणे याबाबत श्री.सय्यद जामा, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□य सदस्य श्री.सय्यद जामा यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. सय्यद जामा (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो. ..

सभापति महोदय, मैं इस विशेष उल्लेख के माध्यम से एक विशेष बात आपके सामने रखना चाहता हूँ. महाराष्ट्र में पिछली 4-5 पीढ़ी से कुर्मी समाज के लोग रहते हैं जो कि दूसरे प्रान्तों से यहां पर आए है. 1993 में ओ.बी.सी. के लिए 27 प्रतिशत रिजर्वेशन दिया गया, उसके अन्तर्गत केन्द्र शासन ने राज्यों के हिसाब से लिस्ट बनाई और उसके अनुसार महाराष्ट्र में ओ.बी.सी. की लिस्ट में कुर्मी का समावेश नहीं दिखाया था. लेकिन दिनांक 17.01.2006 को भारत सरकार ने गजट नोटिफिकेशन के माध्यम से महाराष्ट्र में कुर्मी समाज के लोगों को कुणबी समाज के बराबर समझा है और लिस्ट में उनका समावेश किया है. भारत सरकार के दिनांक 17 जनवरी 2006 के गजट नोटिफिकेशन के आधार पर महाराष्ट्र सरकार ने फायनल एक्शन नहीं लिया है और कोई सूची जाहिर नहीं की है. मैं इस विशेष उल्लेख के माध्यम से महाराष्ट्र शासन से अनुरोध करना चाहता हूँ कि भारत सरकार ने कुर्मी समाज को कुणबी समाज के बराबर माना है, इसलिए कुर्मी समाज को उस सूची में शामिल करके उन्हें आरक्षण का फायदा दिया जाए.

. .. . . . . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..... 3वाय 2 ....

**पृ. शी.** :स्थानिक स्वराज्य संस्थांत विशेषत: नगरपरिषदांमध्ये अनुकंपा तत्त्वावर सेवेत सामावून न घेतल्याने सुरू झालेल्या आत्महत्या.

**मु. शी.** : स्थानिक स्वराज्य संस्थांत विशेषत: नगरपरिषदांमध्ये अनुकंपा तत्त्वावर सेवेत सामावून न घेतल्याने सुरू झालेल्या आत्महत्या. याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. ..

" राज्यातील अनुकंपा तत्त्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्याची अनेक प्रकरणे प्रलंबित असणे, अनुकंपा तत्त्वावर शासकीय सेवेत नोकरी मिळत नसल्याने राज्यातील अनेक अनुकंपाग्रस्त लाभार्थी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत असल्याचे निदर्शनास येत आहे. अंबरनाथ नगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्याचे निधन झाल्याने त्याच्या मागे वारस असलेल्या त्याच्या पत्नीने, वारसा हक्कानुसार, अनुकंपा तत्त्वावर नगरपालिका सेवेत सामावून न घेतल्याने, प्रज्ञा नावाच्या विधवा महिलेने गळफास लावून आत्महत्या केली. त्याच आस्थापनेवर असलेल्या अन्य एका कर्मचाऱ्याच्या निधनानंतर अनुकंपा तत्त्वावर नगरपालिकेत नोकरीच्या माध्यमातून कोणताही आधार न मिळाल्याने उज्ज्वला जाधव नावाच्या महिलेचे निधन झाले आहे. सभापती महोदय, वास्तविक कुटुंबातील कर्ता केल्यानंतर वारसा हक्काने अनुकंपा तत्त्वावर सेवेत सामावून घेऊन त्या कुटुंबाला आधार देण्याची आवश्यकता असतानाही शासनाने, नगरपालिकेने त्याकडे दुर्लक्ष केले आहे. नगरविकास विभागाने याबाबत वारंवार आश्वासने देऊनही कोणतीही कार्यवाही केलेली नाही. परिणामी अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळेल या आशेवर राहणाऱ्यांचे त्यांच्या कुटुंबासह संपूर्ण जीवन उद्ध्वस्त होत आहे आणि त्यामुळे त्यांच्या मनात चिडीची भावना निर्माण झालेली आहे . तरी राज्यातील अनेक अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळण्याच्या आशेवर राहणाऱ्यांना शासकीय सेवेत नोकरी मिळण्याबाबत तसेच त्यांच्यावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करून त्यांना शासकीय सेवेत सामावून घेतले जावे यासाठी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाला विनंती करीत आहे.

*** ..... 3वाय 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : दोडामार्ग तालुक्यात मायनिंग उत्खनन करण्यासाठी डोंगर भागातील जमीन धारकांच्या जमिनी खरेदी करण्यात येणे.

**मु. शी.** : दोडामार्ग तालुक्यात मायनिंग उत्खनन करण्यासाठी डोंगर भागातील जमीन धारकांच्या जमिनी खरेदी करण्यात येणे याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. ..

" दोडामार्ग तालुक्यात (जिल्हा सिंधुदुर्ग) मायनिंग उत्खनन करण्यासाठी डोंगर भागातील जमीन धारकांच्या जमिनी खरेदी करण्यात येत आहेत. या जमिनी मायनिंग एजंटाद्वारे मायनिंग कंपनी विकत घेत आहेत. मायनिंग कंपन्या विकत घेत असलेल्या जमिनींचे हिस्सेदार कोण कोण आहेत, हे 7-12 उताऱ्यावर असणाऱ्या नावाप्रमाणे त्या भागाची रक्कम हिस्सेदाराला देण्यात येते. परंतु पैसे घोरी व्यक्ती तीच आहे की दुसरी हे कंपनी एजंटांना समजत नाही. जी व्यक्ती मायनिंग एजंट घेऊ जाते त्या व्यक्तीवरच मायनिंग कंपनी विश्वास ठेवते. परंतु मायनिंग कंपन्या जमीन धारकांच्या सहहिस्सेदारांना ओळखत नसल्याने जमीन खरेदीचे बोगस व्यवहार तालुक्यात होत आहेत. या प्रकरणी शासनाने चौकशी करून खऱ्या लाभार्थींना योग्य मोबदला देण्याबाबत काय उपाय योजना करीत आहे व संबंधित दोषींवर कोणती कारवाई करीत आहे, हे शासनाने तात्काळ स्पष्ट करावे."

***

..... 3वाय 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्यासाठी मोफत वसतिगृहांची योजना आखणे.

**मु. शी.** : मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्यासाठी मोफत वसतिगृहांची योजना आखणे याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने त्यांच्याकरिता मोफत वसतिगृहांची योजना आखली. त्यानुसार समाजकल्याण विभागामार्फत रायगड जिल्ह्यासाठी वेश्वी, ता. अलिबाग येथे 1996 पासून भाड्याच्या जागेत मुलांसाठी हे वसतिगृह सुरू झाले.

सध्या या वसतिगृहात विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी वेळेवर पाणी मिळत नाही, पाणी साठवण टाकीची साफसफाई होत नसल्याने पिण्यासाठी दूषित पाणीच उपलब्ध आहे., अंथरूण-पांघरूणाची सोय नाही, रात्रीच्या वेळी वीज गेली असता अन्य सुविधा उपलब्ध नसल्याने अभ्यास करणे कठीण जाते, शौचालये अस्वच्छ आहेत, व्यायामाचे साहित्य आहे पण त्याचा वापर करता येत नाही. या वसतिगृहामध्ये राज्याच्या विविध भागांतून आलेले 75 विद्यार्थी राहतात. पण जागा कमी असल्याने दाटीवाटीने रहावे लागते. खिडक्यांना लोखंडी ग्रिल्स नाहीत. काचेची सरकती तावदाने आहेत. स्वतंत्र कपाटे नसल्याने विद्यार्थ्यांना आपले साहित्य उघड्या रॅकवरच ठेवावे लागते. त्यामुळे चोरीचे किंवा गहाळ होण्याचे प्रकार घडतात.

या वसतिगृहात अधिकारी, कर्मचाऱ्यांची एकूण 9 पदे मंजूर आहेत. 2 स्वयंपाकी, 1 मदतनीस, 1 स्वच्छता कामगार, 1 रखवालदार व .1 गृहपाल येथे कार्यरत आहेत. उर्वरित 3 कर्मचारी समाजकल्याण विभागाच्या कार्यालयात वर्ग करण्यात आले आहेत. सबब शासनाने या वसतिगृहाच्या समस्याकडे तातडीने लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे. "

***

(यानंतर सौ.रणदिवे. .... 3झेड 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बीड जिल्हयातील कर्करोग रुग्णांना दिलासा देण्यासाठी बार्शीच्या नर्गिस दत्त कन्सर हॉस्पिटलने राज्य शासनाकडे सादर केलेला प्रकल्प

मु.शी. : बीड जिल्हयातील कर्करोग रुग्णांना दिलासा देण्यासाठी बार्शीच्या नर्गिस दत्त कन्सर हॉस्पिटलने राज्य शासनाकडे सादर केलेला प्रकल्प याबाबत श्रीमती उषा दराडे वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□य सदस्या श्रीमती उषा दराडे यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे(विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"बीड जिल्हयातील कर्करोग रुग्णांना दिलासा देऊ शकेल असा एक महत्वाकांक्षी प्रकल्प बार्शीच्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या नर्गिस दत्त कॅन्सर हॉस्पिटलने राज्य शासनाकडे दाखल केला. राज्य शासनाची शिफारस घेऊन हा प्रकल्प केंद्र शासनाकडे जाणार होता. एक वर्षापासून आरोग्य विभागात हा प्रस्ताव धूळ खात पडून आहे. कर्करोग रुग्णांना अल्पदरात औषधोपचार उपलब्ध करुन देण्याची योजना असणाऱ्या या प्रकल्पाला अखेर राज्य शसनाच्या शिफारशी शिवाय केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले. बीड मध्ये कर्करोगाचे प्रमाण एक लाखामागे 80 आहे. 0+30 टक्के रुग्णांचे रोगनिदान होण्यापूर्वीच मृत्यू होतो. बीड आणि उस्मानाबाद मध्ये स्त्रियांच्या गर्भाशयाच्या आजाराचे प्रमाण जास्त आहे. मागच्या वर्षभरापासून बीड जिल्हयात इंडियन मेडिकल कौन्सिलच्या सहाय्याने उस्मानाबाद-बीड कॅन्सर रजिस्ट्री प्रकटन हे हॉस्पिटल राबवत आहे. बीड जिल्हयास हा प्रकल्प मिळाल्यास कर्करोगग्रस्त रुग्णांवरील उपचार अधिक सोपे होतील अशी प्रतिक्रिया बार्शीचे नर्गिस दत्त कॅन्सर हॉस्पिटलचे प्रशासकीय अधिकारी श्री.पानसे यांनी "दैनिक सुरामशी"बोलताना व्यक्त केली. यामुळे जनतेत पसरलेला असंतोष व त्यावर करावयाची तातडीची उपाययोजना" अशी मी आपल्या परवानगीने विशेष उल्लेखाव्दारे शासनाला विनंती करीत आहे.

-----

. . . .3 झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मालेगाव, जि.नाशिक येथे उर्दू माध्यमाच्या एकूण 27 खाजगी प्राथमिक विनाअनुदानित शाळांना अनुदान न मिळणे

मु. शी. : मालेगाव, जि.नाशिक येथे उर्दू माध्यमाच्या एकूण 27 खाजगी प्राथमिक विनाअनुदानित शाळांना अनुदान न मिळणे याबाबत श्रीमती फौजिया खान वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**सभापती** : माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"मालेगाव जिल्हा नाशिक येथे उर्दू अल्पभाषिक व मुस्लिम धर्मीय अल्पसंख्यांकांच्या शासन मान्यताप्राप्त एकूण 27 खाजगी प्राथमिक शाळा असून त्यापैकी 6 शाळांना जून 2000 पासून शासनाची विना अनुदानित तत्वावर मान्यता आहे. शासनाच्या प्रचलित नियमानुसार अशा शाळांना आणि तुकडयांना चार वर्षानंतर 20% अनुदानासाठी मुल्यांकन प्रस्ताव शिक्षण उप संचालकांकडे दाखल करावयाचे असतात. त्यानुसार संबंधित शाळांनी सर्व कागदपत्रांची रितसर पूर्तता करुन शिक्षण उपसंचालकांकडे प्रस्ताव सादर केले. परंतु संस्था चालकांचे कुठलेही म्हणणे ऐकून न घेता उप संचालकांनी ते प्रस्ताव रद्द केले. प्रस्ताव रद्द करीत असताना शासन निर्णय क्रमांक एसएसएन/1000/(361/2001) माशि-2, दिनांक 7-12-2001 चा साधा विचारही केला नाही. ही बाब अत्यंत खेदाची असून लालफितीचा वाढता प्रभाव अधोरेखित करणारी आहे. यामुळे सदर शाळांवरील शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे भवितव्य अंध:कारमय झाले असून याबाबत तातडीने कार्यवाही होणे आवश्यक आहे."

----

. . . .3 झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ SBT/ 5.45

पृ. शी. : दि.22-4-2008 रोजी चोपडा, जि.जळगाव येथे झालेली दंगल

मु. शी. : दि.22-4-2008 रोजी चोपडा, जि.जळगाव येथे झालेली दंगल याबाबत श्री.गुरुनाथ कुलकर्णी वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"दिनांक 22-4-2008 रोजी रात्री चोपडा जि.जळगाव येथे दंगल होऊन त्यात श्री.संजय चौधरी व दीपक महाजन या निष्पाप तरुणांचा झालेला दुर्दैवी मृत्यू, तसेच इतर अनेक व्यक्ती जखमी होणे, त्यात मालमत्तेचे झालेले नुकसान, दंगल आटोक्यात आणण्यास पोलिसांना आलेले अपयश, पोलिसांनी प्रथम लाठीचार्ज करुन केलेला गोळीबार, जळगाव जिल्हयात वारंवार दंगली होत असणे, त्यात निष्पाप लोकांचा होत असलेला मृत्यू, मृत्यूमुखी पडलेल्या श्री.संजय चौधरी व दीपक महाजन यांच्या कुटुंबियांना तसेच जखमी व्यक्तिनां अद्यापही नुकसान भरपाई न मिळणे, त्यामुळे तेथील परिसरातील लोकांत पसरलेले भितीचे वातावरण, मृत्युमुखी पडलेल्या तरुणांच्या नातेवाईकांस तसेच जखमी झालेल्या व्यक्तीस त्वरित आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, याठिकाणी या राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री आणि गृहमंत्री उपस्थित आहेत. त्यामुळे आपण जर त्यांना याबाबतीत निवेदन करण्यास सांगितले तर ते योग्य होईल असे मला वाटते.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सगळयांना मदत देण्यात येईल.

----

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आता कामकाज पत्रिकेवर 3 शासकीय विधेयके आहेत. तसेच त्या व्यतिरिक्त नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव देखील आहे.

<u>**पॉईंट ऑफ इंफर्मेशन बाबत**</u>

श्री. गुरुनाथ कुलकणी : सभापती महोदय, दोन दिवसांपासून वर्तमानपत्रे व दूरचित्रवाणी यांच्या माध्यमातून एकच महत्वाचा विषय चर्चिला जात आहे. 5 वर्षे ते सत्तेमध्ये होते. तसेच ते भाजपाचे सरचिटणीसही होते. या राज्याला देखील स्वाभिमान आहे. तुम्हाला, आम्हाला स्वाभिमान आहे. भाजपाचे केंद्रीय सरचिटणीस...

श्री. अरविंद सावंत : या विषयावर बोलण्यासाठी वेळ आहे काय ?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : या विषयावर मी पॉइंट ऑफ इन्फर्मेशन दिलेला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांची ज्येष्टता विचारात घेऊन या पूर्वी आपण नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता.

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणत आहेत की, या विषयाचा सभागृहाशी काय संबंध आहे ? या सदनातील सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे अध्यक्ष झालेले होते त्यांचे अध्यक्ष पद आता गेलेले आहे. त्यामुळे या विषयाचा सदनाशी संबंध आहे.

**सभापती** : या सदनाची जी प्रथा व परंपरा आहे ..

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या सभागृहामध्ये ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी नरेंद्र मोदी यांचे पोस्टर फाडले होते त्यावेळी सभागृहाचे नेते म्हणाले होते की, अशा प्रकरणांची चर्चा करण्याची पद्धती येथे आणू नये. माननीय श्री. दत्ता मेघे तेथे का गेले, तेथे ते काय बोलले... हा विषय येथे थांबवला पाहिजे. या बाबत आपण बाहेर चर्चा करु. प्रेस कॉन्फरन्समध्ये चर्चा करु. हा विषय येथेच थांबवावा.

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, त्यांची प्रामाणिकपणे इच्छा असेल तर हा विषय थांबवा.

श्री. विनोद तावडे : आपण माझ्या प्रामाणिकपणावर शंका का घेत आहात ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सदनातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, या सभागृहामध्ये, राज्यातील सामान्य जनतेच्या सार्वजनिक प्रश्न तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत असते. एखादा इश्यू एका मिनिटाकरीता मांडला तर त्यास आपण परवानगी देतो व ते क्षम्य आहे.

यानंतर श्री. बरवड..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

त्यादृष्टीने ते जर कामकाजातून काढावयाचे झाले तर दोन्ही बाजूकडचे काढले जाईल. मी हा विषय या ठिकाणी संपवत आहे. मघाशी मी आजच्या कामकाजाबाबत बोलत होतो. आज सकाळी नियम 260 अन्वयेच्या दोन प्रस्तावांवरील जी चर्चा आहे त्या चर्चेचे उत्तर अपूर्ण राहिलेले आहे. माझ ा याबाबतीतील निर्णय असा आहे की, मुंबईच्या संदर्भातील चर्चेचे जे उत्तर राहिलेले आहे ते आज पूर्ण करण्यात येईल. ग्लोबल वार्मिन्गच्या संदर्भातील दुसरा जो नियम 260 अन्वये प्रस्ताव होता त्या प्रस्तावावरील चर्चेचे उत्तर राहिलेले आहे तेही आज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी आणि इतर सन्माननीय सदस्यांचा पर्यटनाच्या संदर्भात जो नियम 260 अन्वये प्रस्ताव आहे त्याची चर्चा आज पूर्ण करावी लागेल. सदनासमोर असलेले एकंदरीत कामकाज आणि आपल्याकडे उपलब्ध असणारे दिवस पाहिल्यानंतर आपल्याला उद्याचा एकच दिवस चर्चेसाठी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. उद्या सुध्दा या सदनामध्ये एक नियम 260 अन्वये प्रस्ताव आहे तसेच अंतिम आठवडा प्रस्ताव आहे त्याचप्रमाणे कर्जमाफीच्या अनुषंगाने जो नियम 289 अन्वये प्रस्ताव देण्यात आला होता त्यासंदर्भात मघाशी माझ्या दालनामध्ये जी चर्चा झाली त्याप्रमाणे ती चर्चा सुध्दा घ्यावयाची आहे. आंब्याच्या संदर्भात एक छोटी चर्चा घ्यावयाची आहे. अशा दोन तीन चर्चा उद्या घ्याव्या लागणार आहेत. म्हणून मी सन्माननीय सदस्यांना सांगेन की, जरी सभागृहाच्या कामकाजाची वेळ सायंकाळी 6.00 वाजता संपत असली तरी हे सगळे कामकाज संपेपर्यंत सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढविण्याशिवाय अन्य कोणताही मार्ग नाही. त्यादृष्टीने मी आपणा सगळ्यांच्या संमतीने कामकाज संपेपर्यंत सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढविण्याचा निर्णय घेत आहे. आता शासकीय विधेयके घेण्यात येतील.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, काल सकाळी आपण 15 अर्धा-तास चर्चा घेतल्या होत्या. माझी पंधरावी अर्धा-तास चर्चा होती परंतु त्याबाबत असे निदेश देण्यात आले की, ती अर्धा-तास चर्चा आज घेण्यात येईल. परंतु आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेमध्ये ती अर्धा-तास चर्चा दाखविलेली नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/

**सभापती** : उद्या सदनाची नियमित बैठक सकाळी 10.30 वाजता सुरु होणार आहे. त्याच्या अगोदर सकाळी 9.30 वाजता सन्माननीय सदस्यांची येण्याची तयारी असेल तर एका तासामध्ये अर्धा-तास घेऊ.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, आमची तयारी आहे.

**सभापती** : ठीक आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबईच्या संदर्भातील जी चर्चा आहे ती आज आपण संपविणार आहात. त्या चर्चेवरील माझे भाष्य राहिलेले आहे. मी त्यावेळी सभागृहात येऊ शकलो नाही. मला असे वाटले की, ही चर्चा चालू राहील.

**सभापती** : मघाशी माननीय उपसभापतींनी माननीय मंत्रिमहोदय श्री. राजेश टोपे यांना उत्तराच्या भाषणास सुरुवात करण्यास सांगितले होते. सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया खान यांना सुध्दा त्या प्रस्तावावर बोलावयाचे हाते. परंतु मी असा निर्णय घेतलेला आहे की, या सगळ्या चर्चा आज उत्तरासह संपवावयाच्या असतील तर ....

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया खान यांना त्या प्रस्तावावर बोलावयाचे होते.

**सभापती** : मी निर्णय दिलेला आहे. सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया खान तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते त्या प्रस्तावावर आपले म्हणणे मांडतील. आता शासकीय विधेयके घेण्यात येतील.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई मुद्रांक (सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. XXV OF 2008.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY STAMP ACT, 1958.)**

श्री. नारायण राणे ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि. स. वि. क्रमांक 25 - मुंबई मुद्रांक अधिनियम, 1958 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. नारायण राणे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि. स. वि. क्रमांक 25- मुंबई मुद्रांक अधिनियम, 1958 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, राज्याचे माननीय अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांनी अर्थसंकल्प मांडत असताना मुद्रांक शुल्क वाढविण्यासंबंधी उल्लेख केलेला होता.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे.....

म्हणून सन 2008-09 च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये उल्लेख झाल्यामुळे मुंबई मुद्रांक अधिनियम, 1958 यात आणखी सुधारणा करण्यासाठी वि.स.वि.क्रमांक 25 विधेयक मांडण्यात आलेले आहे. सभापती महोदय, या विधेयकाद्वारे 4 सुधारणा सुचविल्या आहेत. पहिली सुधारणा अशी आहे की, विकसन करारनाम्याच्या बाजारमूल्यावर 1 टक्का या दराने मुद्रांक शुल्क आकरले जात होते. आता अनुसूचीच्या अनुच्छेद 25 अनुसार मालमत्तेच्या बाजारमूल्यावर 3 ते 5 टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारले जाईल. या सुधारणेमध्ये ग्रामीण भागामध्ये 3 टक्के आणि क वर्ग नगरपालिकासाठी 4 टक्के आणि उर्वरित अ आणि ब वर्ग नगरपालिका व महानगरपालिकांमध्ये 5 टक्के याचा समावेश आहे. सुधारण क्रमांक 2 मध्ये विकसन, विक्री, हस्तांतरण यासाठी मुख्यत्यारपत्र दिल्यास पूर्वी 1 टक्का मुद्रांक शुल्क होते आता त्यात सुधारणा करुन 3 ते 5 मुद्रांक शुल्क देय राहील. आता 3 टक्के करण्यात आले आहे. तिसरी सुधारणा अशी आहे की, सदनिका किंवा गाळे याकरिता गुंतवणूकदाराने 3 वर्षात पुनर्विक्री केल्यास आधी भरलेल्या मुद्रांक शुल्कामध्ये समायोजित केले जात होते. आता 3 वर्षाऐवजी 1 वर्षाचा कालावधी करण्यात आलेला आहे. सुधारणा चौथी अशी आहे की, विना मोबदला मुख्यत्यारपत्रास बाजारभावाच्या मूल्यानुसार मुद्रांक शुल्क आकारण्याची तरतूद नव्हती. आता मिळकतीच्या बाजारमूल्यांच्या 3 टक्के आणि 5 टक्के मुद्रांक शुल्क आकारण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. यामध्ये वडील, आई, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगी, नातू, नात यांना यातून वगळण्यात आले आहे.

सभापती महोदय, हया ज्या सुधारणा आहेत, त्या केल्यानंतर राज्याच्या तिजोरीमध्ये जवळपास 400 कोटी रुपयांची अधिकची भर पडणार आहे. राज्याच्या विकासासाठी आवश्यक असलेला निधी मिळवून देणारा हा मुद्रांक शुल्क विभाग आहे. या वर्षी या विभागाने 8,500 कोटी रुपये मिळवून दिले आहेत. काही वर्गाकडून कमी जास्त प्रमाणामध्ये करात तफावत होती. ती भरुन करण्यासाठी या सुधारणा केल्या आहेत. हे विधेयक मांडत असताना मी सुरुवातीलाच आपल्या निदर्शनास आणून देतो की, ग्रामीण भागांसाठी 3 टक्के, क वर्ग नगरपालिकांसाठी 4 टक्के + जिल्हा परिषद सेस 1 टक्के म्हणजे 5 टक्के, महानगरपालिका व अ वर्ग

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे....

नगरपालिकांसाठी 5 टक्के असेल. ख-या अर्थाने क वर्ग नगरपालिकांमध्ये स्टॅम्प डयूटीबाबत अन्याय होत आहे. 4 टक्के + 1 टक्के असे 5 टक्के आणि महानगरपालिकांसाठी 5 टक्के लावला जाणार आहे. यासंबंधी सन्माननीय सदस्यांच्या सूचना असतील त्या अनुषंगाने या करासंबंधी सरकार फेरविचार करील. ग्रामीण भागामध्ये 3 टक्के आणि क वर्ग नगरपालिकांमध्ये 5 टक्के होत आहे, त्याचाही भविष्यामध्ये सरकार करणार आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मुद्रांक शुल्क हा शासनाचा महत्वाचा निधी संकलन करणारा विषय आहे त्यात वाढ करण्याचा प्रस्ताव या विधेयकाद्वारे मांडण्यात आला आहे. त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय वित्त मंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात त्याबाबत उल्लेख केला होता. विविध भागात तफावत होती तसेच 3 ते 5 टक्के स्टॅम्प डयूटी लावण्याबाबतचा खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी केला आहे. ग्रामीण भाग, नगरपालिका आणि महानगरपालिका यामध्ये सुधारणा करुन तो 3 ते 5 टक्के करण्यात येणार आहे. ही वाढ सुध्दा खूपच आहे. त्याचे कारण असे की, आता 5 टक्के केले तर तो प्रायर टू कन्व्हेयंस आहे. ज्यावेळी इमारत बांधून पूर्ण होईल, सोसायटी होईल आणि परत कन्व्हेयंस होईल त्यावेळी त्यांना कर द्यावा लागणार आहे. म्हणजे एकाच मिळकतीवर दोन वेळा कर द्यावा लागेल. पॉवर ऑफ ॲटर्नी आणि विकासक यासाठी पूर्वी 1 टक्का कर होता.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते ...)

आता हे 5(ग-अ) मधून काढून ते 48(ग)मध्ये टाकलेले आहे. मुद्रांक शुल्क हे राज्य शासनाचे उत्पन्न वाढवावे यासाठी लावण्यात येते. शासनाने गृहनिर्माण धोरण जाहीर केले त्यावेळी मुंबईतील जागा स्वस्त होतील असे सांगण्यात आले. पूर्वी 1 टक्का मुद्रांक शुक्ल भरावे लागत होते. म्हणजे 5000 रुपयावर 50 रुपये भरावे लाग होते. 10 लाखाचे घर असेल तर 50 हजार रु. भरावे लागत होते. शहरामध्ये हे मुद्रांक शुल्क 5 टक्के केल्यामुळे अडीच लाख रु.भरावे लागत होते. आता शहरामध्ये 10 लाखाला कुठेही घर मिळत नाही. घरांच्या किंमती प्रचंड वाढलेल्या आहेत. बिल्डर हा आपल्या खिशातून पैसे घालणार नाही तर तो गाळाधारकाकडून हे पैसे घेईल. आपण रजिस्ट्रेशनवर मुद्रांक शुल्क भरण्याचा कायदा केला. पुन्हा सोसायटी रजिस्ट्रेशन करुन कन्व्हेयन्स करताना डिफरन्स भरावा लागतो. घर स्वस्त करण्याचे शासनाचे धोरण आहे. पण सर्वसामान्य, मध्यम तसेच उच्च मध्यम वर्गाला घर घेतल्यानंतर तीन स्तरावर पैसे भरावे लागणार असतील तर ते त्यांना अतिशय त्रासदायक, कष्टदायक आणि जाचक होईल. यामुळे घरांच्या किंमती वाढतील. त्यांनी हे मुद्रांक शुल्क दोन ते अडीच लाख रुपये केलेले आहे ते फारच आहे असे वाटते. मालमत्तेच्या बाजारमूल्यावर 3 ते 5 टक्के दाराने मुद्रांक शुल्क आकारण्याचे प्रस्तावित केलेले आहे. याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा केलेला आहे. वडील, आई, भाऊ, बहीण, पत्नी , पती मुलगी, नातू, नात यांना किंवा अशा इतर जवळच्या नातेवाईक व्यक्तींना प्रतिफलाशिवाय मुख्यत्यारनामा देण्यात आला असेल तर त्यावर फक्त पाचशे रुपये मुद्रांक शुल्क आकारण्यात येणार आहे. ही अतिशय स्वागतार्ह अशी बाब आहे. सभापती महोदय, मुंबई उपनगर आणि महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतीचे बाजार मूल्याच्या टक्केवारीनुसार मूल्यांकन करण्याच्या संदर्भात मार्गदर्शन सूचना दिलेल्या आहेत. म्हाडाच्या अधिपत्याखालील जुनी इमारत विकत घेतली तर त्यासंदर्भाचे कोष्टक त्यामध्ये देण्यात आलेले आहे. भूखंडाचे एकूण क्षेत्र हजार मीटर किंवा 15 मीटर, अनुज्ञेय चटई क्षेत्र म्हणजे अव्हायलेबल एफएसआय, भाडेकरुच्या ताब्यात असेले क्षेत्र., 33(7) नुसार जुन्या इमारतीतील भाडेकरुना देण्यासाठी एकूण होणारे बांधकाम वजा करता जे शिल्लक राहील त्यावर मुद्रांक शुल्क आकारले जाणार आहे. 3189/2004 - जोसेफबेन डिसुझा आणि शिरीष पटेल विरुध्द महाराष्ट्र राज्य असे रिट पिटीशन हायकोर्टामध्ये होते.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

यामध्ये शेवटी जो निर्णय आला आहे तो हानीकारक आहे. तो निर्णय डेव्हलपमेंट थांबविणारा आहे काय याची मला माहिती नाही. परंतु यासंदर्भात निर्णय असा आलेला आहे की, "Regulation 33 (7) will have to be read to mean that only the dilapidated buildings of 'A' category which satisfy this requirement (and those declared unsafe prior to the monsoon of 1997 under 3rd proviso thereof) are covered under D.C. Regulation 33(7) and entitled to extra FSI provided therein." याचा अर्थ असा आहे की, म्हाडाने जाहीर केलेल्या मोडकळीस आलेल्या इमारती तातडीने पाडणार आहेत त्यासंबंधीची यादी जाहीर केली आहे, त्या इमारती आणि पावसाळयापूर्वी दरवर्षी जाहीर होतात त्या धोकादायक इमारती, या इमारतींच्या संदर्भात जर खरेदी झाली आणि पुर्नबांधणीचा प्रश्न आला तर शासनाने जाहीर केल्याप्रमाणे कलम 33 (7) खाली 2.5 एवढे चटई क्षेत्र त्यांना देय राहील. इतर इमारतींना तेवढे चटईक्षेत्र अनुज्ञेय राहणार नाही. त्यासाठी शासनाने कमिटी नेमलेली आहे. या निर्णयाच्या शेवटी त्यांनी असे म्हटले आहे की, " The buildings not having the certificate of the cost of structural repairs exceeding Rs. 1200/-..." जुन्या इमारतीसाठी प्रत्येक चौरस फुटास 1200 रुपये दुरुस्तीची मर्यादा दिलेली आहे. त्याच्याहून जास्त नसेल तर ती डेलिब्रेटेड झाली. जी इमारत कोसळावयास आली आहे ती इमारत दुरुस्त केलीच पाहिजे. "...Under Section 88 (3) of the MHAD Act will not be permitted reconstruction henceforth. For future, the certificate under section 88(3) of the MHAD Act, Viz. that the structural repairs cannot be carried out within the monetary limits specified therein will be mandatory." म्हणजे म्हाडाच्या कलम 88 (3) नुसार इमारतीच्या दुरुस्तीसाठी खर्च येणार आहे त्या खर्चापेक्षा जास्त खर्च झाला असेल आणि ती इमारत दुरुस्त होत नाही याचा अर्थ ती इमारत दुरुस्ती लायक नाही, ती इमारत तुम्हाला घेता येईल. हा मुद्दा मी एवढयासाठी सांगितला की, एखादी मालमत्ता हस्तांतरीत करीत असताना मुद्रांक शुल्क भरले जाते. सदर मालमत्ता या कॅटेगरीत बसो किंवा नसो 2.5 एवढे चटईक्षेत्र आपण हिशोबात घेता, भाडेकरुना किती द्यावयाचे आहे ते वजा करता. त्यावर मुद्रांक शुल्क आकारला जातो. माझ्या मते कोर्टाचा असा निर्णय असेल, त्या निर्णयाने म्हाडाच्या कलम 88(3) प्रमाणे आणि कलम

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

33 (7) मध्ये न येणा-या इमारतीच्या बाबतीत अशा प्रकारचा मुद्रांक शुल्क लावणे बरोबर नाही. डी.सी.रुलप्रमाणे अशा प्रकारच्या इमारतींना मंजुरी देता येत नाही. अशा इमारतींना मंजुरी देणे अयोग्य आहे. तसे केले तर योग्य होईल. जुन्या इमारतीत राहणा-या भाडेकरुंचे भलेच होईल. परंतु कोर्टाच्या निर्णयामुळे या सर्व डेव्हलपमेंट कायदेशीर आणि तांत्रिकदृष्टया थांबलेल्या आहेत. हा कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट होऊ शकतो अशी बाब निदर्शनास आली आहे हा एक भाग आहे. दुसरा भाग असा आहे की, सुरुवातीला 2.5 चटईक्षेत्र देऊन मुद्रांक शुल्क वसूल केले जाते आणि इमारतींची कामे पूर्ण झाल्यानंतर पुन्हा मुद्रांक शुल्क घेतला जाणार आहे. दुस-या वेळा जो मुद्रांक शुल्क घेतला जाणार आहे, त्यावेळी पहिला मुद्रांक शुल्क वजा करुन राहिलेली रक्कम मुद्रांक शुल्क म्हणून घेतली पाहिजे. तुम्ही मुद्रांक शुल्कात सूट देणार आहात की नाही हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे सुरुवातीला मालमत्ता घेताना 5 टक्के आणि त्या मालमत्तेचे कन्व्हेयन्स करताना 5 टक्के मुद्रांक शुल्क घेतले जाणार आहे. अशी डबल रक्कम शासनाकडून वसूल केली जाणार आहे. महाराष्ट्र शासनाने गृहनिर्माण धोरण जाहीर केले आहे, परंतु त्याची अंमलबजावणी करताना या 5 टक्क्याचा विचार गांभीर्याने केला गेला पाहिजे. या बाबतीत माननीय मंत्र्यांनी काही गोष्टींच्या बाबतीत खुलासा केलेला असल्यामुळे मी जास्त काही बोलणार नाही. मी एका गोष्टीचा या ठिकाणी खुलासा करु इच्छितो. श्री. आभाळे, कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग यांनी एक आदेश काढलेला आहे. हा आदेश कशासाठी आहे तर मुंबई शहर जिल्हयात भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय भूखंडावरील इमारती, सदनिका, गाळे, कार्यालये यांच्या विक्री हस्तांतर करणेबाबतचा आहे.

यानंतर श्री.कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

सभापती महोदय, स्टॅम्प डयूटीचा विषय आला. मागील आठवडयात कुलकर्णी-कूळ कायद्याच्या संदर्भात विधेयक आले होते त्यावेळी मी याबाबतीत माझी भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला होता. त्यासंदर्भात न्यायालयामध्ये जो दावा दाखल करण्यात आला होता त्यासंदर्भात आलेले आदेश आहेत. नोंदणी अधिनियम 1908 च्या कलम 22(अ) मधील तरतुदींचा वापर करुन शासनाने विशिष्ट दस्ताऐवज नोंदणी जनहितविरोधी घोषित करुन त्याच्या नोंदणीस मज्जाव केला होता .माननीच सर्वोच्च न्यायालयाने सन 2001 चा दिवाणी दावा क्रमांक 7800 मध्ये नोंदणी अधिनियम 1908 च्या कलम 22(अ) मधील तरतूद घटनाबाहय ठरविली आहे. त्यामुळे शासकीय निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक नोंदणी-2006/प्र.क्र.417/म-1 दिनांक 8.11.2006 अन्वये नोंदणी अधिनियम 1908 च्या कलम 22(अ) अनुसार शासनाने काढलेल्या अधिसूचनेचा प्रभाव संपुष्टात आल्याचे जाहीर केले आहे. हे शहरापुरते झाले. हायकोर्टाने दिलेला निर्णय पूर्ण महाराष्ट्रासाठी लागू आहे. मग उपनगरात का नाही? मुंबई शहराकरिता हे परिपत्रक निघाले परंतु उपनगरात नसल्यामुळे यासंदर्भातील नोंदणीला मज्जाव केला. आता नोंदणी केली जात आहे. नाही तर कोर्टाचा अवमान होण्याची शक्यता आहे. नोंदणी शुल्क देऊन अशा प्रकारे नोंदणी होत असेल तर ते थांबविता येते काय हे तपासून पहावे. तसे असेल तर पूर्ण मुंबईकरिता एकच परिपत्रक आणि एकच नियम असावेत. म्हणून उपनगरामध्ये हे परिपत्रक लागू केले नसल्यामुळे नोंदणी चालू आहे ती थांबवावी. मागील वेळी विषय मांडला होता की, मुंबई शहरातील सर्वच्या सर्व मालमत्ता या बिनशेतीच्या आहेत. त्यामुळे त्यांना शासनाकडून दरवर्षी बिनशेती कर जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात भरावा लागतो. एनए करण्यासाठी परवानगी घ्या हा विषय येथे नाही. उपनगरामध्ये अजूनही तेच चालू आहे त्यामुळे तिकडेही तोच कायदा लावावा. सर्व प्रॉपर्टी बिनशेती केल्यानंतर वर्षाला कायमचे उत्पन्न शासनाकडे येत राहील. आता एनए करण्याकरिता आणि एनओसी घेण्याकरिता त्या जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात काय चालते याबाबत मी परवा भाष्य केलेले आहे. तेथे जो भ्रष्टाचार चालतो तो त्वरित थांबविला पाहिजे. सर्व मुंबईमध्ये बिनशेतीचा विषय नसताना एनओसी घेण्याकरिता सर्वच्या सर्व मालमत्ता एनए आहेत असे समजून शहराप्रमाणे उपनगरातील मिळकतीस बिनशेतीचे दर लावले तर शासनाच्या तिजोरीत पैसा येईल. आतापासून बिनशेती झाली तर मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होईल. त्याचवेळी आता रेडी रेकनरचे रेट 30 आणि 40

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

टक्क्यांनी वाढलेले आहेत. रेडीरेकनर प्रमाणे मुद्रांक शुल्क कसे घेणार हा प्रश्न आहे. कारपेट एरिया देण्याच्या बाबतीत विधेयक आले होते त्यावळी हा विषय मी मांडला होता. मुद्रांक शुल्क घेण्याच्या संदर्भात विषय आल्यानंतर इमारत पूर्ण झाल्यानंतर शुल्क आहे त्याच्यावर आपल्या सरकारच्या रेडीरेकनरमध्ये जाहीर केल्याप्रमाणे कारपेट एरिया म्हणजे काय ते दिलेले आहे. कोणतीही इमारत पूर्ण झाल्यानंतर रेडीरेकनरप्रमाणे मुद्रांक शुल्क आकारताना कारपेट एरिया म्हणे काय ते दिलेले आहे. "As per the IS:3861-1975 (Reaffirmed 1992) of Bureau of Indian Standards (BIS) (Government of India Recognised body for Weights and Measures).."यासंदर्भात संस्थेने जो निर्णय घेतला आहे तो कायद्याच्या तरतुदीमध्ये असल्यामुळे राज्य सरकार अथवा केंद्र सरकार जोपर्यंत कायद्यात बदल करीत नाही तोपर्यंत त्या संस्थेला बदल करता येत नाही. त्याच्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "Carpet Area is full area of a house excluding area of all the walls in the house, kitchen, passage, toilets, 50% of balcony area...."

(नंतर श्री.भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

याचा अर्थ घरामध्ये असलेले स्वयंपाक घर हे कार्पेट एरियामध्ये मोजता येणार नाही. जाण्या-येण्याचा पॅसेज कार्पेट एरियामध्ये मोजता येणार नाही. संडास-बाथरुम कार्पेट एरियामध्ये मोजता येणार नाही. 50 टक्के बाल्कनी घेता येईल. मग मुद्रांक शुल्काबाबत नक्की काय निर्णय घेण्यात येणार आहे? हा निर्णय केंद्र शासनाने घेतलेला आहे. त्यामुळे मुद्रांक शुल्काबाबत हाही विचार झाला पाहिजे. कार्पेट एरियाचे धोरण ठरविलेले आहे. ते विधेयक या सभागृहात मंजूर होऊन खालच्या सभागृहात काल गोंधळात मंजूर झाले. आता कायदा अस्तित्वात आला आहे. एफएसआय प्रमाणे विकासकाला नवीन मुद्रांक शुल्क कोणत्या पध्दतीने आकारणार आहात हा विषय आहे. तसे या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक-39 वर कार्पेट एरिया आणि बिल्टअप एरिया कसा मोजावा याची व्याख्या दिलेली आहे. या संदर्भात महसूल विभागाच्या सचिवांनी योग्य ते निर्देश दिले पाहिजेत. मुद्रांक शुल्क घेत असताना कोणत्या पध्दतीने एफएसआयचा अवलंब करणार आहात? शासनाने जाहीर केलेल्या रेडी रेकनरमध्ये दिलेल्या व्याख्येप्रमाणे करणार आहात का? हे दोन महत्वाचे विषय आहे. शासनाने नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर केले आहे. त्यासंबंधी या सभागृहात चर्चा झाली नाही. परंतु खालच्या सभागृहात चर्चा झाली. त्या चर्चेला उत्तर देताना एफएसआय प्रमाणे मुद्रांक शुल्क लावणार असे जाहीर केले आहे. सर्वसामान्य जनतेला परवडतील अशा प्रकारे घरे असतील ही भूमिका घेतली, धोरण स्वीकारले आहे. माननीय वित्तमंत्र्यांनी उत्पन्नाचे साधन म्हणून 5 टक्के मुद्रांक शुल्क प्रस्तावित केले आहे ते फार आहे, ते कमी करावे अशी आपल्या माध्यमातून माननीय मंत्रीमहोदयांना विनंती करतो. धन्यवाद.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांकडून मला एका गोष्टीचे स्पष्टीकरण हवे आहे. या विधेयकाच्या उद्देश व कारणे यातील अनुक्रमांक- 3 मध्ये म्हटले आहे की, प्रतिफलाशिवाय मुखत्यारनामा देण्यात आला असेल तर त्यावर पाचशे रुपये एवढे मुद्रांक शुल्क आकारण्यात येईल आणि अन्य कोणत्याही बाबतीत, उक्त अनुसूची एक च्या अनुच्छेद 25 अनुसार, मालमत्तेच्या बाजारमूल्यावर 3 ते 5 टक्के दराने मुद्रांक शुल्क आकारण्यात येईल." यामध्ये स्थावर मालमत्ता म्हणजे शेतजमीन, आंबा बागा यांचा समावेश होईल. जमीन कसण्यास दिली जाते. त्या संदर्भात बरेच लोक व्हाईटमध्ये पैसे घेतात, त्या पैशावर हे मुद्रांक शुल्क आकारले जाणार आहे. 5 वर्षासाठी जमीन कसण्यास दिली तरी त्यातून शेतीमाल वगळणे अत्यंत आवश्यक आहे. कोकणात हा फार मोठा प्रश्न आहे. बऱ्याच जमिनी, आंबा बागा आहेत, नागपूरमध्ये संत्रा बागा असतील, विविध बागांच्या शेतजमिनी आणि शेतीमालाचा प्रश्न आहे. या संदर्भात मंत्रीमहोदयांनी स्पष्टीकरण करावे अशी माझी विनंती आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक-25 मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत यांनी आपले विचार मांडले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या विधेयकामुळे सर्वसामान्य माणसांवर जो काही बोजा पडणार आहे त्यासंबंधी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यांनी रेडी रेकनरसंबंधी वगैरे अत्यंत चांगले मुद्दे मांडले. मी त्यांना धन्यवाद देतो. त्यांनी सुरुवातीला मुद्दे मांडताना मुखत्यार पत्रासंबंधी उल्लेख केला. दहिसरच्या पुढे भायंदर किंवा भिवंडी येथे सहसा कोणत्याही जमिनीचा व्यवहार होत नाही. फक्त मुखत्यारपत्र घ्यायचे आणि डेव्हलपमेंट करायची. यासाठी एक रुपया देखील खर्च होत नाही. जो काही खर्च वकिलासाठी आणि कोर्टाच्या कामासाठी करावा लागतो तेवढाच खर्च येतो. अशा जमिनीवर मोठमोठ्या इमारती उभ्या राहतात परंतु शासनाला त्यापासून उत्पन्न काहीही मिळत नाही.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ......

बिल्डरलोक जी काही पळवाट काढतात त्यावर कायद्याने बंधन यावे म्हणून मुखत्यार पत्रावर स्टँप डयूटी घेण्याचे ठरविण्यात आलेले आहे. एक रुपयासुध्दा भरावा लागू नये यासाठी लोक मुख्यत्यार पत्र तयार करीत होते त्यामुळे आता मुखत्यार पत्राचे प्रमाण कमी होऊन त्यावर निर्बंध बसावा हा या विधेयकाच्या मागचा हेतू आहे. यातील कमी जास्त प्रमाणाच्या संदर्भात देखील अभ्यास करावा लागणार आहे. परंतु या कायद्यामुळे मुखत्यार पत्रावर स्टँप डयूटी घेतली जाणार आहे. या ठिकाणी सांगण्यात आले आहे की, 10 लाखाचा फ्लॅट असेल तर 2.5 लाख रुपये स्टँप डयूटी भरावी लागेल. परंतु यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, 10 लाखाचा फ्लॅट असेल तर त्यासाठी 50 हजार रुपये स्टँप डयूटी पडेल. बोलतांना आपल्याकडून चुकून बोलले गेले असेल. अडीच लाख रुपये किंमत असलेल्या फ्लॅटवर 100 स्टँप डयूटी घेतली जाते परंतु आता मुंबईमध्ये अडीच लाख रुपयांमध्ये काही फ्लॅट येत नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु यासंदर्भातील मर्यादा 5 लाख रुपयांपर्यंत घेऊन जाण्याचा शासनाचा विचार आहे. म्हाडासारख्यांनी बनवलेली जी घरे असतील त्या ठिकाणी मध्यमवर्गीयाना सूट मिळावी हा या विधेयकाच्या मागचा हेतू आहे. जुन्या चाळीबद्दल रिटपीटीशन 2004 ला फाईल झाले याबाबत आपण संदर्भ दिलेला आहे. 33(7) ला कोर्टाने स्टे दिलेला आहे. हा विषय हौसींगचा आहे. परंतु हा विषय मुंबईच्या दृष्टीने महत्वाचा आहे, मुंबईतील मोडकळीस आलेल्या चाळीच्या संदर्भात आहे. मुंबईमध्ये मोडकळीस आलेल्या चाळींची संख्या जवळपास 19 ते 20 हजार आहे. या चाळींना एफएसआय मिळाला तरच या चाळींची दुरुस्ती होऊ शकते. मध्यमवर्गीयांना दिलासा देण्यासाठी तसेच चाळी लवकर दुरुस्त होण्यासाठी शासन यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेईल असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. जुन्या चाळींची खरेदी करुन त्या आपण विकसीत करु शकतो अशा रितीने सरकार यासंदर्भात विचार करेल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी 88(3) चा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे यासंदर्भात मी आताच सांगितल्या प्रमाणे यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेऊन एक सुटसुटीत धोरण, म्हाडाच्या दृष्टीने लवकरच सादर केले जाईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी मुंबईच्या बीन शेतीच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. मला याची जाणीव आहे की, जमीन एनए करीत असतांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संदर्भात आरोप होतात याची मला जाणीव आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात कोणाला जाऊ नये म्हणून ज्या महानगरपालिकेत प्लॅन पास होतात

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ......

तेथेच पैसे भरुन रीसीट घ्यावी म्हणजे जिल्हाधिकारी, आरडीसी यांच्याकडे जावयास लागणार नाही, यासाठी सुटसुटीत कार्यपध्दत व्हावी यासाठी हे विधेयक या ठिकाणी आणण्यात आले आहे. मुंबई, ठाणे अशी जी प्रमुख शहरे आहेत व ज्या ठिकाणी प्लॅन पास होतात तेथेच एनएचे पैसे घेतले जावे असा शासनाचा प्रयत्न आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी चटई क्षेत्राच्या संदर्भात व्याख्या वाचून दाखविलेली आहे. चटईक्षेत्राच्या संदर्भात राज्यशासनाने यापूर्वीच भूमिका घेतलेली आहे. याच माध्यमातून खरेदी-विक्री व्हावी आणि चटई क्षेत्रावरच कर लावावे असे आमचे धोरण आहे. महाराष्ट्रात रेडीरेकनर बनवत असतांना ज्या प्रकारे रेडीरेकनरची रक्कम बनवली जाते त्यावेळेस इन्फ्रस्ट्रक्चरचा सगळा विचार केला जात असतो. एखाद्या ठिकाणी जर एखादी इमारत असेल तर त्या ठिकाणी शाळा आहे का, कॉलेज आहे का, आरोग्याची व्यवस्था आहे का, स्टेशन किती अंतरावर आहे या सर्व गोष्टींचा विचार होऊन मुल्य ठरवले जाते व या मुल्यावर स्टँप डयूटी किती आकारावी हे ठरवले जाते. आपण या ठिकाणी उल्लेख केला आहे की, यावेळेला रेडीरेकनरमध्ये 30 टक्के वाढ झालेली आहे. यासंदर्भात अनेक तक्रारी सुध्दा आलेल्या आहेत. या खात्याचा मंत्री म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की, संबंधित तज्ञ लोकांना बोलावून यासंदर्भात माहिती घेतो व याबाबत फेर विचार करतो एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. 30 टक्के वाढ ही फार झालेली आहे. ही वाढ कमी करुन शासन नागरीकांना नक्कीच दिलासा देण्याचा प्रयत्न करेल तसेच यासंदर्भात शासन नक्कीच फेर विचार करेल. कर वसूल करीत असतांना नागरीकांचे शोषण होऊ नये अशी शासनाची भूमिका आहे. आपण हा मुद्दा नजरेस आणून दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. ग्रामीण भागाचा विकास करीत असतांना आपण 1 टक्क्याऐवजी 3 टक्के स्टँप डयूटी घेतली जाते, तसेच "क" वर्ग नगरपालिकेला आपण 4 टक्के आणि सेस 1 टक्का म्हणजे एकूण 5 टक्के स्टँप डयूटी लागणार. महानगरपालिका व "अ" व "ब" नगरपालिका यांना सुध्दा 5 टक्के स्टँप डयूटी आहे. म्हणजे "क" वर्ग नगरपालिकेच्या हद्दीत जे फ्लॅट बांधले जातील त्यांना सुध्दा 5 टक्के स्टँप डयूटी लागणार आहे. स्टँप डयूटीचा पर्सेंटेज जास्त आहे. ही रक्कम फार जास्त होते असे मला वाटते. कारण महानगरपालिकेतील क्षेत्रात राहणारा माणूस आणि "क" वर्ग नगरपालिकेच्या क्षेत्रात राहणा-या व्यक्तिच्या उत्पन्नात फार मोठी तफावत आहे. ही तफावत पाहिल्यानंतर "क" वर्ग नगरपालिकेला 5 टक्के स्टँप डयूटी आणि महानगरपालिकेला सुध्दा 5 टक्के स्टँप डयूटी लागते.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे ....

हे मला योग्य वाटले नाही म्हणून या बाबतीत मी स्वत: माननीय अर्थ मंत्र्याबरोबर: बोललो त्याचबरोबर माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर देखील बोललो होतो त्यांनी मला सागितले की या संदर्भात दुसरे विधेयक आणून हा कर कमी करु . ही बाब माझ्या निदर्शनास आल्यानंतर मी स्वत: त्यांच्याशी चर्चा करुन त्याची अनुमती घेतली आहे. त्यासबंधीचा प्रस्ताव आणण्यास देखील सुरुवात झालेली आहे.सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मुद्रांक शुल्काच्या संदर्भात सूचना दिलेल्या आहेत तेव्हा या सूचनांचा उपयोग करुन घेऊन लोकांना कर जाचक वाटणार नाही या दृष्टीने जेवढया सुधारणा करता येतील तेवढया आम्ही करु. यानतरसुध्दा माझ्याकडे कोणी सूचना दिल्या व सांगितले की अमुक या वर्गाचे उत्पन्न लक्षात घेता स्टॅम्प डयुटी जास्त वाटते तरी त्याचा विचार करु. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी मध्यमवर्गीयाचा उल्लेख केलेला आहे राज्य शासनाचे गृहनिर्माण धोरण येणार आहे. या संदर्भात मी मंत्रीमंडळात अशी सूचना केली होती की, लालबाग, परळ, चिंचपोकळी ते माहीम पर्यंतचा जो मुंबईचा मध्य भाग आहे त्याठिकाणी मध्यमवर्गीय राहतात. त्या ठिकाणी आता ज्या प्रकारच या सुधारणा होत आहेत त्या पाहता त्या भागात जे नवीन फलॅटस बांधले जातात त्यातील एका फलॅटची किमत एक कोटी रुपयांची असते कोणताही मध्यमवर्गीय एक कोटी किंवा दोन कोटी रुपयांचा फल्ॅट घेऊ शकत नाही त्यामुळे कोणत्याही विकासकाने 40- 50 किंवा 60 टक्के घरे 500 स्केअर फूटाची बांधावीत आणि बाकीची घरे मात्र कितीही स्केअर फुटाची बांधावीत त्याला शासनाची काही हरकत नाही त्याच बरोबर मध्यमवर्गीयासाठी जी घरे बांधण्यात येणार आहेत त्याचे दर माफक असावे जेणेकरुन मध्यमवर्गीयाना ही घरे घेता येतील. त्याचप्रमाणे आता जे मध्यमवर्गीय लोक त्या ठिकाणी राहत आहेत तेसुध्दा तेथे टीकून राहतील याच उद्देशाने मी तसे सांगितलेले आहे. त्या भागातील फलॅटसची किंमत कमी रहावी त्याचबरोबर सध्या जे मध्यमवर्गीय मध्य मुंबईत राहत आहेत त्यांनी येथेच रहावे असे वाटत असल्यामुळेच त्या दृष्टीने मी स्टॅम्प डयुटीचा देखील विचार करील एवढे मी या निमित्ताने सांगतो त्याचबरोबर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जी महत्वाची सूचना केलेली आहे ती मी तपासून पाहीन त्यामध्ये शेती माल, बागायती मालाच्या सबंधी जर काही व्यवहार असेल तर ते

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे ....

वगळण्याचा प्रयत्न करीन. दोन्हीही सन्माननीय सदस्यांनी मार्गदर्शनपर चांगल्या सूचना केल्याबद्दल मी आपणाला धन्यवाद देतो . तसेच या विधेयकाला पाठिंबा देऊन ते मंजूर करावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात

(खंड 1 व 2, अनुसूची, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही )

**उपसभापती** : ज्या अर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करायाची नाही. त्या अर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

------

**<u>नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाचे उत्तर अगोदर घेण्याबाबत</u>**

**उपसभापती** : माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांना काही महत्वाच्या कामासाठी बाहेर जावयाचे असल्यामुळे नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील उत्तर अगोदर घ्यावयाचे काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, दोन तीन विधेयके घेण्यात यावीत त्यानंतर माननीय मंत्री महोदयांचे उत्तर घ्यावे.

**उपसभापती** : ठीक आहे. आता विधेयके घेण्यात येतील



VTG/ SBT/ KGS/ MMP/ KTG/ 18=30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. I OF 2008.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

श्री.राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2008 वि.स.वि.क्रमांक 1 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वि.स.वि.क्रमांक 1 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ KTG/ श्री. गायकवाड नंतर --- 18:35

श्री. राजेश टोपे ....

सभापती महोदय, या ठिकाणी हे जे विधेयक आणले आहे ते कालच विधानसभेमध्ये मंजूर झाले आहे. याचा विषय एवढाच आहे की, नगरपालिका, नगरपरिषदांच्या निवडणुकांसाठी जी नामनिर्देशपत्रे उमेदवाराला भरावी लागतात त्या नामनिर्देशन पत्राबरोबर त्याला जातीचे प्रमाणपत्र तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र देणेही त्याला बंधनकारक आहे. हे विधेयक यापूर्वी दोन्ही सभागृहांनी मंजूर केलेले आहे याची आपणास माहिती आहेच. हा अधिनियम झालेला होता परंतु हा अधिनियम झाला आणि ताबडतोबीने दुसऱ्याच महिन्यात निवडणुका लागल्या. त्यामुळे असे झाले की, हा नव्याने कायदा झाला असल्याने निवडणुकीला उभी राहणारी जी सर्व पक्षीय मंडळी होती त्यांचे म्हणणे असे पडले की, हा कायदा नव्यानेच झालेला असल्याने लोकांना इतक्या लवकर त्याबाबत कळू शकणार नाही आणि निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी देखील अद्याप जात प्रमाणपत्र काढून ठेवलेले नाही त्यामुळे लोकांना निवडणूक लढविताच येणार नाही. त्यामुळे ताबडतोब आपण अधिनियम काढला आणि ही प्रमाणपत्रे सादर करण्याची मुदत 3 महिन्यांनी वाढविण्यात आली आणि त्यानंतर पुन्हा त्यात सुधारणा करून आणखी एक महिन्यांनी मुदत वाढविण्यात आली. अशा प्रकारे नामनिर्देशन पत्र भरल्यानंतर चार महिन्यांच्या आत जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यात यावे असे महापालिकेच्या आणि नगरपालिकेच्या अधिनियमात हे परंतुक केले होते ते वगळण्याची तरतूद या विधेयकाद्वारे आपण आणलेली आहे. सभापती महोदय, दोन्ही सभागृहांनी यापूर्वी याला मंजुरी दिलेली आहे. यातील मुख्य भाग असा आहे की, आपला जो सामाजिक न्याय विभाग आहे तो आणि आदिवासी विभाग तसेच महसूल विभाग या तिन्ही विभागांच्या संबंधात महत्त्वाची बाब करायची आहे. त्याबाबत शासनाच्या बाजूने निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल. तो म्हणजे समाजकल्याण विभागामार्फत जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यासाठी जवळ जवळ 15 समित्या केल्या आहेत. तीन जिल्ह्यांना मिळून एक समिती, एका विभागास दोन समित्या, राज्यात असे एकूण 6 विभाग आहेत म्हणजे त्यासाठी 12 समित्या आहेत त्याचबरोबर मुंबई, पुणे, नागपूर शहर यांच्यासाठी 1-1 अशा एकंदर 15 समित्या आहेत. सभापती महोदय, मी या ठिकाणी सभागृहाला आश्वासन देऊ इच्छितो की, प्रत्येक जिल्हानिहाय अशा प्रकारे जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याविषयी शासनाकडून विचार करण्यात येत आहे. त्यामुळे जात पडताळणी जिल्हा निहाय समाजकल्याण विभागामार्फत देण्यात आले तर निश्चितपणे

...... 4जे 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टोपे .....

हे काम सोपे होऊ शकेल. त्यामुळे निश्चितपणे हे काम करण्यात येत आहे. तसेच आदिवासी विभाग आहे त्यामध्ये प्रत्येक विभागाला एक एक्सक्युजिव समिती आहे. म्हणजे त्या समितीकडे जात पडताळणी प्रमाणपव देण्याव्यतिरिक्त अन्य दुसरे कोणतेही काम नाही. त्यामुळे आज आहे ती यंत्रणा कशी मजबूत करता येईल हेच आपण पाहतो आहेत. त्या शिवाय ज्या समित्या आहेत त्यामध्ये महत्त्वाची अट अशी आहे की, जॉईंट सेक्रेटरी आणि जॉईंट कमिशनर स्तरावरील अधिकार त्यात असतो. या दर्जाचे लोक आपल्याला त्यामुळे वाढवावे लागतील किंवा डीवायएसपी हे या समितीचे सदस्य आहेत की जे खऱ्या अर्थाने प्रस्तावाची तपासणी करतात. त्यांची संख्या वाढविणे सोपे आहे. ती वाढविण्यासाठी कालबद्ध वेळेमध्ये निर्णय घेतला जाईल आणि हे सक्षम कसे होईल, परिणामकारक कसे होईल या दृष्टीने शासन स्तरावर विचार करण्यात येत आहे. त्यामुळे हा जुनाच अधिनियम आहे, त्यात जे परंतुक आपण घातले होते ते वगळण्यासाठी हे विधेयक येथे मी मांडलेले आहे त्यास आपण मान्यता द्यावी ही विनंती.

प्रश्न प्रस्तुत झाला.

( यानंतर सौ.रणदिवे .... 4के 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, हे विधेयक मागच्या वेळेला मंजूर झाले होते, तेव्हा असे ठरले होते की, विधेयक पास झाल्यानंतर ताबडतोब पुढच्या महिन्यामध्ये निवडणुका आल्यामुळे उमेदवारी अर्ज भरताना रिसीट लावावयाची होती आणि तीन महिन्याच्या आत वैधता प्रमाणपत्र द्यावयाचे होते. पण हा कालावधी कमी होता. म्हणून परत एकदा सदनामध्ये सुधारणा आणून ही मुदत वाढवून चार महिन्याची करण्यात आली. पण आज देखील अशी परिस्थिती आहे की, जर उद्या निवडणुका किंवा पोट निवडणुका लागल्या तर आजही जात पडताळणी समितीने यासंदर्भात कालावधी निश्चित केलेला नाही की, संबंधित उमेदवारांना अमुक इतक्या कालावधीमध्ये वैधता प्रमाणपत्र मिळेल. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, जात पडताळणी करता 15 कमिट्या तयार केलेल्या आहेत. पण मुंबई महानगरपालिकेची पोटनिवडणूक जाहीर झाल्यानंतर काही उमेदवार जात पडताळणी समितीकडे आपले प्रमाणपत्र घ्यावयास गेले, तेव्हा त्यांना असे सांगितले की, आम्ही तुम्हाला वैधता प्रमाणपत्र देऊ शकत नाही. तुम्ही निवडणूक आयोगाकडून लिहून आणा की, आम्हाला या निवडणुकीसाठी उभे रहावयाचे आहे. मग निवडणूक आयोगाकडे गेल्यानंतर त्यांनी असे सांगितले की, हा आमचा विषय नाही. आम्ही असे कशासाठी लिहून द्यावयाचे ? हा तुमच्या पक्षाचा प्रश्न आहे की, तुम्हाला निवडणुकीसाठी संमती द्यावयाची की नाही ? यामुळे उमेदवार कात्रीत सापडलेले आहेत, त्रस्त झालेले आहेत. मग पुन्हा एकदा हा नियम लागू केला की, तुम्ही रिसीट भरा, अर्जाची पावती लावा आणि 120 दिवसाच्या आत वैधता प्रमाणपत्र देण्यात यावे. सेक्शन 5 (बी) मुळे मुंबई महानगरपालिकेचे 14 नगरसेवक डिस-क्वॉलीफाईड झाले. मग ते सुप्रीम कोर्टामध्ये गेले. परंतु 120 दिवसाच्या आत वैधता प्रमाणपत्र मिळाले नाही म्हणून त्यांना 119 व्या दिवशी बाहेर काढले. त्यांना असे सांगण्यात आले की, तुम्हाला वैधता प्रमाणपत्र देता येणार नाही. म्हणून मी त्यावेळी सुप्रीम कोर्टाच्या या डायरेक्टीव्हज् आहेत की मॅन्डेटरी आहेत याची माहिती घेतली. नंतर हाय कोर्टाने असा निकाल दिला की, 120 दिवसामध्ये वैधता प्रमाणपत्र देणे बंधनकारक नाही. ज्यावेळी तुम्हाला ते प्रमाणपत्र मिळेल, तेव्हा ते घ्यावे. त्यानंतर हाय कोर्टामध्ये पिटीशन दाखल करण्यात आले. तेव्हा या विषयावर चर्चा झाली आणि परत सगळा मॅटर जात पडताळणी समितीसमोर पुन्हा रिमांड बॅक झाला आणि याला देखील आता दोन महिने झालेले आहेत. परंतु जात पडताळणी समितीने आजपर्यंत एकही हिअरींग घेतलेले नाही. आपण या विधेयकामध्ये स्पेसिफाय केले पाहिजे की, एखाद्या उमेदवाराने अर्ज केल्या

. . . . 4 के-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब . . . .

नंतर जातपडताळणी समिती किती दिवसामध्ये प्रमाणपत्र देणार आहे ? उद्या जर स्मॉल कॉज कोर्टाने या उमेदवाराला डीस-क्वॉलिफाईड केल्यानंतर मुंबई महानगरपालिकेच्या 33 (5) नुसार जर त्याला दुसऱ्या वेळी परत निवडून येण्याची संधी मिळाली तर तुम्ही या विधेयकाच्या व्दारे त्यासाठी पूर्णपणे प्रतिबंध केलेला आहे. कारण या कायद्याला कोणत्याही कोर्टामध्ये आव्हान देण्याची प्रोव्हीजन नव्हती. सुप्रीम कोर्टाने रिमांड बॅक केल्यामुळे ही बाब हाय कोर्टामध्ये आली आणि तेथे हा विषय परत ओपन झाला. त्यामुळे जातपडताळणी समितीने जर अन्यायाने एखाद्या सदस्याला बाहेर काढले तर तो माणूस कुठे जाणार आहे ? म्हणून याला जातपडताळणी समितीच्या वर एक ॲपिलिएट ॲथॉरिटी असली पाहिजे. मघाशी सांगण्यात आले की, जात पडताळणी समितीमध्ये सक्षम अधिकारी असला पाहिजे. मुंबई हाय कोर्टामध्ये पाच केसेस पेंडींग आहेत. तेथे सक्षम अधिकारी नाही म्हणून त्या केसेस रिमांड बॅक झाल्या .

यानंतर कु.गायकवाड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

23-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4L-1

DVG/ KGS/ KTG/ 18:45

ॲड. अनिल परब....

कमिट्यांचे निकाल उलटे लागले आणि आता हे अधिकारी सक्षम अधिकारी नव्हते अशा प्रकारे हायकोर्टाने निकाल दिलेला आहे.या तीन अधिका-यांपैकी एक सक्षम अधिकारी आणि दोन अधिकारी तुमच्याच विभागाचे असतात व त्याचा सीआर वरचा अधिकारी लिहितो. त्यामुळे 2 विरुध्द 1 असा निकाल दिला जातो आणि उमेदवाराला बाहेर काढले जाते. त्यामुळे आपण जी 3 अधिका-यांची कमिटी करणार त्यामध्ये एक सक्षम अधिकारी असतो परंतु दुसरे जे दोन अधिकारी असतात त्यांचा एकमेकांशी कोणत्याही प्रकारचा संबंध असता कामा नये नाहीतर एकाचा गोपनीय रिपोर्ट दुसरा लिहिणार असतो त्यामुळे खालचा जो तिसरा अधिकारी आहे त्याला दुस-याचे ऐकून निर्णय घ्यावा लागतो. आता जे जातपडताळणी समितीचे रिपोर्ट आलेले आहेत त्या रिपोर्टवर जात पडताळणी समितीच्या अध्यक्षांनी सही करण्यास नकार दिलेला आहे. डिफर झालेली 5 ओपिनियन आज हायकोर्टात पेंडीग आहेत. त्यामुळे हे तीन अधिकारी कोण असावेत, त्यांचा दर्जा काय असावा यासंदर्भात पुन्हा एकदा निश्चिती व्हावी. आज तीन ठिकाणी जात पडताळणी केली जात असते. एक जात पडताळणी विद्यार्थ्यांसाठी केली जाते, दुसरी जात पडताळणी नोकरीसाठी केली जाते व तिसरी जात पडताळणी उमेदवारांसाठी केली जात असते. या सगळयांचे अर्ज एकाच ठिकाणी घेतले जातात. या अर्जांची छाननी पूर्ण होत नाही. नोकरीला लागलेला माणूस रिटायर्डमेंटला आला तरी त्याची जात पडताळणी होत नाही. मध्यंतरी राज्यशासनाने निर्णय केला की, एका घरामध्ये एका माणसाला व्हॅलिडीटी मिळाली असेल तर दुस-याला व्हॅलिडीटी घेण्याची गरज नाही. परंतु यामध्ये जो निकष लावला आहे तो त्यापेक्षाही मोठा असला पाहिजे. जर घरातील मोठया माणसाने व्हॅलिडीटी घेतली नसेल आणि त्याचा फायदा घरातील खालच्या माणसाला मिळणार नसेल तर यासंदर्भात आता आपण जो जीआर काढलेला आहे त्याचा काहीही फायदा होणार नाही. पुन्हा त्याला या सर्व प्रोसेसमधून जावे लागेल त्यामुळे घरातील छोटया किंवा मोठयाने व्हॅलिडीटी काढली असेल तर हा विषय त्या घरातील कोणासाठीही होता कामा नये. जात पडताळणी अधिका-याचे तुम्ही जे निकष लावले आहेत यामध्ये तुम्ही गृह चौकशी लावलेली आहे. परंतु आतापर्यंत जे 14 रिपोर्ट आलेले आहेत त्या 14 रिपोर्ट पैकी 12 रिपोर्टमध्ये गृह चौकशी केलेलीच नाही. ज्यांचा पिढीजात धंदा आहे, पिढीजात जात आहे अशा लोकांच्या बाबतीत राज्यशासनाचे पत्रक आहे व त्या

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब....

पत्रकामध्ये स्पष्ट लिहिले आहे की, जर संबंधिताकडे कागदपत्राची पूर्तता कमी असेल तर त्याची गृह चौकशी करावी, त्याच्या घरी जावे, त्याच्या बाकीच्या गोष्टी तपासून बघाव्यात तसेच यासंदर्भात वेगवेगळी माध्यमे दिलेली आहेत त्या माध्यमांच्या आधारे संबंधिताची जात नक्की करावी. परंतु काही ठिकाणी परस्पर व्यवहार करुन, पैसे घेऊन जात पडताळणी केली जाते. तहसीलदार हा जातीचा दाखला देत असतो आज ब-याच प्रकरणामध्ये तहसीलदाराने जातीचे दाखले दिलेले आहेत. उदा. वैश्य वाणी. वैश्य वाणीमध्ये राज्य मागास आयोगाच्या अहवालात अतिशय स्पष्ट म्हटले आहे की, वैश्य वाणी ही एक जात आहे. परंतु तुमच्या तहसीलदाराने सर्टिफिकेट दिले आणि जात पडताळणी समितीने ते अवैध ठरवले आहे. तुमच्याकडे जे काही कागदपत्र आहेत त्या कागदपत्राच्या आधारे तुमची जात आहे की, नाही हे काम जातपडताळणी समितीचे आहे. शाळेत जाऊन रेकॉर्ड बघणे, समाजात जाऊन सत्य समजून घेणे असे काम असतांना त्यांचा इंट्रेस्ट फक्त पैशाशी आहे त्यामुळे नको ती कागद पत्रे मागितली जातात व हवी त्या कागदपत्राची दुरुस्ती केली जाते आणि रिपोर्टच्या शेवटी असे लिहिले जाते की, आमच्याकडे योग्य त्या कालावधीत कागद पत्रे सबमिट केली नाहीत म्हणून तुम्हाला तुम्ही सांगितलेल्या जातीच्या बाहेर काढतो आहोत. अशी वेगवेगळी प्रकरणे आहेत त्यामुळे जात पडताळणी समितीचे निकष एकदा नक्की करण्याची आवश्यकता आहे. जातपडताळणी समितीला टर्म्स अँड कंडीशनच्या बाहेर जाता येणार नाही अशा प्रकारचा कायदा करण्याची गरज आहे. आता जातपडताळणी प्रमाणपत्र देण्यामध्ये जो स्वैराचार वाढलेला आहे त्याला आळा बसू शकणार नाही. जातपडताळणीच्या कामातून अवैध पैसे कमावले जात आहेत. श्रीमंत उमेदवारांनाच फक्त वैधता प्रमाणपत्र मिळते अशी स्थिती आहे. जातपडताळणीचे सरळ सरळ दुकान मांडलेले आहे परंतु त्यांना कोणीही विचारीत नाही. आज जे उमेदवार इनव्हॅलीड झालेले आहेत त्यांची कोर्टात जाऊन लाखो रुपये खर्च करण्याची ताकद नाही त्यामुळे ते चिरडले जात आहेत. आज हे लोक मतदानाच्या अधिकारापासून वंचित आहेत. या सगळयांना परत एकदा रिमाईंड बॅक करण्यास सांगितले आहे. शासनाने यासंदर्भात मधील काळात जे नवीन जीआर काढलेले आहेत ते रिमाईंड बॅक झालेल्या उमेदवारांना परत लागू करणार का हा अतिशय महत्वाचा विषय आहे. नाही तर त्यामध्ये अजून काही कारणे दाखवून या उमेदवारांना

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब....

बाहेर काढले जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठीची जातपडताळणीची समिती वेगळी असावी,नोकरी करणा-यांच्या बाबतीतील जात पडताळणी समिती वेगळी असावी आणि उमेदवारांच्या संदर्भात जातपडताळणी समिती वेगळी असावी.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब .....

एखाद्या उमेदवाराने जात पडताळणी समितीकडे अर्ज दिल्यानंतर ते किती दिवसात वैधता प्रमाणपत्र देणार हे या विधेयकामध्ये येणे गरजेचे आहे. नाही तर पुन्हा एखादी निवडणूक येईल आणि पुन्हा अशा प्रकारचे विधेयक घेऊन याल. मागे तीन महिन्याची मुदत 4 महिने करण्याच्या संदर्भात आपण विधेयक आणले होते. या विधेयकामध्ये जर दुरुस्ती झाली नाही तर, जात पडताळणी समिती किती दिवसात वैधता प्रमाणपत्र देणार हे नक्की केले गेले नाही तर हेच विधेयक आपल्याला पुन्हा पुन्हा या ठिकाणी आणून दुरुस्ती करावी लागेल. याबाबतीत योग्य ती काळजी घ्यावी आणि या विधेयकामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या कराव्यात अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी ( धुळे तथा नंदूरबार स्थनिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, 2006 मध्ये ज्यावेळी हे बिल सभागृहात आणले होते त्यावेळी सुध्दा मी सांगितले होते. आपण नगरसेवकांवर बंधनकारक केलेले आहे की, त्यांनी तीन महिन्यांमध्ये जात पडताळणी प्रमाणपत्र आणून द्यावे. परंतु अधिकारी ते प्रमाणपत्र तीन महिन्यांमध्ये देत नाहीत. त्यावेळी सुध्दा यासंदर्भात बोलत असताना मी सांगितले होते की, आपण त्या अधिकाऱ्यांवर बंधन घालावे. नगरपालिकेमध्ये आपण बांधकामाच्या संदर्भात डिम्ड परवानगीची तरतूद ठेवलेली आहे. सर्व कागदपत्रे सादर केल्यानंतरही 60 दिवसात नगरपालिकेने परवानगी दिली नाही तर त्या कामाला डिम्ड परवानगी आहे असे आपण गृहीत धरतो. या जात पडताळणीच्या बाबतीत सुध्दा ज्यांनी चेकलिस्टप्रमाणे सर्व कागदपत्रे दिलेली असतील त्यांच्या बाबतीत असे करता येईल. माझी विनंती आहे. भविष्यातील निवडणुकीमध्ये ज्याच्याकडे दाखला असेल तेच उमेदवारी करतील. निवडून येणारे जे उमेदवार असतील त्याला वेळेत जात पडताळणीचा दाखला मिळणार नाही याची काळजी घेणारे विरोधक सुध्दा असतील. आजही पैसे दिल्याशिवाय जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही. आमच्या नगरपालिकेच्या निवडणुका नोव्हेंबर महिन्यामध्ये झाल्या. चार महिने होऊन मुदत संपली तरी जात पडताळणीचे प्रमाणपत्र आले नाही. यामध्ये भरपूर अडचणी आहेत. आपल्याला डिम्ड परमीशन आहे असे समजावयाचे नसेल तर एकदा त्याने सर्व कागदपत्रे दिल्यानंतर अधिकाऱ्यांनी तीन महिन्याच्या आत प्रमाणपत्र दिले नाही तर शासनाने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी. त्यांच्यावर चार्जशीट दाखल करावी. जोपर्यंत ही गोष्ट कायद्यामध्ये आणत नाही तोपर्यंत अधिकाऱ्यांवर वचक राहणार नाही. असलेल्या सर्व कागदपत्रांमधून एखादा कागद काढून घेतात आणि सांगतात की, तुमचा अमुक कागद नाही. परत त्याला पत्र पाठवतात की, आपण अमुक कागद दिलेला नाही. ते परत कागद सादर करतात. दरवेळी नवीन नवीन कागद मागतात. हा धंदा झालेला आहे. त्यामुळे कायद्यामध्ये सुस्पष्टता आणली पाहिजे. अधिकाऱ्यांवर सुध्दा कोठे तरी बंधनकारक केले पाहिजे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी जे विचार मांडले त्याला मी पाठिंबा देतो. मी सुध्दा याच गोष्टी बोलणार होतो. मी या ठिकाणी फक्त दोन सूचना करणार आहे. जे अशिक्षित कोळी बांधव आहे त्यांना वाचता येत नाही. गेल्या महिन्यात आमच्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या. त्यांची बाजू मांडण्यासाठी वकील देण्यास सांगितले परंतु त्यांना वकील देण्याची तरतूद नाही असे सांगण्यात आले. त्याला लिहिता येत नाही, वाचता येत नाही, त्याला मिळालेले सर्टिफिकेट योग्य आहे की नाही हे त्याला समजत नाही. प्रत्येक वेळी मी स्वत: गेलो परंतु त्यांनी ते नाकारले. हायकोर्टाच्या न्यायाधीशापेक्षा, हे जात पडताळणीवाले न्यायाधीशांसारखे वागावयास लागले आहेत. हा मुद्दा मी अनेक वेळा या सभागृहामध्ये मांडलेला आहे. माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी होय म्हणतात परंतु प्रत्यक्षात त्याची कार्यवाही होत नाही. गेल्या दोन महिन्यांपूर्वी आमच्या ग्रामपंचायतीच्या ज्या निवडणुका झाल्या त्यांची अजून जात पडताळणी केलेली नाही. माझी दुसरी सूचना अशी आहे की, जे राखीव वॉर्ड किंवा राखीव मतदारसंघ आहेत त्याची घोषणा एक वर्ष आधी केली पाहिजे. आपण निवडणुकांच्या एक महिना आधी ते जाहीर करतो त्यामुळे असे प्रश्न येतात. आता पाच वर्षात निवडणुका घेणे बंधनकारक आहे. पंचायती राज कायद्याप्रमाणे या निवडणुका आपण निवडणूक आयोगाच्या माध्यमातून घेतो. या निवडणुकीच्या तारखा बदलत नाही. ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा, नगरपालिकांच्या निवडणुकांच्या तारखा बदलत नाहीत. त्यांची तारीख निश्चित असते. त्या ठिकाणी जे वॉर्ड राखीव असतील ते एक वर्ष आधी जाहीर करावेत जेणेकरुन त्यांना दाखल देण्यासाठी वेळ मिळेल. एवढ्या दोन सूचना करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब तसेच सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, जयंत प्र. पाटील यांनी या विधेयकाच्या संदर्भात अतिशय महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत. या ठिकाणी असा उल्लेख करण्यात आला की, हे बिल विधानसभेत गोंधळात मंजूर केले. हे विधेयक विधानसभेत गोंधळात मंजूर झालेले नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.....

या संदर्भातील आता चर्चा झाली होती. त्याबाबत मी एवढेच सांगेन की, 2-3 मुद्दे आहेत. अधिका-यांवर वेळेचे बंधन घातले पाहिजे. 3 महिन्यामध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये हे प्रमाणपत्र दिले पाहिजे. या विधेयकाद्वारे महानगरपालिका आणि नगरपालिका ॲक्टमध्ये सुधारणा करीत आहे. मागील वेळी सुध्दा बोललो होतो की, जात वैधता प्रमाणपत्राच्या कारणास्तव औरंगाबाद आणि नागपूर महानगरपालिकेमध्ये किती तरी संख्येने वॉर्डाच्या पोटनिवडणुका लागल्या. त्याचे कारण काय ? ते जे प्रमाणपत्र होते ते वैध झाले नाही म्हणून पोटनिवडणुका लागल्या. हा कायदा करण्यामागचा हेतू असा आहे की, ज्या संवर्गासाठी तो वॉर्ड राखीव केला जातो त्या वॉर्डातील व्यक्तिवर अन्याय होता कामा नये.एस.टी.ची व्यक्ती असेल तर एस.टी.ची व्यक्ती म्हणून त्यांना अधिकार आहे तेवढया टक्केवारीमध्ये नगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून निवडून यावयाचे. त्या टक्केवारीमध्ये दुस-या संवर्गाची व्यक्ती बोगस दाखला घेऊन निवडून जात असेल व त्यामुळे सातत्याने पोटनिवडणुका लागून शासनाचा खर्च होत असेल तर तो होऊ नये म्हणून हा बदल आणला आहे. एवढया मर्यादित स्वरुपात नगरविकास विभागाचा उद्देश आहे. शासन म्हणून बोलताना जबाबदारीने सांगतो की, हे जे कायदे आहेत त्या माध्यमातून जातीचे प्रमाणपत्र विनियमन होत असते. त्या कायद्यामध्ये हे बंधनकारक करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये सर्व कागदपत्र दिल्यानंतरही प्रमाणपत्र मिळत नाही त्यामुळे संबंधित अधिका-यांवर ते बंधनकारक करावे असे सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी म्हणाले. त्यांचा मुद्दा चुकीचा नाही. जातीच्या प्रमाणपत्रासाठी संपूर्ण 100 टक्के कागदपत्रे सादर केल्यानंतर एका संवर्गामध्ये आहेत ते सिध्द करण्यासाठी लागणारी कागदपत्रे दिल्यानंतर बंधनकारक होते...

ॲड.अनिल परब : तहसीलदारांना संबंधित कागदपत्रे दिल्यानंतर ते प्रमाणपत्र देतात. त्यांना दिलेली कागदपत्रे योग्य आहेत की नाहीत किंवा नाही हे तपासून वैधता प्रमाणपत्र मिळते.

श्री.राजेश टोपे : जात पडताळणी करण्याचा प्रस्ताव दाखल करावयाचा असतो. तो विहित नमुन्यासहित आणि सर्व कागदपत्रांसहित सादर केला असेल तर त्याला वेळेचे बंधन असावे. या 3 महिन्याच्या आत त्यांनी देणे बंधनकारक करण्याच्या संदर्भात जर या अधिनियमामध्ये बदल करावयाचा असेल तर तो बदल करुन बंधनकारक केले जाईल. एमसीएसआरच्या अंतर्गत किंवा फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यासंबंधी विचार करणे आवश्यक आहे. शासनाच्यावतीने बोलत





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेश टोपे...

असताना सुध्दा सांगू इच्छितो की, अधिकारी वेळेचा गैरफायदा घेत आहेत. त्यांनी वेळेचे बंधन पाळण्याच्या दृष्टीने ज्या ज्या तरतुदी या अधिनियमामध्ये करणे आवश्यक असेल त्या या अधिनियमामध्ये करता येणार नाही. परंतु सामाजिक न्याय विभागाचा अधिनियम असेल किंवा आदिवासी विकास विभागाचा अधिनियम असेल या दोन्ही विभागांच्या अधिनियमात वेळेसंबंधीची तरतूद करणे शक्य आहे. सन्माननीय सदस्यांनी म्हटले आहे की, यामध्ये सुटसुटीतपणा आणण्याची आवश्यकता आहे. त्यासंबंधी आवश्यक सुधारणा सुचविल्या आहेत, त्या करण्यात येतील.

श्री.राम पंडागळे : जातीचे बोगस प्रमाणपत्र मागतील त्यांच्यावरही फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तरतूद केली जावी.

श्री.राजेश टोपे : बोगस प्रमाणपत्र देणारा आणि घेणारा असे दोन्ही जबाबदार असून दोघेही शिक्षेस पात्र आहेत.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ (पूर्वी श्री.खंदारे) 19:00

(श्री. राजेश टोपे....)

सभापती महोदय, या ठिकाणी महत्वाचा मुद्दा हा आहे की, नगरपालिका आणि महानगरनालिकेच्या वार्डाची रचना केली जाते आणि त्यानंतर आरक्षण ठरविले जाते, ही प्रक्रिया 1 वर्ष अगोदर किंवा 6 महिने अगोदर करण्या येऊ शकली तर प्रत्येक पक्षाला आणि जनतेला हे कळेल की कोणता वॉर्ड कशासाठी आरक्षित आहे आणि त्या संबंधित वार्डातील नागरिकाला जर निवडणूक लढवायची असेल तर त्याला त्यासंबंधातील तयारी करता येईल. आरक्षण कधी करावे या संबंधात महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा कायद्यामध्ये तरतूद नाही. त्यामुळे हे आरक्षण 6 महिने आधी करण्याची तरतूद करणारा ऑर्डिनन्स निश्चितपणे काढण्यात येईल. वॉर्डांचे आरक्षण 6 महिने अगोदर करता आले तर तीन महिन्याच्या संबंधातील कायदाही बंधनकारक करु शकतो. एक चांगला उद्देश हे विधेयक आणण्यामागे आहे. यामुळे पोटनिवडणुकीला ख-या अर्थाने आळा बसेल.

ॲड. अनिल परब : वैधता प्रमाणपत्र किती कालावधीत देण्याचे बंधनकारक करणार आहात ?

श्री. राजेश टोपे : 3 महिन्याच्या आत देणे बंधनकारक असणार आहे. त्यामुळे सभागृहाने हे विधेयक संमत करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008चे वि.स.वि.क्रमांक 1 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2008चे वि.स.वि. क्रमांक 1 संमत झाले आहे.

----

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महानगरपालिका व नगरपरिषदा (तिसरी सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. LXXX OF 2007.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949 THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965)

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2007चे वि.स.वि. क्रमांक 80 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. राजेश टोपे : महोदय सन 2007चे वि.स.वि. क्रमांक 80 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले ): सभापती महोदय, शासनाचे म्हणणे बरोबर आहे की, निवडणुका झाल्या नंतर 30 दिवसांच्या उमेदवाराने निवडणुक खर्चाचा हिशोब दिला पाहिजे. तो हिशोब देखील स्पेसिफाईड फॉरमेटमध्ये दिला पाहिजे. पिपल रिप्रेझेंटेशन ॲक्टच्या 19 (ए ) प्रमाणे यासंबंधीचा हिशोब घेण्याचा अधिकार तुम्हाला आहे. यामध्ये एक सेक्शन असे आहे की, उमेदवाराने व्यवस्थितपणे हिशोब दिले नाहीत तर उमेदवाराला अटक करण्यात यावी अशी तरतूद केली आहे. ही तरतूद विधानसभेच्या आणि लोकसभेच्या निवडणुकीला लागू करण्यात आली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत आजपर्यंत व्यवस्थितपणे हिशोबच तपासले गेले नाहीत. हा कायदा मुंबई महानगरपालिकेला लावला तर त्याबरोबर पिपल रिप्रेझेंटेशन ॲक्ट 1952 मधील 17 (एच) देखील त्यास लागू होणार आहे. रिटरनींग ऑफिसरला डिस्क्रीशनरी पॉवर्स दिलेल्या आहेत....

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : पिपल रिप्रेझेंटशन ॲक्टची प्रोव्हीजन महानगरपालिकेला लागू होत नाही. हा कायदा फक्त लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांना लागू करण्यात आला आहे.

ॲड.अनिल परब : हा कायदा या ठिकाणी लागू केला तर तो महानगरपालिकेस सुध्दा लागेल. निवडणुका झाल्या नंतर 30 दिवसांच्या उमेदवाराने निवडणुक खर्चाचा हिशोब दिला पाहिजे. तो हिशोब देखील स्पेसिफाईड फॉरमेटमध्ये दिला पाहिजे ती गोष्ट बरोबर आहे. डिस्क्रीएशन पॉवर ज्या अधिका-यांना दिलेले असतात ते अधिकारी उमेदवारांकडून दररोज हिशोब मागतात. दररोजचे हिशोब दिले नाहीत तर कलम 79 लागू केले जाते. सदरहू कलम लागू नये एवढीच काळजी घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी एवढेच सांगू इच्छितो की, आमदार, खासदाराच्या निवडणुका संपल्यानंतर 30 दिवसांच्या आत खर्चाचा हिशोब सादर करावयाचा असतो. यासंदर्भात सिलींग लिमिट दिलेली असते. त्या सिलींग लिमिटच्या आत खर्चाचा संपूर्ण तपशील दिला गेला पाहिजे अशा प्रकारचे बंधन घालून दिलेले आहे. हेतू एवढाच आहे की, निवडणुकांमध्ये अवाढव्य खर्च होऊ नये. केंद्र सरकारने देखील हे विधेयक मंजुर करुन घेतलेले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य निवडणूक आयोगाला यासंदर्भात सूचना दिली आहे. मी एवढेच सांगू इच्छितो की, अशा पध्दतीने खर्चाचा हिशोब ठरवून दिलेल्या कालावधीच्या आत दिला नाही तर राज्य निवडणूक

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे..

आयोग संबंधित नगरपालिका सदस्यांना, महानगरपालिका सदस्यांना नोटीस देतील. त्यानंतर सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतील. त्यानंतर 3 वर्षे अनर्ह करतील. हा कालावधी मॅग्झिमम आहे. हा कालावधी कमी जास्त करण्याचा अधिकार राज्य निवडणुक आयोगाला असणार आहे. डिस्कॉलिफिकेशनचा विषय आहे. सदस्यांना अटक करण्यासंबंधी त्यांचे जे काही नियम तयार केलेले आहेत ते नियम सरळ सरळ या ठिकाणी लागू होत नाही. हा फक्त डिस्कॉलिफिकेशनचा प्रश्न आहे. निवडणूक झाल्यानंतर उमेदवाराने खर्चाचा हिशोब एक महिन्याच्या आत दाखल केला नाही तर त्यास जिल्हाधिकारी नोटीस देतील, त्यानंतर त्यांचे म्हणणे ऐकून घेतील, त्यांना अनर्ह करण्याची मॅग्झिमम शिक्षा करण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आलेली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 ( दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 80 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 80 संमत झाले आहे.

--------------

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ KTG/ 19:10

**पृ. शी.** : मुंबई महानगरपालिका(सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XVI OF 2008

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.)

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि. स. वि. क्रमांक 16 मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 200 चे वि. स. वि.क्रमांक 16 मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 16 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक- 16 संमत झाले आहे.

-------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहाच्या उर्वरित कामकाजाविषयी मी सभागृहाचा कल जाणून घेऊ इच्छितो. मुंबईच्या प्रश्नावरील चर्चेवर आज उत्तर व्हावे अशी अपेक्षा आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबईच्या प्रश्नावर सन्माननीय सदस्य 10/10 मिनिटे बोलतील. त्यानंतर उत्तर होईल. ग्लोबलच्या वॉर्मिगच्या प्रस्तावाच्या संदर्भात पर्यावरणमंत्री उत्तर देणार होते. त्यांचे उत्तर आज होणार असा निर्णय माननीय सभापतींनी दिला आहे. परंतु मंत्रीमहोदय सदनात उपस्थित नाहीत. उद्या वेळ नाही. कारण उद्या दोन महत्वाचे प्रस्ताव आहेत.

**उपसभापती** : माझे माननीय सभापतींशी बोलणे झालेले आहे. अपेक्षा अशी आहे की मुंबईच्या प्रश्नावर जी चर्चा झाली होती त्याचे उत्तर आज व्हावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझी सूचना अशी आहे की, मुंबईच्या प्रश्नावर आज सरकारचे उत्तर व्हावे. दुसरा एक मुंबईच्या विकासाचा प्रस्ताव आता चर्चेला घ्यावा आणि सदनाची उद्याची बैठक सकाळी 10.00 वाजता सुरु करावी.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई शहरात मोठया प्रमाणात वाढत असलेल्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेले अनेक प्रश्न व मुंबईतील गृहनिर्माण धोरण ठरविणे तसेच सर्वांगीण विकासासाठी नियोजनबध्द रितीने प्रयत्न होणे

**मु.शी.**: मुंबई शहरात मोठया प्रमाणात वाढत असलेल्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेले अनेक प्रश्न व मुंबईतील गृहनिर्माण धोरण ठरविणे तसेच सर्वांगीण विकासासाठी नियोजनबध्द रितीने प्रयत्न होणे या विषयावर सर्वश्री संजय दत्त, गुरुनाथ कुलकर्णी, एस.क्यू.जामा, डॉ. एन.पी. हिराणी, श्री. सुधाकर गणगणे, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. सुभाष चव्हाण, श्रीमती उषाताई दराडे, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी, पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ. दिपक सावंत, सर्वश्री मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, प्रकाश शेंडगे, अनिल परब, वि.प.स. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु....

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मनोगत याठिकाणी व्यक्त केले आहे. मी लोकशाही आघाडीच्या शासनाने 1999 पासून जी काही महत्वाकांक्षी पावले उचलली आहेत ती सभागृहाच्या माहितीसाठी याठिकाणी सांगू इच्छितो. मुंबई ही वर्ल्ड क्लास सिटी झाली पाहिजे या

(**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.जगदीश गुप्ता**)

दृष्टीकोनातून सर्वात पहिले पाऊल जर कोणते उचलले असेल तर ते मुंबईच्या नियोजनाच्या संदर्भात उचलले आहे. 25 वर्षानंतर मुंबईची लोकसंख्या किती असेल, ती लोकसंख्या गृहित धरुन कोणते प्रश्न निर्माण होतील, त्या अनुषंगाने कोणत्या पायाभूत सुविधा लागणार आहेत या संदर्भात नियोजन करण्यासाठी सिटी डेव्हलपमेंट प्लॅन तयार करण्यात आला. सिटी डेव्हलपमेंट प्लॅनचा जर आपण आकार बघितला तर 60 हजार कोटी रुपयांचे नियोजन करण्यात आले आहे. इतकेच नव्हे तर मुंबई मेट्रोपोलिटन रिजनच्या संदर्भात सुध्दा डेव्हलपमेंट प्लॅन करण्यात आला.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

सीटी डेव्हलपमेंट प्लॅनची अंदाजित किंमत 2.25 कोटी रुपये आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, अनेक चांगली धोरणे राबविण्याच्या निर्णय शासनाने घेतलेला असून यामध्ये घरांच्या संदर्भात असेल, झोपडपट्टीचे पुनर्वसन करण्याच्या संदर्भात असेल, मोडकळीला आलेल्या घरांच्या संदर्भातील पुनर्विकासाचा प्रश्न असेल याबाबत पॉलिसी करण्याचे काम राज्यशासनाच्या वतीने करण्यात आलेले आहे. या प्रस्तावाच्या संदर्भात असेही सांगण्यात आले की, केंद्रशासन व राज्यशासनाच्या वतीने वित्त पुरवठा करण्यात येत नाही किंवा खूप अल्प प्रमाणात वित्त पुरवठा करण्यात येतो. मी या ठिकाणी आवर्जून सांगू इच्छितो की, केंद्रसरकारने जेएनएनयुआरएम मध्ये 7000 कोटी रुपयांचे प्रोजेक्ट मंजूर केलेले आहेत. राज्यशासनाने सुध्दा दरवर्षी भरीव निधी देण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केलेला आहे. या ठिकाणी जे जे प्रश्न उपस्थित करण्यात आले होते त्यासंदर्भात मी थोडक्यात खुलासा करु इच्छितो. मुंबईतील पाणी पुरवठयाच्या संदर्भात जवाहरलाला नेहरु नॅशलन अर्बन मिशन मध्ये मध्यवैतरणा प्रोजेक्ट 455 एम.एल.डी. चा असून नव्याने मंजूर करण्यात आलेला हा प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी साधारणपणे 1600 कोटी रुपये खर्च येणार असून सन 2011 मध्ये पाणीपुरवठ्याच्या संदर्भात खर्च करुन पाणी पुरवठ्याची सोय मुंबईशहरासाठी करण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबईला पाणी कमी पडते असा विषय उपस्थित होत नाही. स्टॉर्म वॉटरच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार मांडलेले आहेत. स्टॉर्म वॉटर ड्रेनच्या संदर्भात मुंबई आणि उपनगरामध्ये मोठया प्रमाणात सोय होण्याची आवश्यकता आहे. ब्रिमस्टोवार्ड महत्वकांक्षी प्रकल्प गेल्या अनेक वर्षापासून रखडला होता तो मंजूर करुन घेण्यात आलेला आहे. हा प्रकल्प एकूण 1800 कोटी रुपयांचा असून 1800 कोटी रुपयांपैकी 1200 कोटी रुपये वर्क्सवर खर्च केले जाणार आहेत. जेवढे काही नाले, दद्या,ओढे असतील त्यांचे रुंदीकरण, खोलीकरण,स्ट्रेन्थनींग करण्याचे काम ब्रीमस्टोवाड प्रकल्पामध्ये अंतर्भूत आहे. 1200 कोटी रुपये हे अनुदानापोटी केंद्र सरकार कडून मिळणार आहे. भारताच्या पंतप्रधानांनी मुंबईला येऊन माननीय महापौरांच्या हातामध्ये केंद्रसरकारच्या वतीने चेक दिलेला आहे. या 1200 कोटी रुपयांपैकी 400 कोटी रुपये राज्यसराकररला देण्यात आलेले असून त्यापैकी 357 कोटी रुपये आतापर्यंत खर्च देखील झालेले आहेत. ब्रिमस्टोवार्डमुळे जे कोणी प्रकल्पबाधित होणार आहेत त्यांना 14000 घरकुले देण्याची सुध्दा व्यवस्था ब्रिमस्टोवार्ड प्रकल्पामध्ये करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे ...

2005 साली पडलेल्या मुसळधार पावसामुळे जी घटना घडली होती त्यामुळे मिठी नदी प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे 17.83 किलोमिटर्स लांबीची मिठी नदी असून त्या ठिकाणी दोन टप्यात कामे करण्यात येणार आहेत. त्या कामामुळे एकूण 3 हजार 725 प्रकल्पग्रस्त होणार असून त्यापैकी 3 हजार 423 प्रकल्पग्रस्ताचे पुनर्वसन करण्यात आले आहे व 302 प्रकल्पग्रस्ताचे अजून पुनर्वसन करावयाचे राहिलेले आहे.. कुर्ला येथील प्रकल्पग्रस्त धरुन हा आकडा आहे.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, पाण्याचा निचरा चांगला होण्याच्या दृष्टीने योजना आखण्यात आल्या पाहिजेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, ब्रिमस्टॉवर्डच्या प्रकल्पामुळे पावसाळयात पाण्याचा निचरा चांगल्या प्रकारे होऊ शकेल. त्यामुळे पावसाळयात ज्या काही समस्या निर्माण होता त्यावर उपाय म्हणून हा प्रकल्प पूर्ण केला जात आहे.सभापती महोदय, यानंतर मला घराच्या बाबतीत बोलावयाचे आहे अनेक सन्माननीय सादस्यांनी असे सागितले की, यु.एल.सी. ॲक्ट आपण रद्द केला होता. आपण जरुर यु.एल.सी.ॲक्ट रद्द केला आहे यु.एल.सी. रिपील ॲक्टवर भाषण करतांना मी सागितले होते की, यामुळे मोठया प्रमाणावर जमिनीचा स्टॉक मार्केटमध्ये वाढणार आहे आणि लोक जमिनीचा साठा करतील. जोपर्यत भाव वाढणार नाही तोपर्यत ही जमीन तशीच ठेवतील, त्याचा विकास करणार नाही. त्यामुळे व्हेकन्ट लॅन्ड टॅक्स ॲक्ट आम्ही आणणार आहोत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय यु.एल.सी.चा अर्थच असा होतो की, अतिरिक्त जमीन सरकारने ताब्यात घ्यावयाची आहे. त्यामुळे खाजगी माणसांनी अतिरिक्त जागेचा साठा करण्याचा प्रश्न उदभ्वत नाही. 1976 साली यु.एल.सी.ॲक्ट करण्यात आल्यानंतर सरकारने कायद्याची अंमलबजावणी करण्यामध्ये जी लेथॅर्जी दाखवली होती त्यातून मोठया जमिनी या लोकांकडे राहिल्या आणि या जमिनी जाणीवपूर्वक त्यांच्याकडे राहू दिल्या गेल्या. वास्तविक गेल्या 30 वर्षामध्ये या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आली असती तर जमिनीचा साठा वगैरे राहिलाच नसता. ही जमीन सरकारकडे जमा झाली असती व सर्वसामान्य माणसाया घरासाठी या जमिनीचा वापर करता आला आसता. मंत्रालयातील कर्मचारी या जमिनीवर घरे बांधून राहिली असती एवढी जमीन शासनाकडे उवलब्ध झाली असती. त्यामुळे जमिनीचा साठा जमीन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

मालकांनी केलेला नाही तर शासनाने त्यांना हा साठा करु दिला. अतिरिक्त जमीन काढून घेण्यासंबंधी कायद्यात तरतूद करण्यात आली होती परंतु त्याची अंमलबजावणी शासनाने केली नाही त्याचबरोबर कायद्यात दुसरी तरतूद अशी होती की अतिरिक्त बांधकाम करण्यास त्यांना सवलत दिली जाते आणि त्यातून 10 टक्के घरे निर्माण होता.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांरगू इच्छितो की जमिनीचा साठा हा उल्लेख मी यासाठी केला होता की यु.एल.सी.चा ॲक्ट कशासाठी आणला होता हे आपणा सर्वाना माहीतच आहे. परंतु आज यु.एल.सी. कायदा रिपील झाल्यानंतर किती जमीन लोकांनी आपल्याकडे ठेवावयाची याबाबत काही बंधन राहिलेले नाही. एका व्यक्तीकडे शहरामध्ये किती जमीन असली पाहिजे याचे कोणतेही बंधन राहिलेले नाही त्यामुळे काही धनिक लोक जमिनीचा साठा निर्माण करु शकतात. माझे असे म्हणणे की, एक व्यक्ती कितीही एकर जमीन आपल्या ताब्यात ठेवू शकते. त्याचा अर्थ असा होईल की या जमिनीवर त्वरित विकास व्हावा या उद्देशाने व्हेकंट लॅन्ड टॅक्स ॲक्ट आम्ही आणणार आहोत. त्यामुळे या जमिनी जर जमीन मालकांनी तशाच ठेवल्या तर मोठया प्रमाणावर टॅक्स लावण्यात येईल यासंबंधी मी त्यावेळी देखील भाषणात केला होता. त्याप्रमाणे तशा प्रकारचा ॲक्ट आम्ही तातडीने आणणार असून त्यासंबंधीचा ड्राफट तयार झालेला आहे. जमिनीच्या रेडीरेकनरचे जे दर असतील त्याच्या पाच टक्कयापर्यंत टॅक्स लावण्याची तरतूद आम्ही त्या कायद्यात करणार आहोत. त्यामुळे व्हेकंट टॅक्स ॲक्टमुळे जास्तीच्या जमिनी मार्केटमध्ये राहणार नसून त्या लवकरच विकसित होतील असा शासनाला विश्वास आहे. आपल्याला हौसिंग स्टॉक निर्माण करण्यामध्ये आणि घराच्या किंमती कमी करण्यामध्ये त्याचा निश्चितपणे उपयोग होईल असे मला वाटते व त्याच दृष्टीकोनातून साठवणूकी बाबत मला बोलावयाचे होते.यु.एल.सी. ॲक्टच्या संदर्भात मी मघाशी खुलासा केलेला आहे आता मी एस.आर.ए. च्या बाबतीत बोलणार आहे 225 स्केअर फुटाचे घर देण्याची शासनाची भूमिका होती परंतु आता 269 स्केकअर फुट घर देण्यात येणार असून 25 टक्के रेडीरेकनरची कॉस्ट एस.आर.ए.च्या विकासकाकडून घेणार आहोत त्यामागे आपला उद्देश काय आहे ?

नतर श्री.सुंबरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/MMP/SBT/KTG. श्री. गायकवाड नंतर --- 19:30

श्री. टोपे ....

सभापती महोदय, मधल्या काळामध्ये एसआरएच्या संदर्भात विकासकांच्या बाबतीत ज्या मोठ्या प्रमाणात तक्रारी येत होत्या म्हणून शासनाच्या, महापालिकेच्या जमिनींवर जो विकासक नेमला जाणार आहे त्याच्याकडून रेडी रेकनर प्रमाणे त्या जमिनीच्या 25 टक्के रक्कम, प्रिमियम आपण घेणार आहोत आणि याद्वारा शासनाला निधी उपलब्ध करून देणारा स्रोत आपण निर्माण केलेला आहे. त्यामुळे यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करण्याच्या दृष्टीनेही त्याचा उपयोग होणार आहे. सभापती महोदय, आपल्या गृहनिर्माणचा एकच हेतू आहे, आपल्याला जनतेच्या दृष्टीने अफोर्डेबल हौसिंग करावयाचे आहे आणि ते करीत असताना एसआरए मध्ये एफएसआयमध्ये वाढ करून तो 3 पर्यंत आपण केलेला आहे. गृहनिर्माणाच्या संबंधात महत्त्वाचा विषय असा आहे की, सदनिकांच्या किंमतींवर निर्बंध आण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत. म्हणजे त्यासाठी एक रेग्युलेटरी बॉडी निर्माण करण्याचे आपण ठरविले होते. त्या संदर्भात देखील लवकरात लवकर विधेयक निश्चितपणे आम्ही घेऊन येत आहोत. तेव्हा मुंबईमध्ये आलेल्या लोकांना घरे सहज शक्य किंमतीत मुबलकपणे उपलब्ध व्हावीत यासाठी शासनाने हे धोरण जाणीवपूर्वक राबवित आहे. सभापती महोदय, उपनगरांमध्ये .33 एफएसआय वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे, तो एक महत्त्वाकांक्षी निर्णय आहे. आज उपनगरांमध्ये 1 एफएसआय आहे, तो .33 पर्यंत वाढवून आपण देणार आहोत आणि त्या बाबतीतील प्रिमियम घेणार आहोत. राज्य सरकारने घेतलेला हा नवीन निर्णय आहे. निश्चितपणे या प्रिमियरचा उपयोग आपल्याला इन्फ्रास्ट्रक्चर उभारण्यासाठी होणार आहे. याचाच अर्थ सदनिका वाढणार आहेत, घरांचा स्टॉक वाढणार आहे. सभापती महोदय, रेंटल हौसिंग हा कंसेप्टदेखील मोठ्या प्रमाणात आणण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात महत्त्वाचा कंसेप्ट असा आहे की, येथे आलेल्या कोणाही व्यक्तीला, आपण जगामध्ये फिरत असताना पाहतो की, जगामध्ये कोठेही मोठ्या प्रमाणात भाड्याने घरे उपलब्ध होतात परंतु मुंबईमध्ये मात्र तसे होताना दिसत नाही. म्हणूनच रेंटल बेसिसवर किमान 160 चौ.फूटाची घरे उपलब्ध व्हावीत म्हणून साधारणत: 5 हजार घरे बांधण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याबाबत एमएमआरडीएच्या माध्यमातून कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे गृहनिर्माण योजना, रेग्युलेटरी ॲथॉरिटी असेल किंवा एसआरएचा घराचा आकार वाढविण्याचा विषय असेल, त्यासाठी .33 एफएसआय वाढवून देण्याचा विषय असेल, म्हाडाच्या बाबतीत, अर्बन रिनिवल योजनेच्या बाबतीत जे 33.9 खाली जो प्रस्ताव आपण आणू

..... 4यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टोपे ....

पाहत आहोत की ज्यातून 4 हजार चौ.फूट आकाराची जमीन असेल, त्या जमिनीवर आपण एफएसआय वाढवित आहोत आणि जसजसा जमिनीचा आकार वाढेल त्याचप्रकारे इन्सेंटिव एफएसआय देण्याची तरतूद आहे. यातून केवळ म्हाडाच हे विकसित करू शकणार नाही म्हणून म्हाडा आणि प्रायव्हेट असे जॉईंट व्हेंचर देखील आपण अनुज्ञेय केलेले आहे. हे सारे आता चर्चेमध्ये आहे त्यामुळेच यासाठी ठोस निर्णय घेतला जात आहे त्यामुळे मोठ्या पद्धतीने सुनियोजित पद्धतीने मुंबईमध्ये विकास करण्याच्या बाबतीत कामगिरी होऊ शकणार आहे. घरांच्या बाबतीत आणखी एक गोष्ट सांगावयाची म्हणजे समूह विकासाच्या बाबतीत आपण प्रयत्न करीत आहोत. प्रामुख्याने गिरण्यांच्या बाबतीत येथे मोठ्या प्रमाणात चर्चा उपस्थित करण्यात आली. त्या चर्चेच्या माध्यमातून शासनाने महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या सभागृहामध्ये नेहमीच एक चर्चा व्हायची की, या गिरणी कामगरांना त्यांची 100 टक्के देणी द्यायला पाहिजेत. एक गिरणी, जी सबज्युडिस आहे, ती सोडली तर बाकी सगळ्या गिरण्यांच्या जमिनींचा पुनर्विकास होत आहे आणि तेथील कामगारांची देणीही दिली गेली आहेत. .....

( यानंतर सौ. रणदिवे ....4व्ही 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे . . ..

एवढेच नाहीतर त्या कामगारांना घरे देण्याच्या बाबतीत सांगावयाचे तर ज्या जमिनीवर चाळी होत्या, तेथे त्या चाळीला आज 1 एफ.एस.आय.होता, त्याचे 4 एफ.एस.आय.मध्ये रुपांतर करुन जवळजवळ तिप्पट घरे कामगारांसाठी उपलब्ध होतील. मागच्या आठवडयामध्ये कामगारांच्या संदर्भात जी चर्चा झाली होती, त्यावरील चर्चेला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी अशा प्रकारच्या निर्णयासंबंधात माहिती दिली होती.

सभापती महोदय, याठिकाणी नोकऱ्यांच्या संदर्भात सांगण्यात आले. सर्व स्तरावर थर्ड पार्टी इंटरेस्ट क्रिएट झाला, जो फायनल ऑक्युपायर आहे. मग मॉल किंवा इतर ज्या गोष्टी होतील त्याठिकाणी जो फायनल ऑक्युपायर करणारा आहे, जो व्यावसायिक आहे, त्याला सुध्दा नोकऱ्यांसाठी माणसे उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून तेथील गिरणी कामगारांची मुलांना घेणे बंधनकारक असेल आणि त्यासाठी लागणारे ट्रेनिंग देण्याच्या संदर्भात इन्स्टीटयुशन सुरु करण्याच्या बाबतीत ताबडतोब निर्णय घेतले जात आहे. त्यामुळे मला एवढेच सांगावयाचे आहे की, मोठया प्रमाणात घरे निर्माण व्हावीत यासाठी निर्णय राज्य शासनाच्यावतीने घेण्यात येत आहे.

सभापती महोदय, याठिकाणी सर्व सन्माननीय सदस्यांनी ट्रान्सपोर्टच्या बाबतीत विषय उपस्थित केला. मुंबईमध्ये वाढत असलेली लोकसंख्या आणि त्यामुळे सुविधांवर पडणारा ताण या संदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांनी बऱ्याच प्रमाणात चर्चा केलेली आहे. मी याठिकाणी सांगू इच्छितो की, यासंदर्भात राज्य शासनाने जी पावले उचलली आहेत, त्यामध्ये वाहतुकीच्या बाबतीत 4526 कोटी रुपयांचा अतिशय महत्वाकांक्षी एम.यु.टी.पी.प्रोजेक्ट हा मंजूर करण्यात आला आणि त्याच्या जागतिक बँकेच्या माध्यमातून जवळजवळ 2700 कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला. तसेच जे प्रकल्पग्रस्त होते अशा 17,500 जणांना एम.यु.टी.पी.मध्ये पुनर्वसित करण्याचे काम केले आहे. तसेच रेल्वेच्या बाबतीत सांगावयाचे तर रेल्वेचे डबे वाढविण्याचे काम, रेल्वे लाईन्स् वाढविण्याचे काम हे सुध्दा एम.यु.टी.पी.प्रोजेक्टच्या माध्यमातून पूर्णत्वाला येत आहे. त्यामुळे काय परिणाम होईल ? तर आज रेल्वेमधून पाच हजार पॅसेंजर प्रवास करीत आहेत. त्यावरील भार कमी होऊन ही संख्या 2500 पर्यंत येणार आहे. या एम.यु.टी.पी.च्या माध्यमातून रेल्वेवरील ओव्हर बर्डन कमी होणार आहे आणि त्यातून दिलासा मिळणार आहे. तसेच रेल्वे स्टेशन सुधारण्यासाठी सॅटीस संदर्भात स्टेशन एरिया ट्रॅफक इम्प्रुव्हमेंट स्किमच्या संदर्भात अतिशय महत्वाकांक्षी काम ....

. . . .4 व्ही-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे . . ..

एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून हाती घेतलेले आहे. जवळजवळ 100 कि.मी.चा स्काय वॉक आणि 50 स्टेशनमध्ये स्टॅटीसच्या माध्यमातून सुधारणा करण्याचे काम एम.एम.आर.डी.ए.ने हाता मध्ये घेतलेले आहे. हा 600 कोटी रुपयांचा प्रकल्प आहे. त्या माध्यमातून दोन स्टेशनचे काम प्रायोगिक तत्वावर हाती घेतलेले आहे. पुढच्या काळामध्ये 50 स्टेशनच्या बाबतीत काम हाती घेतले जाणार आहे. प्रामुख्याने ली-असोसिएटस् नावाचा जो कन्सल्टंट आहे, त्यांच्याकडे हे कॉम्प्रिहेन्सिव्ह ट्रान्सपोर्ट प्लॅन तयार करण्याच्या बाबतीत जबाबदारी दिली होती. आणि त्या माध्यमातून "एनी वेअर टू एनी वेअर इन मुंबई एमएमआर रिजन. एक तासामध्ये अंतर गाठता यावी अशा प्रकारच्या वाहतुकीची व्यवस्था करण्याचा प्रयत्न आहे. या सेक्टरमध्ये उपाययोजना करताना नियोजन करण्यता आले आहे. तसेच आपण मेट्रो रेल आणि मोनो रेल करीत आहोत. जवळजवळ 146 कि.मी.लांबीची मेट्रो रेलचे नियोजन केलेले आहे आणि पहिल्या टप्प्यामध्ये 62.08 कि.मी.मेट्रो रेलच्या कामाचे भूमीपूजन झालेले आहे आणि पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीपच्या वतीने 19620 कोटी रुपयांचा प्रोजेक्ट करण्याचे नियोजन आहे. मोनो रेलच्या बाबतीत सुध्दा ही एक फीडर रेल म्हणून म्हणजे मेट्रो रेलला फिडींग करणारी रेल म्हणून मोनो रेलचा उपयोग होणार आहे. मोनो रेल हा कन्सेप्ट असा आहे की, मुंबईमध्ये याचा खूप चांगल्या प्रकारे उपयोग होऊ शकेल. जी मेट्रो रेल्वेची जी स्टेशन्स् आहेत, तेथपर्यंत प्रवाशांना आणून पोहोचविण्याचे काम मोनो रेलच्या माध्यमातून होणार आहे. म्हणून अतिशय कमी रुंदीची असणारी ही ट्रेन आहे. तसेच यामध्ये कोणत्याही परिस्थितीत प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न उपस्थित होऊ शकणार नाही.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ MMP/ SBT/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 19:40

श्री. राजेश टोपे..

एका कॉलमवर मोनोरेल्वे चालते. 100 मीटरची मोनोरेल्वे करण्याचे ध्येय शासनाने ठरविले आहे. वडाळा ते मानखुर्द व चेंबूर ते माहूल असा 25 किमीचा मार्ग तयार करण्यास प्राधान्य देण्यात येणार असून हे काम जून 2008 पासून सुरु करण्यात येणार आहे. या वर्षभरामध्ये हे काम पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले आहे. एमयुटीपी व एमयुआयपी अंतर्गत 21 रस्त्यांचे काम करण्यात येणार असून 2647 कोटी रुपये लागणार आहे. मरीन ड्राईव्ह सारख्या महत्वाच्या ठिकाण विकसित करण्याचे काम एमयुआयपीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. रस्त्यांचा विकास करीत असताना त्या ठिकाणी 32 हजार प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन एमयुआयपीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.उड्डाणपूले, इस्टर्न , वेस्टर्न एक्सप्रेस हायवे..

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबईमधील वाहनांची वाढलेली संख्या, नॅनो गाडी या संबंधी आम्ही मुद्दे उपस्थित केले होते त्यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री. राजेश टोपे : रोड, उड्उाणपूल, ट्रान्सपोर्टेशन रोड वायडींगचा विषय असेल, याबाबत राज्य शासनाचा हेतू हा मुंबईमध्ये मास ट्रान्सपोर्टेशन व्हावे असा आहे.

श्री. दिवाकर रावते : माननीय मुख्यमंत्र्यांनी जे भाषण केले त्याच भाषणाचे रिपीटेशन माननीय मंत्री महोदय आता करीत आहेत.

**तालिका सभापती** ( श्री.जगदीश गुप्ता ) : सन्माननीय सदस्यांची अशी भावना आहे की, या चर्चेच्या वेळी त्यांनी जे मुद्दे उपस्थित केले होते त्या अनुषंगाने आपण उत्तर द्यावे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, इंफ्रास्ट्रक्चर बाबत चर्चा झाली होती. सर्व सन्माननीय सदस्यांनी घनकचरा, ट्रान्सपोर्टेशन, वाहनांची होणारी कोंडी याबाबत मुद्दे मांडले होते. त्यासंदर्भात मी येथे सांगत आहे. ट्राफिक समस्येबाबत प्रश्न विचारले गेले. मोनोरेल, मेट्रोरेल्वे हा वाहतूक कोंडीवरील उपाय आहे. हे प्रकल्प किती कोटी रुपयांचे आहेत, ते कधी सुरु होत आहेत, कधी संपणार आहेत याची माहिती मी देत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये आम्ही 3 वर्षापासून हे सर्व ऐकत आहोत. प्रकल्पाचे नारळ फोडला परंतु त्यानंतर कशाचाही पत्ता नसतो. अजून जमीन ताब्यात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

आलेली नाही. त्याच त्याच गोष्टी येथे सांगून आमची दिशाभूल केली जात आहे. सध्या मुंबईतील 60 टक्के जनता ड्रेनेज शिवाय राहत आहे. शहरामध्ये रोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याचा प्रश्न आहे. असे मुंबईचे अनेक प्रश्न आहेत. हे विषय सोडून हायफाय विषय येथे कशा करिता सांगितले जात आहेत ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या सर्व मुद्यांना स्पर्श करणारे भाषण मी करणार आहे. म्हणूनच सुरुवातीला मी सांगितले होते की, मला आपण सविस्तर बोलू द्यावे. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी घनकचरा, मुंबईतील पर्यावरणाच्या समस्या या विषयी मुद्दे मांडले होते. तसेच अनेक सन्मानीनय सदस्यांनी सांगितले होते की, मुंबईतील लोकांना प्रात:विधी करण्यासाठी उघडयावर किंवा नाल्याच्या बाजूला जावे लागते. याबाबत काय निर्णय घेतले आहेत ते मी आपणास सांगतो. एमएमआरडीएच्या वतीने निर्मल अभियान राबविण्यात येत आहे. तसेच 30 हजार स्वच्छता गृहे बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या करिता 250 कोटी रुपये खर्च येणार आहे. डिसेंबर 2009 पर्यंत 30 हजार स्वच्छता गृहे बांधण्याचा प्रकल्प पूर्ण केला आहे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

सभापती महोदय, हा जो प्रश्न उपस्थित केला त्यासंदर्भात निर्मल अभियानाच्या अंतर्गत एमएमआरडीएच्या वतीने मोठ्या प्रमाणावर स्वच्छतागृहे बांधण्याचा प्रकल्प राबविण्यात करण्यात येत आहे हे सुध्दा मला या ठिकाणी सांगावेसे वाटते. सभापती महोदय, मुंबईतील घनकचऱ्याच्या संदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांनी चिंता व्यक्त केली. घन कचऱ्याच्या संदर्भात काय काय उपाययोजना केली जाणार आहे याबाबत सांगू इच्छितो. या ठिकाणी देवनार आणि मुलुंड या ठिकाणी मोठ्या पध्दतीचे डम्पींग ग्राऊंड आहेत. त्या डंपींग ग्राऊंडच्या व्यतिरिक्त कांजूर मार्ग येथे मोठ्या प्रमाणावर लागणारी जमीन विकत घेत आहोत. या सगळ्या डंपींग ग्राऊंडवर आपण शास्त्रीय पध्दतीने जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशनच्या माध्यमातून सुध्दा पैशाची तरतूद करुन खत निर्मिती करण्याचे काम, पॅलेट्स निर्माण करण्याचे काम, प्रोसेसिंग करण्याचे काम करुन शास्त्रीय पध्दतीने या सगळ्या घनकचऱ्याची विल्हेवाट लागली पाहिजे यासंदर्भाने जे प्रकल्प टाकावयाचे आहेत ते प्रकल्प टाकण्याच्या संदर्भात मुंबई महानगरपालिकेच्या बजेटमध्ये सुध्दा तरतूद करण्यात आलेली आहे. मी हेही सांगू इच्छितो की, सगळ्या एमएमआर रिजनमध्ये मिळून मुंबईच्या बाहेर मोठ्या प्रमाणावर या घनकचऱ्याची अतिशय शास्त्रशुध्द पध्दतीने विल्हेवाट लावण्याचा प्रकल्प सुध्दा हा सगळा जो कॉम्प्रिहेन्सीव प्लॅन तयार करण्यात आलेला आहे त्यामध्ये आहे. त्यामुळे आज घनकचऱ्याच्या संदर्भात काय नियोजन केले जात आहे, ते केव्हा पूर्ण होणार याबाबत मी सांगत आहे. कांजूरमार्ग येथे जमीन मिळत नव्हती. त्या ठिकाणी आता खार जमीन मिळवलेली आहे. ती जमीन ट्रान्सफर झालेली आहे. ती जमीन राज्य शासनाच्या ताब्यात आलेली आहे. त्या ठिकाणी खत निर्मितीचा प्रकल्प सुरु करण्याच्या संदर्भात ताबडतोबीने कार्यवाही केली जात आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी अतिक्रमणाच्या बाबतीत मोठ्याप्रमाणावर चर्चा झाली. मी हे निश्चितपणे मान्य करतो की, अतिक्रमण हा मुंबई शहराच्या दृष्टीकोनातून अतिशय चिंतेचा विषय आहे. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत आता उपस्थित नाहीत परंतु त्यांनी सांगितले की, पाणी पुरवठ्याची जी पाईपलाईन आहे त्यावरील अतिक्रमणे काढली पाहिजेत. मी एवढेच सांगू

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. राजेश टोपे .....

इच्छितो की, पाईपलाईनच्या दोन्ही बाजूच्या दहा मीटरपर्यंतच्या झोपड्या काढण्याच्या संदर्भात त्या ठिकाणी महानगरपालिकेकडून एक योजना करण्यात आलेली आहे. त्याचा अंदाज सुध्दा घेतलेला आहे. 16 हजार झोपड्या त्या ठिकाणी आहेत. त्या झोपड्या विशिष्ट फोर्स देऊन कालबध्द पध्दतीने काढण्याच्या संदर्भात त्या ठिकाणी उपाययोजना करण्यात आलेली आहे. नुसते पोलीस स्टेशनच नाही तर आय.जी. लेव्हलचा अधिकारी, ज्याला आपण डेडीकेटेड फोर्स म्हणू, या सगळ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि सातत्याने अतिक्रमण होऊ नये यासाठी यासंदर्भात काम करणारे तीन पोलीस स्टेशन आणि आय.जी. लेव्हलचा अधिकारी या सगळ्या संदर्भाने सुध्दा निर्णय घेतला जाणार आहे हे सुध्दा मला या ठिकाणी आवर्जून सांगावयाचे आहे. एवढेच नव्हे तर सन्माननीय सदस्य नेहमी असे सांगतात की, यामध्ये नेहमी असिस्टंट कमिशनरला आणि पोलीस स्टेशनच्या पी.आय.ला जबाबदार धरतो आणि त्यांच्यावर कारवाई केली जाईल अशा पध्दतीचे आपण म्हणतो. हा अर्बन डेव्हलपमेंटचाच विषय आहे. माझे तर असे म्हणणे आहे की, अशा पध्दतीने हलगर्जीपणा करणाऱ्यांना नुसते जबाबदारच धरणे नाही तर फौजदारी गुन्ह्याच्या संदर्भातील तरतूद एमआरटीपी मध्ये करण्याच्या संदर्भात, जे जबाबदार अधिकारी आहेत की ज्यांनी अतिक्रमण रोखले पाहिजे, ज्यांच्यावर ही जबाबदारी आहे त्यांनी जर त्यांच्या कामात निष्काळजीपणा केला तर काय केले जाणार याबाबत

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो. मी फेरीवाल्याचे एक अतिक्रमण उचलावयास सांगितले. मी कौतुकाने वॉर्ड ऑफीसरला बोललो. या ठिकाणी महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित आहेत. मी कोणाचे नाव घेत नाही कारण मला वाईट वाटते. मी त्यांना कौतुकाने सांगितले. त्यांनी ते सगळे उचलले. आठ दिवस बुशींग अराऊंड करत करत इथे तिथे फिरले. मग मी सांगितले की ते अमूक ठिकाणी आहे. त्यांनी ते उचलले. काल मी पंधरा मिनिटे खिशात हात घालून त्या चोरगाडीपुढे उभा होतो.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

माझ्या घराच्या बाजूला तेच अतिक्रमण गेले 15-20 दिवस तेथेच आहे. मी काल येथून संध्याकाळी 7.30 वाजता गेलो होतो त्यावेळी चोर गाडीतील कर्मचारी त्याच्याकडे व्यवस्थितपणे खात पीत बसले होते. मी तेथे गाडीच्या पुढे आरामात उभा राहिलो. शेवटी माझी सुध्दा लेव्हल आहे, मी कोणाशी बोलावे आणि कोणाशी बोलू नये. ही परिस्थिती मुंबई महानगरपालिकेची आहे. मी 4 वर्षापासून हीच भाषणे ऐकत आहेत, माननीय मुख्यमंत्र्यांची सर्व भाषणे आणून वाचण्यास तयार आहे. त्यांनी अनेक वेळा सांगितले आहे की, आम्ही एमआरटीपी खाली अधिका-यांवर कारवाई करु, झोपडपट्टया हटविण्यासाठी पोलीस फोर्स लावण्यात येईल. माझ्या काळात मुंबई महानगरपालिकेमध्ये 400 पोलीस होते, अधिकारी होते, ते काढून घेतले आहेत. याठिकाणी मंत्रिमहोदयांनी आम्ही हे करणार आहे, ते करणार आहे असे सांगू नये. उद्यापासून ही कारवाई करणार आहोत असे ठामपणे सांगावे. गेली 4 वर्षे सन्माननीय मुख्यमंत्र्यांकडून हेच उत्तर ऐकून आम्ही थकलो आहोत. मला या प्रस्तावावर बोलावयाचे होते, पण मला बोलता आले नाही. शासनाने एका तरी अधिका-याला घरी बसवावे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या अतिक्रमणाला शासन गंभीरपणे घेऊ इच्छिते हे मी येथे सांगत आहे. अधिका-यांनी दाखविलेल्या निष्काळजीपणाबद्दल एमसीएसआरनुसार कारवाई करण्यापेक्षा....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, रस्त्याच्या मध्ये असलेली झोपडी बेकायदेशीर होती, ती झोपडी काढण्याचे आदेश कोर्टाने दिले होते त्यावेळी त्याला विरोध करण्यासाठी महानगरपालिकेतील विरोधी पक्ष नेते उभे राहिले. त्या एका झोपडीमुळे महानगरपालिकेतील श्री.रोकडे यांच्यासारख्या अधिका-यांना काढून टाकले होते. ही वस्तुस्थिती आहे.

श्री.राजेश टोपे : वैयक्तिक कारणामुळे तसे घडले असावे. स्लम ॲक्टच्या कलम 3 (झेड) (2) मध्ये फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे. त्या अनुषंगाची तरतूद एमआरटीपी कायद्यामध्ये केली तर अधिका-यांवर अधिक जरब बसू शकेल आणि अधिक जबाबदारी निश्चितच वाढू शकेल. (अडथळा) याबाबत कायदा करणार असे मी सांगत आहे म्हणजे ते शासनाचे आश्वासन आहे असे समजले पाहिजे. हा महत्वाचा निर्णय आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.राजेश टोपे....

जुन्या भाषणापेक्षा वेगळा निर्णय आहे. शासनाने अतिक्रमण हा विषय अतिशय गांभीर्याने घेतलेला आहे. सभापती महोदय, फेरीवाल्यांनी केलेल्या अतिक्रमणासंबंधी शासनाने काहीच केले नाही असे नाही. याबाबतची मी आकडेवारी सभागृहाला देऊ इच्छितो. दिनांक 7.12.2004 ते 17.2.2005 पर्यंत 36,485 अतिक्रमित झोपडया निष्कासित केल्या आहेत. दिनांक 18.2.2005 ते जानेवारी, 2008 पर्यंत 90,549 झोपडया निष्कासित केल्या आहेत. शासनाने 3 पोलीस स्टेशन स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. अतिक्रमण निष्कासित करण्याच्या कामासाठी जवळजवळ 1 हजार पोलीस प्रतिनियुक्तीवर नेमले जाणार आहेत. म्हणजे डेडीकेटेड पोस्ट या कामासाठी निर्माण करण्याचा निर्णय लवकरच घेण्यात येत आहे. अतिक्रमण हा विषय गंभीरपणे घेण्याची आवश्यकता आहे आणि त्यादृष्टीने शासन लक्ष देत आहे. आय.जी.लेव्हलचे अधिकारी नेमले जातील. यापेक्षा मोठा निर्णय कोणता असू शकतो ? फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करणे, आय.जी.स्तरावरील अधिकारी नेमणे, स्वतंत्र पोलीस स्टेशन्स स्थापन करणे, 1 हजार पोलीस नेमण्यात येते असे महत्वाचे निर्णय घेण्यात येत आहेत. त्यामुळे काही चांगले परिणाम पहावयास मिळतील असा विश्वास वाटतो. आपल्याला माहीत आहे की, राष्ट्रीय हॉकर्सचे धोरण आहे. दिनांक 12.2.2007 रोजी सुप्रीम कोर्टाचा निकाल लागला होता. त्या धोरणाला अनुसरुन राज्य सरकारचे धोरण तयार करण्याचे काम सुरु आहे. त्या धोरणाचा अभ्यास करण्यासाठी नगरविकास खात्याच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी स्थापन केली आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 19:55

(श्री. राजेश टोपे...)

येणा-या एक महिन्याच्या आत या समितीचा अहवाल प्राप्त करुन घेऊन त्या अहवालाच्या अनुषंगाने पुढील पावले टाकली जातील. 221 हॉकिंग झोन्स निर्माण करण्यात आलेले असून तेथे 15159 परवानाधारक फेरीवाल्यांचे स्थलांतर करण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. हॉकिंग झोनसाठी काय काय केले हे सुध्दा मला जबाबदारीने सांगावयाचे आहे. ...(अडथळा).. मी हे सांगितले की, 221 हॉकिंग झोन्स करण्यात आलेले असून परवानाधारक फेरीवाल्यांना तेथे स्थलांतर करण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. जे नॅशनल धोरण आहे त्याला अनुषंगून मुंबईचे धोरण कसे करावयाचे हे ठरविणे आवश्यक आहे. याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाने देखील आदेश दिलेले आहेत. म्हणून मी असे आश्वासन देतो की, 1 महिन्याच्या आत या संदर्भातील सुस्पष्ट असे धोरण राज्य सरकार मार्फत करण्यात येईल. काही महत्वाकांक्षी प्रकल्प आम्ही मुंबईमध्ये करु पहात आहोत. काही सन्माननीय सदस्य ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड येथील प्रकल्प पाहून आलेले आहेत. मुंबईतील तारापोरवाला मत्स्यालय प्रोजेक्टवर आपण 200 कोटी रु. खर्च करणार आहोत. येत्या 8-10 महिन्यामध्ये तारापोलवाला मत्स्यालय प्रोजेक्ट आम्ही पूर्ण करणार आहोत. सनमाननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मिराणी समितीच्या अहवालाचा उल्लेख केला. मिराणी समिती गठित करण्यात आली. त्या समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. त्यांच्याकडून ताबडतोबीने अहवाल प्राप्त करुन घेऊन ज्या मॉल्सनी नियम धाब्यावर बसवून काम केले असेल त्याबाबतीत चौकशी करुन निश्चितपणे कारवाई केली जाईल. त्या आधी अहवाल प्राप्त करुन घ्यावा लागेल. तो प्राप्त करुन त्या संदर्भातील कारवाई केली जाईल.

डॉ. दीपक सावंत : अहवालातील शिफारशी कधी एक्सपीडाईट करणार आहात ?

श्री. राजेश टोपे : लवकरात लवकर. हा विषय महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी याठिकाणी उदाहरणे देऊन सांगितलेले आहे. त्यामुळे त्या समितीचा अहवाल प्राप्त करुन घेऊन त्या संदर्भातील कारवाई लवकरात लवकर करण्यात येईल. काही सन्माननीय सदस्यांनी मुंबईतील ट्राफिक आणि ॲक्सिडेण्टच्या संदर्भातील मुद्दे उपस्थित केले. मी जाणीवपूर्वक सांगू इच्छितो की, दारु पिऊन गाडी चालविणा-या लोकांना पकडण्याची मोहीम

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

23-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4Z-2

(श्री. राजेश टोपे...)

पोलिसांनी सुरु केलेली असल्यामुळे ॲक्सिडेण्टचे प्रमाण कमी झालेले आहे. या प्रस्तावावर चर्चा करताना सन्माननीय सदस्यांनी जे जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्या मुद्यांना मी उत्तरे देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु वेळेअभावी काही सन्माननीय सदस्यांच्या मुद्यांना उत्तरे दिली गेली नसली तरी त्यांच्या मुद्यांची गांभीर्याने नोंद घेतलेली असून त्याप्रमाणे उचित कारवाई केली जाईल.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : मुंबई शहरातील झोपडपट्टयांमधील ग्राहकांना पाण्याचा जो दर लावला जातो त्यापेक्षा चार ते पाच पटीने पाण्याचा दर टॉवर्समधील ग्राहकांना लावण्यात येईल काय ? मुंबईतील काही मार्गावर वाहनांची वेग मर्यादा मोजण्यासाठी गन लावलेले आहेत. मुंबई शहरात जेवढे फ्लॉय ओव्हर्स आहेत त्या ठिकाणी अशा प्रकारचे गन बसविण्याची व्यवस्था करण्यात येईल काय ?

श्री. राजेश टोपे : झोपडपट्टीधारकांना पाणी पुरवठा दर 2 रुपये 25 पैसे आकारला जातो आणि इमारतीमध्ये राहणा-या ग्राहकांना 3 रुपये 60 पैसे दर आकारला जातो. जे ग्राहक टॉवर्समध्ये राहतात त्यांना पाण्याचे दर जास्त लावावेत अशा प्रकारची सूचना सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी केली आहे. त्या सूचनेचा निश्चितपणे विचार करण्यात येईल. त्याचप्रमाणे मुंबईत्तील फ्लॉय ओव्हर्स आहेत तेथे गन बसविण्यात यावा अशी देखील सूचना केल आहे. त्या सूचनेचा देखील निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांना संबंधित विभागाच्या अधिका-यांनी माहिती बरोबर दिलेली दिसून येत नाही. मुंबईतील रस्त्यांवर मायक्रो सिस्टीम बसण्यिाचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतलेला आहे.

श्री.राजेश टोपे : या बाबतीत माहिती घेतली जाईल. सन्माननीय सदस्यांनी गन बसण्यिाची सूचना केली आहे त्या बाबतीत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : मुंबईच्या प्रस्तावावरील चर्चेत आठ सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आहे. ज्या सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला त्यातील सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत सोडले तर अन्य सात सन्माननीय सदस्य उत्तराचे भाषण ऐकण्यासाठी सभागृहात उपस्थित नाहीत. सन्माननीय सदस्य चर्चेत भाग घेतात, परंतु माननीय मत्र्यांचे उत्तर असले की, ते सभागृहात उपस्थित नसतात, याबाबतीत मी मागे मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळच्या पीठासीन अधिका-यांनी नाराजी व्यक्त केली होती. जे सदस्य अशा प्रकारच्या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेतात त्यांनी चर्चेचे उत्तर पूर्ण होईपर्यंत सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे. सभापती महोदय, या गोष्टीची आपण गांभीर्याने दखल घ्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.जगदीश गुप्ता ) : एखाद्या प्रस्तावावर सदस्यांनी भाग घेतला तर त्या प्रस्तावावरील चर्चेचे उत्तर होईपर्यंत त्यांनी सभागृहात उपस्थित असले पाहिजे अशा प्रकारचे संकेत आहेत. सभागृहातील प्रथा, परंपरा आणि संकेत सन्माननीय सदस्यांनी जोपासले पाहिजेत असे माझे देखील मत आहे. सदरहू बाब मी माननीय सभापतींच्या निदर्शनास आणून देईन.

श्री. दिवाकर रावते : ठीक आहे.

**तालिका सभापती** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

----------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.शिगम 20:00

**पृ.शी.**: महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसाय वाढविण्याची आवश्यकता.

**मु.शी.**: महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसाय वाढविण्याची आवश्यकता या विषयावर सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, श्रीमती उषा दराडे, श्रीमती मंदा म्हात्रे, प्रा.फौजिया खान, श्री. राजेंद्र जैन, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री. गुरुनाथ कुलकणी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

" महाराष्ट्र राज्यात पर्यटनाला मोठया प्रमाणात वाव असणे, मराठवाडयात अजिंठा, वेरुळ लेणी आणि ऐतिहासिक किल्ले आणि प्रेक्षिणीय पर्यटन स्थळे असणे, विदर्भातील ताडोबा वाध्र प्रकल्प अभयारण्य व किल्ले आणि एतिहासिक ठिकाणे असणे, कोकणाला लाभलेला 720 कि.मी.चा समुद्र किनारा, निसर्गाने दिलेल्या सहयाद्री पर्वताच्या रांगा, किल्ले, बंदरे, सिंधुदूर्ग जिल्हयाला शासनाने पर्यटन जिल्हा म्हणून दिलेली मान्यता, देशातील केरळ, राजस्थान, गोवाव जम्मू-काश्मिर या राज्यांनी पर्यटनावर केलेल्या एकंदरीत खर्चाच्या तुलनेत राज्यात अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद न करणे, पर्यायाने राज्यात पर्यटनाला चालना न मिळणे, राज्यातील बेकारी दूर करण्यासाठी पर्यटन व्यवसाय वाढविण्याची आवश्यकता, त्यामुळे बेकारीकाही प्रमाणात दूर होण्यास होणारी मदत, यावर शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री. कानडे...

अप्रसुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ...

सभापती महोदय, नियम 260 अन्वये मी पर्यटनाच्या विषयावर चर्चा उपस्थित करीत आहे. जगामध्ये अशी कित्येक राष्ट्रे आहेत मग ती छोटी असतील किंवा मोठी असतील पर्यटन हा त्यांचा एकमेव व्यवसाय आहे आणि त्या व्यवसायावर त्या राज्याची अथवा देशाची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. उदाहरण द्यावयाचे झाले तर स्वित्झर्लॅन्ड, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, थायलंड, केनिया आणि मॉरिशस या देशांचे देता येईल. मॉरिशस हा तर एक संपन्न भूप्रदेश आहे. तेथील सर्व अर्थव्यवस्था ही पर्यटनावर अवलंबून आहे. भारत हा प्राचीन देश आहे. 5000 वर्षांची संस्कृती आणि परंपरा या देशाला लाभली आहे. आज जगामध्ये भारताला अनन्यसाधारण महत्व आहे. या देशाने निरनिराळी स्थित्यंतरे पाहिली आहेत. या देशाने निरनिराळे बदल पाहिलेले आहेत. इ.स.पूर्व आणि इ.स.नंतर या देशाने मोठया प्रमाणावर स्थित्यंतरे पाहिली आहेत. उदाहरण द्यावयाचे झाले तर रामायण आणि महाभारताचे देता येईल. रामायण घडले आणि महाभारतही घडले ज्याचा आपण आदर्श ठेवतो आणि त्या आदर्शानुसार आपला देश पुढे चालला आहे. इ.स.नंतर या देशात मोठया प्रमाणात बदल झाला आणि स्थित्यंतरे घडली. पूर्वीचा एक धर्म सोडून अन्य अनेक धर्मांना महत्व प्राप्त झाले. प्राचीन भारत काय आहे हे पहाण्यासाठी सर्व देशातील माणसे उत्सुक असतात. त्यांना पर्यटनस्थळे पहावीशी वाटतात. भारतात यावेसे वाटते. चायनामध्ये मूळ आहे. बौध्दाचा जन्म आणि प्रसार या देशामध्ये झाला. फार मोठया प्रमाणात बौध्द धर्माचा स्वीकार केला गेला. चायनामध्ये जन्मलेला माणूस बौध्द धर्म मानतो. तेथे अशी आख्यायिका आहे की मला पुढील जन्म माणसाचा मिळणार असेल तर मला ज्या देशात बौध्दाचा जन्म झाला त्या देशामध्ये मिळाला पाहिजे. या राज्यापुरते बोलावयाचे झाले तर वर्षानुवर्षे विकासाच्या मोठया मोठया प्रक्रिया आणि योजना आखल्या गेल्या. पण योजना आखत असताना या राज्यात अशी काही ऐतिहासिक वारसा सांगणारी स्थळे आहेत की त्याठिकाणी पर्यटनाला मोठया प्रमाणात चालना दिली असती तर मोठया प्रमाणात पर्यटनाचा व्यवसाय राज्यात वाढला असता. आज जी बेकारीची परिस्थिती आहे त्यातून त्याठिकाणी तरुणांना कामधंदा मिळाला असता आणि त्यांच्या हाताला काम मिळले असते.

( **सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषा दराडे** )

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी.........

मला सांगायला आनंद वाटतो की, रामानंद सागर यांनी 'रामायण' या सिरिअल्सची निर्मिती केली. त्यामध्ये लंकेमधील जे घनघोर युध्द दाखविले आहे त्याचे शूटिंग डहाणू तालुक्यातील बोर्डी येथे करण्यात आले होते. याची किती लोकांना माहिती आहे मला कल्पना नाही. परंतु अशी सुरेख लोकेशन्स, प्रेक्षणीय स्थहे या राज्यामध्ये अस्तित्वात आहेत. अजंठा-वेरुळ येथील लेणी जगप्रसिध्द आहेत. वर्षानुवर्षे जगातील पर्यटक या लेणी पहावयास येत आहेत. जगामध्ये इतरत्र कुठेही अशी लेणी पहावयास मिळणार नाहीत. पर्यटनाच्या दृष्टीने खूप चालना देण्यासारखे आहे. भारत सरकारने या लेणींच्या विकासासाठी किती पैसा खर्च केला याची मला कल्पना नाही. परंतु जपान सरकारने अजंठा-वेरुळ लेण्यांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन दिला आणि तेथे विकासाची कामे सुरु झाली आहेत. याचे आपल्याला काही वैषम्य वाटत नाही. ज्या खात्याला काही महत्व नाही असे या राज्यात पर्यटन खाते आहे. सन्माननीय वनमंत्री याठिकाणी बसले आहेत. वन खात्याच्या माध्यमातून मोठया प्रमाणात पर्यटनाला चालना देता येईल. परंतु पर्यटन खाते हे लिस्ट प्रायॉरिटीचे खाते आहे. वन खात्याला सुध्दा बजेटमध्ये खास अशी तरतूद केलेली नाही. ही दोन्ही खाती या राज्यामध्ये केवळ खाती असावीत म्हणून अस्तित्वात आहेत. आज राज्याचे महसुली उत्पन्न 89 हजार कोटी रुपये असताना पर्यटन विकासासाठी अर्थसंकल्पात कमीत कमी तरतूद केलेली आहे. मराठवाड्यामध्ये अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. लोक ही स्थळे पाहण्यासाठी येतात. विदर्भातील रामटेक हे पर्यटन स्थळ सुप्रसिध्द आहे. त्याबाबत एक आख्यायिका आहे. रुक्मिणीचे स्वयंवर करण्यासाठी श्रीकृष्ण द्वारकेहून त्याठिकाणी आले आणि रुक्मिणीला घेऊन गेले व स्वयंवर झाले. रामटेक येथील मंदिर बघण्यासारखे आहे. विदर्भामध्ये ताडोबा व्याघ्र प्रकल्प बघण्यासारखा आहे. सन्माननीय वनमंत्र्यांनी इको टूरिझम ही नवीन संकल्पना आणली आहे. वन खात्याच्या माध्यमातून पर्यटनाला चालना द्यावयाची आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी छत्रपती शिवरायांनी निर्माण केलेले अनेक किल्ले आहेत. जगामध्ये पहावयास मिळणार नाहीत अशी शिल्पे पश्चिम महाराष्ट्रातील निरनिराळ्या डोंगर कपारीमध्ये पहावयास मिळतात.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

सभापती महोदय, कोकणाला 720 कि.मी. चा समुद्र किनारा लाभला आहे. या समुद्र किना-याचा पर्यटन स्थळ म्हणून विकास व्हावा यासाठी भारत सरकारने 250 कोटी रुपये पाच वर्षामध्ये उपलब्ध करुन देणार आहे म्हणजे प्रत्येक वर्षाला 62.5 कोटी रुपये मिळणार आहेत. परंतु माननीय वनमंत्री सांगतात की, हे पैसे आम्ही केंद्रसरकारकडे मागितले होते. कोकणाला 720 कि.मी. सागरी किनारा लाभला असून या ठिकाणच्या पर्यटनाला विकसित करण्यासाठी भारत सरकार कडून आपल्याला हा निधी मिळालेला आहे. मी कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हयाचा आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा भारत सरकारने आणि राज्य सरकारने पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेला आहे. सिंधुदुर्ग जिल्हयाला पर्यटन जिल्हा म्हणून मान्यता मिळालेली आहे परंतु ही मान्यता केवळ कागदावरच मिळालेली आहे. परंतु सिंधुदुर्ग जिल्हा पयर्टन जिल्हा घोषित झालेला असतांना सुध्दा केंद्र सरकार कडून तसेच राज्य सरकार कडून काहीही प्रयत्न होतांना दिसत नाहीत. जी कामे अन्य जिल्हयात केली जातात तीच कामे सिंधुदुर्ग जिल्हयात केली जातात. पर्यटनासाठी सिंधुदुर्ग जिल्हयात वेगळी काहीही कामे केली जात नाहीत. गोवा हा सिंधुदुर्ग जिल्हयाला लागून आहे. गोव्यामध्ये दर वर्षी दोन ते अडीच हजार चार्टर्ड विमाने येत असतात. एवढया मोठया प्रमाणात गोव्यामध्ये विमाने येत असल्यामुळे विमानाच्या पार्किंगसाठी जागा कमी पडते म्हणून ही विमाने बेळगावच्या विमानतळावर पार्किंग केली जातात. गोव्याची लोकसंख्या 18 लाखापेक्षा जास्त नाही. गोव्यामध्ये दरवर्षी देशातील आणि परदेशातील असे 18 लक्ष पर्यटक भेट देत असतात. जर परदेशातील पर्यटकाला विचारले तर व्हाट ईज युवर लास्ट डेस्टीनेशन ? तर तो सांगतो आय एम गोईंग टू इंडिया अँड माय लास्ट डेस्टीनेशन ईज गोवा. गोवा हे छोटेसे राज्य असतांना देखील या राज्याला जगामध्ये फार महत्व आलेले आहे. गोवा हे केंद्रशासित प्रदेश होता त्यावेळेस त्यांना विचारले की, तुम्हाला महाराष्ट्रात विलीन व्हावयाचे आहे काय त्यावेळेला त्यांनी सांगितले की, आम्हाला स्वतंत्र राज्य पाहिजे आहे, आम्हाला दुस-या राज्यात विलीन व्हायचे नाही. त्यांनी जर आपल्या राज्यात सामील होण्याचा निर्णय घेतला असता तर गोवा आज आपल्या राज्यात सामील झालेले असते. सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयाला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आलेले आहे परंतु पर्यटक येतील, त्यांची सोय होईल यासाठी काहीही व्यवस्था करण्यात आलेली

श्री. गुरुनाथ कुलकर्णी.....

नाही.1986-87 मध्ये जेव्हा माननीय शरद पवार साहेब पहिल्यांदा राज्याचे मुख्यमंत्री झाले होते तेव्हा त्यांनी गणपती पुळेला भेट दिली होती.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 20.20

श्री.गुरुनाथ कुलकर्णी ...

श्री.टी. चंद्रशेखर रत्नागिरीचे जिल्हाधिकारी होते व त्यावेळी गणपतीपुळे येथे विकास करण्याचे काम सुरु करण्यात आले होते. त्या पूर्वी तेथे फक्त जुने गणपतीचे मंदीर होते . माननीय श्री.पवार यांनी ज्यावेळी हा भाग पाहिला तेव्हा त्यांना असे वाटले की, पर्यटन स्थळ म्हणून हा भाग चांगला विकसित होऊ शकेल त्यामुळे श्री. टी. चंद्रशेखर यांच्यावर त्या भागाचा विकास करण्याची जबाबदारी टाकण्यात आली व त्या कामासाठी लागणारा आवश्यक तो निधी देखील त्यांना दिला होता. तेव्हा पासून तेथे विकास कामाला सुरुवात झाली होती. त्यामुळे या राज्यातील ते एक सुरेख असे पर्यटन स्थळ म्हणून विकसित झालेले आहे.आज हजारो संख्येने पर्यटक गणपतीपुळे येथे येतात. या ठिकाण्ी पर्यटन विकास राज्य मंत्री उपस्थित असल्यामुळे मी त्यांना सांगू इच्छितो की या विभागाच्या वतीने पर्यटन विकासाची केन्द्रे चालविली जातात त्यातील प्रॉफिट मेकीग जी युनिटस आहेत त्यापैकी एक प्रॉफिट मेकीग युनिट हे गणपतीपुळे आहे.

सभापती महोदया, यानंतर मी दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडू इच्छितो. तारकर्लीचा पर्यटन विकास करण्याच्या कामाला जेव्हा आम्ही सुरुवात केली होती. तेव्हा सिंधुदूर्ग जिल्हयातील मालवणच्या पत्रकारांनी असे सांगितले की, पर्यटन विभागाच्या वतीने सी.आर.झेड.चे उल्लंघन केले जात आहे. त्यावेळी माननीय श्री.छगन भुजबळ हे पर्यटन विभागाचे मंत्री होते त्यावेळी मी त्यांच्याबरोबर तारकर्ली येथे गेलो होता तेव्हा पत्रकारांनी आम्हाला असे विचारले की ,सी.आर. झेड.चे तुम्ही उल्लंघन केलेले आहे. तेव्हा श्री.भुजबळ साहेबांनी त्यांना सांगितले की , " तुम्ही केरळ राज्यात जाऊ पहावे . एखाद्या भागाचा पर्यटन केन्द्र म्हणून विकास केला जात असेल तर त्या कामाला खो घालण्याचे काम आपण करीत असाल तर मी माझ्या खर्चाने तम्हाला केरळमध्ये नेऊन दाखवतो की त्या ठिकाणी सीआरझेडची कशी "ऐसी की तैसी " करुन टाकलेली आहे. त्या ठिकाणी सीआरझेडचे उल्लघन करुन समुद्र किनारी हॉटेल्स बांधण्यात आलेली आहेत. सर्वात जास्त पर्यटनाचा विकास केरळ या राज्याने केलेला आहे. त्यांनी सीआरझेडचे पालन केलेले नाही. तर केवळ पर्यटन विकासाचे काम करण्याचे त्यांनी ठरविलेले आहे केवळ नियमांची भीती आपल्यालाच दाखविण्यात येत आहे त्यामुळे कोणतेही विकासाचे काम करावचयाचे असेल तर जिल्हाधिकारी व तहासीलदार यांच्याकडून नोटीसेस दिल्या जातात अमुक करावयाचे नाही व तमुक करावयाचे नाही असे सांगितले जात असल्यामुळे पर्यटनाचा विकास संपूर्णपणे खुटलेला आहे .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी

श्री.सुशीलकुमार शिंदे हे जेव्हा या राज्याचे मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांनी कोकणासाठी 300 कोटी रुपयांचे पॅकेज दिले होते त्या अंतर्गत कोकणात रस्त्याची कामे करण्यात आली होती, त्याचबरोबर इरिगेशन आणि इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याची कामे करण्यात आली होती. पर्यटनावर खर्च करण्यासाठी आम्हाला त्यावेळी मोठया प्रमाणावर निधी मिळाला होता त्या 300 कोटी रुपयापैकी सिंधूदूर्ग जिल्हयाकरिता 30 कोटी रुपये मिळाले होते. त्याचा वापर चांगल्या प्रकारे केला असून त्यातून सांवंतवाडी, वेंगुर्ला , मालवण येथे विकास झाला असून मालवण येथे जे.टी. बांधण्यात आली आहे. 300 कोटी रुपयाच्या पैंकेजमधून आम्हाला जो निधी मिळाला होता त्यातून ही सर्व विकासाची कामे तेथे करण्यात आलेली आहेत.आजही अनेक कामे करता येण्यासारखी आहेत. मालवण येथील समुद्रकिना-यावर जर आपण गेला तर त्या समुद्रात निरनिराळया रंगाचे मासे आपल्याला पहावयास मिळतात त्याचबरोबर स्नॉकर्लीग नावाचा एक उपक्रम तेथे राबविण्यात येत आहे. डॉ. सारंग हे वैज्ञानिक असून ते सोलापूरचे असले तरी मालवण येथे गेले आणि त्यांनी तेथे स्नॉकर्लीग आणि स्कुबा डायव्हीग सारख्या स्पोर्ट ॲक्टीव्हीटीज सुरु केलेल्या आहेत..

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

KBS/MMP/KTG/SBT/KGS. श्री. गायकवाड नंतर --- 20:25

श्री.गुरूनाथ कुलकर्णी ....

आज मोठ्या प्रमाणात पर्यटक तेथे येत आहेत. परवा अर्थसंकल्पामध्ये आपण यासाठी 5 कोटीचा निधी दिला आहे. अँग्रिया बँक सारे बेट, मालवण-वेंगुल्यापासून 100 कि.मी. अंतरावर आपल्याला सापडले आहे, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात निरनिराळ्या जातीचे, रंगांचे मासे आणि स्वच्छ असा समुद्र तळ पहावयास मिळतो. तेव्हा हे प्राथमिक असले तरी त्याच्या विकासासाठी राज्य सरकारने 5 कोटी रूपयांची तरतूद यावेळी केलेली आहे त्याबद्दल मी राज्य सरकारचे आणि पर्यटन विभागाचे अभिनंदन करतो. राज्याला लाभलेला हा संपूर्ण समुद्र किनारपट्टीचा भाग आहे, त्या संदर्भात एकदा मुख्यमंत्र्यांबरोबर आम्हा सर्व आमदारांची सह्याद्रीवर बैठक झाली होती. त्यावेळी मी सांगितले होते की, कोकणामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने मोठ्ठे पोटेंशिअल आहे आणि म्हणून त्यादृष्टीने राज्य सरकारने कोकणाला पैसा दिला पाहिजे. कोकणाला आपण पर्यटन विकासासाठी पैसा दिला तर तेथे आमचे निरनिराळे पडलेले प्रकल्प आहेत, 1980 पासून आम्ही सागरी महामार्गाची मागणी करीत आहोत तो सागरी महामार्ग आपण पूर्ण करू. अगोदरच कोकणामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने अनेक सौंदर्यस्थळे आहेत. त्यात एवढे पोटेंशिअल आहे की, राज्याची संपूर्ण अर्थव्यवस्था मजबूत करण्याचे काम त्यातून होऊ शकेल. मी हे जाहीरपणेदेखील सांगितले होते आणि आजही सांगतो की, राज्याची अर्थव्यवस्था आपल्याला मजबूत करावयाची असेल तर 720 कि.मी.च्या सागरी पट्ट्यामध्ये विकासाच्या कामांसाठी आपण मोठ्या प्रमाणत निरनिराळ्या कामांसाठी निधी उपलब्ध करून दिल्यास त्याच्या दामदुपटीने आपल्याला रिटर्नस् मिळू शकतील. सभापती महोदय, मी आपला जास्त वेळ घेऊ इच्छित नाही. या विषयावर माझे अन्य सहकारी बोलणार आहेत याचीही मला जाणीव आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, पर्यटन विभागाने राज्यातील, विशेषत: कोकणातील पर्यटनाचा विषय हा गांभीर्याने घेतला पाहिजे. मी जेव्हा 2002 मध्ये या सभागृहात सदस्य म्हणून आलो तेव्हा पहिली दोन तीन वर्षे जो अर्थसंकल्प राज्याचा मांडला जात असे त्यात पर्यटन विभागासाठी अत्यंत तुटपुंजी तरतूद केली जात असे. अवघी 8 ते 10 कोटी रूपयांची तरतूद केली जात होती. त्यात आपली मॅचिंग ग्रँट अधिक केंद्राचे तेवढेच 8 कोटी असे 16 कोटी रूपये एकूण राज्यातील पर्यटनासाठी दिले जात होते. आपल्या पर्यटन विभागाचा कोणीही अधिकारी पर्यटन विकासाच्या दृष्टीने काम करीत नव्हता, महामंडळाला एमडी देखील दिले जात नव्हते.

...... 5एफ 2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कुलकर्णी ....

थोडक्यात सांगावयाचे तर पर्यटन विभाग हा अत्यंत दुर्लक्षित विभाग असे. आता या विभागाला माननीय श्री.सुरेश शेट्टी यांच्यासारखे चांगले मंत्री लाभले आहेत, ते चांगले काम करीत आहेत. पण पूर्वी या विभागासाठी जे पैसे दिले जायचे ते सारे कर्मचाऱ्यांच्या पगारापोटी खर्च व्हायचे. अधिकाऱ्यांपुढे कोठलेही काम वा ध्येय्य नसायचे. आता आमच्या कर्तबगार मंत्र्यांनी या अधिकाऱ्यांना कामाला लावावे. कोकणातील गणपती-पुळे चांगल्या प्रकारे विकसित झालेले आहे. ....

( यानंतर सौ. रणदिवे .... 5जी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/SBT/MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 20:30

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . . .

ते ठिकाण म्हणजे आता तुम्हाला प्रॉफीट मेकींग युनिट झालेले आहे. ताकर्ली येथे देखील नवीन प्रोजेक्ट सुरु झालेला असून तो देखील नफ्यामध्ये आहे. परंतु शासनाकडे राज्यातील पर्यटनाच्या दृष्टीने काय व्यवस्था आहे ? तुम्हाला पर्यटन महामंडळाच्या ऑफीसमध्ये कोण बसलेले आहे ? हे देखील माहिती नाही. पूर्वी पर्यटन विकास महामंडळाकडे बऱ्याच गाड्या होत्या. ओबेरॉय शेरेटन या हॉटेल समोर पर्यटन महामंडळाची जागा होती. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या गाड्या मराठवाडयामध्ये, कोकणामध्ये जात असत. तसेच पुणे, शिवनेरी पर्यंत देखील जात होत्या. पण आज सर्व गाड्यांचा चक्काचूर झालेला आहे. या गाड्या कुठे आहेत ? या गाड्या भंगारमध्ये टाकलेल्या आहेत का ? हे देखील कोणाला माहिती नाही. माझे असे म्हणणे आहे की, जर पर्यटनाच्या संबंधात अधिकाऱ्यांना काम करावयाचे नसेल तर त्यांना घरी पाठवावे आणि पर्यटनाच्या विकासासाठी नवीन संकल्पना घेऊन पुढे येणाऱ्या अधिकाऱ्यांची या महामंडळामध्ये नेमणूक करा. अशा प्रकारे पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न केला तर त्या माध्यमातून लोकांना रोजगार मिळेल. आपण राज्यामध्ये निरनिराळया मार्गाने महसूली उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहोत. अशा वेळी आपण पर्यटनवाढीच्या बाबतीत प्रयत्न केले तर हा विभाग देखील चांगल्या प्रकारचे पोटेन्शिअल निर्माण करणारा विभाग होईल. म्हणून माझी विनंती आहे की, राज्यातील पर्यटनाचा विकास करण्याच्या बाबतीत आतापर्यंत जे काही झाले, ते सोडून द्या. पण पुढच्या काळामध्ये पर्यटनाचा विकास करण्यासाठी चांगल्या प्रकारचे नियोजन करावे आणि त्यासंदर्भात व्हीजन डॉक्युमेंट तयार करावी. या माध्यमातून राज्यामध्ये पर्यटनाचा विकास घडवून आणावा अशी मी शासनाला विनंती करतो. सभापती महोदया, आपण याठिकाणी मला प्रस्ताव मांडण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र .

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . .5 जी-2

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी पर्यटनाच्या संबंधात सदनामध्ये जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्यासंबंधात बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी या सदनामध्ये सात वर्षापासून काम करीत आहे आणि सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी या विषयावर जवळजवळ 7-8 वेळा चर्चा उपस्थित केलेली आहे. मी या विषयासंबंधात भाषण करीत असताना कोणतेही मुद्दे रिपीट करणार नाही. तसेच मला माननीय मंत्री महोदयांचे उत्तर देखील पाठ आहे. केवळ तीन-चार मुद्दे मांडून मी माझे भाषण संपविणार आहे.

सभापती महोदय, मी सदनामध्ये या विषयाच्या संदर्भात अनेक वेळा बोललो असल्याने तेच तेच मुद्दे किती वेळा मांडावयाचे ? मला देखील त्याचा कंटाळा आलेला आहे. या राज्यातील पर्यटन विकास महामंडळ कार्यक्षम कसे होईल यादृष्टीने शासनाने विचार केला पाहिजे. पण याठिकाणी या विषयावर बोलतो, पण यासंबंधात ज्यांनी काम करावयास पाहिजे, ते करीत नाहीत. पर्यटन महामंडळाने ठिकठिकाणी जागा घेतलेल्या आहेत. कोकणामध्ये देखील समुद्र किनारी असलेल्या जमिनीचे ॲक्वीझिशन करुन जागा ताब्यात घेतलेल्या आहेत. काही गुरचरणच्या जागा देखील घेतलेल्या आहेत. ग्रामपंचायतीच्या ताब्यातील जमिनी ताब्यात घेतलेल्या आहेत. तेथे पर्यटनाचा व्यवसाय सुरु होईल या उद्देशाने या जमिनी देण्यासाठी विरोध करण्यात आला नाही. पण या जमिनी ताब्यात घेतल्यानंतर अजूनपर्यंत तेथे पर्यटनाच्या विकासाच्या दृष्टीकोनातून कोणतेही नियोजन केलेले नाही, त्या परिसराचा विकास केलेला नाही, कोणतेही उद्योगधंदे सुरु केलेले नाहीत. या जमिनी खाजगी लोकांना कशा दिल्या जातील यादृष्टीने करोडो रुपयांचे व्यवहार करण्याचे काम पर्यटन महामंडळ करीत आहे. माझ्या तालुक्यामध्ये नागाव येथे समुद्र किनाऱ्यावरील जागेचा भाव 20 लाख रुपये गुंठा आहे. कोकणामध्ये 4 कोटी एकरी भाव आहे. तसेच आक्शी, नागाव, किहीममध्ये जवळजवळ 40 ते 50 एकर जमीन आहे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील..

अलिबाग नगरपालिकेच्या हद्दीतील भाव आता साधारणपणे 10 कोटी रुपये प्रती एकर एवढे वाढलेले आहेत. येथील जागा खरेदी केली परंतु तेथे कोणतीही डेव्हलपमेंट केली नाही. अधिकारी तेथे जाऊन कोणती चर्चा करतात ? त्या ठिकाणी लोकप्रतिनिधी आहेत, आमदार आहेत जिल्हापरिषदेचे मेंबर आहेत, जिल्हापरिषदेचे अध्यक्ष आहेत, सरपंच आहेत. परंतु हे अधिकारी यांना जाऊन भेटत नाही. त्यांना आमदार कोण आहेत हे तरी माहीत आहे काय ? मग हे लोक येथे डेव्हलपमेंट कसे काय करणार आहेत ? येथे विकास करताना, स्थानिक लोकांना किंवा लोकप्रतिनिधींना सामावून घेतले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी आता सांगितले की, सिंधुदूर्ग खूप लांब आहे, परंतु गोवा जवळ आहे. मुंबईच्या नजीक जे समुद्र किनारे आहेत, किल्ले आहेत ते पाहण्यासाठी परदेशी पर्यटक येतात. तेथे येणाऱ्या पर्यटकांची राहण्याची सोय आपण केली पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी पर्यटन महामंडळावर अनेक वेळा चर्चा केली आहे. पर्यटन महामंडळाने आतापर्यंत काय केले आहे ? घारापुरी येथे जलद गतीने वाहतूक करण्यासाठी कॅटरेमनची सेवा सुरु करण्यात आली होती. तेथे ही सेवा सुरु करण्याकरीता 2 कोटी रुपये खर्च करण्यात आले. परंतु ही बोट घारापुरी येथे नेण्यासाठी परवानगी मिळालेली नाही. या बाबत ग्रँट मिळालेली नाही. पर्यटन महामंडळ या बाबत काय करीत आहे ?

सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, सध्या जितकी मालमत्ता आहे, ती मालमत्ता माझ्या ताब्यात द्या. मला तेथे नेमा. बजेटमध्ये कोणतीही नवीन तरतूद न करता हे सर्व प्रोजेक्टस मी व्हाएबल करुन दाखवीन. हे मी या ठिकाणी अनुभवाने बोलत आहे. गेट वे गोरीची जलवाहतूक व्यवस्था मी खाजगी स्वरुपात सुरु केली आहे. तेथे कॅटरेमन सुरु केले आहेत. परंतु घारापुरी पर्यंत जी बोट सुरु करण्यात येणार होती ती अद्यापि सुरु झालेली नाही. ती सेवा अजूनपर्यंत तशीच पडून आहे. पहिल्या एका वर्षामध्ये, केवळ 1 हजार पॅसेंजर अलिबागला गेले होते. परंतु त्या नंतर पुढील वर्षी 8 लाख पर्यटक अलिबागला गेले. महाराष्ट्राला 720 किमी लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे असे केवळ येथे सांगितले जाते. याबाबत मी अनेक

..2..

श्री. जयंत प्र. पाटील..

उदाहरणे देऊ शकतो. माननीय मंत्री महोदयांनी या संदर्भात उद्या आम्हाला ठोस उत्तर द्यावे.

सभापती महोदय, आपल्याकडे जी प्रॉपर्टी आहे, समुद्र किनारे आहेत त्याचा विनियोग केला गेला पाहिजे. याबाबत आपण आम्हाला उद्या उत्तर द्यावे. कोकण कृषी विद्यापीठाचा एक सदस्य म्हणून मी 5 वर्षापासून काम करीत आहे. या राज्यातील 5 प्रमुख कृषी विद्यापीठातील कोकण कृषी विद्यापीठ हे एक प्रमुख विद्यापीठ आहे. हे कृषी विद्यापीठ 5 हजार एकरामध्ये वसलेले आहे. या विद्यापीठाचे वर्षाला 8 कोटी रुपयांचे उत्पन्न आहे. तेथील कर्मचाऱ्यांना पगार देण्यासाठी व इतर सोयी सुविधा देण्यासाठी 7.5 कोटी रुपयांचा खर्च करण्यात येतो. मुंबईमध्ये येणारे पर्यटक कोकण कृषी विद्यापीठामध्ये कसे जातील याचा आपण विचार केला पाहिजे. कोकण कृषी विद्यापीठामध्ये, आंबा, काजू यांची सुंदर झाडे आहेत. तेथे नागावचा सुंदर किनारा आहे. परंतु आज हा किनारा दुर्लक्षित झालेला आहे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

आपल्याकडे कल्पना नाहीत. लोकांकडे पेसे आहेत. परदेशातून जे पर्यटक येतात त्यांच्या दृष्टीने ही नगण्य रक्कम आहे. परंतु आपल्याकडे कल्पना आहे काय ? आपण कोणाशी चर्चा करता काय ? बाकीच्या विकासापेक्षा आपल्याकडे जे इन्फ्रास्ट्रक्चर आहे त्यामध्ये हा व्यवसाय कसा वाढेल, पर्यटक कसे येतील आणि तेथील लोकांना पूरक उद्योगधंदा कसा मिळेल हे बघण्याचे काम प्रामुख्याने पर्यटन विकास महामंडळाने केले पाहिजे. आपण मला आठवड्यातून एक तास दिला तर मी आपल्याला सर्व सांगेन. आपण प्रामुख्याने ते करु शकतो. मी माननीय मंत्रिमहोदयांना कळकळीने सांगेन. मी फ्रान्समध्ये निज येथे हेलिकॉटरमधून गेलो. हेलिकॉप्टमधून जात असताना तेथील समुद्र किनारा बघितला. आपल्याकडे असे सौंदर्य नाही काय असे मी म्हणालो. मी हेलिकॉप्टरने कधी गोव्याला गेलो नव्हतो परंतु माझ्या मित्राने आग्रह केला की, आपले समुद्र किनारे कसे आहेत ते बघा. म्हणून मी हेलिकॉप्टरने गोव्याला जात असताना हेलिकॉप्टर जमिनीपासून कमीतकमी उंचीवरुन नेऊन ते सर्व बघत गेलो. मुंबईतील महालक्ष्मी येऊन 45 मिनिटात मी गोव्याला कलंगूट येथे पोहोचलो. हेलिकॉप्टरमधून जात असताना येथील सौंदर्य बघितले. ते ऐश्वर्य बघितले. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांना मी बोललो की हे समुद्र किनारे आपले ऐश्वर्य आहे. या ठिकाणी सुंदर समुद्रकिनारे आहेत. कोकणात काय वैभव आहे हे मी बघितले. श्रीवर्धन, हरिहरेश्वर बघून डोळ्याचे पारणे फिटले. ते आपण बघणार की नाही ? आपले जे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत ते याकडे बघतात की नाही ? आम्ही आमदार आहोत. मी स्वत:ला ॲक्टीव आमदार समजतो. सर्व आघाड्यांवर काम करणारा मी कार्यकर्ता आहे. मी सहकार क्षेत्रामध्ये काम करतो. मी शिक्षण क्षेत्रामध्ये काम करतो. मी व्यवसाय सुध्दा करतो. मी व्यवसायातील सगळी कामे करतो. आपल्याला कधी वाटले नाही काय की, हे लोकप्रतिनिधी आहेत आणि हा धंदा कसा वाढेल याबाबत त्यांना विचारावे. परंतु आम्हाला कोणी भेटत नाहीत. मी हॉटेल व्यवसायामध्ये सुध्दा आहे. माझे पंचतारांकित हॉटेल आहे. या पध्दतीचा व्यवसाय कसा वाढवावयाचा हे बघण्याचे आपले काम आहे. पण हे कोणी बघत नाही. जोपर्यंत आपण ते बघणार नाही तोपर्यंत काही होणार नाही. कोकण कृषी विद्यापीठामध्ये पर्यटन व्यवसाय चांगल्या पध्दतीने

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .......

वाढू शकतो. तेथील कुलपती डॉ. मेहता हे चांगले अधिकारी आहेत. अनेकवेळा सन्माननीय सदस्यांना सांगितले की कोकण कृषी विद्यापीठाला जावयाचे आहे. वेगळ्या तऱ्हेने काम करण्याची इच्छा आहे. त्या ठिकाणी पर्यटन व्यवसाय कसा वाढेल हे बघण्याचे काम प्रामुख्याने आपल्याला करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी बोलत असताना संपूर्ण महाराष्ट्राच्या बाबतीत सांगितले. मी त्याबाबत बोलणार नाही. या ठिकाणी कृषी पर्यटन कसे वाढेल हे बघण्याचे काम प्रामुख्याने या ठिकाणी केले पाहिजे. कृषी पर्यटनाच्या कामामध्ये त्या ठिकाणी बेरोजगार तरुण तरुणी कसा व्यवसाय करीत आहेत आणि त्यांना आम्ही कसे कामाला लावले आहे हे माननीय मंत्रिमहोदयंनी अलिबागला येऊन बघावे. नागाव येथे माझी वाडी आहे. शनिवार-रविवारी नागाव येथे 2 ते 3 हजार पर्यटक येतात. नागावला आल्यानंतर गोव्याला आलो आहोत असे वाटते. गोव्याला जसे पर्यटक येतात तसे पर्यटक त्या ठिकाणी सुध्दा येतात. परंतु त्या ठिकाणी कोणत्याही सुविधा नाहीत. एकाबाजूला एमटीडीसीची जागा आहे.

यानंतरश्री. खंदारे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

दुस-या बाजूला वन विभागाची जागा आहे. वन विभाग बांधकाम करु देत नाही, तेथे कोणत्याही प्राथमिक सुविधा करु देत नाही, लेव्हल करु देत नाही. सन्माननीय पर्यटन राज्यमंत्री आणि सन्माननीय वन मंत्री आपण दोघांनी अलिबागला यावे. मी आपल्याला लाँचने घेऊन जाण्यास तयार आहे. शासन म्हणून तुम्ही याबाबत विचार करणार आहात की नाही हे मला प्रामाणिकपणे विचारावयाचे आहे. आपल्याकडे एकविरा देवी आहे. युरोप आणि बाकीच्या देशातील नवीन तरुण पर्यटक गोव्याप्रमाणे राज्यातील पर्यटन स्थळाकडे कसे येतील ते पहावे. त्यांनाही पंढरपूरला जायचे आहे, एकविरा देवीच्या ठिकाणी जायचे आहे. त्याचा विचार करणार की नाही ? सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, या खात्यामध्ये असलेल्या अधिका-यांच्या डोक्यामुळे काही सुधारणा होईल असे वाटत नाही. म्हणून माझी सूचना आहे की, पर्यटन हा विषय घेऊन एमबीए केलेल्या, पर्यटनाचा कोर्स घेऊन डीग्री मिळविलेल्या तरुणांना संधी द्यावी. सरकारमध्ये असलेले आयएएस अधिकारी हे काम करु शकत नाहीत. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी म्हटल्याप्रमाणे ही साईड पोस्टींग आहे. त्या जागेवर गेल्यावर 2 वर्षात पुन्हा बदली कशी होईल ते पहात असतात. एक दिवस संपल्यावर ते रोज कॅलेंडरवर फुल्ली मारतात. वर्षातील 365 दिवसापैकी अमूक दिवस राहिले याची वाट पहात असतात. त्यामुळे त्यांचे काम करण्याकडे लक्ष लागत नाही. पर्यटनावरील चर्चा आता आम्हाला तोंडपाठ झालेली आहे असे सांगितले जाते. पण मी वेगळी चर्चा करु इच्छितो. मी 7 वर्षापासून या सभागृहात काम करीत आहे. पण या 7 वर्षात पर्यटनाच्या कामामध्ये फारशी प्रगती झाल्याचे दिसून आलेले नाही. शासन कमीत कमी एक तरी आश्वासन देऊ शकते की नाही ? या सभागृहात पोटतिडीकीने बोलणारे 8-10 सदस्य आहेत. त्यांना बरोबर घेऊन त्यांच्या बरोबर संयुक्तपणे दौरा करणार की नाही ? त्यांच्या सूचना, संकल्पना, त्यांचा अनुभव हा पर्यटन वाढीसाठी फायदेशीर ठरेल असे वाटते. त्याचाही विचार करण्यात यावा. सभापती महोदय, आता पर्यटकांची सुध्दा वर्गवारी झालेली आहे. ए ग्रेड, बी ग्रेड, सी ग्रेड आणि डी ग्रेडचे पर्यटक समजले जातात. सध्या अलिबाग येथे फाईव्ह स्टार हॉटेलची सोय नाही. परंतु गणपतीपुळे येथे आहे. त्याठिकाणी या सभागृहाच्या

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.जयंत प्र.पाटील....

माजी सदस्या श्रीमती विद्या बेलोसे यांचे एक हॉटेल आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत की, त्या ते हॉटेल विकणार आहेत. पण त्याचे कारण असे आहे की, त्यांचा तो व्यवसाय आता चांगला चालला आहे, परंतु पहिली 5-6 वर्षे हॉटेल चालण्यास जोर मिळाला नाही त्यामुळे कदाचित ही माहिती मिळाली असावी. माझे म्हणणे आहे की, या सर्व गोष्टी शासनाने गांभीर्याने घेतल्या तर निश्चितपणे पर्यटक वाढू शकतात. त्यासाठी वेगवेगळे स्टॉल उभे केले पाहिजेत. वेगवेगळया पर्यटनाची सोय केली पाहिजे. अलिबागमध्ये येणारे पर्यटक कोठून येतात ? डोंबिवली-कल्याण येथील मध्यमवर्गीय लोक तेथे येतात.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील...

त्याला हजार पाचशे रुपये खर्च करुन घरातच रहायचे असते, शेतात झोपायचे असते आणि घरगुती जेवण पाहिजे असते. अशा प्रकारचे पर्यटक आमच्या अलिबागमध्ये येतात. तुम्ही ए.सी.मध्ये बसता, तुमची ऑफिसेस दक्षिण मुंबईमध्ये आहेत. तुम्ही डोंबिवली, ठाणे या परिसरामध्ये जाऊन तेथे पर्यटनाच्या दृष्टीने काही सोईसवलती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे काय ? माझ्या या प्रश्नाचे उत्तर नकारात्मक असेल. मी राजस्थान, केरळ या देशांमध्ये जाऊन आलो. तेथील पर्यटन कसे विकसित झालेले आहे हे मी पाहिलेले आहे. आपणाला मात्र कोणत्याही स्थळाचा विकास करायचा असेल तर त्यामध्ये पुरातत्व विभागाचा अडथळा येतो. इतर राज्यामध्ये पुरातत्व विभागाची परवानगी लागत नाही. राजस्थानमध्ये चितोड गडावर बी.ओ.टी. तत्वावर सुशोभिकरण करण्यात आलेले आहे. तेथे तिकिट लावण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे सातत्याने हा प्रश्न या सभागृहामध्ये मांडत आहेत. तेव्हा या पर्यटनाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी काही तरी ठोस निर्णय घ्यावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 260 अन्वये एका अतिशय महत्वाच्या विषयावर या ठिकाणी चर्चा उपस्थित केलेली आहे. आज महाराष्ट्रामध्ये हा पर्यटन विषय दुर्लक्षिला गेला असल्यामुळे त्या विषयाकडे महाराष्ट्र शासनाने लक्ष केन्द्रित करण्याची गरज आहे. या पर्यटन व्यवसायामधून जगातील अनेक छोट्या छोट्या राष्ट्रांनी खूप प्रगती केलेली आहे. पर्यटन व्यवसायावर त्यांनी देशामध्ये आर्थिक सुबत्ता निर्माण केलेली आहे. आपल्या देशातील गोवा आणि केरळ या छोट्या राज्यांनी पर्यटन व्यवसायाला चालना दिलेली आहे. पर्यटन क्षेत्रे चांगल्या प्रकारे विकसति करण्यासाठी त्या राज्यांनी प्रत्येकाला खूप प्रोत्साहन दिलेले आहे. महाराष्ट्र राज्याचे पर्यटन विकास महामंडळे हे बंद पडलेल्या महामंडळापैकी एक असल्या सारखे आहे. या पर्यटन विकास महामंडळाबद्दल काही सांगावे असे काही नाही. आपल्याला जे कार्ड दिलेले आहे त्यावर एमटीडीसीच्या गाडयातून मोफत प्रवास करता येईल असे लिहिलेले आहे. परंतु आता एमटीडीसीकडे त्यांच्या गाडयाच नाहीत. एकंदरीत महाराष्ट्रामध्ये पर्यटन व्यवसायाला चालना देण्याच्या दृष्टीने कोणतेही ठोस असे काम झालेले नाही. सभापती महोदय, राज्यामध्ये सिंधुदुर्ग हा एकमेव पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. परंतु त्या जिल्ह्याचा पर्यटन जिल्हा म्हणून अद्याप विकास झालेला नाही म्हणून सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी याठिकाणी हा प्रस्ताव आणलेला आहे असे मला वाटते. आपल्या शेजारच्या गोवा राज्यामध्ये 18 लाख पर्यटक येतात. त्यामधील 10-20 टक्के पर्यटक जरी सिंधुदुर्ग जिल्ह्याकडे वळविता आले तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनाला खूप मोठी चालना मिळू शकेल. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये नैसर्गिक तसेचे इतिहासकालीन अशी खूप चांगली पर्यटन स्थळे आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा समुद्र किनारा हा अतिशय स्वच्छ आणि सुंदर आहे, आंबोलीसारखे थंड हवेचे ठिकाण आहे, अनेक प्राचीन मंदिरे आहेत. विजयदुर्ग, सिंधुदुर्ग सारखे सागरी किल्ले आहेत. विजयदुर्ग हा 800 वर्ष पुरातन किल्ला आहे. त्या किल्ल्याच्या पलिकडे बांधलेली भिंत पाहाण्यासारखी आहे. बॅकवॉटर मध्ये छोट्या छोटया होडयांच्या माध्यमातून किंवा निवासी होडयांच्या माध्यमातून नौकानयनाला चालना देता येईल. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा पर्यटन जिल्हा म्हणून विकास करण्यासाठी शासनाने तेथे अनेक सोईसुविधा देण्याची गरज आहे. विमानतळ होण्याच्या बाबतीत सिंधुदुर्ग जिल्ह्याचा खेळखंडोबाच झालेला आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर.........

सिंधुदूर्ग येथे विमानतळाच्या कामासाठी माननीय मंत्री महोदयांनी दोन वेळा भूमिपुजन केले. विमानतळाच्या कामासाठी दोन वेळा टेंडर देखील मागविण्यात आले होते. परंतु या कामात कोणत्याही प्रकारची प्रगती झालेली दिसून आलेली नाही. या ठिकाणी विमानतळ झाले तर बाहेरचे पर्यटक मोठया प्रमाणात येतील, पर्यायाने शासनाच्या महसुलात वाढ होईल आणि स्थानिक बेरोजगारांचा रोजगारांचा प्रश्न देखील काही प्रमाणात दूर होईल म्हणून सिंधुदूर्ग येथें विमानतळाचे काम तातडीने हाती घेण्यात यावे, अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, सिंधुदूर्ग येथे स्कूबा डायव्हींग वॉटर स्पोर्ट काढले होते. परंतु त्या वॉटर स्पोर्टला मेरीटाईम बोर्डाने आक्षेप धेतला, त्यामुळे ते बंद करावे लागले. सिंधुदूर्ग जिल्हयात अशा प्रकारचे वॉटर स्पोर्ट आणि वॉटर रिसॉर्टला मेरीटाईम बोर्डाने मान्यता दिली तर पर्यटक मोठया प्रमाणात आकर्षित होतील. म्हणून त्या ठिकाणी वॉटर स्पोर्ट आणि वॉटर रिसॉर्ट सुरु करण्याची परवानगी शासनाने द्यावी अशी मी या प्रस्तावाच्या माध्यमातून विनंती करतो.

सभापती महोदय, तारकर्ली या प्रेक्षणीस स्थळावर पर्यटकांना फिरविण्यासाठी नवीन बोट खरेदी करण्यात आली होती. परंतु ती बोट समुद्रात फिरण्यापूर्वीच तुटली. ती बोट तारकर्ली येथे निवासी बोट म्हणून ठेवली आहे. बोट खरेदी करण्यात मोठा गैरव्यवहार झालेला आहे. ही बोट कशी खरेदी केली गेली ? कोणत्या कंपनीकडून खरेदी केली ? तसेच ती लागलीच नादुरुस्त कशी झाली ? या सर्व गोष्टींची शासनाने माहिती ध्यावी. या ठिकाणी चांगल्या प्रतीची बोट उपलब्ध करुन द्यावी आणि या ठिकाणच्या पर्यटन स्थळाचा चांगल्या प्रकारे विकास करावा अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. माझ्या मागणीचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून शासनाने धोषित केलेला आहे. या जिल्हयात अनेक पर्यटन आणि प्रेक्षणीय स्थळे आहेत. पर्यटन क्षेत्राला चालना मिळावी म्हणून या जिल्हयातील सर्व पर्यटन स्थळांचा आणि प्रेक्षणीय स्थळांचा विकास करण्यात यावा व त्यासाठी शासनाने मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी शासनास विनंती आहे.

...2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर..........

सभापती महोदय, सनमाननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितिले की, मुंबई पासून सागरी मार्गाजवळ सिंधुदूर्ग किल्ला आहे. परंतु त्या किल्ल्याच्या विकासाकडे शासनाचे लक्ष नाही. शासनाने या किल्ल्याच्या विकासाची कामे लवकरात लवकर हाती घ्यावीत अशी या निमित्ताने त्यांनी सूचना केलेली आहे. माझी देखील शासनास अशी विनंती आहे की, सिंधुदूर्ग किल्ल्याचे जतन करण्यासाठी व पर्यटकांना ही ऐतिहासिक वास्तू पाहण्यासाठी, त्या किल्ल्याच्या विकासाची कामे तात्काळ हाती घेण्यात यावीत. त्याचप्रमाणे सिंधुदूर्ग जिल्हयात इको टुरीझमला देखील मोठया प्रमाणात संधी आहे. सिंधुदूर्ग येथील पर्यटन स्थळांचा तसेच प्रेक्षणीस स्थळाचा विकास लवकरात लवकर करण्यात येईल असे सभागृहात वारंवार सांगितले जाते. परंतु प्रत्यक्षात मात्र कोणतीही विकासाची कामे हाती घेतली जात नाहीत, ही दुर्देवाची गोष्ट आहे. ज्या ज्या वेळी सिधुदूर्ग जिल्हयातील पयर्टनाचा विकास करण्यासंबंधीचा प्रश्न उपस्थित होतो, त्यावेळी शासनाकडून थातूर मातूर उत्तरे दिली जातात. या जिल्हयातील पयर्टन स्थळांचा विकास केला गेला तर राज्य शासनास आर्थिक सुबकता प्राप्त होऊ शकेल. पर्यटनाला चालना देण्यासाठी वेगवेगळया चांगल्या योजना शासनाने सुरु केल्या आहेत, त्या योजनांची अंमलबजावणी सिंधुदूर्ग जिल्हयात यशस्वीपणे करावी अशी माझी शासनास विनंती आहे. सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयात कोणकोणत्या ठिकाणी पर्यटन स्थळे आहेत, ती पर्यटन स्थळे किती आहेत ? पर्यटन स्थळांचे महत्व काय आहे ? महाराष्ट्रात मोठमोठी पर्यटन स्थळे किती आहेत ? ती पर्यटन स्थळे कोणकोणत्या जिल्हयात आहेत ? या सर्व गोष्टींची माहिती विद्यार्थ्यांना लहानपणापासून व्हावी म्हणून राज्यातील प्रत्येक शाळेत पर्यटन विषय शिकविला गेला पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, या राज्यात पर्यटन क्षेत्राला योग्य रितीने चालना मिळावी यासाठी शासनाने कोणकोणत्या योजना हाती धेतल्या आहेत याबाबतीत माननीय पर्यटन मंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात माहिती द्यावी आणि राज्यातील पर्यटन क्षेत्राचे महत्व वाढावे म्हणून ठोस उपाययोजना आखाव्यात, अशा प्रकारची विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---------

यानंतर श्री.कानडे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जामा (विधानसभा द्वारा निर्वाचित ): सभापति महोदय, सम्माननीय सदस्य श्री गुरुनाथ कुलकर्णी जी ने राज्य में पर्यटन के विकास के संबंध में चर्चा करने के लिए यहां एक प्रस्ताव पेश किया है. उन्होंने इस प्रस्ताव पर बहुत इमोशनल होकर अपने विचार रखे हैं. इसलिए मैं उनका अभिनंदन करता हूं. इस विषय पर विस्तार से बोलने के लिए समय नहीं है. क्योंकि बहुत समय हो गया है. वरना यह बहुत दिलचस्प विषय है.

सभापति महोदय, यह सही है कि राज्य में पर्यटन विभाग बहुत निग्लेक्टेड है, इसमें कोई दोमत नहीं है. इतिहास में जाने से काम नहीं चलेगा. मंत्री जी को ट्रेडिशनल जवाब देने की भी जरुरत नहीं है. क्योंकि अभी हमारे पास रिसोर्सेस नहीं है, पर्याप्त बजट नहीं है. इसलिए मंत्री जी आप नई बात सोचिए. कैसे अच्छी पॉलिसी बनाई जाए, शॉर्ट टर्म पॉलिसी बनाए जाए ताकि हमें भी राजनीतिक फायदा मिले. लोगों को हम बता सकेंगे कि हमारी सरकार ने कैसी अच्छी पॉलिसी बनाई है. अच्छे प्रोग्राम बनाए. अच्छी मशीनरी बनाए, जो पर्यटन को प्रमोट कर सके. पर्यटन विभाग में एमबीए की डिग्री प्राप्त लोगों को नियुक्त करें. बहुत सारे इच्छुक लोग इसमें काम करने के लिए तैयार है. कोंकण, विदर्भ, मराठवाड़ा में ऐतिहासिक स्थल है, पर्यटन का बॅकग्राउण्ड है और पोटेन्शियल भी है. आज पर्यटन में भी अनेक प्रकार हैं, जैसे इको पर्यटन, कृषि पर्यटन इत्यादि. इसमें बहुत स्कोप है. रामटेक में रोप वे का प्रोजेक्ट हो सकता है. रामटेक में राम मंदिर है. यह राम मंदिर राष्ट्रीय एकात्मता का प्रतीक है. क्योंकि इस राम मंदिर में मस्जिद है. कासिम बाबा की दरगाह है. मैंने उसे ट्रस्ट बनाया है. हम इस स्थान को पर्यटन स्थल के रुप में लाने की कोशिश कर रहे हैं. वहां पर 5 हजार वृक्ष लगाए गए हैं. कोराडी में भी मंदिर है. मध्यप्रदेश की सीमा के पास कन्हान नदी है, वहां पर गोंड (आदिवासी) समाज का धार्मिक स्थान है. वहां पर हजारों लोग आते हैं. इस स्थान को आप पर्यटन स्थल के रुप में रख सकते है. उसी प्रकार से गडचिरोली, चंद्रपुर में राजाओं के किले हैं. उन किलों की दीवारें गिर रही है. गडचिरोली में पर्यटन के विकास के लिए बहुत स्कोप है. क्योंकि वहां पर पोटेन्शियल है. आनंदवन में विदेश से लोग आते हैं. इस प्रकार से विदर्भ में अनेक पर्यटन स्थल हो सकते हैं. पर्यटन का विकास बीओटी के माध्यम से भी हो सकता है. पब्लिक पार्टनरशिप के माध्यम से विकास हो सकता है. पयर्टन विकास से रोजगार उपलब्ध होंगे. इसलिए पर्यटन को एम्पलायमेंट ओरिएण्टेड करें. अमेरिका की एक कंपनी ने कोंकण में पर्यटन का विकास करने के लिए राज्य सरकार को 70

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जामा...

हजार करोड़ रुपये का प्रस्ताव दिया है. मैंने सम्माननीय मुख्यमंत्री जी के साथ उस कंपनी के अधिकारियों की बैठक करवाई थी. दुबई की कंपनी भी पर्यटन के क्षेत्र में महाराष्ट्र में इनवेस्टमेंट करना चाहती है. इसलिए आज जरुरत है कि आर्थिक गतिविधियों के संबंध में एक्शन प्लान बनाए जाए, पॉलिसी बनाई जाए.

सभापति महोदय, मा. सदस्य श्री. कुलकर्णी जी को बताना चाहता हूं कि रामटेक के पास में "रामधाम" बनाया गया है और वहां पर रोजाना 2-3 हजार गरीब लोग आते हैं. कॉंक्रीट का मनुष्य निर्मित "ओम" बनाया है. लिमका बुक ऑफ रिकॉड्र्स में इसका नाम आ गया है और गिनीज बुक में इसका नाम आने वाले वाला है. It is the biggest 'OM' in the world in concrete form, containing entire depict of Ramayan and Geeta. विदर्भ में ऐसे कई स्थान है, जिनका विकास आप कर सकते हैं. वहां पर कार्य करने के लिए बहुत पोटेन्शियल हैं. मेरा शासन से अनुरोध है कि आप एक्शन प्रोग्राम बनाएं. मैं गुरुद्वारे का ग्रंथी तो नहीं हूँ. सरकार इसके लिए बड़ा बजट बनाए और "बीओटी" बेस पर कार्य करके आने वाले एक साल के अन्दर हमें रिजल्ट मिलना चाहिए. इस प्रस्ताव का पुरजोर सपोर्ट करते हुए मैं अपना भाषण पूर्ण करता हूँ.

..................

भाषण पूर्ण, नंतर भोगले.

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, अनेक छोट्या छोट्या राष्ट्रांनी आपली इकॉनॉमी टूरिझमवर डेव्हलप केली आहे. थायलंड, मलेशिया यासारखे देश अनेक प्रकारची कृत्रिम बेटे तयार करुन पैसा कमावत आहेत. जेंटिंग हायलँड आपण पहा. Genting Highland is only amusement park. त्यावर त्यांनी करोडो डॉलर्स कमावले आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा हा निसर्गाने ओतप्रोत भरलेला जिल्हा आहे. सुंदर समुद्र किनारे आहेत. समुद्राचे निळेशार पाणी आहे. चेहेरा दिसावा, प्रतिबिंब दिसावे इतका समुद्राचा तळ दिसतो. या सिंधुदुर्ग जिल्हयाला शाप आहे का? तिथे टूरिझम डेव्हलप का होत नाही? खरे म्हणजे या राज्य शासनाची अनास्था याला कारणीभूत आहे. इकॉनॉमी सुधारण्यासाठी जास्तीत जास्त महसूल कसा मिळेल यादृष्टीने पर्यटनाकडे कधी लक्ष दिले गेले नाही. पर्यटन विकासाच्या दृष्टीने टीसीएस कंपनीने शासनाला अहवाल सादर केला होता. त्या अहवालाचे काय झाले? तो अहवाल किती गांभीर्याने घेतला? त्या अहवालावर काय विचारविनिमय केला? त्यानुसार काय कार्यवाही करण्यात आली? शासनाने फक्त एकच काम केले, सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला. सिंधुदुर्ग जिल्हयातील जनतेला वाटले की आता पर्यटन जिल्हा घोषित केल्यामुळे रोजगार निर्मिती होईल. परंतु रोजगारासाठी बिहारी आणि उत्तर भारतीय तिथे येऊन वसले. कोकणी माणूस मात्र हद्दपार झाला. आता सिंधुदुर्ग जिल्हयाची जबाबदारी माननीय मंत्रीमहोदयांच्या शिरावर आहे असे मी मानतो. मंत्रीमहोदय राज्यमंत्री असले तरी डायनॅमिक मंत्री आहेत. या चर्चेचा रोख पाहून या प्रश्नाकडे त्यांनी लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो. मंत्रीमहोदयांनी एकदा या जिल्हयाचा प्रक्टिकल अभ्यास दौरा करावा. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी, श्री.परशुराम उपरकर यांचे मार्गदर्शन घ्यावे. केवळ रेस्टहाऊसमध्ये मुक्काम न करता लोकांच्या समस्या समजून घ्याव्यात. टूरिझम कसे डेव्हलप करता येईल यादृष्टीने विचार करावा. एमटीडीसीचे रेस्टहाऊस जे भाड्याने चालवावयास दिले आहे ते अतिशय उत्तम आहे. ते वगळता महाराष्ट्रात एकही ठिकाणी एमटीडीसी या संदर्भात यशस्वी ठरलेले नाही. दाजीपूर येथे सुंदर अभयारण्य आहे. तेथे कोणत्याच सुविधा नाहीत. रात्री 9.00 नंतर गेलो तर तेथे एक कप चहा देखील मिळणार नाही. टूरिझम डेव्हलप

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..........

करावयाचे असल्यास तेथे प्रथम इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करणे आवश्यक आहे. ताडोबा व्याघ्र प्रकल्पाचा उल्लेख करण्यात आला. परंतु शेजारच्या राज्यात नागपूरपासून 160 कि.मी.वर बांधवगड येथे वाघांची संख्या पहा. तेथे पर्यटकांना हत्तीवरुन वाघाजवळ नेले जाते. ताडोबा येथे त्याप्रमाणात काहीच सुविधा नाही. तेथील रेस्टहाऊस राहण्याच्या लायकीचे नाही. आम्ही समितीच्या अभ्यास दौऱ्याच्या वेळी पाहिले आहे. तेथील रेस्टहाऊसमध्ये केवळ पाली, बेडूक आणि घुशीचे साम्राज्य आहे. पर्यटक कसे आकृष्ट होणार? पर्यटकांना नैसर्गिक परिस्थितीत वाघांचे दर्शन होणे आवश्यक आहे. ज्याठिकाणी पर्यटक राहतील तेथे तरी निदान स्वच्छता असणे आवश्यक आहे अशी अपेक्षा असते. पंचतारांकित सुविधा नको. परंतु स्वच्छ आणि नीटनेटकी व्यवस्था असली पाहिजे. मध्यप्रदेश राज्यातील कान्हा नॅशनल पार्क पहा.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

बांधवगडमध्ये परदेशी पर्यटक मोठया प्रमाणात येतात त्याचे कारण म्हणजे या पर्यटकाना हत्तीवरुन वाघाच्या जवळ घेऊन जातात, वाघाच्या पंजाच्या ठशावरुन वाघाचा शोध घेऊन पर्यटकांना वाघ दाखवले जातात, पहाटच्या चार वाजेपासून ट्रेकींगला सुरुवात केली जात असते त्यामुळे या ठिकाणी परदेशी पर्यटक मोठया प्रमाणात येत असतात. ताडोबा व्याघ्र प्रकल्पाकडे आमचे काही सुध्दा लक्ष नाही. ताडोबा व्याघ्र प्रकल्पात एकच वाघीण शिल्लक आहे. या ठिकाणी गाडया सुसाट धावतात त्यामुळे ही वाघीण सुध्दा पर्यटकांना पहावयास मिळत नाही. या ठिकाणी मगरी आहेत परंतु या मगरी कधीच जमिनीवर येत नाही. या मगरींसाठी जे पाणी लागते ते पाणी सुध्दा अत्यंत अशुध्द आहे. या पाण्याची सुध्दा काळजी घेतली जात नाही. या ठिकाणी फायर लाईनचा काही सुध्दा विचार केला गेलेला नाही. वणवे लागू नये म्हणून फायर लाईन असते परंतु त्याकडे सुध्दा वन विभागाचे लक्ष नाही. वन विभागाच्या अधिका-यांना जीप सुध्दा पुरवण्यात आलेल्या नाहीत. श्री. मिश्री कोटकर यांना सुध्दा जीप पुरवली गेली नाही. जर अधिका-यांना जीप पुरवल्या नाहीत तर ते जंगलाचे कसे काय संरक्षण करु शकतील त्यामुळे अधिका-यांना जीप पुरवण्याची आवश्यकता आहे. वन विभागात बरीच पदे रिक्त असल्यामुळे वन विभागातील पदे लवकरात लवकर भरण्याची आवश्यकता आहे. ताडोबाच्या जंगलात आपण जातो त्यावेळेस आपल्याला खाणसामा जेवनाची सोय करुन देतो परंतु जो पर्यटक पैसे भरुन पर्यटनासाठी येतो त्यासाठी कोणत्याही प्रकारची सुविधा पुरवली जात नाही. या पर्यटकाला या ठिकाणी जेवनाची सुध्दा काहीच सोय नाही. आपल्याला पर्यटनामधून पैसे कमावण्याची खरे म्हणजे तळमळ असण्याची आवश्यकता आहे त्यासंदर्भाने जर आपण विचार केला तर चांगल्या प्रकारे पर्यटनाचा विकास होऊ शकतो त्यामुळे पर्यटनाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी अधिक लक्ष आवश्यकता आहे. आपण या ठिकाणी मला विचार मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

------------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ): सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन विषयावर सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

मी स्वत: कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हयातील धामापूरचा रहिवासी आहे. पर्यटन हा माझा आवडीचा विषय असून पर्यटनाच्या संदर्भात मी स्वत: काम करण्यास निघालो आहे. दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी या जेव्हा पराभूत झाल्या होत्या त्यावेळेस 1978 मध्ये त्या मालवणला भेट देण्यासाठी हेलिकॉप्टरने आल्या होत्या. त्यावेळेस प्रांताध्यक्ष श्री. रामराव आदीक होते. या ठिकाणचा समुद्र किनारा पाहिल्यानंतर त्या खुप खूष झाल्या होत्या व यासंदर्भात वर्तमानपत्रात मथळे भरभरुन माहिती आली होती. कोकणाला 720 कि.मी. चा समुद्र किनारा लाभला आहे. परंतु या समुद्र किना-याचा पाहिजे तसा विकास होत नाही. 1982 मध्ये महाराष्ट्रचे मुख्यमंत्री कै. वसंतदादा पाटील होते व श्री. सुशील कुमार शिंदे यांच्याकडे नियोजन व वित्त व पर्यटन खाते होते. त्यावेळेस कै. वसंतदादा पाटील यांनी गणपतीपुळे येथील एमटीडीसीच्य रेस्ट हाऊसचे उद्‌घाटन केले होते.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण .

कै. वसंतदादा पाटील यांच्या बरोबर श्री. यशवंत हापे होते आणि श्री.सुशीलकुमार शिंदे यांच्या बरोबर मी होतो. त्यावेळी गणपतीपुळयाचे उद्‌घाटन करण्यात आले होते. केवळ सॅम्पल म्हणून ते पर्यटन स्थळ विकसित करण्यात आले होते. त्यानंतर महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळ स्थापन करण्यात आले होते.व त्यानंतर पर्यटन क्षेत्रात विकास व्हावयास लागला. मला या निमित्ताने असे सांगावयाचे आहे की, सिंधुदूर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला असला तरी जितका विकास व्हावयास पाहिजे होता तितका झालेला नाही. श्री.नारायण राणे याच्या रक्तात पर्यटनाविषयी फार आवड आहे आणि 1991 साली त्यांना पर्यटना विषयी संकल्पना मिळाली त्यामुळे ते दरवर्षी पर्यटन महोत्सव घेत असतात तसेच त्या जिल्हयासाठी विविध योजना आणतात. ज्यावेळी श्री. सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री होते त्यावेळी त्यांनी 300 कोटी रुपयांचे पॅकेज या जिल्हयासाठी दिले होते. हे पैसे संपूर्णपणे पर्यटनासाठी खर्च करण्यात आले होते. कोकणातील सुंदर रस्ते या पैशातून पूर्ण करण्यात आलेले आहेत. कोकणातील रस्ते पाहण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातून अनेक लोक येत असतात. माननीय श्री.नारायण राणे हे तुमच्या पक्षात होते व त्यांच्या ताब्यात हे पैसे देण्यात आले होते. त्यामुळे कॉग्रेस पक्षातील काही जण नाराजसुध्दा झाले होते परंतु श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी कोणताही भेदभाव केला नव्हता. पर्यटनाच्या संदर्भात चांगले काम होत असतांना हा पैसा जर चांगल्या माणसाच्या हातात गेला असेल तर ती चांगली गोष्ट आहे. पर्यटनाच्या संदर्भात केन्द्र सरकारने सुध्दा 200 कोटी रुपयांचे विशेष पॅकेज जाहीर केले होते. जयगड, विजयगड,सिंधुदूर्ग या सारख्या ऐतिहासिक किल्लयाची डागडुजी करण्यासाठी हे पैसे खर्च करण्यात आले होते. सिंधुदूर्ग जिल्हयाचा विकास करण्यासाठी जो निधी देण्यात आला होता त्यातून त्या जिल्हयाचा आता विकास व्हावयास सुरुवात झालेली आहे. सिधुदूर्ग जिल्हा हा निसर्गरम्य असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पुनित झालेला हा जिल्हा आहे. शिवकालीन अनेक किल्ल्यांचा वारसा सांगणारा हा पर्यटन जिल्हा आहे.महाराष्ट्राला 720 किलोमिटर्स लांबीचा समुद्रकिनारा लाभालेला आहे.या जिल्हयातील काही गावे पर्यटनाच्या केन्द्रासाठी निवडण्यात आलेली आहेत. तारकर्ली, धामापूर,देवबाग,आंबोली, उभा दांडा, वेगुर्ला, सावंतवाडी, कुडाळ, आरोंदा अशी काही गावे पर्यटनाच्या दृष्टीने विकसीत करण्यासाठी निवडण्यात आलेली आहेत. धामापूर हे माझे गाव आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री.बबनराव पाचपुते यांना मी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण .

सांगू इच्छितो की धामापूर येथे वन विभागाचे अभयारण्य आहे . पॅकेजच्या माध्यमातून जे पैसे मिळालेलेले आहेत ते पैसे धामापूरकरिता वापरण्यात आलेले आहेत. ग्रामीण लूक दिसेल अशी छोटी छोटी घरे तेथे बांधण्यात आलेली आहेत. हे पैसे संपल्यानंतर त्याची निगा राखण्याची देखील तेथे काही सोय करण्यात आलेली नाही व तेथे कोणी निगा राखण्यासाठी कोणीही नाही. एम.टी.डी.सी.च्या माध्यमातून तेथे सात आठ क्लब्ज बांधण्यात आले असून माननीय मंत्री महोदयांनी त्याचे उद्घाटन केलेले आहे. त्याला दीड वर्षे होऊन गेले आहे परंतु अजूनही ते पर्यटनासाठी सुरु करण्यात आलेले नाही. माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी यांना सांगू इच्छितो की आपण या क्लबचे उद्धाटकरुन दीड वर्षे झाले तरी अजून ते सुरु झालेले नाही. यापूर्वी हे क्लब बांधून तयार झालेले नव्हते तरी सुध्दा त्याचे उद् घाटन करण्यात आले होते. तेव्हा जी अर्धवट कामे राहिलेली आहेत त्याची कामे जर आपल्या विभागाकडून पूर्ण होत नसेल तर पर्यटनाच्या दृष्टीने विकास कसा होईल ? कोकणामध्ये करली नावाची एक खाडी आहे. माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे यांच्याकडे 1984 साली नियोजन व पर्यटन खाते होते तेव्हा या खाडीवर पूल बांधण्यासाठी साडेपाच कोटी रुपये मंजूर करुन घेतले होते.: या कामाची फाईल प्रत्येक विभागामध्ये मी स्वत: घेऊन जात होतो. मंत्रालयात मी असल्यामुळे सर्व आय.ए.एस.अधिकारी व डेस्क ऑफिसर हे माझे चांगले मित्र आहेत. त्यामुळे डेस्क ऑफिसरच्या समोर बसून मी माझी कामे करुन घें्त होतो. करली खाडीवरील पूल त्यावेळी झाला होता. "अरण्य ", "अभयारण्य" नावाच्या बोटी या पुलाच्या खालून आज जात आहेत बोटीना जाता यावे म्हणून दूरदृष्टीने त्या पुलाची उंची 700 ते 800 मिटर्स ठेवण्यात आली होती .माझे गाव हे धामापूर असून तेथे वडिलोपार्जित घर आहे. त्या ठिकाणी अतिशय सुंदर डोंगर असून जवळून नदी वाहत आहे. श्रीमती प्रभा राव, माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे आणि इतर नेते मंडळी माझ्या घरी येऊन गेलेले आहेत. तो भाग अतिशय सुदर असून माझे त्या भागावर प्रेम आहे. मी आमदार नसतांनासुध्दा आमदार निधीतून पैसे घेऊन या भागात विकासाची कामे केलेली आहेत मी मागच्या वर्षी माननीय सभापतींच्या निधीतून देखील पैसे घेतले होते व विकासाच्या कामासाठी विविध मार्गातून पैसे कसे मिळवता येतील यासाठी मी सतत प्रयत्न करीत असतो. मी मघाशीच सांगितले आप्हे की, मी आमदार नसतांनासुध्दा आमदार निधीतून पैसे मिळवून त्या विभागाचा, त्या गावाचा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विकास करण्यासाठी योग्य पध्दतीने नियोजन करीत होतो. या विषयावर बोलण्यासाठी इतर मुद्दे बरेच आहेत परंतु वेळे अभावी मी थोडक्यात माझे मुद्दे मांडणार आहे.

सभापती महोदया, धामापूर येथे एक तलाव असून त्या तलावाच्या सुशोभिकरणाच्या कामाचा मी एक आराखडा तयार केला असून या कामासाठी साडेपाच कोटी रुपये लागणार आहेत माननीय केन्द्रीय मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांना तसेच इतर काही केन्द्रीय मंत्र्यांना हा तलाव पहाण्यासाठी आणले होते. तो तलाव इतका सुंदर आणि रमणीय आहे की अशा प्रकारचा तलाव संपूर्ण देशात कोठेही पहावयास मिळणार नाही. मी जल संधारण मंत्र्यांना असे म्हणालो की या कामाचे एस्टिमेट फक्त तुम्ही मंजूर करा पैसे मिळवण्याचे काम मी करीन. लोकप्रतिनिधींनी वेगवेगळया मार्गाने केन्द्र सरकारकडून आणि राज्य सरकारकडून पैसे मिळवून त्या भागातील विकासाची कामे जोपर्यंत करणार नाही तोपर्यंत त्या भागाचा विकास होणार नाही. =

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चव्हाण .....

त्यासाठी भिंत बांधणे, पाण्याची योजना करणे अशी जी वेगवेगळी कामे आहेत ती केली गेली पाहिजेत. सभापती महोदया, बोलण्यासारखे खूप विषय आहेत. पण मला थोडासा वेळ असल्याने मी माझे भाषण आटोपते घेणार आहे. सभापती महोदया, कोकणामध्ये जी छोटी छोटी घरे आहेत, त्याबाबतीत माझी सरकारला अगदी पहिल्यापासून सूचना आहे की, All Houses will be converted into Hotels. ज्याप्रमाणे गोव्यामध्ये पद्धत आहे, तेथे जी छोटी छोटी घरे आहेत तेथे अशा प्रकारे हॉटेलिंगचा व्यवसाय चालविला जातो. त्याप्रमाणे आपल्या कोकणामधूनही व्हायला काय हरकत आहे ? त्यातून त्यांनाही पैसा मिळेल, रोजगार मिळेल. तेव्हा तेथील अशी सगळी सुंदर घरे तुम्ही हॉटेलमध्ये कन्व्हर्ट करा. असे अनेक प्रश्न आहेत. तसेच यासाठी अभ्यासवर्ग निर्माण करा, युनिवर्सिटी निर्माण करा. या कोकणामध्ये पर्यटनाच्यादृष्टीने जास्तीत जास्त विकास करण्याची नितांत आवश्यकता आहे त्यासाठी वेगवेगळ्या सवलती देऊन तेथील लोकांना या व्यवसायाकडे आकर्षित करा. आमच्यासारख्यांनी अनेक सवलती तेथे दिलेल्या आहेत. खरे तर साऱ्या सवलतींचा पाढाच मी येथे लिहून आणला आहे. पण वेळेअभावी तो संपूर्ण वाचून दाखवू शकणार नाही. तेव्हा मी येथेच माझे भाषण अपूर्ण ठेवून, मला या चर्चेत भाग घेऊन बोलण्याची संधी दिली त्याबद्दल सभापती महोदया, आपला मी आभारी आहे.

***

...... 5क्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ KTG/ श्री. गायकवाड नंतर --- 21:20

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदया, मी नेहमीच गंमतीने म्हणते की, मी या विधान परिषदेत निवडून आल्यावर देवाने मला एक वरदान दिले म्हणून मी आमदार झ ााले आणि एक शाप दिला तो म्हणजे तू शेवटचा वक्ता असशील. म्हणजे सभागृहात उपस्थित असलेले सगळे सदस्य तुझे भाषण संपण्याची वाट बघत बसतील. ... सभापती महोदया, हा विनोदाचा भाग झाला. पण या चर्चेत बोलताना माझ्याकडे बरेच मुद्दे आहेत. परंतु सगळ्यात प्रथम लक्ष वेधावेसे वाटते ते म्हणजे देशाचे अर्थकारण आणि पर्यटन याचा जो जवळचा संबंध आहे त्यात किती प्रमाणात आपण पर्यटनातून रोजगार मिळविणार आहोत याचा आढावा घेणे हे अतिशय गरजेचे आहे. थायलंड, फिलिपिन्स सारखे अनेक देश असे आहेत की, त्यांचे सारे अर्थकारण हे पर्यटनावर अवलंबून आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात तेथे पर्यटनाला एक इंडस्ट्री म्हणून मानले जाते, डेव्हलप केले जाते तसा प्रयत्न करतात आणि आपल्याकडे मात्र पर्यटन हा विषय रेल्वेच्या यार्डामध्ये सायडिंगला पडलेल्या एखाद्या डब्यासारखा असतो, त्या पद्धतीने त्याकडे पाहिले जाते ही फार मोठी खेदाची बाब आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारतामध्ये आणि इतरत्र देखील जी वेगवेगळ्या प्रकारची पर्यटने अतिशय लोकप्रिय झाली आहेत आणि त्यात पर्यटन करणाऱ्या कंपन्या स्वत: चांगल्या प्रकारे, अगदी कोट्यवधी रूपयांमध्ये फायदा मिळवितात. अशी जी पर्यटने दिसत आहेत पण शासनाकडे मात्र जो भाग आहे त्यामध्ये मात्र आपल्याला पर्यटनामध्ये फारसे यश येत नाही. सभापती महोदया, मी खास उल्लेख करीन आणि तो म्हणजे धार्मिक स्वरूपाचे पर्यटन. प्रचंड मोठ्या प्रमाणात लोकांमध्ये हळूहळू धार्मिकता वाढते आहे. त्यामुळेच कुंभमेळे असोत, अष्ट-विनायक यात्रा असोत, सगळ्या देवींच्या यात्रा असोत. मी तर आपल्याला सुचवेन की, कोठल्या देवाची वा देवीची कोठे आणि कोठल्या दिवसांमध्ये यात्रा आहे याचे एक महाटाईमटेबल राज्यात तयार करा. ज्यामध्ये लोक लक्षावधींच्या संख्येने इकडून तिकडे जातात. मग ती जेजुरीच्या खंडोबाची यात्रा असेल, पालीच्या खंडोबाची यात्रा असेल, पंढरपूरची यात्रा तर सर्वश्रुत आहे, पण प्रत्येक जिल्ह्यात किमान 5-10 लाख लोक जमतात इतक्या मोठ्या यात्रा भरल्या जातात. तेथे सर्व सामान्य लोकांच्या याच मागण्या असतात की, एसटीची सोय असली पाहिजे, पाण्याची सोय असली पाहिजे. म्हणून माझी पहिली सजेशन आहे की, अष्टविनायक, संकेष्टी-चतुर्थी वगैरे यात्रांच्या तारखा आहेत, अगदी पंचांग पाहून कधी कोठल्या यात्रा आहेत ते लक्षात घेऊन त्याचे एक महा टाईम-टेबल बनवून त्या त्या भागामध्ये लोकांना त्या त्या यंत्रणा लावून लोकांना सुविधा कशा

...... 5क्यू 2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

उपलब्ध करून देता येतील हे आपण पाहू शकतो.

सभापती महोदय, दुसरे मला सुचवावेसे वाटते ते सेफ टुरिझम. गोवा आणि या संपूर्ण भागामध्ये हा एक मोठा इश्यू चर्चिला जात आहे. स्कार्लेट नावाच्या मुलीवर मोठे अत्याचार गोव्यात झाले आहेत. त्या प्रकरणात भारत सरकारला देखील फार मोठे फटके मिळाले आहेत. परदेशी पर्यटक या देशात येतात आणि त्यांची सुरक्षितता राहत नाही असा जगामध्ये मेसेज गेला आहे. एकट्या तरूण मुली जगामध्ये सर्वत्र पर्यटक म्हणून जात असतात पण भारतात आल्यावर मात्र त्यांना सुरक्षित वाटत नाही. रशियन मुलगी मुंबईमध्ये आल्यावर तिच्याशी दुर्वर्तन, गोव्यात मुलीशी दुर्वर्तन झाल्याच्या बातम्या येतात. त्याचा परिणाम असा होतो की, पर्यटनाच्या दृष्टीने हा देश सेफ नाही असा मेसेज सातत्याने सर्वदूर जातो. तेव्हा आपल्या चांगल्या पर्यटनाची जशी प्रसिद्धी केली जाते तसेच आपल्या पर्यटनामध्ये ज्या त्रुटी आहेत, मग त्यात चाईल्ड लेबर आहे, मुलांचे सेक्स्युअल एक्स्प्लॉयटेशन असेल., या संदर्भात माझ्या माहितीप्रमाणे ताज ग्रूप ऑफ हॉटेल्सने 'युनिफेम' म्हणजे "युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट फंड फॉर विमेन्स" यांच्या बरोबर चार वर्षापासून एक काम सुरू केले आहे. या सगळ्या हॉटेल्समध्ये सेफ टुरिझम असावे या दृष्टीने स्वत:च्या स्टाफला आणि स्वत:कडे येणारी जी वेगवेगळी माणसे आहेत त्यांच्यासाठी त्यांनी काही कोड ऑफ कॉंडक्टस् सुचवायला सुरूवात केली आहे. पार्क हॉटेल्सनेदेखील काही मजले महिला पर्यटकांसाठी राखीव ठेवले आहेत आणि तेथे त्यांना लागणाऱ्या सर्विसेस आणि सुरक्षितता अशा पद्धतीचा फायदा होऊ शकतो. आणखी एक मला असे सुचवावेसे वाटते की, आपल्याकडे ऋतुनुसार देखील लोक पर्यटनाला निघतात. विहार करण्यासाठी मुंबई-पुणे रोडवर जातात, धबधब्याला जातात, असे अनेक स्पॉटस् मला माहिती आहेत की, खेड तालुक्यात अनेक सुंदर धबधबे तेथे होतात. परंतु धबधबा आल्याची बातमी आली की त्या दिवशी तेथे 10 हजार पर्यटक येतात. ...

( यानंतर सौ.रणदिवे.....5आर 1 ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

मग तेथे गाडया येतात. त्यांना जेवणासाठी काही मिळत नाही. मग ते लोक जे मिळेल ते खातात आणि निघून जातात. परंतु जे नैसर्गिक देखावे तयार होतात, तेथे पर्यटनासाठी जाणारे लोक आहेत. तसेच अनेक लोक नद्यांची परिक्रमा करतात. डॉ.दत्तप्रसाद दाभोळकर यांचे "नर्मदा परिक्रमा" हे पुस्तक वाचले तर असे दिसून येईल की, नर्मदा नदीला चालत परिक्रमा करणारेही लोक आहेत. असे देखील लोक असतात. पर्यटन विभागाकडे संवेदनशीलता असली पाहिजे. तसेच संपूर्ण समाजातील लोक कुठे-कुठे जात आहेत, यासंबंधीची माहिती घेतली तर असे दिसून येईल की, फिल्म पाहण्यासाठी आणि त्याचे शुटींग कसे होते ? हे पहाण्यासाठी सुध्दा मुंबईला येणारे पर्यटक आहेत. भारतभर याबाबतीत प्रचंड आकर्षण आहे की, फिल्मचे शुटींग कसे होते ? फिल्मीस्तान स्टुडिओ कुठे आहे ? वेगवेगळे स्टुडिओ कुठे आहेत ? हे लांबून पहाण्यासाठी सुध्दा लोक उत्सुक आहेत. आजकाल लोक वैद्यकीय पर्यटनासाठी सुध्दा मोठया प्रमाणात येत आहेत. कारण मुंबई, पुणे या शहरांमध्ये कमी पैशांमध्ये ऑपरेशन्स् होतात. त्याचबरोबर शैक्षणिक टुरिझम आणि सिनिअर सिटीझन देखील लवकर रिटायर होऊन पर्यटनासाठी बाहेर जातात. त्यामुळे ते लोक दहा वर्षे पर्यटनासाठी पैसे साठवून वयाला 55-60 वर्षे झाल्यानंतर पर्यटनासाठी बाहेर पडतात. फक्त त्यांची अशी अपेक्षा असते की, वैद्यकीय उपचार जवळपास उपलब्ध झाले पाहिजेत. त्यांना जे पथ्य-पाणी असते, ते सांभाळता आले पाहिजे. ज्याप्रमाणे परांजपे स्कीमने पुणे येथे "अथश्री "सारखा प्रकल्प उभा केला आहे. जेणेकरुन वयोवृध्द लोकांना चालता येईल, त्याठिकाणी त्यांना लिफ्ट मिळतील, वैद्यकीय उपचार मिळतील. त्यांच्यासाठी खाण्या-पिण्याच्या सोयी असतील. त्यांना बसमधून नेण्यासाठी कोणीतरी एक्सकॉर्ट असले. सिनिअर सिटीझननां अशा प्रकारच्या सोयी असणाऱ्या टुरिझमची आवश्यकता असते. काही कपल्स अशी पाहिली आहेत की, त्यांच्याकडे लहान बाळे असतात. या सगळ्या मुद्यांबाबत आपण कशा प्रकारे कृती कार्यक्रम केलेला आहे हे मला माहिती नाही. परंतु मला लक्ष वेधले पाहिजे की, यापूर्वी मांढरदेवी, काळूबाईच्या यात्रेमध्ये हजारो लोकांची गैरसोय झाली आणि शेकडो लोक मृत्युमूखी पडली. त्यानंतर असे आश्वासन दिले होते की, आम्ही तीर्थक्षेत्रांचे पर्यटन या विषयासाठी एक स्वतंत्र कॅबिनेट दर्जाचा मंत्री नेमणार आहे. परंतु त्याचे पुढे काय झाले ? ही बाब कोणाच्याही लक्षात नाही.मी मघापासून जी भाषणे झालेली आहेत. पण आम्ही तीर्थक्षेत्रांसाठी पर्यटन मंत्री नेमणार आणि परत अशा दुर्घटना होऊ नयेत म्हणून

. . . . 5 आर-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

श्री.राजन कोचर यांच्या समितीचा अहवाला आला, त्याची आपण कोणती अंमलबजावणी केली आहे? आज सप्तश्रृंगी, वणी, माहूर, एकवीरा अशा प्रकारे प्रत्येक देवीचे देऊन डोंगरावर आहे. कोणत्याही गडावर चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी दोन रस्ते नाहीत. तेथे पाण्याची गैरसोय होते, तेथे लोडशेडींग होत असते. मघाशी लेण्याद्रीचा उल्लेख झाला. लेण्याद्रीला विजेचे कनेक्शन नाही, त्यामुळे लोक अंधारामध्ये आरती करतात. आपण अष्टविनायकसाठी पैसे दिले. पण मी मोहोटा देवीच्या दर्शनासाठी गेले होते, तेव्हा मला अतिशय चांगला प्रकल्प दिसला. त्यांनी केंद्र शासनाचे 27 लाख रुपयांचे अनुदान दिले आणि त्याठिकाणी सौरऊर्जेचा वापर केला जातो. त्यामुळे वीज गेली तरी सौरऊर्जेमुळे भाविकांची गैरसोय होत नाही. पायऱ्या चांगल्या प्रकारे बांधलेल्या आहेत. म्हणून माझी सूचना आहे की, गडावर जी मंदिरे आहेत. अशा वेळी गडावरील संस्थाने आणि पर्यटन विभागाचे अधिकारी यांनी मिळून तेथे किमान कोणत्या गोष्टी करावसयास पाहिजेत यासंबंधात एक मॉडेल प्लॅन तयार करावा.

सभापती महोदय, याठिकाणी बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी एम.टी.डी.सी.ला नावे ठेवली आहेत की, एम.टी.डी.सी.चा कारभार वाईट आहे. परंतु ताकर्लीच्या संबंधात असेल आणि खास करुन मळवली येथील एम.टी.डी.सी.रिसॉर्ट अतिशय सुंदर होते. अनेक कुटुंबे तेथे जात होती, अनेक शिबिरे होत होती. तसेच मध्यमवर्गीयांना परवडेल अशी तेथे व्यवस्था होती. परंतु त्याचे रिनोव्हेशन आणि मेन्टेनन्स् करावयास पाहिजे.आता लोकांच्या खाण्याच्या आवडी बदललेल्या असल्याने त्यांना ज्यापध्दतीने खाद्यपदार्थ लागतात असे कॅटरर तेथे दिले पाहिजेत आणि या संपूर्ण एम.टी.डी.सी.च्या सेंटर्स्चे पुनरुज्जीवन करणे हे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय जगामध्ये जात असताना आपल्या लोकांना किमान मॅनर्स् शिकविले पाहिजेत. अनेक ठिकाणी अस्वच्छपणाची परिसीमा आहे. ज्या हाताने नाक पुसतील, त्याच हाताने लोकांना चहा नेऊन देतील. असला प्रकार पाहिल्यानंतर कोणत्याही पर्यटकाला तेथे जावे असे वाटणार नाही. त्यामुळे स्वच्छतेच्या, सर्व्हींगच्या आणि खाद्यपदार्थ वाढत असताना ते कशा प्रकारे वाढले पाहिजेत याची काळजी घेणे आवश्यक आहे. किमान टॉयलेटस् स्वच्छ असली पाहिजेत. आपण बोलत असताना त्याचा हेल कसा असला पाहिजे. आज तुम्ही दुसऱ्या देशामध्ये जाऊन पाहिले तर वेगळया सूरामध्ये लोक बोलतात आणि आपल्याकडे ज्या सूरामध्ये माणूस बोलतो हे ऐकल्यानंतर सुरवातीला भांडणाचेच स्वरुप तयार ....

. . . .5 आर-3



APR/KGS/MMP 21:25

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

होते. बऱ्याचशा पर्यटकांना चांगला अनुभव येतो, बरेचसे कंटाळून निघून जातात. तेथे गेल्यानंतर रिक्षावाल्यापासून भांडणे सुरु होतात आणि परत घरी जाईपर्यंत आपण जणुकाही युध्दावर निघालो आहोत अशा प्रकारे तलवारी घेऊन पर्यटनासाठी जाण्याची वेळ येते. तेव्हा कुठेतरी आपल्या लोकांना देखील पर्यटनाचे व्यवस्थापन शिकविण्याची आवश्यकता आहे. ते झाले नाही तर पर्यटना साठी 300 कोटी रुपये नाही, 3000 कोटी रुपये मिळाले तरी त्याचा काय उपयोग आहे ? पर्यटनाला चालना देण्यासाठी माणसांमध्ये जी इन्व्हेसमेंट करावयास पाहिजे, ती न करता फक्त आपण इमारतींसाठी तात्पुरती मॅनेजमेंट केली, त्यांचे रिनोव्हेशन केले, बांधणी केली तरी पुढच्या वेळेस तो माणूस तशाच घाणेरडया पध्दतीने वापरणार आहे आणि चांगल्या प्रकारे व्यवस्थापनच ठेवणार नाही.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्रीमती उषा दराडे ) : आता बऱ्याचशा वक्त्यांनी त्यांचे विचार मांडलले आहेत. परंतु आता मला सोडविण्यासाठी येथे कोणीही उपस्थित नाही. या विषयासंदर्भात मला या ठिकाणी 2 -3 सूचना माडावयाच्या आहेत.

बीड जिल्हयाच्या संदर्भात मी काही सूचना याठिकाणी मांडणार आहे. येथे पर्यटनाचा विकास करण्याकरिता शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. प्रा. सुरेश नवले आता येथे बसलेले आहेत. आरोग्य टुरीझम हा शब्द मी वर्तमानपत्रामध्ये वाचला होता. उरळीकांचन येथे निसर्गोपचार केंद्र आहे. आपल्या राज्यामध्ये, बीएमएस, आयुर्वेद यांचा चांगला विकास झालेला आहे. परंतु निसर्गोपचाराकरिता आपल्याला केरळला जावे लागते. इको टुरिझम, कृषी पर्यटन या कल्पना चांगल्या आहेत. या संदर्भात मी आपल्याला लोळद गावातील एक उदाहरण सांगत आहे. तेथील शेतकरी गायीच्या शिंगापासून सेंद्रीय खत तयार करतात. एक एकर शेतामध्ये एक ग्रॅम खत कसे पुरते हे बघायला इतर राज्यामधील शेतकरी देखील तेथे येत असतात. परंतु या गावामध्ये, रस्ते नाही, कोणतीही व्यवस्था नाही.

कृषी टुरिझम ही संकल्पना आता येथे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी मांडली होती. ही सकल्पना अतिशय सुंदर आहे. ही संकल्पना आपल्याला राबविता आली तर महाराष्ट्र राज्य बरेच पुढे गेल्या शिवाय राहणार नाही. तीर्थक्षेत्र विकास करण्याच्या बाबत सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी येथे चांगल्या सूचना मांडल्या आहेत. आमच्या जिल्हयातील प्रस्ताव आलेले आहेत परंतु रस्त्याचे प्रस्ताव सोडून इतर कोणत्याही प्रकल्पांना मंजुरी दिली जात नाही.

**(सभापतीस्थानी : माननीय सभापती )**

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांना सोडविण्यासाठी कोणीही नव्हते असे मी ऐकले. म्हणून मी येथे आलो आहे. आता यापुढे त्यांनी आपले विचार मांडावेत.

( सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे आपले आसन ग्रहण करतात व आपल्या जागेवरुन बोलतात. )

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, सभागृहाचा अधिक वेळ न घेता मी केवळ दोन मिनिटे या विषयावर बोलणार आहे. आमच्या बीड जिल्हयामध्ये कपिलधारा व मौताडा हे दोन





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे..

धबधबे आहेत. यापैकी मौताडा या धबधब्यावर जाण्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही. तेथे कोणीही उतरायला गेले तर तेथे पडण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे या धबधब्यावर जाण्याकरिता अडचण होत आहे. त्यामुळे तेथे जाण्यासाठी रोपवेची व्यवस्था आणणे आवश्यक आहे. अशी व्यवस्था तेथे तयार करुन या ठिकाणांचा विकास केला पाहिजे. नायगाव अभयारण्यामध्ये आग लागून जंगल व तेथे असणारे सुंदर मोर जळून खाक झालेल आहेत. वारंवार आगी लागल्यामुळे तेथील मोरांचे वास्तव्य संकटात सापडले आहे. हे सर्व माननीय वनमंत्री महोदय श्री. बबनराव पाचपुते यांनी पाहिले आहे. येथे शांतिवन आहे. मात्र तेथे अर्धवट निधी दिला जातो. तेथे कोणताही विकास इ ाालेला नाही. परळी वैद्यनाथ हे देखील सुंदर क्षेत्र आहे. आमच्या जिल्हयातील खजाना विहीर ही अशी विहीर आहे की, या विहिरीमधील पाणी एक इंच देखील खाली जात नाही. तेथे 500 हेक्टर जमीन आहे. या विहिरीमधून तेथील शेतीला वर्षभर पाणीपुरवठा होत असतो. आमच्या जिल्हयातील लोक वेंगुर्ल्यातील समुद्र पाहण्याकरिता कधीही येत नाहीत. ते लोक खजाना विहीर बघायला जातात. हे लोक लेकरा बाळांना घेऊन तेथे जातात त्यावेळी त्यांना डबा खाण्यासाठी इ ााडाखाली बसावे लागते.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे .......

त्या ठिकाणी घाणीमध्ये बसावे लागते. ही छोटी छोटी ठिकाणें आमच्यादृष्टीने महत्वाची आहेत. औरंगाबादचा बिबीका मकबरा आम्हाला ताजमहालसारखाच आहे. म्हणून या ज्या गोष्टी आहेत त्या मी जाणीवपूर्वक माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छिते.

परळी वैजनाथ हे 12 ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. औंढ्या नागनाथ, परळी वैजनाथ, वेरुळ, नळदूर्ग किल्ला, पैठण अशी ठिकाणे आहेत. परंतु मी बीड जिल्ह्याच्या बाबतीत जास्त भर देणार आहे. बीडच्या बाहेरचे सांगावयास गेले तर फार वेळ लागेल. म्हणून मी आधी माझ्याच जिल्ह्याचे पोट भरुन घेते. परळी वैजनाथच्या जवळ मेरुपर्वत हे ठिकाण आहे. त्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. बाकी काय फोडावयाचे ते फोडा परंतु मेरुपर्वत फोडू नका. तेथील वडावर बायका व्यवसायाला जातात. तेथील वड सुध्दा संपून जाईल. त्या गोष्टीला एक भावनिक संदर्भ आहे. त्या ठिकाणी दंगडी बांधकामाच्या खूप मोठ्या बारवा आहेत. या बारवा पडावयास लागल्या आहेत. त्यांची डागडुजी करणे गरजेचे आहे. आमच्याकडे काही मोठमोठी धरणे झालेली आहेत. माजलगाव, वाण, कुंडलिका, सिंदफणा ही धरणे आहेत. आता अपर कुंडलिका धरण होत आहे. चारदरीला एम.आय. टॅक झाला आहे. उन्हाळ्यामध्ये आम्हाला मुलांनी कोठे घेऊ जा म्हटले की, आमच्या जिल्ह्यातील माणसे गाडीमध्ये किंवा रिक्षामध्ये बसतात आणि जवळच्या धरणावर जाऊन येतात. त्या ठिकाणी जी आडवी भिंत किंवा डॅम लाईन असते त्या ठिकाणी बसून डबा खातात आणि परत येतात. ही जी छोटी छोटी ठिकाणे आहेत ती डेव्हलप करण्याची आवश्यकता आहे. परवाच्या दिवशी दादा असे म्हणाले की, कोणी बी.ओ.टी. तत्वावर पुढे आले तर करा. परंतु त्याच्यासाठी विशेष बैठका घेऊन ही सगळी ठिकाणे डेव्हलप केली पाहिजेत अशी माझी विनंती आहे. बीडला एक हेमाडपंथी मंदिर आहे. त्या ठिकाणी चारही बाजूला पाणी आहे आणि मध्ये महादेवाचे मंदिर आहे. तसेच कंकालेश्वर आहे. वेरुळ अजिंठा येथील लेण्यांमधील ज्या मूर्ती आहेत तशाच पण आकाराने लहान मूर्ती त्या मंदिराच्या भोवती आहेत. हे मंदिर सुध्दा डेव्हलप करणे गरजेचे आहे. या ठिकाणी ताईंनी मोहटादेवीचा उल्लेख केला. तपोवनला महादेवाचे मंदिर आहे. पिंपळगावला महादेवाचे मंदिर आहे. ही सगळी हेमाडपंथी मंदिरे आहेत. ही सगळी मंदिरे जपणे गरजेचे आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे .....

गोरक्षनाथ नावाची एक टेकडी आहे. दोन लाखापासून आपल्याकडे 30 लाख रुपयांचा प्रस्ताव पर्यटन खात्याकडे पडून आहे. तो मंजूर करुन पाठवावा. आम्ही रिव्हाईज एस्टीमेट करुन ते काम करुन घेऊ. लाखो भाविक त्या ठिकाणी येतात. ते अत्यंत चांगले उंचीवरचे ठिकाण आहे. वर गेल्यानंतर सुरेख हवा मिळते. म्हणून तो प्रस्ताव पर्यटन खात्याने ताबडतोब मंजूर करावा अशी मी विनंती करते. आमच्या जिल्ह्याची काही अस्मिता स्थळे आहेत. त्यामध्ये गहिनीनाथ गड, भगवान गड, नारायण गड आणि हनुमान गड ही ठिकाणे आहेत. ही सगळी ठिकाणे डोंगरावर असून चांगल्या पध्दतीने डेव्हलप करण्यासारखी आहेत. सन्मानीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे त्या ठिकाणी लाखो लोक येतात. पण त्यांच्यासाठी त्या ठिकाणी टॉयलेटची सोय नाही. पिण्याच्या पाण्याची अडचण असते. राहण्याची अडचण असते. त्या ठिकाणी भक्तिधाम बांधले गेलेले नाहीत. त्या ठिकाणी आपण छोटे छोटे गार्डन्स डेव्हलप केले पाहिजेत. फक्त पैठणला गार्डन डेव्हलप करुन चालणार नाही. छोट्या छोट्या ठिकाणी सुध्दा गार्डन डेव्हलप करुन आमच्या मुलाबाळांची फुले पाहण्याची हौस पूर्ण करणे गरजेचे आहे. बिडमध्ये एकच गार्डन होते. बिंदूसरा नदीला महापूर आला आणि ते गार्डन वाहून गेले. त्या ठिकाणी दोन मोर होते. आम्ही त्यांना चमन म्हणत होतो. त्या मोराने मला चोचीने टोचले होते. तो चमन वाहून गेला. आता त्या ठिकाणी चमनच नाही. मानूर येथे फार मोठे देवस्थान आहे. व्यंकटस्वामीचे फार मोठे मंदिर आहे. आमच्या जिल्ह्यामध्ये बरेच दर्गा आहेत. त्यामध्ये शहशावली दर्गा आहे. त्या ठिकाणी हायवेला जागा मागत आहोत. त्या ठिकाणी जागा पूरत नाही. त्यानंतर सिरसाळा दर्गा, दिद्रूड दर्गा, निथ्रुड, उपळी, पाथ्रुड, बालेपीर, सायगाव हे दर्गा आहेत. सायगावला आपले माननीय मुख्यमंत्री दरवर्षी किमान दोनदा जातात. एवढे धार्मिक आशास्थान असेलेला दर्गा आहे. असे अनेक दर्गा आहेत. त्यांचे डेव्हलपमेंट केले पाहिजे. तीर्थक्षेत्र विकासाला आपण प्राधान्य दिले पाहिजे. मी एक उदाहरण देते. मी सिंधुदुर्ग जिल्ह्यात कनकवली येथे प्रचाराला गेले होते. रेल्वेतून प्रवास करताना ज्यावेळी जागी झाले त्यावेळी सूर्योदय होत होता. रेल्वे डब्यातून माझ्या मोबाईलच्या कॅमेऱ्यातून सूर्योदयाचे फोटो काढले. मागच्या आठवड्यात मी अधिवेशनाहून परत जात असताना औरंगाबादला विमानाने उतरले

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे .....

आणि गाडीत बसून बीडला जात असताना सूर्योदयाचे फोटो काढले. मी ते फोटो त्याच दिवशी धुवून घेतले. दुसऱ्या दिवशी ते फोटो मी मुलींना दाखवले. हे फोटो कोठले आहेत हे ओळखा असे मी त्यांना सांगितले. त्यांनी मला बीडला जाताना सूर्योदयाचे काढलेले फोटो अतिशय सुंदर आहेत असे सांगितले. मी कोणाला कमी लेखत नाही परंतु सौंदर्य हे सौंदर्य आहे. निसर्ग हा निसर्ग आहे आणि तो सगळीकडे आहे. निसर्गाने जे दिले आहे त्या प्रत्येकावर आपण समान प्रेम केले पाहिजे. आम्ही बिडमध्ये राहून कोकणावर प्रेम करतो, महाबळेश्वरवर प्रेम करतो. त्यामुळे या मुंबईमध्ये बसलेल्या लोकांनी सुध्दा माझ्या बीडमधल्या गल्लीबोळामधल्या सौंदर्यस्थळांकडे तितक्याच प्रेमाने पाहिले पाहिजे. माझ्या बिडमध्ये येऊन आपण जर कंकाळेश्वर येथे उभे राहिला तर "यह कौन चित्रकार है, यह कौन चित्रकार " या गाण्याची आठवण त्या ठिकाणी आल्याशिवाय राहणार नाही. शक्य झाले तर आयुर्वेदिक कृषी टुरीझम माझ्या बिडमध्ये करावे. त्या ठिकाणी बालाघाट आहे. पाहिजे तेवढी जमीन आम्ही शासनाला मिळवून देऊ एवढीच विनंती करते. सभापती महोदय, आपली थोडीशी गैरसोय झाली पण इलाज नव्हता. मला बीडचा प्रश्न मांडणे गरजेचे होते. मला आपण ते मांडण्याची संधी दिली तसेच आपण सर्वांनी ऐकले. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांचे मी अभिनंदन करते. टुरिझमवर बोलण्यासारखे खूप आहे

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे...

संपूर्ण मराठवाडयातील पर्यटन स्थळांपैकी मी बीड जिल्हयातील पर्यटन स्थळांचा उल्लेख केला आहे, त्यात थोडा स्वार्थी भाव होता. कारण बीड हा मागासलेला जिल्हा आहे. एवढे बोलून मी माझ ो भाषण संपविते.

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांना मी सांगू इच्छितो की, माझा गैरसमज झालेला नाही. परंतु मला रिलिव्ह करण्यासाठी कोणी नाही असे आपल्याला वाटले असावे. सभागृह चालू असताना सभापती निघून गेले असा आपला समज होऊ नये.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, असा माझा समज झाला नव्हता. परंतु तालिका सभापतीस्थानी बसण्यासाठी कोणी उपलब्ध झाले नाहीत म्हणून मी तसे बोलले होते.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते ( वने मंत्री ) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी पर्यटनासंबंधीचा प्रस्ताव मांडलेला आहे. या विषयामध्ये माझ्या विभागाचा थोडासा सहभाग आहे. टूरिझममध्ये इको टूरिझमचे अनेक भाग आहेत. त्यांचा विकास झाला पाहिजे, सुधारणा झाली पाहिजे असे अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. पर्यटन विभागाचा शेवटून पहिला क्रमांक आहे. या विभागासाठी किती बजेट मिळते त्याची आकडेवारी सांगू इच्छितो. गेल्या वर्षी राज्याचे बजेट 11,035 कोटीचे होते. त्यापैकी या विभागासाठी 33 कोटी मिळाले म्हणजे 0.29 टक्के, सन 2003-04 मध्ये 33 कोटी म्हणजे 0.27 टक्के, सन 2004-05 मध्ये 16 टक्के, सन 2005-06 मध्ये 22 टक्के, सन 2006-07 मध्ये 39 टक्के, सन 2007-08 मध्ये 37 टक्के आणि या वर्षाच्या बजेटमधून 35 टक्के बजेट मिळाले आहे. अशाप्रकारे बजेट मिळत असेल तर या खात्याचे काय होणार आहे ? सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ताडोबा येथे गेल्यावर चांगले रेस्ट हाऊस मिळाले पाहिजे. मी तर म्हणेन की, या पैशामध्ये आता जे मिळते तेच खूप आहे. या सर्व परिस्थितीमध्ये राज्यातील लोकांचा स्थायी भाव काय आहे ? बाहेरुन आलेल्या पाहुण्यांकडून पैसे काढण्याची आपली मानसिकता नाही, त्यांच्या खिशाकडे आमचे लक्ष नाही. या राज्यात साधू, संत, महंत होऊन गेले आहेत. त्यामुळे आपल्याकडे पाहुणे आले तर आपण अतिथी देवो भव असे म्हणतो. पाहुणे आल्यावर आपल्याला समाधान मिळते. त्यांच्यासाठी राहण्याची, जेवणाची मोफत सोय करतो आणि त्यात धन्यता मानतो. बाहेरुन आलेल्या पाहुण्यांना लुबाडायचे नाही हा पूर्वीचा स्थायी भाव होता आता तो बदलला आहे. आता आपण धोरण बदलले आहे, मी या विभागाचा चार्ज घेतल्यावर इको टूरिझमबाबत धोरण ठरविण्यासाठी मला 3 वर्षे लागली. ठरविण्यात आलेले धोरण 7 महिने जागचे हलले नाही. त्याबाबत प्रक्रिया सुरु आहे असे सांगण्यात आले. गेल्या वर्षाच्या ऑगस्ट महिन्यात ती प्रक्रिया पूर्ण झाली आहे. राज्यातील टूरिझम, इको टूरिझम विकसित करावयाचे असेल, मग ते शैक्षणिक पर्यटन, अध्यात्म पर्यटन, कृषि पर्यटन, किल्ले पर्यटन, समुद्र पर्यटन असेल असे विविध भाग त्यात अंतर्भूत आहेत. आपला महाराष्ट्र विविधतेने नटलेला आहे, झाडा झुडुपांनी सजलेला आहे. विस्तीर्ण समुद्र किनारा आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ (पूर्वी श्री. खंदारे 21:45

(श्री. बबनराव पाचपुते...

अशा या विविधतेने नटलेल्या सुंदर राज्याचा आपण काय फायदा करुन घेत आहोत ? आपण करंटे आहोत. आपण याचे मार्केटिंग करत नाही. मी कान्हा अभयारण्यामध्ये गेलो होतो. आम्ही कुठे वाघ दिसतो का ते पहात होतो. परंतु तो कुठे दिसेना. मग तेथील एका आदिवासी माणसाने "तुम्हाला एक चांगले ठिकाण दाखवतो" असे सांगून त्या ठिकाणावर नेले आणि सांगितले की, सूर्योदयापूर्वी वाघ येथे नेहमी येत असतो. येथे येण्याचा त्याचा नियम आहे. परंतु आपल्याला आता उशीर झालेला असल्यामुळे तो दिसू शकणार नाही. तो आदिवासी माणूस चांगल्या त-हेने आम्हाला पटवून सांगत होता. त्याही पेक्षा तो त्या जागेचे चांगले मार्केटिंग करीत होता. आम्ही असे मार्केटिंग करीत नव्हतो पण आता आम्ही याकडे लक्ष दिले आहे. ईको टुरिझमची आमची पॉलिसी नव्हती ती आता आम्ही केलेली आहे. 2002ला आम्ही पॉलिसी तयार केलेली असून त्या पॉलिसी प्रमाणे आम्ही काम सुरु केलेले आहे. हे करीत असताना आम्ही ब-याच गोष्टींचा अभ्यासही केलेला आहे. आपण स्वातंत्र्यानंतर 59 वर्षांनी ही पॉलिसी तयार करीत असताना ती चांगली कशी होईल याकडे आम्ही लक्ष केन्द्रीत केलेले आहे. केरळ, कर्नाटक या शेजारच्या राज्यांकडून माहिती घेऊन 20 फेब्रुवारी 2008ला ही पॉलिसी आम्ही तयार केलेली आहे. ही ईको टुरिझम पॉलिसी स्वतंत्रपणे तयार करीत असताना पर्यटनाच्या संदर्भातील अनेक छोट्या छोट्या गोष्टींचा त्यामध्ये समावेश केलेला आहे. निसर्ग पर्यटन विकास मंडळ देखील आपण तयार करीत आहोत. राज्य शासनाचा सहभाग देखील या सर्व गोष्टींमध्ये घेतलेला आहे. पर्यटन विस्तार, प्रसिध्दी तसेच स्थानिक रहिवाशांना जास्तीत जास्त सहकार्य कसे करता येईल याबाबतीत देखील काम सुरु झालेले आहे. मेळघाट मधील सोमडोह येथील पर्यटन केन्द्र खाजगी पध्दतीने चालविण्यासंबंधीचा जी.आर. काढलेला आहे. बी.ओ.टी.तत्वावर खाजगी माणसाना अशी केन्द्र चालविण्यासाठी दिली तर ते ती उत्तर प्रकारे चालवतील आणि मोठ्या प्रमाणावर पर्यटक आकर्षित होतील. हे करीत असताना तेथील पर्यटन व्यवसायामध्ये त्या भागातील 70 टक्के कामगार घेतले पाहिजेत, एकूण उत्पनाच्या 5 टक्के उत्पन्न त्या गावाच्या विकासासाठी दिले पाहिजे अशा प्रकारचा निर्णयही घेतलेला आहे. सभापती महोदय मी सांगू इच्छितो की, भारतात नाही असे प्रकल्प नागपूरच्या परिसरामध्ये

(श्री. बबनराव पाचपुते...

आहेत. ताडोबा, पेंच आणि मेळघाट या सारखे प्रकल्प तेथे आहेत. त्यामध्ये नागझिरा सारख्या सुंदर भागाचाही समावेश होऊ शकेल. अशा प्रकारची विदर्भामध्ये 56 आणि महाराष्ट्रामध्ये 110 ठिकाणे आम्ही लोकेट केलेली आहेत. ती ठिकाणे विकसित करण्यासाठी पैशाची आवश्यकता आहे. आता आपल्याला मिळालेले पैसे अत्यल्प आहेत. या कामासाठी आता 15 कोटी रुपये मिळालेले आहेत. हे पैसे त्या कामासाठी जास्तीत जास्त कसे वापरता येतील याकडे लक्ष दिलेले आहे. 12व्या वित्त आयोगाकडून काही पैसे मिळालेले आहेत. 443 कोटी रुपये पाहिजे असतील तर पाच वर्षाचा कार्यक्रम तयार करुन पाठवा असे आम्हाला सांगण्यात आले. 5 वर्षाचा कार्यक्रम तयार करुन पाठविल्यानंतर हे पैसे मिळतील.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री. शिगम 21:50

श्री. बबनराव पाचपुते...

रेस्ट हाऊस चांगल्या पध्दतीचे करावयाचे आहेत. सध्याचे रेस्ट हाऊसची चांगल्या प्रकारे दुरुस्ती करावयाची आहेत. बाहेरील पर्यटक आले तर चांगल्या ठिकाणी निवासाची व्यवस्था व्हावी म्हणून पंचतारांकित रेस्ट हाऊसची व्यवस्था केली पाहिजे. बाहेरील पर्यटकांना घेऊन फिरणारे वाहन चालक हे देखील प्रशिक्षित असले पाहिजेत. त्यांना पर्यटन स्थळांची माहिती देण्यासाठी प्रशिक्षित गाईडची व्यवस्था अशा ठिकाणी निर्माण केली पाहिजे. परदेशातील पर्यटकांबरोबर अडाणी माणूस गाईड म्हणून दिला तर पर्यटन स्थळांचे महत्व त्यांना कळणार नाही. बाहेरील पर्यटक या राज्यात आकर्षित व्हावेत म्हणून शासनाने वेगळया पध्दतीने लक्ष केंद्रीत केलेले आहे. विदर्भात पेंच प्रकल्प आहे. त्याच्यापुढे कान्हा पर्यटन स्थळ आहे. पर्यटक नागपूरला विमानाने येतात. तेथून 40 कि.मी. अंतरावरील कान्हा या पर्यटन स्थळाला भेट देतात. या रस्त्यावरच पेंच प्रकल्पाचे पर्यटन स्थळ लागते, परंतु तेथे कोणीही बाहेरील पर्यटक थांबत नाहीत. कान्हा येथे पर्यटकांसाठी ज्या सोयी सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत, तशा सोयी सुविधा पेंच प्रकल्प येथे नाहीत.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी पर्यटनाच्या संदर्भात अतिशय चांगले विचार मांडले. त्यांच्या पर्यटनाच्या बाबतीत खूप मोठा अभ्यास आहे. सन्माननीय सदस्यांबरोबर मी फिरलेलो आहे. बोटीने, स्पीड बोटीने मी प्रवास केलेला आहे. कोकणातील सगळी पर्यटनस्थळे मी पाहिलेली आहेत. मी गेल्या तीस ते चाळीस वर्षापासून संपूर्ण राज्य फिरतो आहे. अध्यात्मामुळे महाराष्ट्रात माझे चांगले फिरणे झालेले आहे. मी महाराष्ट्रातील बारीक-सारीक पर्यटनस्थळे बधितलेली आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे यांनी त्यांच्या जिल्हयातील लहान लहान तीर्थक्षेत्रे आणि पर्यटन स्थळांचा विकास व्हावा अशी मागणी केली आहे. त्यांनी ज्या पर्यटन स्थळांचा उल्लेख केला त्या ठिकाणी मी जाऊन आलो आहे. अधिवेशन संपल्यानंतर लागलीच विधानसभेचे अध्यक्ष आणि मी हेलिकॉप्टरमधून महाराष्ट्रातील सगळा कोस्टल एरिया फिरणार आहोत. पारघड पर्यटन क्षेत्र आहे, तिल्हारी डॅम आहे. सर्वात उत्तम पर्यटन स्थळे सिंधुदूर्ग जिल्हयात आहेत. सिंधुदूर्गच्या लोकांनी दुस-यावर बोटे मोडण्यापेक्षा आपण स्वत: पर्यटन स्थळांच्या विकासाच्या बाबतीत लक्ष घातले पाहिजे असे माझे मत आहे. परंतु त्या ठिकाणी पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी कोणीही पुढे येत नाही ही एक मोठी अडचण आहे. दुस-याने या ठिकाणी यावे आणि त्यांनी काही तरी करावे अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. त्या ठिकाणच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

एकत्र येऊन तेथील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. तुम्हाला मदत व्हावी अशीच आमच्या विभागाची भूमिका आहे. त्या ठिकाणी हत्ती ग्राम करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्या गोष्टीचा कोकण विभागातील लोकांना उपयोग होणार आहे. राज्यात वन विभागाअंतर्गत चांगली पर्यटन स्थळे आहेत ती चांगल्या प्रकारे विकसित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. या कामासाठी 12 व्या वित्त आयोगाकडून निधी मिळतो. यासंदर्भात केंद्राकडे आपल्या वन विभागाची कोणतीही पॉलिसी नव्हती, ती पॉलिसी तेथे घेऊन जाणार आहोत. निसर्ग टुरीझमसाठी मोठयाप्रमाणात केंद्राकडे पैसे मागितले जाणार आहेत.

सभापती महोदय, वन विभागाकडे राज्यातील एकूण 27 किल्ले् आहेत. त्या किल्ल्याचा विकास करण्यासाठी व्यवस्थितपणे नियोजन आखलेले आहे. सध्या जुन्नर येथील किल्ल्याचा चांगल्या प्रकारे विकास करीत आहोत. तसेच सिंहगड किल्ल्याचा देखील विकास करतो आहोत. सिंहगडच्या संदर्भामध्ये 1972 साली कमिटी निर्माण करण्याचा निर्णय झाला आहे. कमिटी करण्यासबंधीचा जी.आर.मला नुकताच मिळालेला आहे. किल्ल्याचा विकास करावयाचा असेल तर वन खात्याची वा बांधकाम खात्याची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. पूर्वीच्या जी.आर.प्रमाणे एक कमिटी तयार करावयाची. सिंहगड, एलिफंटा येथील लेणी, अरण्येश्वर अभयारण्य यांचा विकास करावयाचा आहे. सदरहू पर्यटन स्थळांचा विकास या कमिटीच्या माध्यमातून करण्याचे ठरविले आहे. सिंहगह किल्ला बघण्यासाठी हजारो पर्यटक जातात. पर्यटक सिंहगडाच्या पायथ्याशी येतात. लोकांना तो किल्ला पायी चढावा लागतो. पर्यटकांसाठी त्या ठिकाणी रोप-वे ची व्यवस्था केली तर बरेच लोक सिंहगडावर जातील. पर्यटक सिंहगड किल्ल्याच्या वरच्या बाजूस गेले आणि तेथे पर्यटकांसाठी राहण्याची, जेवणाची चांगली व्यवस्था ठेवली तर पर्यटनामुळे काही प्रमाणात उत्पन्न मिळेल. दिल्ली येथील लाल किल्ल्यात साऊंड सिस्टीम कार्यान्वीत केली आहे. प्रत्येक किल्ल्याच्या ठिकाणी लाईटींग आणि साऊंड सिस्टीम चालू केली तर बरेच पर्यटक किल्ल्यांना भेटी देतील. खरे तर या व्यवसायाला आपण उद्योग म्हणून मान्य करणार आहात की नाही हा खरा महत्वाचा प्रश्न आहे यादृष्टीने सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे यांनी सूचना केली की, या व्यवसायास उद्योग म्हणून मानले पाहिजे. राज्यात नालाबंडींग, पाझर तलाव, के.टी.बंधारे तयार करण्यासाठी रोजगार हमी योजनेचा निधी खर्च करीत आहात. पाटबंधारे विभागावर 6 ते 7

3...



ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री. शिगम 21:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

हजार कोटी रुपयांचा निधी दरवर्षी खर्च केला जातो आहे. वीज निर्मितीसाठी मोठया प्रमाणावर खर्च करण्यात येत आहे. रस्त्यांच्या कामासाठी मोठया प्रमाणात खर्च करण्यात येत आहे. यातून आऊटपूट काहीही नाहीत. सगळयात जास्त आऊटपूट टुरीझम मधून मिळू शकेल. हा एक उद्योग आहे असे मानण्याची आवश्यकता आहे. मेडीकलच्या बाबतीत विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे याचे कारण असे आहे की, अमेरिका, लंडन येथे हार्टची सर्जरी करावयाची असेल, एन्जॉग्राफी करावयाची असेल, एन्जॉप्लॉस्टी करावयाची असेल, बायपास सर्जरी करावयाची असेल तर त्यासाठी तेथे 15 ते 20 लाख रुपये खर्च करावे लागतात. आपल्या राज्यामध्ये ही सर्जरी दोन ते तीन लाख रुपयांमध्ये होते. म्हणून या राज्यात मोठमोठी हॉस्पीटल निर्माण केले पाहिजेत. पंचतारांकित हॉटेल्स उभारल्या पाहिजेत, आपण जर त्या ठिकाणी राहण्याची तसेच उपचार करुन घ्यावयाचा असेल तर त्यासंबंधी एक पॅकेज आपण जाहीर केले पाहिजे. परदेशी पर्यटकाला तीन,चार दिवसांचे पॅकेज दिले पाहिजे. कोणत्याही कामासाठी पर्यटक या राज्यात आला तर त्याला पॅकेज दिले गेले पाहिज.तीन चार दिवसांचे पॅकेज दिले तर पहिल्या दिवशी नागूपर दाखवा, दुस-या दिवशी ताडोबा येथे घेऊन जा, तिस-या दिवशी पेंच प्रकल्पाला भेट देता येईल, त्यानंतर मेळघाट येथे जात येईल. मेळघाटच्या पुढे लोणारे येथे उल्का पडल्यामुळे मोठा तलाव निर्माण झाला आहे, त्या पर्यटन स्थळाला भेट देता येईल.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ SBT/ 21:55

श्री. बबनराव पाचपुते....

अशा प्रकारचे पॅकेज देण्याची आवश्यकता आहे. पॅकेजची माहिती इंटरनेटच्या माध्यमातून अपडेट करुन पर्यटकाला ती मिळाली पाहिजे. त्याचप्रमाणे बुकींग करण्याची देखील आवश्यकता आहे.त्यादृष्टीने या खात्यामध्ये लक्ष केंद्रीत करण्याचा निर्णय घेतलेला आहे. पॉलिसी तयार करीत आहोत. 8/10 दिवसामध्ये कोस्टल एरियामध्ये राज्यमंत्र्यांसमवेत आम्ही जाणार आहोत. विधानसभेच्या माननीय अध्यक्षांबरोबर आपल्याला जायचे आहे. मी 1991 साली गृहमंत्री असताना कै.रामराव आदिक यांच्याबरोबर तेव्हा अशा प्रकारचा पर्यटन स्थळांचा हेलिकॉप्टरने दौरा केला होता. गणपतीमुळे येथे गेलो होतो. मालवणला गेलो होतो. हेलिकॉप्टरमधून सुध्दा पाण्याच्या तळापर्यंत काय चालले आहे ते दिसते. पाणी अगदी काचेसारखे स्वच्छ दिसते. उत्तम प्रकारचे बेट आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्याचा इतिहास जागा करावा लागणार आहे. काही लोकांना बोटींग करावयाचे असते. त्यांना तशी संधी द्या. कोणाला पाण्यात रहावयाचे असते. एकूणच यामध्ये सुधारणा करीत आहोत. महाबळेश्वर येथे प्रताप गडावर 12 कोटी रुपये खर्च करुन बीओटी तत्वावर सुधारणा करण्याचा विचार आहे. जगामध्ये यासंदर्भात काय काय चालले आहे याबाबत खालच्या सदनात चर्चा झाली. फॉरेस्टबाबत इतर जगात काय चालले आहे ते पाहण्यासाठी परदेशात मी जाऊन आलो. दक्षिण आफ्रिका या देशात पर्यटनाच्या माध्यमातून 17 टक्के पैसा जमा होतो. केनिया देशामध्ये 19 टक्के पैसा टुरीझममधून येतो. तेथील लोकांना चांगल्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुनप देण्यात आलेल्या आहेत. मॅनमारला विमानाने गेलो होतो. मुरुमाच्या धावपट्टीवर विमान उतरवले होते. तेथील फॉरेस्टमध्ये गेलो असता उत्तम प्रकारचे प्राणी दाखविण्याचे काम त्यांनी केले. महाराष्ट्र राज्य हे पहिले राज्य आहे ज्या राज्याने परदेशाबरोबर यासंदर्भात आपला विनियोग करण्याचे ठरविले असून इको-टुरीझमच्या माध्यमातून एमओयू करण्याचे ठरविले आहे. अशा प्रकारचा करार करुन त्यांनी आपल्याकडे यायचे आपण त्यांच्याकडे जायचे, त्यांनी ट्रेनिंग द्यायचे ठरविलेले आहे. यामाध्यमातून उत्तम प्रकारचे टुरीझम आपण उभे करु शकतो. ते आपल्या विकासाच्या दृष्टीने सपोर्टींग होणार आहे. माझ्याकडे गृहविभाग होता त्यावेळी सांगितले की जास्तीत जास्त बजेट कायदा आणि सुव्यवस्थेवर खर्च करावे लागणार आहे. खऱ्या अर्थाने आपल्याला काम करावयाचे असेल तर पर्यटन खात्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. एक पर्यटक जर देशात आला तर छोटयामोठया अशा 85 लोकांना काम मिळते. याचा अभ्यास करुन आदिवासी

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते....

परिसरामध्ये काम द्यावयाचे असेल पैसा मिळवायचा असेल तर सगळयात महत्वाचे पर्यटन क्षेत्र आहे. आयटीपार्क आपण उभे करतो. 1 कोटी रुपये खर्च केले तर दोन लोकांना काम मिळते. शेतीमध्ये 1 कोटी रुपये खर्च केले तर 7 लोकांना रोजगार मिळतो....

श्री. जयंत प्र.पाटील :सभापती महोदय, आम्ही जे बोललो त्याचाच उल्लेख माननीय मंत्रीमहोदय करीत आहेत. आम्ही जे मुद्दे मांडले त्याचे उत्तर शासनाकडून आले पाहिजे. मंत्रीमहोदयांच्या आतापर्यंतच्या दिलेल्या उत्तराने आमचे समाधान झालेले आहे.

नंतर श्री. भोगले

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील........

सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी वन खात्यासाठी किती निधी मागितला होता? वन खात्याने किती प्रस्ताव सादर केले, त्यापैकी किती प्रस्ताव कॅबिनेटने फेटाळले याची माहिती सभागृहाला द्यावी. वन खाते काम करीत नाही असे आमचे म्हणणे आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, गेल्या सात वर्षानंतर पहिल्यांदा इको टूरिझमची पॉलिसी तयार झाली. महाराष्ट्र निर्माण झाला त्या 1 मे रोजी आपण झेंडा फडकविणार आहोत. पहिल्यांदा ऑगस्टमध्ये टूरिझमची पॉलिसी निर्माण झाली. फेब्रुवारीमध्ये इको टूरिझमची पॉलिसी निर्माण झाली. यावेळी बजेटमध्ये 400 कोटी रुपयांची मागणी केली होती परंतु फक्त 87 कोटी रुपये देण्यात आले. इको टूरिझमसाठी पैसे मागितले होते. 12 व्या वित्त आयोगामधून 15 कोटी धरुन 100 कोटी रुपये मागितले होते. ताडोबा, मेळघाट, पेंच याठिकाणी 29 गावे आहेत. या 29 गावांचे पुनर्वसन करावयाचे असेल तर 130 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. ही गावे वन क्षेत्रातून बाहेर गेली तर कान्हा नॅशनल पार्कपेक्षा ताडोबा हे नंबर एकचे जंगल आहे. तेथील सहा गावे बाहेर निघत नाहीत तोपर्यंत ते जंगल उत्तम होऊ शकत नाही. आणखी चार गावे राहिली आहेत. या संदर्भात काय केले हे सांगितले पाहिजे. आतापर्यंत कुटुंबाला 1 लाख रुपये देत होतो. आम्ही प्रयत्न केला आणि केंद्र सरकारकडे गेलो आणि प्रत्येक कुटुंबासाठी 10 लाख रुपये देण्याचे मान्य करुन घेतले. एका वर्षात सगळी गावे बाहेर काढावयास तयार आहोत. परंतु त्यासाठी 130 कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. या संदर्भात एकदा निर्णय घ्यावा लागणार आहे. टूरिझमला उद्योग मानून मोठया प्रमाणात पैसे द्यावे लागतील. पायाभूत सुविधा निर्माण कराव्या लागतील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांना ऑन लेग ठेवावे आणि उर्वरित उत्तराचे भाषण उद्या ठेवण्यात यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, यासाठीच मी सन्माननीय सदस्यांना दोन-दोन मिनिटात विचार मांडण्याची विनंती केली होती.

**सभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदय, वनमंत्री या नात्याने इको टूरिझमसाठी आपण जे श्रम घेत आहात याची सभागृहाला कल्पना आहे. अनेकदा या संदर्भात चर्चा झालेली आहे. अधिवेशन संपल्यानंतर एका दिवशी किमान 2-3 तासाची कार्यशाळा घेण्यात यावी. मधल्या काळात एक

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**..............

कार्यशाळा आयोजित केली होती. परंतु मी त्यावेळी उपस्थित राहू शकलो नाही. दोन-तीन तासाची कार्यशाळा आयोजित केली तर अधिक चांगली माहिती मिळू शकेल.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी आपला अतिशय आभारी आहे. मागील अधिवेशनात वन औषधीच्या संदर्भात सांगितले होते. वन औषधीच्या संदर्भात एक कार्यशाळा आयोजित केली होती. आपल्याला उपस्थित राहता आले नाही. आपल्या सूचनेमुळे ती कार्यशाळा आयोजित केली होती. इको टूरिझममध्ये ज्यांना ज्यांना इंटरेस्ट आहे त्या सर्वांना बोलावता येईल. आपल्या सूचनेप्रमाणे मागील कार्यशाळेसाठी दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांना उपस्थित राहण्यास कळविले होते. परंतु दुर्दैवाने सगळयांना काम असल्यामुळे फक्त 3 सन्माननीय सदस्य उपस्थित राहिले होते ही वस्तुस्थिती आहे. आपण सुचविले परंतु कोणी हजर रहात नाहीत.

सभापती महोदय, आपले वन आहे ते वन सुध्दा खाजगी क्षेत्रामार्फत विकसित करण्यासाठी ट्रायपार्ट ॲग्रीमेंट करणार आहोत. या वनामध्ये चांगल्या प्रकारच्या सुविधा निर्माण करुन वनाचा आतील भाग इको टूरिस्टसाठी द्यायचा आणि वनाबाहेर रिसॉर्ट, हॉटेल तयार करायचे. 10 ते 15 हेक्टर जमीन ज्याप्रमाणे दक्षिण आफ्रिकेमध्ये खाजगी कंपन्यांना देण्यात आली आहे त्याप्रमाणे जमीन देऊन इको टूरिझम करण्याचा मुद्दा आहे. त्याचबरोबर गोरेगाव आणि गोऱ्हेवाडा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे दोन झू निर्माण करणार आहोत. त्यासाठी ट्रायपार्ट ॲग्रीमेंट करुन सरकारने किती पैसा द्यायचा यासंबंधी निर्णय घेत आहोत.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते ....

या शिवाय आपण ज्या ठिकाणी जमीन देणार आहे त्या ठिकाणी सुध्दा बाहेरचे जनावरे आणून ते त्यांनी सांभाळावेत अशा प्रकारचा देखील कार्यक्रम आपण करीत आहोत. वनाच्या आसपास असणारे जे तरुण मुले आहेत त्यांना ट्रेनिंग देण्याचे काम आदिवासी विकास महामंडळ आणि वन विभाग असे एकत्र येऊन करणार असून या मुलांना हॉटेलिंग, भाषा, ड्रायव्हींग, तसेच आपल्या कडे आलेल्या लोकांबरोबर कसे वागावयाचे याची माहिती व्हावी म्हणून यासंदर्भात आम्ही ट्रेनिंग देणार आहोत. येत्या दोन तारखेला आदिवासी विकास विभागाचे प्रमुखांची माझ्या बरोबर मंत्रालयात एक बैठक आयोजित केलेली आहे. गोरेवाडा नागपूरच्या झीरो माईलपासून सात कि.मी. अंतरावर असून या ठिकाणी 2200 हेक्टर जमीन असून त्यातील 1800 हेक्टर जमीन आपण इंटरनॅशनल झू साठी दिलेली असून, या ठिकाणचे काम आता फायनल स्टेजला आलेले आहे, मास्टर प्लॅनसुध्दा तयार झालेला आहे. तसेच मी गोरेगावच्या संदर्भात सांगतो की, मुंबईच्या एअरपोर्ट पासून 12 कि.मी. अंतरावर संजयगांधी राष्ट्रीय उद्यानातील 500 हेक्टर जमीन आणि ॲनिमल हजबंडरीकडे असलेली 100 हेक्टर जमीन आपण याच कामासाठी वापरत असून त्याचा देखील मास्टर प्लॅन तयार करण्याचे काम सुरु आहे. पयर्टनाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी चांगल्या प्रकारचा प्रस्ताव मांडला असून पर्यटनाच्या संदर्भात माझ्याकडे खूप माहिती आहे परंतु माहिती खूप आहे आणि क्रिया काही नाही असे व्हायला नको म्हणून लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य गुरुनाथ कुलकर्णी साहेबांनी पर्यटनाच्या संदर्भात ठराव मांडल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो व आपली रजा घेतो.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आम्ही आज सकाळी 9.00 वाजेपासून येथे आलेलो आहोत. आता 10.00 वाजून गेलेले आहेत त्यामुळे पर्यटन मंत्र्यांचा पर्यटनावरील रिप्लाय उद्या घ्यावा अशी आमची आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : उद्याचा बिझनेस फार हेवी आहे. उद्या नियम 260 अन्वयेच्या दोन चर्चा, आंब्याची चर्चा आहे त्या व्यतिरिक्त बीले आहेत. त्यामुळे पर्यटन राज्यमंत्र्यांनी आपल्या रिप्लायला सुरुवात करावी.

-------------

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी (पर्यटन राज्यमंत्री ) : आदरणीय सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी पर्यटनाच्या संदर्भात या ठिकाणी प्रस्ताव मांडला असून या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, परशुराम उपरकर, सुभाष चव्हाण, ॲ. दराडे, डॉ. नीलम गो-हे, डॉ. दीपक सावंत अशा काही सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतलेला आहे. आज पहिल्यांदाच पर्यटनासारख्या विषयावर चर्चा सुरु झाल्यामुळे मला फार आनंद झालेला आहे. काल या ठिकाणी शिक्षणासारख्या महत्वाच्या विषयावर चर्चा झालेली आहे. पर्यटनाच्या संदर्भात विकसीत आणि विकसनशील देशात पर्यटनाला प्रथम स्थान दिले जाते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी इटली, स्वीत्झरलँड यांचे वर्णन केलेले आहे. युरोप, अमेरिका, फार इस्ट एशिया मध्ये पर्यटनला बेसीक प्रायमरी सोर्स ऑफ इकॉनॉमिक जनरेशन अँड एम्पलॉयमेंट जनरेशन असे म्हटले जाते. आपल्या देशातील जीडीपी मध्ये 5.3 टक्के पर्यटनापासून उत्पन्न मिळते आणि जगाचा विचार केला तर आपल्या संपूर्ण देशाचा शेअर 0.8 पर्सेंट आहे. आपल्याकडे 10 लाख लोक पर्यटनाच्या व्यवसायामध्ये गुंतलेले आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/ 22=10

श्री.सुरेश शेट्टी..

. महाराष्ट्रामध्ये गेल्या 25 - 30 वर्षा पूर्वीचे पर्यटन जर आपण पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, मुंबईमध्ये मॅक्झिमम फॉरिन टुरिस्ट येत होते. त्याचे एक कारण असे की वेस्टर्न कोस्टलमध्ये मुंबई हा एकच इंटरनॅशनल एअरपोर्ट आहे. त्यानंतर नॉर्थ कोस्टलमध्ये दिल्ली आणि इस्ट कोस्टलमध्ये कलकत्ता हे इंटरनॅशनल एअरपोर्ट आहे. त्यावेळी बाहेरच्या देशातून जे कोणी बिझनेस साठी वा अन्य कामासाठी फॉरिन टुरिस्ट ते मुंबईतच येंतात त्यामुळे आकडेवारीवरुन असे दिसावयाचे की मुंबईमध्ये जास्तीत जास्त फॉरिन टुरिस्ट येतात. परंतु पर्यटनाच्या विकासाच्या दृष्टीकोनातून गेल्या 25-30 वर्षामध्ये महाराष्ट्रात पाहिजे तेवढे लक्ष दिले गेले नाही. कारण मुंबईमध्येच फक्त फॉरिन टुरिस्ट येत होते. त्याचप्रमाणे गल्फमध्ये रोजगार मिळतो म्हणून त्या ठिकाणी आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ या राज्यातून अनेक मजूर जात होते हे सर्व मजूर त्या राज्यातून मुंबईला येत होते आणि मुंबईहून गल्फमध्ये जात होते. परत येतांना ते गल्फमधून मुंबईला यावयाचे आणि मुंबईहून त्या त्या राज्यामध्ये जात होते. त्यामुळे पुस्तकातील आकडेवारीवरुन असे दिसून येते की टुरिझमसाठी फार बुस्ट आहे परंतु खरे म्हणजे मुंबई हाच सर्व टुरिस्टच्या दृष्टीकोनातून एक ट्रॅंझिट पॉईन्ट होता. आता 37 परसेन्ट फॉरिन टुरिस्ट आपल्या देशामध्ये येतात त्यात फारिन टुरिझम आणि डोमॅस्टिक टुरिझम यांची जर आपण तुलना केली तर आपल्याला असे दिसून येते की,डोमॅस्टिक टुरिझम मध्ये यु.पी आणि आंध्र प्रदेश व राजस्थान ही राज्ये वरच्या क्रमांकावर आहेत याचे कारण असे की , आंध्र प्रदेशामध्ये तिरुपती बालाजीचे मंदीर आहे आणि यु.पी.मध्ये आग्रा आणि बनारस आहे.त्यामुळे आंध्र प्रदेश आणि यु.पी.मध्ये डोमॅस्टिक टुरिस्ट जास्त जातात महाराष्ट्रात 2005 साली फॉरिन टुरिस्ट किती आले आले याचे आकडे पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की फॉरिन टुरिस्टचे प्रमाण 1.45 परासेन्ट एवढेच आहे. गोव्याची आकडेवारी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी दिली आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, महाराष्ट्रात 2005 साली 14 लाख 48 हजार 656 पर्यटक आले होते. गोव्यातील 2005 सालातील आकडे पाहिले असता असे दिसून येईल 3 लाख 36 हजार 803 एवढे पर्यटक आले होते. गोव्यामध्ये पाच वर्षापूर्वी 10 चार्टर फलाईटस येत होत्या परंतु आता 300 चार्टर फलाईटस येत आहेत ही गोष्ट खरी आहे. परंतु या टुरिस्टपैकी 75 टक्के

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी..

टुरिस्ट असे आहेत की,जे 100 डॉलर्सचे तिकीट काढून विमानात बसतात आणि हॉटेलमध्ये तीन किंवा सात दिवस राहतात परंतु ते हॉटेलमध्ये एक पाण्याची बाटली देखील घेत नाही वा काही खात पीत सुध्दा नाहीत. ते बाहेर रस्त्यावरील खातात व पाणी पितात या टुरिस्टमुळे काहीही रेव्हेन्यु जनरेशन होत नाही. जे लोक युरोप, इस्त्रायल, रशिया या देशातून येतात त्यामुळे गोव्यातील स्थानिक लोकांना तसेच हॉटेल इन्डस्ट्रीजला काहीही फायदा होत नाही त्याच्यामुळे रेव्हेन्यु जनरेशन काहीही होत नाही. त्यांना टुरिझम मध्ये "बॅक पॅकर्स" असे म्हटले जाते ते लोक फक्त झोपण्याकरता हॉटेल्समध्ये येतात आणि बाहेर माकेटमध्ये जाऊन फळे , ब्रेड वगैरे घेतात व तेथेच बसून खातात परंतु लक्झरीअस टुरिस्ट फक्त दहा ते 20 टक्के एवढेच आहे . महाराष्ट्रात मुंबई म्हणजे संपूर्ण देशाचे ज्युवेल ऑफ टुरिझम **आ**हे . आपण भारतातील कोणत्याही राज्यात जाऊन तेथील लोकांना विचारले की , आपल्याला भारतातील कोणत्या ठिकाणी भेट द्यावयाची आहे तर ते प्रथम असेच सांगतात की, आम्हाला मुंबईला जावयाचे आहे. तामिळनाडू,मिझोराम आसाम अशा कोणत्याही राज्यातील लोकांना आपण विचारले तरी ते हेच उत्तर देतात की मला देखील एकदा मुंबईला जावयाचे आहे ही वस्तुस्थिती आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MMP/SBT. श्री. गायकवाड नंतर --- 22:15

श्री. सुरेश शेट्टी ....

तेव्हा मुंबई इज ए ज्वेल ऑफ टुरिझम. मुंबईमध्ये उद्योग आहेत, बॉलीवूड आहे. सभापती महोदय, महाराष्ट्रात आपण 2006 मध्ये राज्याचे पर्यटन धोरण जाहीर केले. त्याद्वारा आपण एक कॉम्प्रिहेन्सिव पॉलिसी तयार केली आहे. त्यात सर्व उद्योग मग हॉटेल व्यवसायिक, टूर ऑर्गनायझर्स, कार भाड्याने देणारे वगैरे सर्व प्रकारच्या लोकांना आपण एकत्र घेऊन त्यांच्याशी बोलून पर्यटनाचे धोरण आपण जाहीर केले आहे. हेतू हा होता की, महाराष्ट्रात पर्यटनातून गुंतवणूक यावी. त्यात खाजगी गुंतवणूक म्हणजे हॉटेल्स व्यवसाय, करमणूक उद्योग, स्पोर्टस् विभागातील गुंतवणूक देखील आपण गृहीत धरली. त्यामध्ये आपण असे जाहीर केले की, मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड या सारख्या ठिकाणी पर्यटन उद्योगात गुंतवणूक करील त्यांना 50 टक्के सबसिडी दिली जाईल आणि राज्यातील इतर भागांमध्ये, जिल्ह्यांमध्ये गुंतवणूक केली तर 100 टक्के सबसिडी जाहीर केली. सभापती महोदय, आपण पर्यटनाच्या संदर्भात जेव्हा चर्चा करतो तेव्हा त्यात अनेक विभाग येतात. ते सगळे पिलग्रीम्स सर्किट आपण निश्चित केले. सभापती महोदय, मी जेव्हा या खात्याचा मंत्री झालो तेव्हा प्रत्येक सन्माननीय आमदार असेल, खासदार असतील ते आमच्याकडे येतात आणि आम्हाला विनंती करतात की, आमच्या गावामध्ये 500 वर्षापूर्वीचे जुने मंदिर आहे, तेथे भीम आला होता, राम आला होता. ते मंदिर चांगले व्हावे म्हणून 10 कोटी रूपये पर्यटन खात्याने द्यावेत. वगैरे वगैरे. माझे त्याबद्दल काहीही म्हणणे नाही. परंतु प्रत्येक गावामध्ये अशी 1-2 तरी मंदिरे असतातच आणि प्रत्येक आमदारांची, लोकप्रतिनिधींची मागणी हीच असते की, त्या मंदिरासाठी सरकारने पैसे द्यावेत. खरे तर हा त्या त्या जिल्ह्याच्या डीपीडीसीचा विषय असतो. त्यांनी त्यासाठी पैसे द्यायचे असतात, तसेच आमदार-खासदार फंडातून देखील त्यासाठी पैसे लोकप्रतिनिधी देऊ शकतात. तेव्हा सगळ्या आमदार-खासदारांचे एक वर्कशॉप घेऊन त्यांना प्रथमत: हे समजावून सांगावे लागेल की, पर्यटन म्हणजे नेमके काय आहे ? पर्यटन म्हणजे मंदिरे नाहीत, तर ती पिलग्रीम्स सर्किट आहेत. मुंबईमध्ये देखील अशीच मुंबादेवी, महालक्ष्मी, हाजीअली इत्यादी पवित्र स्थाने आहेत. त्याशिवाय राज्यामध्ये शिर्डी, पंढरपूर इत्यादीही ठिकाणे आहेत. प्रत्येक गावामध्ये अशी जी जुनी मंदिरे आहेत ती आपण दुरूस्त करायला गेलो तर त्यासाठी जेवढा पैसा लागणार आहे तो आपण कोठून आणणार आहोत ? अर्थात जी महत्त्वाची मंदिरे आहेत, पवित्र देवस्थाने आहेत उदा. अष्ट-विनायक मंदिरे, हरिहरेश्वर मंदिर इ. जी

...... 6बी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शेट्टी .....

महत्त्वाची स्थाने आहेत त्यांचा आपण त्या दृष्टीने जरूर विचार करू आणि करतो. परंतु लहान लहान मंदिरे आहेत त्यासाठी त्या त्या जिल्ह्यातील डीपीडीसीने आणि आमदार-खासदार निधीतून पैसे देऊन त्यांचा विकास केला गेला पाहिजे.

अ सभापती महोदय, डोमेस्टिक टुरिझममध्ये सांगावयाचे तर संपूर्ण महाराष्ट्रातून पंढरपूर, शिर्डी सारख्या ठिकाणी लोक मोठ्या संख्येने जात असतात. तसेच आपण कोस्टल टुरिझमची देखील चर्चा करतो. आता या ठिकाणी कोकणातील जास्तीत जास्त लोकप्रतिनिधी आहेत. आणि कोकणातील 720 कि.मी. लांबीचा कोस्टल एरिया आहे त्याचा फायदा पर्यटन विकासाच्या दृष्टीने आपण घेतला पाहिजे. मी आपल्या यापूर्वीच सांगितले आहे की, या संदर्भात आपण क्रिसिल कंपनीकडे प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम दिले असून त्यांचा अहवाल तयार केला आहे. त्यात त्यांनी संपूर्ण प्रकल्प सविस्तर सांगितले आहेत. 250 कोटी केंद्र सरकारकडून येणार आहेत त्यातील 100 कोटीचा आराखडा तयार केलेला आहे आणि बाकीच्या पैशाचे काय करणार हे मी पुन्हा येथे सारे सांगत बसणार नाही. परंतु इको-टुरिझम हाही पर्यटनाचा एक भाग आहे. 2006 मध्ये जेव्हा आपण राज्याचे पर्यटन धोरण जाहीर केले तेव्हा कॅबिनेटमध्ये हे इको-टुरिझम वन खात्याने करायचे असे ठरविले. आता उदाहरण म्हणून मी आपल्याला सांगेन की, माथेरान येथे आपल्याला रोप-वे करायचा आहे, गेली 10 वर्षे झाली तरी त्यासाठी आपल्याला वन विभागाकडून परवानगी मिळालेली नाही. ...

( यानंतर सौ.रणदिवे ..... 6सी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 22:20

श्री.सुरेश शेट्टी . . . .

एलीफंटा केव्हज्च्या ठिकाणी टॉयलेट बांधण्यासाठी फॉरेस्ट विभागाकडून परवानगी मिळालेली नाही एवढी भयानक परिस्थिती झाली आहे. मग त्यांना असे सांगितले की, तुम्ही पॉलिसी बनवावी, तुम्हाला जी मदत लागेल ती आम्ही करु.

सभापती महोदय, याठिकाणी मेडिकल टुरिझमच्या बाबतीत चर्चा झाली. महाराष्ट्रातील लोक इंटरनॅशनल फोरममध्ये जातात. याबाबतीत एक प्रश्न असा निर्माण झाला आहे की, जेव्हा आपण मेडिकल टुरिझम प्रमोट करतो, तेव्हा जे पेशंट घेऊन यावयाचे आहेत, ते कुठून येणार आहेत ? युरोपमधून येथे पेशंट येणार नाहीत, कारण तेथे हॉस्पिटल केअर सर्व्हीस सुपिरिअर आहे. मग याठिकाणी कोण येणार ? तर गल्फ कन्ट्रीमधील, श्रीलंका, इंडोनेशिया मधील जो मिडल क्लास वर्ग आहे, तो याठिकाणी येईल. पण आपल्याकडील सरकारी हॉस्पिटलमधील व्यवस्था कशी आहे ? हे आपल्याला सर्वांना माहिती आहे. तेथे आपल्याच लोकांना जागा मिळत नाही, तर बाहेरुन आलेल्या टुरिस्टंना कुठून मिळणार ? मी मंत्री म्हणून सांगू इच्छितो की, आमच्याकडे दोन रुम्स्च्या बाबतीत मागणी केली जाते. एक म्हणजे हॉटेलमधील रुम मिळण्याबाबत आणि दुसरी म्हणजे हॉस्पिटलमधील रुम मिळण्याबाबत आणि या दोन्ही रुम्स्ची कमतरता आहे. आपण कोणत्याही हॉस्पिटलमध्ये जाऊन पहावे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनाही माहिती आहे की, आज कोणत्याही हॉस्पिटलमधील आय.सी.यु.मध्ये एकही बेड उपलब्ध नाही आणि फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये एकही रुम उपलब्ध नाही. त्यामुळे जोपर्यंत नवीन हॉस्पिटल निर्माण होणार नाही, तोपर्यंत मेडिकल टूरिझमच्या बाबतीत बोलून फायदा नाही. पण या मेडिकल टुरिझमचा फायदा दिल्लीतील लोक घेतात. तेथे फाईव्ह स्टार हॉस्पिटल्स् आलेली आहेत. त्यामुळे आज गल्फ मधील लोक दिल्लीला जातात आणि छोटी-मोठी ऑपरेशन करुन परत जातात. तो स्कोप महाराष्ट्रात निर्माण करु शकतो. पुणे,औरंगाबाद,नाशिक या रिजनमध्ये 300 ते 500 बेडचे हॉस्पिटल्स् बांधली तर आपल्याला पुढच्या काळामध्ये मेडिकल टुरिझममध्ये खूप वाव आहे.

सभापती महोदय, याठिकाणी एन्टरटेंन्मेंट टुरिझमच्या बाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला. मी सांगू इच्छितो की, एन्टरटेंन्मेंट टुरिझम पॉलिसीबाबत चर्चा झाली, तेव्हा माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय अर्थमंत्री उपस्थित होते. त्यावेळी मी त्यांना एक साधा प्रश्न विचारला की, मुंबईमध्ये टुरिस्ट येऊन काय करणार आहेत ? तर ते एस्सेल वर्ल्ड, गेटवे ऑफ ...

. . . .6 सी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी . . . .

इंडिया आणि चौपाटी याठिकाणी जाणार आहेत. दहा वाजता हॉटेल्स्, शॉपिंग कॉम्प्लेक्स बंद होतात. मग काय करणार ? तर हॉटेलमधल्या रुमवर बसून बिअर प्यावयाची. अशी स्थिती असेल तर ते लोक म्हणतील की, मग आम्ही आमच्या देशात राहून बिअर पिऊ शकतो. माझ्याकडे इजिप्तचे एक डेलिगेशन आले होते. त्यांनी असे सांगितले की, आमचे लोक शॉपिंगसाठी चायनाला जातात. जर तुम्ही देखील येथील शॉपिंग मॉल्स् रात्री 12.00 वाजेपर्यंत सुरु ठेवले तर मग आमचे लोक तुमच्याकडे येतील. या सर्व गोष्टी इंटरनल डिपार्टमेंटच्या आहेत. यामध्ये केवळ पर्यटन विभाग काही करु शकत नाही. यामध्ये एक्साईज विभागाचाही भाग आहे. त्यांचे असे म्हणणे असते की,तुम्ही 12 वाजता सर्व बंद करावयास पाहिजे. अशा वेळी जर एखादी फॅमिली हॉटेलमध्ये बसलेली असली तरी सुध्दा पोलीस त्यांनाही पकडून घेऊन जातात. त्यामुळे आपल्याकडे टुरिस्ट अवेअरनेस निर्माण केला पाहिजे, तशा प्रकारचे वातावरण निर्माण केले पाहिजे. If tourists come, you have to receive them with a smile. आपण जोपर्यंत अशा प्रकारचे वातावरण निर्माण करणार नाही तोपर्यंत काही होऊ शकत नाही. 15-20 वर्षापूर्वी गोवा येथे नव्याने फाईव्ह स्टार हॉटेल्स् सुरु करण्यात आली. तेव्हा तेथील स्थानिक लोकांनी याला विरोध केला होता. पण आज तेथील स्थानिक लोक खुष आहेत. कारण त्यांनी चार पपयांची झाडे लावली आणि त्यामधून तीन पपया तयार झाल्यानंतर त्या हॉटेल्स् मध्ये जाऊन विकल्यानंतर त्यांना 500 रुपये मिळतात. तसेच त्यांनी भाजीपाला लावला आणि तो देखील या हॉटेल्स्मध्ये नेऊन दिल्यानंतर त्यांना 100 रुपये मिळू लागले. त्याप्रमाणे आपल्याला देखील कोकणामध्ये जाऊन लोकांना सांगावे लागेल. आपण ताजमहल हॉटेलला तेथे हॉटेल बांधण्यासाठी जागा दिली, पण तेथील स्थानिक लोक याला विरोध करीत आहेत की, आम्ही येथे हॉटेल बांधावयास देणार नाही. ओबेरॉय यांना दहा वर्षापूर्वी जागा दिलेली आहे, परंतु अजून तेथे काहीही सुरु झालेले नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.गायकवाड . . . .

DVG/ SBT/ KGS/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 22:25

श्री. सुरेश शेट्टी ..

जे स्थानिक लोक हॉटेल करण्याकरिता विरोध करतात त्यांना आपण समजावून सांगितले पाहिजे की, आपल्या गावामध्ये फाईव्ह स्टार हॉटेल सुरु झाल्यास गावातील लोकांना रोजगार मिळू शकेल. त्यांनी शेतामध्ये तयार केलेला माल त्यांना विकता येईल. या मालाला चांगला भाव मिळू शकेल. अशा प्रकारचे वातावरण तयार करण्याची आवश्यकता आहे. मी मघाशी एक्साईल बाबत सांगत होतो त्यावेळी माननीय मंत्री महोदय श्री. गणेश नाईक उपस्थित होते. आपल्याकडे 11 वाजता हॉटेल बंद करावे लागते. असे झाले तर मग आपल्या राज्यात पर्यटक कसे काय येणार ? या सर्व लहान लहान गोष्टींचा विचार आपल्याला करावा लागणार आहे.

सभापती महोदय, पर्यटनाचा विकास करण्यासंदर्भात हरियाणा राज्याने एक धोरणात्मक निर्णय घेतला आहे. गुडगाव येथे एक पर्यटक झोन डिक्लेअर केलेला आहे. हा झोन दिवसातील 24 तास सुरु असणार आहे. तेथे मॉल सुरु होणार आहे. अशा प्रकारची योजना मुंबईमध्ये केली पाहिजे. एग्रीकल्चर, माईन, टुरीझम यांचा विकास केला पाहिजे. चंद्रपूर जिल्हयामध्ये माईन टुरिझम प्रमोट करण्यासाठी एक प्रोजेक्ट करण्यात येणार आहे. आपण कोकणासंबंधी चर्चा केली होती. विदर्भातील जे आमदारांची एक कमिटी तयार केली जाईल या कमिटीमध्ये डिव्हीजन कमिश्नर चेअरमन असतील. या कमिटीच्या 3 महिन्यामध्ये बैठक घेतली जाते. आता या बैठकीमध्ये माननीय राज्य मंत्र्यांना चेअरमन केलेले आहे. तशाच प्रमाणे कोकणातील आमदारांची एक समिती तयार करण्यात येईल व या समितीमध्ये माननीय राज्यमंत्री किंवा मंत्री महोदयांना चेअरमन केले जाईल. तसेच 3 महिन्यामध्ये एकदा बैठक घेऊन कोकणातील पर्यटनाच्या विकासासांबंधी चर्चा करण्यात येईल. तसेच तेथील पर्यटनाचा विकास करण्याकरिता तेथील स्थानिक लोकांना भेटून ग्राउंड रिॲलिटी काय आहे याचा विचार करुन हे सर्व काम केले पाहिजे. आता क्रिसीलचा रिपोर्ट तयार झालेला आहे. त्यासंबंधी चर्चा करु. हे सर्व कसे कामे कशी काय फिजिबल हेतील याचा विचार केला जाईल.

सभापती महोदय, मुंबईतील एलिफन्टा केव्ह, वरळी, शिवडी, घोडबंदर बांद्रा किल्ला यांचा विकास करण्याचे काम सुरु करण्यात येणार आहे. बांद्रा किल्ल्याचे काम संपत आले आहे.तसेच

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ..

माहीम किल्ल्याचा विकास करण्याचे काम सुरु करण्यात येणार आहे. परंतु तेथे साधारण 300 ते 359 झोपडया आहेत त्यांचे पुर्नवसन एमएमआरडीएकडून प्रथम करावे लागणार आहे. माहीम किल्ल्याचा विकास करण्याचे काम सुरु करण्यात येणार आहे. परंतु तेथे साधारण 300 ते 359 झोपडया आहेत त्यांचे पुर्नवसन एमएमआरडीएकडून प्रथम करावे लागणार आहे.

सभापती महोदय, मराठवाडा विकास पॅकेज अंतर्गत प्रत्येक जिल्हयातील पर्यटनाच्या विकास कामासाठी 3 कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच प्रत्येक जिल्याच्या कलेक्टरांनी दर वर्षी एक प्रोजेक्ट पाठविला पाहिजे. आता हे काम टीसीएसला दिलेले आहे. त्यांचा अहवाल आलेला आहे. मराठवाडयामध्ये प्रत्येक जिल्हयात एक कार्यक्रम होती घेतला जाणार आहे तसेच हा कार्यक्रम राबविण्याचा देखील प्रयत्न केला जाणार आहे.

सभापती महोदय, मी याठिकाणी एक महत्वपूर्ण घोषणा करु इच्छितो की, विदर्भ क्वीन ही नवीन एक्सप्रेस विदर्भामध्ये सुरु करण्यात येणार आहे. तिचे उद्घाटन 9 मे ला होणार आहे. डेक्कन ओडीसी नंतर सुरु होणारी ही दुसरी लक्झरी गाडी आहे. या गाडीला 6 एसीचे डबे आहेत 1 नॉन एसीचा डबा आहे. 1 ऑब्झर्व्हेशन कार आहे. अशी ही सुपर डीलक्स गाडी आहे. सीओनी ते काना व नागपूर ते ताडोबा असा तिचा प्रवास असणार आहे. सकाळी या गाडीने प्रवाशांना जंगलामध्ये नेले जाईल . तेथे त्यांची राहण्याची सोय करण्यात येईल. दुसऱ्या दिवशी सकाळी जंगलातील वन्य प्राण्यांचे दर्शन केले जाईल. तेथेच त्यांचा ब्रेकफास्ट, लंच, डीनरची देखील सोय करण्यात येणार आहे व दुस:या दिवशी प्रवाशांना परत सोडविले जाईल. या गाडीचे 9 तारखेला सकाळी 10 वाजता उद्घाटन करण्यात येत असून या कार्यक्रमाचे निमंत्रण सर्व माननीय आमदारांना पाठविण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ......

सभापती महोदय, आपण जेव्हा पर्यटनासंबंधी बोलतो तेव्हा गोवा, केरळ या राज्यांबद्दल बोलतो. गोवा आणि केरळ राज्याचे पब्लिसिटी बजेट आहे, मी जे लहानलहान देश आहेत त्यांच्या बाबतीत बोलत नाही. मॉरिशस, फिनलँड, आयर्लंड, स्वित्झरलँड वगैरे जे लहान देश आहेत तसेच आपल्या देशातील जी लहान राज्ये आहेत उदा. छत्तीसगड, झारखंड, गोवा , केरळ या राज्यांचे पब्लिसिटी बजेट पाहिले तर त्या मानाने आपल्या महाराष्ट्राचे पब्लिसिटी बजेट काहीच नाही. एका वर्षी आम्हाला 12 कोटी रुपयांचे बजेट दिले आणि नंतर ते सुध्दा काढून घेतले. त्याबाबत मी या सभागृहात स्पष्ट केले होते. मी एका अधिकाऱ्याला विचारले की, या वर्षी पैसे का काढून घेतले तर त्यांनी सांगितले की, मागच्या वेळी ते आम्ही चुकीने दिले होते. टुरिझममुळे शासनाला रेव्हेन्यू मिळतो हे तरी लक्षात घ्यावे. डायरेक्ट रेव्हेन्यू जनरेट होत नसेल पण जे काही पर्यटक येतात त्यांच्यापासून आपल्याला सेल्स टॅक्स मिळतो, एक्साईज ड्युटी मिळते. हे सर्व आपल्याला टुरिझममुळे मिळते. परंतु पुढच्या पाच वर्षात आपण पर्यटनामध्ये काय करणार आहोत याबाबत आपण सर्वांनी बसून एक व्हिजन तयार करावी लागेल. नुसती भाषणबाजी करुन उपयोग होणार नाही. मुंबईचे ग्लोबली जे ब्रँडनेम इस्टॅब्लिश झाले त्या ब्रँडनेमची आपण फक्त रॉयल्टी घेत राहणार. त्यामुळे मुंबई सोडून दुसरी काही ठिकाणे आपण डेव्हलप करणार आहोत की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. आपण आज जी चर्चा केली हे पहिले पाऊल आहे असे मला वाटते. यापुढे प्रत्येक अधिवेशनामध्ये सर्व सन्माननीय सदस्यांनी एक एक दिवसाची जिल्हावार चर्चा लावावी, मग या पर्यटन खात्याला महत्व मिळेल याची मला खात्री आहे.

सभापती महोदय, मी जास्त बोलणार नाही पण मी एकच सांगू इच्छितो की, केंद्र सरकार आता आपल्याला फायनान्शियली खूप मदत करीत आहे. आपण एम.टी.डी.सी. ला जास्त दोष देऊन फायदा नाही. आता एम.टी.डी.सी.चे जे अधिकारी आहेत ते चांगले काम करीत आहेत. आपण तारकर्ली येथे हाऊस बोट चालू केली आहे तसेच स्कुबा डायव्हींग चालू केले आहे. मी नंदूरबार जिल्ह्याचा पालकमंत्री आहे. नंदूरबारला तोरणमाळ म्हणून हिल स्टेशन आहे. त्या ठिकाणी आपण 12 कोटीचा प्रोजेक्ट फायनलाईज केला आहे. पुढच्या महिन्यात माननीय मुख्यमंत्री



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/KTG/ MMP

श्री. सुरेश शेट्टी ......

भूमिपूजन करणार आहेत. पहिल्या टप्प्यामध्ये आपण तोरणमाळ येथे 5 कोटी रुपये खर्च करणार आहोत. दुसऱ्या टप्प्यामध्ये 7 कोटी रुपये खर्च करुन तोरणमाळ हे महाबळेश्वरपेक्षा चांगले हिल स्टेशन होऊ शकते इतकी ती चांगली जागा आहे. मी आपल्याला विश्वासाने सांगु इच्छितो की, Toranmal will be a better hill station than Mahabaleshwar in next few years. आपण नवीन नवीन ठिकाणे काढत बसतो. आमचे जे रिसॉर्ट आहेत त्याबाबत असे धोरण होते की, जी पर्यटन स्थळे आहेत, ज्या ठिकाणी खाजगी गुंतवणूकदार येत नाहीत त्या ठिकाणी एम.टी.डी.सी.ने इनिशियल इन्व्हेस्टमेंट करुन आपले रिसॉर्ट सुरु करावयाचे. आता आपण ज्या ज्या ठिकाणी रिसॉर्ट उभे केलेले आहेत ते आपण खाजगी उदयाजोकांना मॅनेजमेंटसाठी देत आहोत. कारण आपण जर तारकर्लीला गेलो आणि चहा मागितला तर प्लास्टिकच्या ग्लासमध्ये चहा आणून देतात. त्यामुळे क्वॉलिटी आणि सर्व्हिस या पर्यटनामध्ये सर्वात महत्वाच्या बाबी आहेत. आपण जेव्हा कोठेही बाहेर जातो तेव्हा आधी रुम बघतो. त्या रुमचे लिनन कसे आहे, पिलो कव्हर कसे आहेत, बाथरुम कसे आहे हे आपण बघतो. या तीन गोष्टी चांगल्या नसतील तर ताबडतोब पर्यटक बाहेर निघून जातात. आपण चहाची ऑर्डर दिल्यानंतर तो चहा जर प्लास्टिकच्या ग्लासमध्ये आणला तर परत त्या ठिकाणी पर्यटक येणार नाहीत. त्यामुळे आपण निविदा मागवून प्रायव्हेट प्लेयर्सना, प्रायव्हेट कंपन्यांना रिसॉर्ट देत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे आपले जे भूखंड आहेत, मग ते अलिबागमध्ये असो किंवा कोठेही असो, आपण बी.ओ.टी. तत्वावर देण्यास तयार आहोत. आपण अट घातली आहे की, त्यासाठी पाच वर्षाचा फाईव्ह स्टार हॉटेलचा अनुभव पाहिजे. पाच वर्षाचा थ्री स्टार हॉटेलचा अनुभव पाहिजे. आपण हे प्रायव्हेट प्लेयर्सनाच देत आहोत आणि त्यामध्ये एम.टी.डी.सी. ला रेव्हेन्यू मिळतो हे खरे आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण साहेबांनी सांगितले की, कोकणात त्यांच्या गावात लहानलहान घरात बेड अँड ब्रेकफास्टची जी योजना सुरु केलेली आहे. त्यासंदर्भात आपण या अर्थसंकल्पामध्ये अडीच कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. जवळपास 400 लोकांनी या बेड अँड ब्रेकफास्ट योजनेमध्ये नावे नोंदविली आहेत. आपण कोकणामध्ये बेड अँड ब्रेकफास्ट योजनेमध्ये जास्तीतजास्त इन्व्हॉल्वमेंट करण्याचा प्रयत्न केला तर खूप लोकांना या योजनेचा फायदा होईल.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी....

सन्माननीय सदस्या डॉ.श्रीमती नीलम गो-हे यांनी बॉलिवूडसंबंधीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबत मी सांगेन की, मी दोन वर्षे खूप प्रयत्न केला आहे. फिल्म इंडस्ट्रीमध्ये निर्माते, निर्देशक हे माझे मित्र आहेत. त्या सर्वांबरोबर बोललो आहे पण त्यात मला यश लाभले नाही. हॉलिवूड टूरिझम चालू आहे, पण बॉलिवूडचे ॲक्टर्स सांगत आहेत की, बाहेरचे ॲक्टर्स आले तर आम्हाला डिस्टर्ब होईल. आम्ही शूटिंग करु शकणार नाही, त्याचे कारण मला समजलेले नाही. पण आता एक-दोन निर्माते तयार झाले आहेत. त्यांनी मला असे सांगितले आहे की, आम्ही स्वत:चे स्टुडिओ उभे करतो. त्यामध्ये सी थ्रू मिरर होणार नाही, ॲक्टर्सना डिस्टर्ब होणार नाही अशाप्रकारचे प्रस्ताव घेऊन येत आहोत. फिल्म सिटीमध्ये ए.सी.ची सोय आहे, तेथे शूटिंग केले जाते. परंतु त्यांचे असे म्हणणे आहे की, पण आम्ही व्हिजिटर्सना अलाऊ करणार नाही. आमचे व्हीआयपी गेस्ट असले तरी त्रास होतो. बॉलिवूड टूरिझम आहे त्याचे सुंदर प्रपोजल आहे, मला वाटते की, संपूर्ण विश्वात एनआरआय आहेत. ते बॉलिवूड टूरिझमसाठी कितीही पैसे देण्यासाठी तयार आहेत. पण इंडियन फिल्म इंडस्ट्री इज नॉट रेडी टू ॲक्सेप्ट. मी माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांना यासाठी भेटण्यासाठी तयार आहे. पर्यटन वाढण्यासाठी माझी कोणालाही भेटण्याची तयारी आहे. आपण त्यांना विनंती करु. मी कोठेही जाण्यास तयार आहे. पर्यटनाचा विकास होत असेल तर माझी काही हरकत नाही. कोकणामध्ये ताज ग्रुपला एक आयटीआय दिलेले आहे. ताज ग्रूपने टेकओव्हर केलेले आहे. हॉटेल उद्योगाचे जे ट्रेड आहेत त्या ट्रेडचे स्थानिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाईल. तसेच अवेअरनेससाठी आणि पर्यटन हा विषय अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट करण्यासाठी मी माननीय शिक्षण मंत्र्यांना सूचना करतो. सभापती महोदय, सर्व सन्मानीय सदस्यांच्या मुद्यांना मी उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे, आपण मला उत्तर देण्याची संधी दिली आहे त्याबद्दल आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



23-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 6F-2

NTK/ KTG/ KGS/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, पर्यटनासंबंधी राज्य स्तरावर या सभागृहात अतिशय चांगली चर्चा झाली आहे. या प्रस्तावावर अनेक माननीय सदस्यांनी पर्यटन विकासाच्या दृष्टीने आपले विचार मांडले आहेत. त्या सर्वांचे मी प्रथम आभार मानतो. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी त्याला समर्पक असे उत्तर दिले आहे त्याबद्दल मी त्यांनाही धन्यवाद देतो.

सभापती महोदय, कोकणातील विशेषत: सिंधुदुर्ग जिल्हयातील पर्यटनाचा प्रश्न असो त्यासंबंधी कॉम्प्रिहेन्सिव्ह चर्चा झाली आहे. तरी सुध्दा मला सन्माननीय मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, पर्यटन विकास महामंडळाच्या अध्यक्षांची आणि उपाध्यक्षांची नियुक्ती शासनाने अद्याप केलेली नाही. या सरकारला आता 4 वर्षे झाली आहेत आणि 1 वर्ष शिल्लक राहिले आहे, तरीही आम्हाला या महामंडळाचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष कोण आहेत ते माहीत नाही. या विभागाचे मंत्री अध्यक्ष आणि राज्यमंत्री उपाध्यक्ष म्हणून काम पहात असतील ते ते योग्य नाही. कारण पर्यटन विकास महामंडळ ही स्वायत्त संस्था आहे. त्यामुळे या महामंडळावर पूर्वीप्रमाणे अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची नियुक्ती तातडीने करावी अशी मी यानिमित्ताने विनंती करतो. सभागृहामध्ये अतिश चांगल्या वातावरणात या प्रस्तावावर चर्चा झाल्यामुळे मी सर्वांचे आभार मानतो आणि येथेच थांबतो.

**सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी ग्लोबल वॉर्मिंगसंबंधी नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडला होता, त्यावरील सन्माननीय सदस्यांची भाषणे पूर्ण झालेली आहेत. सभागृहाचे उद्याचे कामकाज विचारात घेता रात्री 9 ते 9.30 वाजण्याची शक्यता आहे. त्यामुळे नंतरच्या वेळेमध्ये या प्रस्तावावरील उत्तर देण्याची संधी मिळू शकेल. सन्माननीय पर्यावरण मंत्री श्री.गणेश नाईक याठिकाणी उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, या प्रस्तावावरील उत्तर आता होण्यासाठी मला सहकार्य करावे.

-------

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 22:40

**पृ.शी.**: ग्लोबल वॉर्मिंगमुळे होणा-या हवामानातील बदलाचा मुंबई शहरावर होणारा परिणाम

**मु.शी.**: ग्लोबल वॉर्मिंगमुळे होणा-या हवामानातील बदलाचा मुंबई शहरावर होणारा परिणाम या विषयावर डॉ. दीपक सावंत, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, भास्कर जाधव, ॲड.अनिल परब, सर्वश्री. सय्यद मुझफ्फर हुसेन, मधुकर चव्हाण, गुरुनाथ कुलकर्णी, अरविंद सावंत, श्रीमती अलका देसाई, श्री. विनोद तावडे, प्रा. फौजीया खान, श्री. परशुराम उपरकर, श्रीमती उषा दराडे, सर्वश्री कपिल पाटील, उल्हास पवार, प्रा. सुरेश नवले व श्री. राजन तेली,वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु...)

श्री. गणेश नाईक (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. भासकर जाधव, सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन, सन्माननीय सदय श्री. मधुकर चव्हाण आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी ग्लोबल वार्मिंच्या संदर्भात चर्चा उपस्थित करुन आपले विचार व्यक्त केलेले आहेत. ग्लोबल वॉर्मिंग हा आज जगाचा चिंतेचा विषय झालेला आहे. कालच वसुंधरा दिन साजरा झाला. सन 1969मध्ये वॉशिंग्टन येथील सेटन शहरामध्ये पर्यावरणाचा अभ्यास केलेल्या जगातील तज्ज्ञांची बैठक झाली आणि त्या दिवसाला वसुंधरा दिन म्हणून म्हटले गेले. पहिली कॉन्फरन्स 1970 मध्ये झाली होती. त्यानंतर 35 वर्षाचा कालखंड गेला. जगाच्या समस्या हव्यासापोटी अतिशय वाढत गेलेल्या आहेत. वाढत्या लोकसंख्येच्या गरजेपोटी शेत जमिनी आणि वनामध्ये नागरीकरण करावे लागले. शहरामध्ये झोपडपट्टी पुनर्वसनासाठी एसआरअे योजनेंतर्गत तसेच ग्रामीण भागामध्ये इंदिरा आवास योजना, वाल्मिकी आवास योजनांतर्गत कामे होऊ लागली. सूर्याची उष्णता ही पृथीवर पडताना त्याला अडसर नसल्या कारणाने थेट जमिनीमध्ये जाते. त्यामुळे जमिनीचे तापमान वाढते. हे तापमान वाढायला लागलेले आहे याचे कारण वनांची झालेली तोड. जगामध्ये काही गोष्टी हव्यासापोटी, ऐषआरामी जीवन जगण्यासाठी होऊ लागल्या.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 22:40

(श्री. गणेश नाईक...)

ह्या गोष्टी जितक्या गतीने मिळतात तितक्याच गतीने जीवनाचा ऱ्हास होऊ लागलेला आहे हे मला येथे नमूद करायला कोणताही प्रत्यवाय वाटत नाही. आपल्या शहरामध्ये सुका कचरा आणि ओला कचरा निर्माण होतो. ओला कचरा तसाच ठेवला तर त्यामधून मिथेन गॅस निर्माण होतो. हा मिथेन गॅस पर्यावरणाला घातक आहे. सर्व महानगरपालिकांमध्ये नवी मुंबई महानगरपालिका ही पहिली महानगरपालिका आहे की जिने ब्रिटीश कंपनीबरोबर करार करुन सुका कचरा, ओला कचरा वेगवेगळा करुन ओल्या कच-यापासून निर्माण होणा-या मिथेन गॅसवर वीज निर्माण केली आहे. अशा प्रकारचा प्रयोग सर्व ठिकाणी व्हावा यासाठी पर्यावरण मंत्री म्हणून मी प्रयत्नशील आहे. मध्यंतरी कार्बन्डायऑक्साईड, नायट्रॉक्साईड, क्लोरोफ्युरो, कार्बन मोनाक्साईड ...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक...

कार्बन मोनोक्साईड आणि हॅयड्रो कार्बन हे वायू ओझोनचा थर फोडून काढतील अशी भीती वाटू लागली आहे. औद्योगिकीकरणातील बॉयलर मधून निर्माण होत असलेले प्रदूषण तसेच त्यामुळे मोठया प्रमाणात उष्णता देखील निर्माण होत आहे. गतीने जाण्यासाठी पूर्वी वापरलेल्या डिझेट ट्रक्स, शिसेरहीत असलेले पेट्रोल या गोष्टी पर्यावरण बिघडविण्यास कारणीभूत आहेत. मुंबईतील वाहनांनी एल.पी.जी.चा वापर करावा अशी सक्ती करण्यात येत आहे. 15 वर्षापूर्वीची जुनी मोठी वाहने आहेत त्यांना मुंबईत येण्यावर बंदी घालण्यात आली आहे. एम.एम.आर.डी.ए.च्या संपूर्ण परिसराचा यामध्ये समावेश करण्याचा विचार आहे. पुणे, नाशिक ,नागपूर, औरंगाबाद अशी जी मोठी शहरे आहेत त्या ठिकाणी अशा प्रकारचे धोरण राबविण्याचा शासनाचा विचार आहे. कोळश्यापासून निर्माण होणारी वीज केंद्रे हा देखील एक मोठा चिंतेचा विषय झालेला आहे. भविष्यात सौर ऊर्जा, वीन मिल, बायोडिझेल, समुद्राच्या लाटांपासून होणारी वीज निर्मिती, इथेनॉलचा वापर मोठया प्रमाणात करण्याचा शासनाचा मानस आहे. मळीपासून इथेनॉलची निर्मिती होते. त्याचा वापर दारु निर्मितीसाठी न करता वीज निर्मितीसाठी करावा असा शासनाचा प्रयत्न आहे. इथेनॉल वापरण्याकरिता प्रस्ताव आला होता, परंतु सक्ती करण्यात आली नव्हती. केंद्रीय रसायन विभागाने आईल कंपन्यांना इथेनॉलचा वापर 5 टक्के करण्यात यावा अशी सक्ती केली आहे. 10 ते 15 टक्के इथेनॉल कार्यरत असलेल्या यंत्रणेच्या माध्यमातून वापर करता येऊ शकतो. ब्राझील देशात 100 टक्के इथेनॉल वापरले जाते. इथेनॉलचा वापर करावयाचा असेल तर त्यासाठी वेगळी यंत्रणा प्रत्येक ठिकाणी बसवावी लागेल. डिझेल, रॉकेलचा मोठया प्रमाणात वापर होतो आहे तो वापर थांबविला पाहिजे. मुंबई व राज्यातील मोठया शहरात वाहतुक व्यवस्थित व्हावी म्हणून सिग्नल्स यंत्रणा बसविण्यात आली आहे. त्याला फ्लॉय ओव्हर हा पर्याय आहे. हे सिग्नल टाळावयाचे असतील तर मोठया शहराच्या एकेका विभागातून आर-पार जाणारे एलिमेंटरी रुटस् निर्माण करणे आवश्यक आहे. वाहने गतीने चालतात त्यावेळी त्या वाहनांमधून कार्बनडॉय ऑक्साईड कमी प्रमाणात निर्माण होतो. शहरातील प्रत्येक सिग्नलवर वाहने थांबतात, परंतु सिग्नल संपल्यानंतर वाहन सुरु करताना वाहनातून मोठया प्रमाणात धूर बाहेर फेकला जातो त्यामुळे प्रदूषणात मोठया प्रमाणात वाढ होत आहे. महाराष्ट्राला मोठा कोस्टल एरिया मिळालेला आहे. महाराष्ट्रातील समुद्रातील पाण्याच्या वापर जल वाहतुकीसाठी केला गेला पाहिजे. याबाबतीत आपणा

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक....

सर्वांमध्ये जागरुकता येण्याची गरज आहे. मुंबईतील काही भागांना धोका आहे. त्सुनामीची लाट कधीही येण्याची शक्यता आहे. मी अतिशय विनम्रपणे सांगतो की, 1996 या वर्षी असताना 1000 फूट रुंदीची गुजरात बॉर्डरपासून ते गोवा बॉर्डरपर्यंत वृक्षांची भींत निर्माण करावी असे प्रस्तावित केले होते. मॅग्रोज आहेत, त्यानंतर सुरुची झाडे आणि त्यानंतर निलगिरीची झाडे,त्यानंतर बांबुची लागवड अशा वृक्षांची एक हजार फुट रुंदीची वृक्षांची भींत उभी केली तर निसर्गाचा समतोल व्यवस्थित मेंटेन होऊ शकतो. ऑबेरॉय हॉटेलच्या समोर अशा प्रकारची वृक्षांची भींत उभी करण्याचे ठरविले तर हॉटेल मालक तसेच त्या ठिकाणचे रहिवासी हरकत घेतील की, समुद्राचा चांगला देखावा आहे तो कशाला घालवता ? काल माननीय सभापतींच्या दालनात बैठक झाली. तेथे यासंबंधी थोडीशी चर्चा देखील झाली. ज्या बेटाच्या खोली जास्त असते ,त्या ठिकाणी त्सुनामीचा प्रादूर्भाव कमी प्रमाणात होतो. परंतु ज्या बेटावर उथळ खटक असतो तेथे त्सुनामीचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता जास्त असते. डेथ असलेल्या बेटावरील वस्ती या संकटातून वाचते. उथळ जागी असलेले बेट अशा लाटेमुळे पाण्याखाली नाहीसे होते. उथळ भूभाग आहे तो खोल करणे हा एक त्यावर पर्याय आहे. दिनांक 26 जुलै रोजी मुंबई शहरात जो प्रलय झाला होता, तो प्रलय 100 वर्षाच्या इतिहासातील पहिला प्रलय होता. सर्व गोष्टीमध्ये ब्रिटीश लोक सतर्क रहावयाचे. ते लोक फार सेफर असावयाचे. त्यांनी मुंबईतील नद्यांची पाण्याच्या पातळीची उंची ठरविली होती. परंतु त्या दिवशी ब्रिटीशांनी नद्यामधील पाण्याची उंची ठरविली होती, त्यापेक्षा 4 मीटर जास्तीचे पाणी या नद्यांमधून वहात होते.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक ....

निसर्गाचा कोपच झाला होता. सर्व सन्माननीय सदस्यांनी याविषयाबाबत ज्या सूचना केलेल्या आहेत त्या महत्वाच्या आहेत. परंतु यासाठी जागरुकता येण्याची आणि सर्वांना सहभागी करुन घेण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील नद्यांची परिस्थिती पाहिली तर एका शहराचे सांडपाणी दुसऱ्या शहराला पिण्यासाठी वापरले जात आहे. पर्यावरण विभागाने याबाबत असे सुचविले आहे की, गांव, नगरपालिका मग त्या अ वर्ग,ब वर्ग आणि क वर्ग असोत तसेच महानगरपालिका यांच्याकडे विचारणा केली जाणार आहे की सांडपाण्याचा हिस्सा किती आहे आणि या सांडपाण्यावर ट्रीटमेंट करण्यासाठी किती खर्च लागणार आहे याची माहिती घेतली जाणार आहे. महानगरपालिका, नगरपालिका यांच्याकडे पैसा नाही आणि राज्य शासन मदत करण्याच्या परिस्थितीमध्ये नाही. अशा परिस्थितीमध्ये खाजगी लोकांच्या पैशाचा वापर करुन उपाय शोधावा लागेल. सांडपाण्याचे प्रमाण इंटरनेटवर फ्लॅश करुन टेंडर काढले जातील आणि याबाबतीत खाजगी लोकांना पर्यावरण विभाग मार्गदर्शन करील. ग्रामपंचायत, महानगरपालिका बांधकाम करतील. अशा नदीतील सांडपाणी शुध्द करण्यासाठी अतिशय शीघ्र गतीने उपाय करण्याचे सुचविलेले आहे. त्याचप्रमाणे मेट्रो, स्कायबस, किंवा गतीमान रेल्वे त्याचप्रमाणे सौरऊर्जेचा वापर याचा उपयोग करावा लागणार आहे. ठाणे महानगरपालिकेने हे सक्तीचे केलेले आहे की सौर ऊर्जा आणि रेन हॉर्वेस्टींग केल्याशिवाय बांधकामची सीसी आणि ओसी दिली जाणार नाही. अशा प्रकारचे नियम बनविण्याची गरज आहे आणि त्याप्रमाणे ते बनविले जातील आणि त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे यासभागृहातील आणि खालच्या सभागृहातील काही सदस्य तसेच या विषयातील तज्ज्ञ लोकांची चर्चा घडवून आणण्यासाठी एका समितीचे गठन करण्याचा विचार आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जी चर्चा उपस्थित केली ती ऐकण्याची उत्सुकता मला होती. परंतु त्यातील मुद्दे मी पाहिलेले आहेत. आपण मांडलेल्या भूमिकेचा शासन गंभीरपणे विचार करील आणि खात्याच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या जातील आणि गरज पडली तर परदेशातील याविषयातील तज्ज्ञ लोकांचा सल्ला देखील गरज पडली तर शासन घेईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी अतिशय थोडक्यात आणि समर्पक असे उत्तर दिलेले आहे. मुंबईची काळजी सगळयात जास्त आहे. कारण देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईसाठी विशेष कायदे करण्याची गरज आहे. पुढील 50 वर्षे डोळयासमोर ठेवून आपण

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

कायदे केले नाहीत तर हे असेच चालू राहील. परंतु कायदे केले तर येणारी पिढी आपल्याला धन्यवाद देईल आणि मंत्रीमहोदयांना देखील धन्यवाद देईल. दूरदृष्टीने मुंबईसाठी विशेष कायदे करण्यात येतील काय ? त्यासाठी लीड घ्यावा लागेल. हा प्रश्न केवळ एकाच विभागाशी संबंधित नसून यामध्ये वन खाते, नगरविकास खाते तसेच आरोग्य खात्याचा संबंध येतो. म्हणजे याविषयात 4/5 खाती अंतर्भूत आहेत. मंत्रीमहोदयांनी याबाबतीत समिती गठीत करण्यात येईल असे सांगितले त्याबद्दल धन्यवाद देतो. त्यामध्ये महाराष्ट्रातील काही तज्ज्ञ लोकांचा देखील समावेश करावा. तसेच या समितीची आढावा बैठक दर 2/3 महिन्यांनी घेण्यात यावी. नाहीतर समिती गठीत झाल्यावर ती नांवापुरती होता कामा नये. पर्यावरणातील बदलाचे आणि जगातील बदलांचा आढावा दर तीन महिन्यांनी ही समिती घेईल काय ?

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/ 22:55

श्री.गणेश नाईक :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, मुंबईच्या अनुषंगाने काही खास तरतूद करावी लागेल. मुंबई शहराचे अनन्यसाधारण महत्व आहेच. परंतु महाराष्ट्र स्तरावर एकूणच कायदे केलेले आहेत. दुर्दैवाने त्याची अंमलबजावणी होत नाही. गरजेएवढी कायद्यात सुधारणा केली जाईल. गांभीर्याने त्याच्या अंमलबजावणीचा अहवाल दरवर्षी सभागृहाला सादर केला जाईल. The Environment Minister will submit a Report for every year. त्याचबरोबर बैठक एकदाच होणार आहे. त्या बैठकीत विविध तज्ञांनी केलेल्या सूचनांबाबत खात्याच्या अधिकाऱ्यांमार्फत दरवर्षी अहवाल प्राप्त होणार आहे. आपल्याला वारंवार बैठक घेण्याची गरज नाही.

श्री सय्यद जामा : सभापति महोदय, ग्लोबल वॉर्मिंग की समस्या बहुत गंभीर होती जा रही है. इसलिए इस समस्या से निपटने के लिए जिन विभागों और कानूनों का सहयोग आवश्यक है, उन सब को एक साथ मिलकर काम करना होगा. जैसे- एयर पोलूशन संबंधी कानून, वाटर पोलूशन संबंधी कानून, पर्यावरण संबंधी कानून, वन संबंधी कानून है, इन सब कानूनों को इन्टिग्रेट करके एक व्यापक कानून बनाया जाए. क्या सरकार इस पर विचार करेगी ?

श्री.गणेश नाईक : याठिकाणी मंत्रिमंडळाच्या बैठका होत असतात. खास करुन सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे हा विषय नगरविकास, वन, पर्यावरण आणि आरोग्य विभागाशी निगडित आहे. बायो मेडिकल वेस्टची विल्हेवाट लावणे वगैरे बाबी संदर्भात नगरविकास, पर्यावरण, वन आणि आरोग्य विभागाच्या सचिवांशी माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होण्यासाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांना पत्र पाठवून त्या अनुषंगाने निश्चित गांभीर्याने त्यावर चर्चा घडविली जाईल.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, ग्लोबल वॉर्मिंगचा सर्वात मोठा धोका अणू उर्जेमुळे आहे. दोन महायुध्दे झाली. तिसरे महायुध्द होऊ नये म्हणून जागतिक शांतता परिषद व्हावी यासाठी भारताने पुढाकार घ्यावा. महाराष्ट्राने त्या परिषदेचे आयोजन करावे आणि ती परिषद मुंबईमध्ये भरविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करावा अशी मी सूचना केली होती. त्यासाठी प्रयत्न केला जाईल काय?

..2..

श्री.गणेश नाईक : जागतिक शांततेच्या अनुषंगाने आपल्या देशाचे प्रमुख आवाहन करु शकतात. त्यांच्यामार्फतच प्रयत्न करावे लागतील. आपण डायरेक्ट परिषदेचे आयोजन करु शकणार नाही. सन्माननीय सदस्यांचा उद्देश अतिशय चांगला आहे. आपण माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या मार्फत माननीय पंतप्रधान महोदयांना सांगून तसा प्रयत्न करु शकतो.

**सभापती** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

आज याठिकाणी संपूर्ण कामकाज पूर्ण करण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी सहकार्य दिल्याबद्दल सर्वांना व्यक्तिशः धन्यवाद देतो.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या गुरुवार, दिनांक 24 एप्रिल, 2008 रोजी सकाळी 9.30 ते 10.30 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. या बैठकीत प्रलंबित पाच अर्धातास चर्चा घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 10.45 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 10 वाजून 59 मिनिटांनी गुरुवार, दिनांक 24 एप्रिल, 2008 रोजीच्या सकाळी 9.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही